THE LIBRARY

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ

S. N. D. T.
WOMEN'S UNIVERSITY
MUMBAI

Rs 75/-

मराठी कन्यांचा कल्पवृक्ष

# म. धोंडो केशव कर्वे

सौ. सुधा चाफेकर

SNDT W.U. Library, Churchgate
M923.754 138284
Kar/Cha

923.754
M Kar/Cha

138284

चंद्रकला प्रकाशन

[illegible] - ११

[illegible] वाफेकर.

[illegible] व आतील छपाई :
[illegible] कला मुद्रण, पुणे.

●
अक्षर जुळणी :
सौ. पद्मिनी रुईकर
१३९५, कसबा पेठ,
पुणे - ४११ ०११.

●
प्रथमावृत्ती :
डिसेंबर १९९५

●
पुनर्मुद्रण :
ऑगस्ट १९९७

●
किंमत ७५/- रुपये

महर्षी कर्व्यांप्रमाणे समाजाकार्यावर
नितांत श्रद्धा ठेवून
सतत कार्यमग्न असणारे मातुलत्रयी
श्री. मुकुंद प्रभाकर दाबके, सातारा
श्री. जनार्दन प्रभाकर दाबके, पुणे
श्री. विश्वनाथ प्रभाकर दाबके, पुणे
यांना
आदरपूर्वक अर्पण.

# निश्चयाचा महामेरू

**'निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ॥'**

धोंडो केशव कर्वे

१९५० सालच्या माझ्या स्वाक्षरीच्या डायरीतील महर्षी कर्व्यांनी मला दिलेला स्वाक्षरीबरोबरच्या संदेश मी कितीदातरी वाचला होता. त्यावेळी मी १३-१४ वर्षांची असेन. हुजुरपागेत शिकत होते. दुसऱ्या टर्मला मी माझ्या मामीकडे, कै. सत्यभामाबाई दाबक्यांकडे टिळक टँकजवळच्या त्यांच्या 'गंगा निवास' या बंगल्यात आईबरोबर काही दिवस रहात होते.

महर्षी कर्वे माझ्या मामीचे मामा. ते मामीला कृष्णी या माहेरच्या नावाने हाका मारीत. मामी त्यांना अण्णा म्हणे. त्यावेळी माझी मामी साठीच्या आसपास असेल. तिला इंग्रजी शिकवायला ते, आठवड्यातून दोनदा येत. मामीकडे आलेला 'केसरी' त्यावेळी ते वाचीत. मामी त्यांच्यासाठी डाळिंब्यांची उसळ, परतलेल्या डाळिंब्या, अंबेळी, पानगी काहीतरी खास कोकणातला पदार्थ करायची. खाणं झाल्यावर चहा व्हायचा. त्यानंतर अण्णा आपली कपबशी, स्वत: धुवून भिंतीजवळ पालथी घालत. त्यावेळी मला खूप आश्चर्य वाटे, सर्वांचे धावधावून करणारी माझी मामी स्वत:च्या मामांची कपबशी का धुवत नाही? अण्णांनीही त्याबद्दल कधी नाराजी दाखविली नाही.

पुढे काही वर्षांनी कळले की अण्णांनी विधवेशी पुनर्विवाह केला होता, म्हणून हे असे वागणे असे.

त्यावेळी अण्णा ९३ च्या आसपास असतील. पांढरी पँट, त्यावर काळा लांब कोट, डोक्याला मला वाटते हिरव्या रंगाचा वुलनचा चौकोनी रूमाल डबल करून बांधलेला, डोळ्याला चष्मा, हातात काठी, पायात बूट असा त्यांचा पोषाख असे. या वयातही ते खूप लांब अंतर चालून येत. त्यावेळी इरावतीबाईंकडे ते रहात होते. मामीबरोबरच्या गप्पात अप्पांचा - म्हणजे रँग्लर परांजप्यांचा विषय हमखास निघे. मुरूड गावच्या आठवणी म्हणजे तर मामी आणि त्यांच्यातला अतूट दुवा होता. काही दिवस मी हे सर्व कुतूहलानी पाहिले. मग एक दिवस धीटपणा करून मी अण्णांकडे माझ्या डायरीत स्वाक्षरीसह संदेशही मागीतला. थोडसं हसून वृद्ध अण्णांनी मला संदेश लिहून दिला.

॥ निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ॥ त्यावेळी तुकारामाच्या या उक्तीतील सामर्थ्य कळण्याचे वय नव्हते. एवढेच माहीत होते - अण्णा खूप थोर व्यक्ती आहेत. आणि म्हणून अण्णांनी आपल्याला संदेश दिला याचेच मला खूप अप्रूप वाटले. आज त्यांची जीवनकथा लिहिण्यासाठी त्यांच्यासंबंधीची अनेक पुस्तके मी वाचली. त्यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्याशी संबंधित असलेल्या अनेक व्यक्तींशी बोलले. त्यांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या हिंगण्याच्या आश्रमात जाऊन राहिले, तेव्हा या संदेशातील प्रत्येक शब्दाचा खराखरा, खोलवरचा अर्थ म्हणजे साक्षात अण्णांचे स्वत:चेच जीवन आहे असे मला स्पष्टपणे जाणवले. अण्णा स्वत: तर दृढनिश्चयी होतेच पण अगणित स्त्री-पुरुषांच्या मनात त्यांनी त्यागमय जीवन जगण्याच्या निश्चयाची रोपटी लावली आणि त्यांचे वटवृक्ष झालेलेही पाहिले.

महर्षींची जीवनकथा माझ्या हातून लिहून कशी झाली त्याबद्दल थोडे लिहायला हवे. आमच्या ठाण्याचे रहिवासी असलेले सुप्रसिद्ध चरित्रवाङ्मय लेखक श्री. अरविंद ताटके यांचा आणि माझा परिचय 'मोहनमाला' ह्या माझ्या महात्मा गांधींचे विचारधन असलेल्या अनुवादित पुस्तकामुळे झाला. एक दिवस त्यांनी मला महर्षी कर्व्यांच्या जीवनावरील त्यांच्या संग्रही असलेली आठदहा पुस्तके देऊन म्हटले, 'मला वाटते एका स्त्रीनेच अण्णांचे चरित्र लिहावे, कारण स्त्री शिक्षणासाठीच अण्णांनी आपले सारे आयुष्य वेचले. तुम्ही ते लिहू शकाल का?'

चरित्रवजा लेखनाचा माझा हा पहिलाच प्रयत्न. हे अवघड काम आपल्या हातून पुरे होतेय की नाही याबद्दल मन साशंक होते. पण श्री. ताटके यांनी नुसती पुस्तके देण्याचे काम केले असे नाही तर गेल्या दीड-दोन वर्षांत लेखन कुठपर्यंत आले म्हणून सतत विचारणा केली. इतकी आस्था माझ्यासारख्या नवशिक्या व्यक्तीला त्यांनी दाखविली म्हणूनच मी हे पुस्तक लिहून पूर्ण करू शकले. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

महर्षी कर्वे हे मूलत: प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारे विद्यार्थी, ज्ञानदानाचे अखंड व्रत घेतलेले अव्वल दर्जाचे शिक्षक, भारतीय विधवांना दुष्ट रूढींपासून वाचवून, त्यांना शिक्षण देऊन स्वावलंबी करणारे विधवांचे उद्धारक, क्रियाशील समाज सुधारक आणि थोर समाजपरिवर्तक होते. पण एवढ्या वर्णनाने त्यांचे मोठेपण पर्याप्त होऊ शकत नाही. दुसऱ्याची वेदना जाणून ती दूर करणारा त्यांच्यातला 'माणूस' हा फार मोठा होता. त्यामुळेच त्यांनी स्त्री शिक्षण व विधवाविवाह विषयक कार्यास

स्वत:ला वाहून घेतले. ते कार्य करीत असताना उपहास, अपमान व प्रतिकार यांकडे लक्ष न देता अविश्रांत श्रम करीत राहणे, कमी महत्त्वाच्या गोष्टीत तडजोडीची तयारी ठेवणे, शत्रू व मित्र दोघांबरोबर सरळ वागणूक, स्वत: स्थापन केलेल्या संस्थांत स्वत:चा काडिमात्रही स्वार्थ न साधता, सदैव संस्थेच्या कल्याणाचाच विचार करणे, संस्थेच्या पै-पैशाचा चोख हिशोब ठेवणे, सहकाऱ्यांशी जुळवून घेणे, कामापुरतेच बोलणे, स्वच्छ चारित्र्य इत्यादी गुणांमुळे त्यांनी शून्यातून शैक्षणिक विश्व निर्माण केले. शतायुषी 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था' हाच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आरसा आहे.

महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घातला असला, तरी त्या कार्यावर कळस चढविण्यापर्यंतचे काम महर्षींनीचे केले. आज शिक्षणामुळे स्त्रीच्या पाठीचा कणा ताठ झाला. तिला तिच्या कुटुंबात, समाजात, तिने निवडलेल्या कार्यक्षेत्रात सन्मानाने वागविले जाऊ लागले. तिची मते ग्राह्य धरली जाऊ लागली. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ती जबाबदारीची कामे पार पाडू लागली. एवढेच नव्हे तर वेळप्रसंगी पुरुषाच्या नाकात वेसण घालू शकणारी आजची स्त्री एवढी सामर्थ्यवान कशामुळे झाली - तर ती अण्णांनी आयुष्यभर केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यामुळेच !. अण्णांच्या काळातल्या स्त्रीच्या तुलनेत आजच्या काळातील स्त्रीने केलेली प्रगती कौतुकास्पद आहे. स्त्री वर्गाच्या मनात आत्मविश्वासाची, दृढनिश्चयाची ज्योत कायम तेवत ठेवण्याचे कार्य महर्षी कर्व्यांनी केले. त्यासाठी समस्त स्त्री जातीने तर त्यांच्याबद्दल कृतज्ञ असायलाच हवेच, पण महर्षींची जीवनकथा लिहिताना, जसजसे ह्या व्यक्तिमत्वाचे दैदिप्यमान पैलूंचे दर्शन मला घडत गेले आणि त्यांची व्यक्तिरेखा साकार होत गेली तसतसे मला प्रकर्षाने वाटू लागले की 'हा माणूस कसा होता, कसा जगला' याचे ज्ञान होणे हे आजच्या ध्येयशून्य, श्रद्धाहीन बनत चाललेल्या आणि जीवघेण्या स्पर्धेने पछाडलेल्या, आपल्या समाजातील प्रकाशाचा शोध घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दीपस्तंभासारखे ठरेल.

माझ्या लेखनाच्या कामी मला श्रीमती सुधाताई जोशी, सौ. पुष्पा टिळक, महर्षी कर्व्यांची नात सौ. कुंदाताई नेने, कर्वेनगर येथील कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतले सर्व निष्ठावान कार्यकर्ते, माझी थोरली बहीण सौ. सुमती कानिटकर आणि माझ्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचे परोपरीने सहाय्य झाले. त्यांना मनापासून धन्यवाद देणे मी माझे कर्तव्य समजते.

**सौ. सुधा चाफेकर**

'विकास'
रामवाडी, नौपाडा,
ठाणे, ४०० ६०२.

# अभिवादन

महर्षी कर्वे यांचा कालखंड (१८५८ - १९६२) एकशे चार वर्षांचा असूनही त्यांचं बारीक सारीक तपशीलांसकट एखादं मोठं चरित्र (Monumental Biography) कुणी मराठीत अगर इंग्रजीत का लिहू नये याचं मला नेहमीच आश्चर्य वाटत आलंय. दुसरी गंमत म्हणजे त्यांची बहुतेक चरित्रं पुरूष लेखकांनी लिहिलेली आहेत. आधुनिक स्त्रियांचा माथा उजळ करण्यात कर्व्यांचा सिंहाचा वाटा असताना त्यांचं एखादं चरित्र लिहिण्यास स्त्री लेखिका पुढं का येत नाहीत त्याचं मला नेहमीच कोडं पडत आलंय. अशा परिस्थितीत माझ्या निकट परिचित असलेल्या सौ. सुधा चाफेकर यांनी कर्वे यांचं चरित्र लिहून आपल्यापरीनं समाजाला कर्व्यांची ओळख करून देण्याचा आपला खारीचा वाटा उचलला आहे.

महर्षी कर्वे यांचं आत्मचरित्र १९१५ साली प्रसिद्ध झालं. या चरित्राची दुसरी आवृत्ती १९२८ साली प्रसिद्ध झाली. तीत १९२८ सालापर्यंतची हकीगत आलेली आहे. कर्वे जन्मशताब्दीच्या वेळी १९५८ मध्ये त्यांच्या आत्मचरित्राची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्या आवृत्तीत १९२८ ते १९५८ या कर्वे चरित्राच्या कालखंडांचं चरित्र प्रि.ना.म. पटवर्धन यांनी लिहून कर्व्यांच्या आत्मचरित्रात भर घालून ते अद्यावत केले. या आत्मचरित्राचा व कर्व्यांच्या इतर चरित्र साहित्याचा लाभ प्रस्तुतचं कर्वे चरित्र लिहिताना सौ. सुधा चाफेकर यांनी घेतला असल्यानं हे चरित्र, सुबोध, रसाळ व माहितीनं परिपूर्ण असं उतरलेलं आहे. कर्वे यांना प्रत्यक्ष पहाण्याची व त्यांच्याशी दोन शब्द बोलण्याची संधी सौ.सुधाबाईंना लाभलेली असल्यानं या चरित्राला जवळीकीची व भावनांची झालर लाभलेली आहे.

जुन्या काळात आपल्या आप्तांकडं गेल्यावर आपली कपबशी व डिश कर्व्यांना

कशी विसळून ठेवावी लागे त्याची आठवण लेखिकेनं दिलीय, ती अतिशय हृदयस्पर्शी आहे. पहिल्या प्रकरणात पैशाच्या व्यवहारात कर्वे कसे चोख असतं त्याची आठवणही मनाला भिडणारी आहे. अठराव्या वर्षी सहावीच्या परीक्षेसाठी मुरूड ते सातारा हा १०८ मैलांचा पायी प्रवास कर्व्यांनी कसा केला व अठरा वर्षं पुरी झाली आहेत ही गोष्ट कर्व्यांना परीक्षकांना सांगता न आल्यानं त्यांची परीक्षा कशी हुकली वगैरे भाग वाचताना मनाची कालवाकालव झाल्याशिवाय रहात नाही. चरित्राचा पट उलगडत असताना लेखिकेनं आठवणींची पेरणी मोठ्या कौशल्यानं केलेली असल्यानं कर्व्यांचं मोठेपण आपल्याला सहज भावत जातं.

कर्व्यांनी पहिली पत्नी राधाबाई हिलाही त्या काळात कर्व्यांनी लिहायला, वाचायला कसं शिकविलं याचंही सुरेख चित्र चरित्रात पहायला मिळतं. राधाबाई अकाली गेल्यावर कर्व्यांनी मुरूड फंडाला ५०० रु. देऊन तिच्या नावानं शिष्यवृत्ती कशी ठेवली त्याचं हृदयंगम चित्र लेखिकेनं हळुवारपणे रेखाटलंय. कर्व्यांनी विधवेशी पुनर्विवाह केल्यानंतर ते गावी गेलेले असताना मुरूडकरांनी केलेल्या त्यांच्या छळाचं वर्णनही, त्या काळाचं चित्र आपल्या मनांवर उमटवतं. या हकीगती वाचताना आपलं मन सैरभैर झाल्याशिवाय रहात नाही.

प्रस्तुतच्या चरित्राचा विशेष म्हणजे कर्व्यांचं चरित्र लिहीत असताना शंभर वर्षांपूर्वीच्या जुन्या काळाचं चित्र लेखिकेनं थोडक्यात पण समर्थपणे रंगविलंय. आपल्या डोळ्यांसमोर नुसतं कर्व्यांचं चरित्रच न दिसता गेल्या शंभर वर्षांचा काळ उभा रहातो.

सौ. सुधाबाईंनी कर्वे चरित्रसाहित्याचा सखोल अभ्यास करून मगच या चरित्राला हात घातल्यानं प्रस्तुत चरित्र शेवटपर्यंत वाचनीय झालेलं असून, कर्व्यांची यथातथ्य ओळख करून देण्यात ते यशस्वी ठरलेलं आहे.

महात्मा फुल्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला तर महर्षी कर्व्यांनी त्यावर कळस चढविला ही वस्तुस्थिती आहे. पण फुल्यांचा जयजयकार करीत असताना काही मंडळी कर्व्यांचं नाव घेण्यास का कचरतात ते मला कळत नाही. स्त्रियांची मान समाजात उंच रहावी म्हणूनच शंभर वर्षांपूर्वी कर्व्यांनी दंड थोपटले. आज आधुनिक स्त्रियांचा माथा उजळ झालेला असून प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीनं त्या कर्तृत्व दाखवित आहेत, त्याचं श्रेय निःसंशयपणे महर्षी कर्व्यांनाच आहे.

महर्षी कर्व्यांच्या चरित्राला प्रस्तावनारूपी अभिवादन करण्याचा बहुमान मला लाभला हे मी माझं मोठं भाग्य समजतो. या चरित्राच्या प्रकाशिका सौ.शशिकला उपाध्ये या स्त्रीच आहेत हाही एक योगायोग. लेखिकेला मनःपूर्वक धन्यवाद व शुभेच्छा देऊन हे अभिवादन पूर्ण करतो.

– अरविंद ताटके

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | मुरुडातले बालपण | ११ |
| २) | कष्टतर विद्यार्थिदशा | १६ |
| ३) | तिहेरी कसरत | २२ |
| ४) | प्रवाहाविरुद्ध पाऊल | २७ |
| ५) | कसोटीचे दिवस | ३५ |
| ६) | अनाथबालिकाश्रमाची स्थापना | ४१ |
| ७) | निष्काम-कर्म-मठाचे मिशनकार्य | ४९ |
| ८) | महिला विद्यापीठ | ५८ |
| ९) | वय वर्षे ६१ ते ७१ | ६७ |
| १०) | सातासमुद्रापलीकडे | ७५ |
| ११) | नवीन संकल्प | ८५ |
| १२) | अण्णांचे लाखमोलाचे दशवार्षिक वाढदिवस | ८९ |
| १३) | शिक्षणमहर्षींचा जन्मशताब्दिमहोत्सव | ९५ |
| १४) | महर्षींचे महाप्रयाण | १०८ |
| • | परिशिष्ट १ कल्पवृक्ष कन्यांसाठी | ११५ |
| • | परिशिष्ट २ मनामनांचा कानोसा | ११७ |
| • | परिशिष्ट ३ घरातले पडसाद | १२३ |
| • | जीवनातील प्रमुख घटना | १३३ |
| • | संदर्भसूची | १३५ |

# १ / मुरुडातले बालपण

(मुरूड हे दक्षिण कोकणातले समुद्रकाठचे छोटेसे गाव. गावाची हवा अतिशय उत्तम. मुंबईपासून दक्षिणेस अवघ्या ९० मैलांवर वसलेले रत्नागिरी जिल्ह्यातले हे ठिकाण.

'मूळवटग्राम' असा मुरूडसंबंधी एका बखरीत उल्लेख आढळतो. हे गाव मुद्दाम वसलेलं असावं असं वाटतं. गावाच्या दक्षिणटोकापासून उत्तरटोकापर्यंत दगडांनी बांधलेला सरळ रस्ता आहे. याला पाखाडी म्हणतात. समुद्राकडून गावात शिरण्यास व गावातून बाहेर जाण्यास सारख्या अंतरावर तीन रस्ते आहेत. गावाची रचना शिस्तशीर आहे. पाखाडीच्या दोन्ही बाजूंनी ब्राह्मणांची घरे रांगेत आहेत. प्रत्येक घराच्यापुढे अंगणवजा थोडी जमीन आहे, तर घराच्या मागे केवढेतरी आगार. त्यात माडापोफळांच्या झावळ्यांची सदैव सळसळ. पश्चिमेकडच्या घरांच्या अगदी मागीलदारी समुद्र आहे. झावळ्यांच्या सळसळीत समुद्राची गाज बेमालूम मिसळून जाते. तिथली घरं एकमेकांपासून फार जवळही नाहीत, फार दूरही नाहीत. त्यामुळे शेजाऱ्यांना एकमेकांचा उपसर्ग होत नसे, पण शेजार असल्याचा फायदा मात्र मिळे.)

मुरूड गावातील पाण्याचा तलाव आणि दुर्गादेवीचे देऊळ कर्व्यांच्या पूर्वजांनीच बांधलेलं आहे. मुरूडचं कर्वे घराणं मोठं मातब्बर होतं. कर्व्यांचे पूर्वज केशवभट आणि रघुनाथभट पेशव्यांच्या काळी पुण्यास आले. त्याकाळी कोकणातील कर्तबगार, गुणी माणसं पेशव्यांची राजधानी असलेल्या पुण्याकडे धाव घेत असत. स्वतःच्या कर्तबगारीवर स्वतःची भरभराट करून घेत. अग्निहोत्री केशवभटांच्या विद्वत्तेचा खुद्द पेशवे आदर करीत. त्यावेळी रघुनाथ भट आणि केशव भट या दोघाभावांनी दुकान थाटून खूप पैसा मिळविला. लक्ष्मी त्यांच्या घरी पाणी भरू लागली. ओंजळी भरभरून दक्षिणा ते ब्राह्मणांना वाटत असत. मराठ्यांचे शूर सरदार-बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले यांना सुद्धा त्यांनी लाखो रुपये कर्जाऊ दिले होते. त्यांनी कोकणातल्या आपल्या मुरूडगावी कुटुंबियांसाठी प्रशस्त वाडा बांधला. गावकऱ्यांसाठी पाण्याचा

तलाव आणि दुर्गादेवीचे मंदीर बांधले होते. पण हे सगळे ऐश्वर्य हळूहळू नष्ट झाले. लक्ष्मी चंचल असते म्हणतात - कर्व्यांच्या घरची श्रीमंती ओसरू लागली. अण्णांचे वडील केसोपंत (केशव) यांच्या लग्नात कर्व्यांकडे श्रीमंतीचा डामडौल खूप होता. पण तो डामडौल म्हणजे पोकळ देखावाच होता, हे अण्णांच्या आईला थोडयाच दिवसांत कळून आले.

शेरावली गावच्या परांजप्यांकडे अण्णांचे आजोळ. त्यांची आई लक्ष्मीबाई ही केसोपंत परांजप्यांची मुलगी. लग्नातला कर्व्यांकडचा डामडौल, त्यांचा प्रशस्त वाडा पाहून आईवडिलांना आपली मुलगी थोराघरी पडतेय म्हणून किती आनंद झाला असेल! पण मुलीच्या अंगावर घातलेले लग्नातले दागिनेसुद्धा कुणाकडून उसनवारीने आणले होते, ही खरी परिस्थिती थोडयाच दिवसांत लक्षात आली. पण तेव्हाही ह्या सत्त्वगुणी, सालस माणसांनी मुलीच्या सासरच्यांना एका शब्दानेही दुखावले नाही.

अण्णांचे वडीलही शांत स्वभावाचे होते. त्यांना राग कसा तो यायचाच नाही. अण्णांच्या आईचा स्वभाव किंचित रागीट व करारी होता. परंतु तिचा राग दुसऱ्याला फारसा कळावयाचा सुद्धा नाही व त्या रागापासून कोणाला बिलकुल त्रास व्हायचा नाही. आपणाला गरिबी आली आहे हे उभयतांनी जाणले. पण नशिबाला अगर कोणाही व्यक्तीला बोल न लावता नेटाने प्राप्त परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात यशही मिळवले. या कामी अण्णांच्या आईला माहेरची खूप मदत घ्यावी लागली. शेरावलीला परांजप्यांचे घर नेहमी १५-२० माणसांनी गजबजलेले असायचे. तेथे दूधदुभत्याला व अन्नाला तोटा नसायचा. लक्ष्मीबाई काही दिवस माहेरच्या आश्रयाला गेल्या. कोठेही राहिल्या तरी त्या सर्वांना हव्याहव्याशाच वाटत. पडेल ते काम करायला सदैव तयार असत आणि दुसरा गुण म्हणजे कोणाविषयी कोणी काही बोलले तरी पोटात ठेवत. लावालावी अजिबात नाही.

अण्णांचे वडील कोरेगावच्या बर्व्यांकडे मुनिमाचे काम करीत. नोकरीच्या निमित्ताने ते तेथेच रहात. एकटेच असल्याने हातानेच स्वयंपाक करीत. मालकाची खोताच्या वसुलीची कामे चोख करीत. स्वत: खूप काटकसर करीत. पैसा मागे टाकीत. चांगली कुळे हेरून त्यांना पैसे व्याजी लावीत. पतिपत्नी दोघांनीही एकमेकांचा दुरावा सोसून कुटुंबाची ढासळलेली आर्थिक स्थिती सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत राहण्याचा निश्चय केला होता.

'सुवृत्त व उद्यमशील मातापितरांच्या पोटी जन्माला येणे यासारखे दुसरे भाग्य नाही. हे भाग्य मला पूर्वपुण्याईने लाभले, या विचाराने माझे मन आनंदाने अगदी भरून जाते.' अण्णांनी आपल्या आत्मचरित्रात आईवडिलांबद्दल लिहिलेले वर्णन अगदी तंतोतंत खरे होते.

अण्णांचे वडील हरकसबी गृहस्थ होते. काथ्याचा पिळवा काढून त्याचे सुंभ



तयार करणे व त्याची गुरांची दावी, रहाटाच्या माळा वगैरे वळणे यात ते वाकबगार होते. त्यांना चित्रे काढण्याचीही फार हौस होती. ते पागोटी चांगली बांधत. मुंबईला जाऊन पगडबंदाचा धंदा करावा असे कित्येकदा त्यांच्या मनात येई. कोरेगावाहून ते मुरूडाला आले की लोकांची पागोटी बांधून देण्याचे त्यांना एक मोठे कामच असे. पागोटयाच्या कामाचे त्यांनी कुणाकडून पैसे घेतले नाहीत, आणि नकाराचे उत्तर देऊन कधी कामही टाळले नाही.

अण्णांचे आईबाबा दोघेही धार्मिक वृत्तीचे होते. आईने तर सर्वांशीच जमवून घेतले होते. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे अण्णांच्या लग्नात वधुगृही जाताना त्या काही पदार्थ बरोबर घ्यायला विसरल्या होत्या. तेव्हा वधूची आजी म्हणाली, 'तुम्ही एवढाल्या मोठ्या बायका पण साध्यासुध्या गोष्टीसुद्धा तुम्हाला कळत कशा नाहीत?' खरे तर प्रत्यक्ष वरमाईचा अशा मर्मभेदक शब्दांनी अपमान झालेला होता. पण अण्णांच्या आईने काही न बोलता एकदम स्वत:च्या श्रीमुखात मारून घेतली आणि 'माझी चूक झाली. क्षमा करा.' असे शब्द उच्चारले. सर्व बायका थक्क होऊन पहातच राहिल्या. लक्ष्मीबाईंच्या अशा सावरून घेण्याने लग्नसोहळ्यातले पुढील सर्व विधी निर्विघ्नपणे पार पडले. पुढेही कधी त्यांनी सुनेवर त्याचा सूड उगवला नाही.

बाबांचा स्वभाव निग्रही होता. थोरल्या मुलाच्या मुंजीत मुरूड गावाला सहस्रभोजन घालण्याविषयी आईने आग्रह धरला होता. त्यावेळी बाबांनी निक्षून सांगितले होते, 'माझ्या आटोक्याबाहेरची गोष्ट मी करणार नाही.' आईनेही आपला हट्ट सोडला. दृढनिश्चय तसेच आवश्यक तेथे जुळते घ्यावयाचे आईवडिलांचे गुण अण्णांना सर्व आयुष्यभर उपयोगी पडले. केसोपंत आणि लक्ष्मीबाई यांची पहिली तीनही अपत्ये दगावली. त्यामुळे मनातून ते दोघे फार खिन्न असत. दु:ख आणि दारिद्र्य त्यांची सत्त्वपरीक्षा पहात होते. मात्र काटकसर व स्वाभिमानी वृत्ती यांच्या आधारावर ते दिवस निभावून नेत होते. मुले जगत नव्हती म्हणून अण्णांच्या थोरल्या भावाचे नाव भिकू आणि अण्णांचे नाव धोंडू ठेवले. अंबाताई अण्णांपेक्षा तीन वर्षांनी लहान असलेली त्यांची बहीण. नवसासायासाने जगलेल्या ह्या तीनही मुलांवर आईवडिलांची फार माया होती. त्यांच्यावर ते क्वचितच रागवत. मुलेही ते रागावतील असे काही वागत नसत.

१८५८ साल भारताच्या इतिहासात अनेक कारणांनी फार महत्त्वाचे ठरले. देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी असीम त्याग आणि परिश्रम करणाऱ्या अनेक थोर पुरुषांचा जन्म या काळात झाला. भारतीय महिलांच्या उद्धारासाठी आयुष्यभर झिजणाऱ्या महर्षी धोंडो केशव कर्व्यांचा जन्म १८५८ च्या १८ एप्रिलला झाला.

मुरूडच्या निसर्गरम्य परिसरात भिकू, धोंडू वाढत होते. धोंडू चार वर्षांचा

असताना मुरूडच्या शाळेत धूळपाटीवर अक्षरे गिरवू लागला. शाळा भरताच मुले भूपाळ्या म्हणत. मोठ्या आवाजात अनेक श्लोक व आर्या म्हणत. पाठांतराची सवय अशी लहानपणीच जडली. स्पष्ट व गोड आवाजामुळे धोंडू शाळेत लोकप्रिय झाला. तो मन लावून अभ्यास करी. त्यामुळे, त्याचे शिक्षक विनायक लक्ष्मण सोमण त्याच्यावर प्रेम करीत. त्याची आई त्याच्याकडून रामविजय, हरिविजय इत्यादी पोथ्या वाचून घेई. धोंडू कुलदेवतेची रोज नियमाने पूजा करीत असे. शिवलीलामृत, गुरुचरित्र यांसारख्या ग्रंथांचे पारायण करीत असे. या वाचनाने, पूजनाने धोंडू काया, वाचा, मनाने धार्मिक प्रवृत्तीचा झाला. आपल्या इच्छा, आकांक्षांची आणि विचारांची कसकशी घडण होत गेली याबद्दलच्या आठवणी वृद्धपणी महर्षी कर्वे सांगत असत.

'लहानपणी मला गाण्याची खूप आवड होती. संधी मिळाली की लगेच मी नाटक पहायला जायचो, किंवा गाण्याचा कार्यक्रमाला जायचो. हरिकिर्तनाला तर मी हर्णैला अगर दापोलीला पायी चालत जात असे. एकदा माझा दादा आणि त्याची मित्रमंडळी दापोलीला नाटक पहायला गेली. मला त्यांच्याबरोबर पाठवले नाही, कारण मी हे नाटक पाहिले होते. शिवाय वडील ज्यांच्याकडे नोकरी करीत त्या श्री. बर्व्यांकडे षष्ठीपूजन होते. त्यासाठी कर्वे कुटुंबियांतर्फे मला त्या ठिकाणी हजर रहायला सांगण्यात आले. नाटक पहायला मिळणार नाही, याबद्दल मला फार वाईट वाटले. पण नाटकाची संधी दवडणे शक्यच नव्हते. प्रथम मी षष्ठीपूजनाला गेलो आणि पंगत आटोपताच अर्ध्यारात्रीच्या सुमारास दापोली गाठून नाटक पुन्हा पाहिले.'

लोकांच्या बागांमधील आंबे, बोरे तोडून खाण्याच्या खोड्या करण्यात धोंडू आघाडीवर असायचा. धोंडू स्वभावत: मात्र भित्रा होता. पोहायला तो काही आपणहून शिकला नसता, पण गावातल्या मंडळींनी त्याला तळ्याऐवजी विहिरीकडे नेले आणि काहीबाही सांगून विहिरीत उतरायला लावले. विहिरीत धरायला ना दोर ना आधार. तेव्हा धोंडूने खूप गटांगळ्या खाल्ल्या. लोकांना दया येऊन त्यांनी त्याला वर काढले खरे पण या प्रसंगामुळे त्यांनी कित्येक महिने पाण्याची धास्ती घेतली. पण उणिवांवर मात करण्याची चिवट जिद्द असलेल्या धोंडूने पुढे पोहण्यात प्राविण्य मिळविले.

धोंडू मन लावून अभ्यास करी. त्यामुळेच तर तो सोमण गुरूजींचा लाडका होता. त्याच्या शिक्षणात एखादे अपयश सोडले तर कधी खंड पडला नाही. त्याच्या भिकूदादाने शिक्षण अर्धवट सोडले. धोंडू मात्र दहा किलोमीटरवरच्या दापोली गावी जाऊन इंग्रजी शिकू लागला. इतर सर्वसामान्य मुलांना अवघड वाटणारा गणित हा विषय धोंडूला फार आवडायचा. देवकुळे गुरूजींची टिपणे त्याला मिळाली होती. त्यामुळे त्याने गणितात प्राविण्य मिळविल्याचे उल्लेख आढळून येतात.

धोंडू कामसू व अभ्यासू आहे हे लक्षात आले म्हणून सोमण गुरूजींनी दुर्गादेवीच्या



मास्तरांनी दिलेला वयाचा दाखला परीक्षकांनी पाहिलासुद्धा नाही. त्याला परीक्षेस बसू दिले नाही. मुखदुर्बळ धोंडूच्या तोंडून शब्द फुटेना. सारा दिवस त्याने आपल्या भवितव्याचा विचार करण्यात घालविला. स्वत:च्या नशिबाला खूप दूषणे दिली. पण त्याच्याबरोबर परीक्षेस आलेले बाकीचे चार विद्यार्थीही गणितात नापास झाले. त्यामुळे सर्वच अपयशी, समदु:खी ठरून मुरुडास परत गेले.

पुढच्या वर्षी ह्याच परीक्षेसाठी धोंडू कोल्हापूरला पायी चालत गेला आणि परीक्षा देऊन पास झाला. सातारला हीच परीक्षा वय १७ वर्षे पूर्ण असूनही निर्भयपणे बोलता न आल्यामुळे त्याला हातची घालवावी लागली होती. धोंडू चटकन निराश होत असे. मात्र विचार करून तो पुन्हा चिवटपणाने निर्धार करी व यश मिळवी. कष्ट करण्याची त्याची क्षमता अमर्याद होती. त्याचबरोबर शिकण्याची, ज्ञान संपादन करण्याची महत्त्वाकांक्षाही तीव्र होती. ज्ञानाची उपासना तो मन लावून करीत असे. आपण चांगली कामे करावी हे त्याचे ध्येय होते.

भावी जीवनाविषयीचे त्याचे मनोरथ साधे होते. आपण काहीतरी भव्यदिव्य करावे अशी अव्यवहारी तृष्णा त्याला नव्हती. शिवाय यशापयशाकडे उदासीनवृत्तीने पहायला त्याला अनुभवानेच शिकविले.

वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत त्याला इंग्रजीचा गंधही नव्हता. पण इंग्रजी शिकण्यासाठी कुठल्याही गावी जायची व कुठल्याही परिस्थितीत राहण्याची त्याची तयारी होती. गरिबीमुळे वडिलांपाशी काही बोलण्याचा धीर धोंडूला झाला नाही पण वडिलांनी मुलाच्या मनातील इच्छा ओळखली. त्याला इंग्रजी शिकण्यासाठी रत्नागिरीला पाठविले. त्यासाठी त्यांनी आपल्या मेव्हण्याकडून कर्ज घेतले. रत्नागिरीला इंग्रजी तिसऱ्या इयत्तेत धोंडूचे नाव घातले. वार्षिक परीक्षेत धोंडूचा पाचवा नंबर आला. त्याला शिष्यवृत्तीही मिळाली. धोंडू मनोमन सुखावला. आता सर्व सुरळीत होईल असे वाटू लागले. परंतु त्यानंतर त्याला तापाने पछाडले. तो खूप अशक्त झाला आणि रत्नागिरीच्या शिक्षणाला निरोप देऊन त्याला मुरुडास घरी परतावे लागले. परत आल्यावरही धोंडू स्वस्थ बसला नाही. मुरूडच्या प्राथमिक शाळेत त्याने शिक्षकाची नोकरी धरली. श्री. धोंडोपंत मंडलिकांच्या मदतीने त्याने पुन्हा इंग्रजीचा अभ्यास सुरू केला. इंग्रजी पुस्तके मिळवून वाचली. काही महिन्यांनंतर धोंडूचे काही मित्र सुट्टीत मुंबईहून मुरुडास आले होते. त्यांच्या मदतीने धोंडू मुंबईला गेला आणि रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये त्याने पाचव्या इयत्तेत प्रवेश मिळविला.

मुरूडमधील मुलांनी मुंबईत एक खोली घेतली होती. तिथे धोंडू राहू लागला. नागोपंत दातारांच्या खानावळीत जेवू लागला. पुढे त्याला मुगभाटातल्या आंग्रे यांच्या चाळीत श्री. परशुरामपंत दामल्यांकडे आश्रय मिळाला.

रॉबर्ट मनीत शिकत असताना धोंडूला आपले हस्ताक्षर खराब आहे ते सुधारले

पाहिजे असे वाटले. मनात विचार आला की प्रयत्नांची पराकाष्ठा करायची हा त्याचा स्वभावगुण त्याला उपयोगी पडला. त्याने अक्षर खूप गिरविले. त्याला सुंदर वळण कसे द्यायचे त्याची बारकाईने पहाणी केली. सतत सराव करून त्याचे हस्ताक्षर सुंदर झाले. त्याच्या वर्गमित्रांना हे पहावले नाही. काही विद्यार्थ्यांनी त्याच्यावर खोटा आळ घेऊन मि. जॅक्सन या शिक्षकांकडे तक्रार केली की हे अक्षर धोंडूचे नाही त्याने आपला मित्र दामले याचेकडून ते लिहून घेतले आहे. दामलेचे अक्षर फार सुंदर होते हे मि. जॅक्सनना माहीत होते. ते कर्व्यांवर भडकले. त्यांनी एकवीस वर्षे वयाच्या कर्व्यांना छडी घेण्यासाठी हात पुढे करायला सांगितले. ती खटयाळ मुले एकमेकांकडे पाहून मिष्किलपणे गालातल्या गालात हसत होती. मुखदुर्बळ कर्व्यांवर मात्र मरणप्राय दु:ख भोगायची पाळी आली. पण तेवढ्यात मि. जॅक्सनची नजर त्यांच्या असहाय्य चेहऱ्याकडे गेली आणि क्षणार्धात त्यांना सर्व काही उमगले.

'हा लिहिलेला मजकूर पुन्हा आपल्या हस्ताक्षरात असाच लिहू शकशील का?' मि. जॅक्सननी कोमल आवाजात विचारले.

धोंडू कर्वेला धीर आला.

'तुमच्या समोरच लिहू शकतो.' तो लगेच म्हणाला.

पूर्वीपेक्षाही सुंदर हस्ताक्षरात लिहिलेला मजकूर पाहून मि. जॅक्सनचे समाधान झाले. धोंडू निरपराध ठरला. भिडस्त व प्रसंगी खचून जाण्याच्या स्वभावामुळे विद्यार्थिदशेत असे प्रसंग त्याच्यावर नेहमी ओढवत.

शाळेत अण्णांची प्रगती चांगली होती. त्यामुळे त्यांना एक रुपया शिष्यवृत्ती मिळे, पण तेवढ्या पैशात भागत नसे म्हणून ते शिकवणी करून आणखी एक रुपया मिळवू लागले. एका गृहस्थाला दर रविवारी एक तास 'नवनीतातली कविता' वाचून दाखवत. त्याबद्दल त्यांना ताशी दोन आणे मिळत. शिकत असतांनाच स्वकमाई होऊ लागली. कष्टाची व पैशाची किंमत आपोआप समजू लागली. त्यामुळे त्या वयापासूनच ते स्वकष्टाने मिळविलेल्या रकमेतून रुपयास एक पैसा या प्रमाणात धर्मादायाचा निधी काढून ठेवू लागले. ते ज्या नागोपंत दातारांच्या खानावळीत जेवत असत त्या दातारांना एकदा खूप अडचण होती, म्हणून कर्व्यांनी त्यांना पाच रुपये उसनवारीने दिले होते. ते परत करणे दातारांना काही जमले नव्हते. पुढे नागोपंतांची प्रकृती खूप ढासळली. ते मुरुडास गेले. धोंडू कर्वेही मुरुडास गेले तेव्हा नागोपंतांना भेटायला गेले. वस्तुत: नागोपंतांकडून पाच रुपये येणे आहे ही गोष्ट ते कधीच विसरून गेले होते. मात्र कर्व्यांना पाहताच अत्यवस्थ नागोपंतांना त्याही अवस्थेत फार वाईट वाटले. ते म्हणाले, 'पैसे मागण्यासाठी आलात का? पण पैसे फेडण्यासाठी मला खरंच सवड मिळाली नाही हो.' असे म्हणून ते रडू लागले. मरणोन्मुख दातारांची सचोटी पाहून कर्वे गहिवरले. ते म्हणाले, 'नाही काका, ते मागचे पैसे फिटले असं समजा.



त्याबद्दल माझ्या लक्षातही नव्हतं. उलट मजजवळ शिलकीत असलेले पैसे तुमच्या अडचणीत उपयोगी पडावे म्हणून तुम्हाला द्यायला आलो आहे.' कर्व्यांनी त्यांना आणखी तीन रुपये दिले. नागोपंतांच्या डोळ्यात कृतज्ञतेचा भाव क्षणभर चमकून गेला, आनंदाश्रू वाहू लागले. ऐन अडचणीत कर्व्यांनी दिलेल्या तीन रुपयांचे मोल त्यांना तीन हजाराहून जास्त वाटले.

'परोपकार करणाऱ्या मनुष्याला होणाऱ्या अवर्णनीय आनंदाचा थोडासा अनुभव मला त्या दिवशी आला.' असे कर्व्यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे.

मॅट्रीकच्या वर्षी धोंडूची नरहर बाळकृष्ण जोशी यांच्याशी गाठ पडली. जोशींच्या मैत्रीचा कर्वे वारंवार उल्लेख करीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा धोंडूच्या मनावर व जीवनावर कायमचा ठसा उमटला. धोंडूची अभ्यासूवृत्ती व हुशारी पाहून नरहर जोशी त्याच्या अधिकच जवळ आले. ते दोघे बरोबर अभ्यास करू लागले. नरहरपंत जोशी मनमिळावू होते. त्यांची चिकाटी दांडगी होती. खिशात दमडी नसताना ते कोकणातून मुंबईस आले आणि त्यांच्या देवरूख गावच्या कोर्टातल्या एका गृहस्थाकडे आश्रयाला राहिले. त्या गृहस्थाची सारी बारीकसारीक कामे ते करीत. शिष्यवृत्त्या मिळवून त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले. जोशी मोठे लटपटे होते. दुसऱ्यावर त्यांची छाप चटकन पडे.

सी. पी. टँकजवळच्या ख्रिश्चन वसतिगृहात त्यांनी एक खोली मिळविली. त्या वसतिगृहाचे व्यवस्थापक रेव्हंड जानी अली हे नरहरपंतांचे मित्र होते. त्यांनी धोंडूलाही तेथे बोलाविले. रोज संध्याकाळी जेवण झाल्यावर दोघे तेथे जात, अभ्यास करीत व तेथेच झोपत. सकाळी उठून पुन्हा अभ्यासाला बसत, आणि त्यानंतर आपापल्या खोलीकडे जात.

नरहरपंतांचे अनेक गुण धोंडूला आवडत. आपला मित्र रे. अली आणि प्राचार्य कार्स यांच्याबरोबर ते निर्भिडपणे धर्मविषयक चर्चा करीत. या चर्चा ऐकून धोंडूच्या मनातील अनेक जुन्या समजुती व कल्पना हळूहळू बदलत गेल्या. कर्वे व जोशी दहा वर्षे एकमेकांच्या सहवासात होते. प्रथम शाळेत असताना व त्यानंतरही एकाच बिऱ्हाडात राहिल्यामुळे दोघांना एकमेकांचा सहवास घडला. नरहरपंतांनी धोंडूमध्ये वाचनाची आवड निर्माण केली. अनेक पुस्तके त्या दोघांनी मिळून वाचली. डब्ल्यू. ट्राईन या लेखकाच्या 'इन टयून विथ द इन्फिनिट' या पुस्तकाचा नरहरपंतांनी मराठीत अनुवाद केला. ते फार विचारपूर्वक बोलत असत. त्यामुळे कर्व्यांच्या विचाराला नेहमी खाद्य मिळे. आत्मचरित्रात कर्व्यांनी असे नमूद करून ठेवले आहे की, 'नरहरपंतांच्या विचारांच्या प्रभावामुळे आपला जीवनविषयक दृष्टिकोन पुष्कळ व्यापक झाला आणि त्याला तर्कशुद्ध वैचारिक अधिष्ठान लाभले.'

मॅट्रीकच्या परीक्षेत नरहरपंत तिसरे आले होते तर धोंडोपंत कर्वे सोळावे आले. रिझल्टनंतर महाविद्यालयीन शिक्षणही आपल्याला पुरे करता येईल असा आत्मविश्वास

कर्व्यांना वाटू लागला. विल्सन कॉलेजात त्यांनी प्रवेश घेतला. दोघाही मित्रांना शिष्यवृत्त्या मिळाल्या.

खत्रीच्या चाळीत जोशींनी बिऱ्हाड थाटले. तेव्हा ती चाळ विल्सन कॉलेजच्या अगदी जवळ म्हणून कर्वे त्यांच्याकडे पेइंगगेस्ट म्हणून राहू लागले. स्वत: शिकत असताना मिळतील तितक्या शिकवण्या कर्वे घेत असत. कारण त्यांना परांजपेमामांकडून स्वत:च्या शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडायचे होते.

धोंडू प्रथम मुंबईला आला त्याला वर्ष पुरे व्हायच्या आतच त्याचे वडील केसोपंत यांचा मृत्यू झाला. धोंडूच्या अभ्यासात खंड पडू नये म्हणून त्याच्या दादाने वडिलांच्या आजाराबद्दल त्याला कळविले नव्हते. पण केसोपंतांचा तो आजार शेवटचाच ठरला. वडिलांच्या मृत्यूची बातमी कळली तेव्हा शेवटची भेटसुद्धा झाली नाही म्हणून कर्व्यांना अतोनात दु:ख झाले. एकाएकी वडिलांचा आधार तुटला. आपले भविष्य आता अंधारमय झाले असे कर्व्यांना वाटले. पण अशा या दारुण निराशेच्या काळात आईने त्यांना धीर दिला. केशवपंनाच्या दु:खद व घृणास्पद प्रकाराला तिने धैर्याने तोंड दिले. दादाने बाणकोटाची नाकेरी सोडली व तो मुरुडास आला. परांजपेमामांकडून त्याने धोंडूच्या शिक्षणासाठी २०० रुपये कर्ज काढले. मामांनी सर्व प्रकारची मदत देण्याचे तात्काळ कबूल केले. अशा तऱ्हेने धोंडूला स्वत:च्या भवितव्याबद्दल वाटणारी भीती, घरून भक्कम आधार मिळाल्यामुळे दूर झाली.

मुंबईत धोंडूला खूप कष्टाचे जीवन जगावे लागे. पण सुट्टीत तो जेव्हा मुरुडास येई तेव्हा सुट्टीचा आनंद पुरेपूर उपभोगित असे. तो नाटकात कामे करी. नाटकासाठी मुंबईहून दोन पडदे पण आणले होते. तो स्वत: संस्कृत संवाद रचित असे. वेणीसंहारातील अश्वत्थाम्याची भूमिका त्याने फारच उत्तम केली होती. थोरल्या भावाने आणि आईने उत्तेजन दिले म्हणून कसोटी पाहणारे दिवस धैर्याने पार पडले. त्याग व परस्पर सहाय्य, आपुलकी व श्रद्धा या पायावर धोंडूचे पुढचे जीवनकार्य उभे राहिले. अतिशय प्रेमळ दादा आणि सुसंस्कृत व उदात्त विचार बाळगणारी अंबाताई यांच्याबद्दल कर्व्यांना फार प्रेम होते.

वयाच्या पंधराव्या वर्षीच नऊ वर्षांच्या राधाबाईबरोबर कर्व्यांचे लग्न झाले. राधाबाई कर्व्यांच्या मुरूडच्या घराच्या शेजारच्याच घरात रहाणारी. त्यामुळे लग्नाआधीपासूनच दोघांची ओळख होती. लहानपणी कधी कधी ते एकत्र खेळले सुद्धा होते. राधाबाई शांत, सोशिक, आज्ञाधारक व कष्टाळू होती. जनरीतीप्रमाणे लग्न झाल्यावर कर्व्यांचे व तिचे परस्परांशी बोलणे, हसणे, खेळणे बंद झाले. मात्र त्याकाळीसुद्धा कर्व्यांच्या घरी इतका प्रतिबंध नव्हता. धोंडूची आई फार चांगल्या स्वभावाची होती. म्हणून ती सुनांना मुलींप्रमाणेच वागवीत असे. त्यामुळे कर्वे सुट्टीत मुरुडास गेले की राधाबाईला आणि अंबाताईला अभ्यास शिकवीत. त्या दोघीही



चांगल्या लिहू-वाचू लागल्या. पुढे तिने काही मराठी पुस्तके वाचली व इंग्रजीचे तिसरे पुस्तकही वाचले. राधाबाई पत्रे छान लिहीत.

कर्वे कॉलेजात जायला लागले आणि कॉलेजच्या पहिल्यावर्षी कर्व्यांना पुत्रलाभ झाला. रघुनाथाचा जन्म झाला.

■ ■ ■

# ३ / तिहेरी कसरत

गरजेपोटी शिकवण्या आणि ध्येयासाठी शिक्षण घेणे यामुळे कर्वे एकाच वेळी उत्कृष्ट शिक्षक आणि कष्टाळू व अभ्यासू विद्यार्थी या दोन भूमिका करीत होते. त्याचवेळी संसारातही ते पिता व पतीची भूमिका बजावत होते. एव्हाना उत्तम शिक्षक म्हणून त्यांची ख्याती झाली होती. शिक्षकाचा पेशा त्यांनी जीवनकार्य म्हणून स्वीकारला.

तो काळ असा होता की प्रोफेसर आणि विद्यार्थी यांचे संबंध फार प्रेमाचे, जिव्हाळ्याचे असत. हुशार मेहनती विद्यार्थ्यांवर सरांची खास मर्जी असायची. पहिल्या वर्षीचा अभ्यासक्रम पुरा केल्यावर कर्वे, जोशी आणि अन्य दोन विद्यार्थी यांनी विल्सन सोडून एल्फिस्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळचे एल्फिस्टन कॉलेजचे प्राचार्य वर्डस्वर्थ हे विश्वविख्यात आंग्ल कवी विल्यम वर्डस्वर्थ यांचे नातू. प्राचार्य वर्डस्वर्थ विद्यार्थ्यांचे आवडते होते. काव्य शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांचे लक्ष आपल्याकडे ओढून घेता आले तर विद्यार्थी तो आपला सन्मान समजत. विल्सनच्या या हुशार विद्यार्थ्यांचे डॉ. वर्डस्वर्थनी स्वागत केले, आणि त्यांना संपूर्ण नादारीही दिली. वास्तविक नवीन विद्यार्थ्यांची पहिल्या टर्मची प्रगती पाहूनच मग त्याला नादारी दिली जात असे. पण या नव्या विद्यार्थ्यांना अपवादात्मक सवलत मिळाली.

एल्फिस्टन कॉलेज त्यावेळी राणीच्या बागेसमोर होते. हिवाळ्यात पासाचे पैसे वाचविण्यासाठी कर्वे - जोशी दोघेजण गिरगाव ते भायखळा पायी जात.

गणित हा कर्व्यांचा आवडता विषय होता. १८८४ साली गणित स्पेशल विषय घेऊन ते बी. ए. झाले. जोशी वकिलीकडे गेले. कर्व्यांना एम. ए. व्हायचे होते. आपल्या भिडस्त व बुजऱ्या स्वभावामुळे वकिली आपल्याला जमणार नाही हे त्यांनी केव्हाच ओळखले होते. एल्फिस्टनमध्ये शिकत असताना कर्व्यांबरोबर गणितज्ञ म्हणून पुढे ख्यातनाम झालेले गोपाळ कृष्ण गोखले, विख्यात कायदेपंडित चिमणलाल सेटलवाड, सार्वजनिक जीवनात मानाचे स्थान असणारे चिंतामण गंगाधर भानु इत्यादी मंडळीही एल्फिस्टनमध्ये विद्यार्थी म्हणून होती.



नरहरपंत आणि धोंडोपंत कर्वे एकाच बिऱ्हाडात रहात होते. पण पदवी परीक्षेच्यावेळी नरहरपंतांनी आपल्या पत्नीला माहेरी पाठवून दिले आणि स्वत: वसतिगृहात अभ्यासासाठी राहिले. कर्व्यांनी ह्या संधीचा फायदा घेऊन आपली पत्नी राधाबाई आणि मुलगा रघुनाथ यांना मुंबईच्या बिऱ्हाडी आणले. एव्हाना त्यांच्या लग्नाला तब्बल दहा वर्षे उलटून गेली होती. आता ते खऱ्या अर्थाने गृहस्थाश्रमी बनले.

परांजपेमामांचे कर्ज फेडण्यासाठी त्यांना खूप कष्ट करायला हवे होते. त्यासाठी ते एल्फिस्टन हायस्कूल मध्ये शिक्षकाच्या नोकरीसाठी विचारायला गेले. त्यावेळी एल्फिस्टनचे प्राचार्य वामन आबाजी मोडक होते. रत्नागिरीला असताना कर्वे त्यांच्या घरीच रहात होते. पण कर्वे जेव्हा त्यांच्याकडे नोकरीसाठी विचारायला गेले तेव्हा मोडक त्यांच्याकडे बारिक डोळे करून पहात म्हणाले, 'चाळीस विद्यार्थ्यांच्या वर्गाला तू शिकवू शकशील? काम सोपे नाही. मला वाटते शिक्षक होण्यास तू अजून लहान आहेस.'

कर्वे नाउमेद झाले. घडलेली हकीगत त्यांनी आपले प्राध्यापक हे हेथर्नथ्वेट यांना सांगितली. त्यांनी मोडकांना शब्द टाकला, आणि कर्वे एल्फिस्टन हायस्कूलमध्ये शिक्षकाच्या जागेवर रुजू झाले.

त्यांची विषयाची तयारी पाहून प्राचार्य मोडक खूष झाले. त्यांनी कर्व्यांना कायम करण्याची तयारी दर्शविली. पण कर्व्यांना एम. ए. करायचे असल्याने त्यांनी ती आभारपूर्वक नाकारली. प्रा. हेथर्नथ्वेट यांनी कर्व्यांना काही लष्करी आधिकाऱ्यांच्या गणिताच्या शिकवण्या मिळवून दिल्या.

एकाच वेळी धोंडोपंत कर्वे विद्यार्थी, शिक्षक, गृहस्थ अशा तिहेरी जबाबदाऱ्या पार पाडत होते. गिरगावातल्या चाळीतली ती दोन खोल्यांची जागा आणि त्यात माणसं किती रहात होती? एकूण पंधराजण. त्यांतही आला गेला पै-पाहुणा असायचाच. पण खरेच का ते एवढे मोठे कुटुंब होते? कुणाच्याही मनाला हा प्रश्न पडला असता.

अगदी जवळच्या मित्रांनी एकत्र रहायचे ठरवले आणि ते संयुक्त कुटुंब तयार झाले होते. त्यात कर्वे कुटुंब होते, जोशी कुटुंब होते आणि मोरेश्वर रामचंद्र काळे यांचेही कुटुंब होते. शिवाय कुणाची बहीण, कुणाचे भाऊ आणि कर्व्यांनी मुद्दाम शिक्षणासाठी ठेऊन घेतलेली पाच मुले होती, आणि ही सर्व मंडळी तब्बल सात वर्ष आनंदाने, गुण्यागोविंदाने एकत्र राहिली. याचे सारे श्रेय मात्र धोंडोपंत कर्वे आपल्या प्रेमळ पत्नीला-राधाबाईला देतात.

स्वत:च्या विद्यार्थी दशेत कर्व्यांनी स्वत: खूप अडचणींना तोंड दिले, ही गोष्ट कर्वे कधी विसरू शकत नव्हते. म्हणूनच होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी त्यांचा जीव तुटे. मात्र ती मुले स्वावलंबी व्हावी आणि दुसऱ्याकडून दान घेतल्याचे ओझे त्यांच्यावर जन्मभर राहू नये म्हणून कर्वे त्यांना त्यांच्या गरजेपुरती रक्कम व्याजाने

देत. शिवाय मुलांचा प्रत्येकी एक हजाराचा विमाही त्यांनी उतरवला होता. मुलांनी कर्जफेड केल्यावर मुलांना ते विमापत्र परत देत असत.)

इतकी मुले अण्णांनी शिकायला आणली पण त्यांतील, कर्व्यांचा मामेभाऊ रघुनाथ परांजपे याने कर्व्यांच्या सदिच्छेचे चीज केले. 'धोंडूसारखा हुशार हो!' असे रघुनाथाची आई त्याला त्याच्या लहानपणी नेहमी सांगत असे. आणि खरोखरच रघुनाथ हुशार निघाला. मॅट्रीकला तो पाहिला आला. पुढील सर्व परीक्षातही तो पहिलाच येत गेला. एवढेच नव्हे तर साऱ्या भारत देशातला पहिला सीनियर रॅंग्लर होण्याचा मान रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे याला मिळाला. आपल्या अद्वितीय यशाचे श्रेय रॅंग्लर परांजप्यांनी अण्णांच्याच म्हणजे धोंडोपंत कर्व्यांच्याच पदरात टाकले आहे. कर्व्यांच्या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत त्यांनी लिहीले आहे, 'ती. स्व. रा. रा. धोंडोपंत कर्वे यांच्या आत्मवृत्ताला मी उपोद्घात लिहिणे म्हणजे खरोखरच मर्यादा सोडून वागणे आहे. माझे दोन शब्द म्हणजे सूर्याला दिवटी दाखविल्याप्रमाणे असले तरी प्रकाशक मित्राच्या आग्रहाने लिहीत आहे याबद्दल वाचकांची विशेषत: अण्णांची माफी मागितली पाहिजे. प्रा. कर्वे यांचा माझा जवळचा आप्तपणाचा संबंध, तशात लहानपणापासून त्यांनी मला सर्व प्रकारचे शिक्षण देऊन मजवर मोठा उपकार केला आहे. या दोन कारणांमुळे मला ते वडिलांसमान सन्माननीय आहेत. त्यांच्या लेखणीतून उतरलेले आत्मचरित्र हे आमच्या परांजपे कुळाला शोभा आणणारे आहे. त्यामुळे माझ्यासारख्या त्यांच्या शिष्याला सहाजिक फार अभिमान वाटतो. पुष्कळ थोर विभूतींबद्दल 'दुरून डोंगर साजरे' अशी स्थिती असते. पण अण्णांच्या बाबतीत अशी स्थिती तिळमात्र नाही. त्यांच्याशी जितका जास्त परिचय होतो, तितकी त्यांच्याबद्दलची पूज्यबुद्धी जास्त वृद्धिंगत होत जाते.'

अण्णांनी असे विद्यार्थी आपल्या बिऱ्हाडी ठेवून घेतले होते, पण त्यांचे सारे यथास्थित करायचे कष्ट मात्र राधाबाईंना पडले. आपल्या कष्टाळू, कामसू, कधीही कुरकूर न करणाऱ्या पत्नीला आवश्यक असलेली विश्रांती आपण देऊ शकलो नाही याची टोचणी कर्व्यांच्या मनाला अनेकदा लागायची.

राधाबाई पहाटे साडेचार वाजता उठत. पाच वाजेपर्यंत न्याहारी तयार ठेवीत. न्याहारीसाठी दहीभात असे. मुलांचा अभ्यास घेणे, विद्यार्थ्यांचे खाणेपिणे करणे, सर्व बाबतीत त्यांची आईप्रमाणे काळजी घेणे, एकत्र कुटुंबातील सर्व कामे उरकणे आणि इतके करूनही स्वत: उशिरापर्यंत अण्णांजवळ शिकायला बसणे - यामुळे ती माऊली फार थकून जायची. एकत्र कुटुंबातल्या अडीअडचणी व मन:स्ताप यांचा राधाबाईंनी कर्व्यांजवळ कधी उच्चारही केला नाही. मात्र अपार कष्टामुळे राधाबाईंवर असह्य ताण पडला. त्यांची प्रकृती पार ढासळत गेली. दुखणे विकोपास गेले. कर्व्यांनी त्यांना विश्रांतीसाठी मुरुडास पाठविले. त्यांना बरेच दिवस मुरुडास काढावे लागले.



पत्नीच्या दुखण्यात तिला धीर देण्यासाठी कर्व्यांनी अनेक पत्रे लिहिली. त्यांची मने पूर्णपणे मिळाली होती. थोडे बरे वाटल्यावर त्या पुन्हा काही दिवस मुंबईला आल्या, पण मुंबईला फार दिवस राहणे त्यांना शक्य झाले नाही. दुखणे पुन्हा विकोपास गेले. त्यांना पुन्हा मुरुडास जावे लागले. यावेळी कर्वे परमार्थपर पत्रे लिहून मरणाला सामोरे जाण्यासाठी राधाबाईंच्या मनाची तयारी करीत होते, व या कठीण प्रसंगाला तोंड देण्यासाठी धैर्य यावे म्हणून स्वत:च्या मनाचीही तयारी करीत होते. त्यांच्या कुटुंबामध्ये अशा प्रसंगी मन कठोर बनविण्याचा गुणविशेष होता. बाबा वारले त्यावेळी त्यांच्या आईने असेच धैर्य दाखविले होते.

बाबांच्या प्रमाणेच राधाबाईंचा मृत्यूही पावसाळ्यातच झाल्यामुळे अण्णांना त्यांच्या शेवटच्या अवस्थेत भेटताही आले नाही. राधाबाईंच्या मृत्यूची वार्ता अण्णांना मुंबईत कळल्यावर त्यांची ती रात्र झोपेवाचून तळमळत गेली. पण त्यांनी पहाटेला रोजच्याप्रमाणे कार्यक्रम सुरू केला व संध्याकाळीच घरी परत आले. 'असल्या कठीण प्रसंगी मनुष्ये निरुद्योगी होऊन बसतात व समाचाराला येणाऱ्या आप्तांशी त्याचत्या गोष्टींची चर्चा करतात, त्यामुळे त्यांना निष्कारण कितीतरी त्रास होतो. नित्य कृत्यात व्यग्र होऊन जाणे यासारख्या अशा दु:खमय गोष्टींचा विसर पाडण्याला दुसरा उपाय नाही.' असे कर्व्यांचे विचार होते. सर्व सामान्यांत असा विवेक क्वचित आढळतो. राधाबाईंच्या स्मरणार्थ कर्व्यांनी मुरूडफंडाला ५०० रुपये दिले व राधाबाईंच्या नावे शिष्यवृत्तीही ठेवली.

(एम्. ए. व्हावे अशी कर्व्यांची फार इच्छा होती, पण ते यश त्यांना मिळवता आले नाही. तेव्हा कर्व्यांच्या जुन्या प्राध्यापकांनी त्यांना कॅथेड्रल गर्ल्स् हायस्कूल आणि अलेक्झांड्रा गर्ल्स् हायस्कूलमध्ये अर्ध वेळेची कामे मिळवून दिली. मॅट्रीकच्या वर्गाला ते गणित व विज्ञान शिकवीत. या शाळांत मुख्यत: युरोपियन व पार्शी मुली असत. त्यांच्यापुढे शिकवायला जाणाऱ्या कर्व्यांचा पोशाख धोतर, बंद गळ्याचा कोट, पगडी, पायांत मोजे व जोडे असा हिंदुपद्धतीचा होता. एक दिवस प्रिन्सिपॉलनी त्यांना पॅंट वापरावी असे सुचविले. यापूर्वी कर्व्यांनी कधी पॅंट वापरली नव्हती म्हणून त्यांनी प्रिन्सिपॉलच्या सूचनेचा तीन-चार दिवस विचार केला. मग एका मित्राकडून दोन पॅंटस् आणून काही दिवस घालून पाहिल्या. त्या त्यांना सोयीस्कर वाटल्या, मग कर्वे धोतराऐवजी पॅंट वापरू लागले.)

राजारामशास्त्री भागवत ह्या कर्व्यांच्या शिक्षकांनी मुंबईत टिळक आगरकरांच्या धर्तीवर मराठा हायस्कूलची स्थापना केली होती. नि:स्वार्थी व ध्येयवादी शिक्षक म्हणून कर्व्यांना त्यांनी बोलावून घेतले. नोकरी व खाजगी शिकवण्या करण्यात कर्व्यांचे दिवसातले ८-१० तास मोडत. काटकसर म्हणून ते सर्वत्र पायी जात. त्यांचे जीवन कष्टाचे व दगदगीचे होते पण त्यात त्यांना आनंद वाटायचा.

त्याशिवाय युरोपियन व अँग्लो इंडियन विद्यार्थ्यांसाठी ते माझगावला खाजगी वर्ग चालवीत. दिवाळीत पहाटे सहालाच वर्ग सुरू करीत. पहिला अर्धा पाऊण तास दिवा लावून वर्ग चालवावा लागे. कर्वे गिरगावातून माझगावपर्यंत पायी जात. पहाटे साडेचारपासून त्यांचा कामाचा दिवस सुरू होत असे. पण विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहिले की ते आपले सारे कष्ट विसरून जात. त्यांचा सारा शीण नाहीसा होई.

राधाबाईंना देवाज्ञा झाल्यावर कर्व्यांनी आपली कामे सुरू केली खरी पण त्यांचे मन दु:खाने भरून गेले होते. त्यांना एकाकीपणा जाणवत होता. दररोज राधाबाईंची आठवण येत होती. कर्वे अबोल होते. त्यांनी आपले दु:ख फारसे कुणाजवळ बोलून दाखवले नाही इतकेच.

त्याच सुमारास अचानक कर्व्यांचे जुने मित्र गोपाळ कृष्ण गोखले यांनी कर्व्यांना पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून बोलावले. असे बोलावणे येणे त्यांना सद्‌भाग्याचे वाटले पण कॉलेजच्या मुलांना आपल्याला आटोक्यात ठेवता येईल का अशी शंका त्यांना वाटली. आत्मविश्वास वाटेना. म्हणून नकार द्यायचा निर्णय त्यांनी घेतला. पण राजारामशास्त्री भागवतांनी त्यांना समजावले, 'कर्वे, असा मूर्खपणा करू नकोस. आलेली संधी घालविलीस तर या चुकीबद्दल जन्मभर तुला पस्तावावे लागेल. फर्ग्युसनला तुझी गरज आहे. तू जा.'

स्वत:च्या संस्थेचे नुकसान सोसून कर्व्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी भागवतांनी त्यांना मोलाचा सल्ला दिला. १५ नोव्हेंबर १८९१ या दिवशी कर्वे फर्ग्युसन कॉलेजात गणिताचे प्राध्यापक म्हणून दाखल झाले.

■ ■ ■



# ४ / प्रवाहाविरुद्ध पाऊल

श्री. धोंडो केशव कर्वे ऊर्फ अण्णा फर्ग्युसनमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले ते एकाकी विधुर अवस्थेत. पहिल्या पत्नीपासून एक मुलगा असूनसुद्धा अवघ्या ३३ वर्षांच्या या विधुर प्राध्यापकाला आपली मुलगी देण्यास पुण्यातील अनेक प्रतिष्ठित लोक उत्सुक होते, पण अण्णांचा ठाम निश्चय होता की, पुनर्विवाह करायचाच तर पुनर्विवाहित स्त्रीशीच.

नरहरपंत जोशी आणि धोंडोपंत कर्व्यांची मैत्री खूपच जुनी होती. विद्यार्थिदशेपासून ते एकत्र राहिले होते. एकाच बिऱ्हाडात त्यांची कुटुंबेपण नांदली होती. त्यामुळे जोशी-कर्वे कुटुंबातील सर्वच माणसे एकमेकांच्या दाट परिचयाची होती. पुढेही काय विचित्र योग - दोघाही मित्रांना विधुरावस्था प्राप्त झाली.

नरहरपंतांना तीन बहिणी होत्या, दुर्दैवाने त्या तिघीही विधवा झाल्या. त्या तिघींतली सर्वांत वडील बहीण हुशार, तरतरीत व अत्यंत तीव्र मनोवृत्तीची होती. अशा स्त्रीला वैधव्य दु:सह व्हावे यात नवल नाही. तिने तीव्र विरोध केला तरी तिला सक्तीने सोवळे केले गेले. त्यानंतर ती मानी मुलगी घराच्या बाहेर कधी पडली नाही. तिने आपले अन्न तोडले. गोडधोड कधी खाल्ले नाही. आजारात औषध घेतले नाही. स्वदेहाचे हाल हाल केले. केशवपनानंतर तिच्या तोंडावरचे हसू कायमचे मावळले. या यमयातना तिने सहासात वर्षे भोगल्या. कर्वे तिला स्वत:ची बहीणच समजत होते. अगदी विश्वासाने तिने कर्व्यांना आपल्या मुलीकडे लक्ष द्यायला सांगितले. कर्व्यांनीपण तिला शब्द दिल्याप्रमाणे तिच्या मुलीचे लग्न रँग्लर परांजप्यांशी ठरविले. हे लग्न लागल्याची वार्ता ऐकल्यावर तिने सुखाने प्राण सोडले. एका विधवेची अत्यंत दयनीय अवस्था करून सोडण्याच्या वेळी आपला समाज किती कठोर होतो हे त्यांनी जवळून पाहिले. बालविधवांना सोवळे करून त्यांना सक्तीने ब्रह्मचर्य पाळायला लावण्याची अनेक उदाहरणे त्यांनी ऐकली होती. सुधारणावादी विचारसरणीच्या या तरुणाचे मन त्यांचे दु:ख पाहून कळवळले होते, आणि म्हणूनच पुन्हा लग्न करावयाचे

तर पुनर्विवाह करू इच्छिणाऱ्या गतविधवा स्त्रीशीच - असे त्यांनी ठरविले. अर्थात हा निश्चय करताना त्यापुढे येणाऱ्या अडचणींची त्यांना कल्पना होतीच. पण तो कर्व्यांचा निश्चय!. परिणामांना शांतपणे तोंड देण्याच्या त्यांच्या निश्चयानेच त्यांना खूप मोठे केले.

नरहरपंतांची दुसरी बहीण गोदूबाई. लग्न झाले तेव्हा गोदूबाईचे वय अवघे आठ वर्षांचे होते. तर तिचे बिजवर पती तिच्यापेक्षा सतरा वर्षांनी मोठे होते. लग्न वैशाखात झाले आणि पुढे भाद्रपदात त्यांना वैधव्य आले. विधवेवर असणारी सर्व बंधने एवढ्या बालवयात तिच्यावर आली. लग्न, वैधव्य कुठल्याच शब्दाचा खरा अर्थ न कळणारे असेच तिचे वय होते.

'आजीने कुंकू लावू दिले नाही की मला राग यायचा.

'का नाही लावायचे कुंकू?' मी जोरात विचारले की आजी व आई डोळे पुसू लागत. पण त्या अशा का रडतात हेही मला तेव्हा उमगत नव्हते.'

धोंडोपंतांच्या पुनर्विवाहित पत्नी बाया कर्वे यांनी वरील प्रसंग आपल्या 'माझे पुराण' या आत्मचरित्रात लिहिला आहे.

नवरा गेल्यानंतर काही दिवसांनी गोदूबाईच्या सासरचे पत्र आले. 'माझी सून वारली आहे, आहे ही गोदूबाई माझा मुलगाच जिवंत आहे असे आम्ही मानतो. तरी सूनबाईस पाठवून द्यावे.'

गोदूबाईच्या आईच्या जिवावर आले तरी गोदुबाईला सासरी जावे लागले. आईचे सांगणे असे की, 'कामावे तो सामावे'! कामाने काही कुणी मरत नाही. सासरच्या मंडळींनी गोदुबाईला २१ वर्षापर्यंत सकेशा ठेवली होती. पण मग सोवळी गेली. कारण सकेशा विधवेच्या हातचे अन्न देवाच्या नैवद्याला चालत नसे. गोदुबाईच्या सासरची माणसे प्रेमळ होती तरी रूढीबाहेर वागणारी नव्हती. त्याकाळी एखादी विधवा सोवळी व्हायला तयार नसली तर तिचे फार हाल करीत. तिला मारत, दोरांनी बांधत. इतरही बराच त्रास देत. मग त्या अघोरी कृत्याला विधवेला नाईलाजाने तयार व्हावेच लागे. सोवळे झाल्यावर व्रतवैकल्ये खूप मागे लागत. रोज एकच वेळ जेवायचे. उपास तापास करायचे. कुणाच्या नजरेस पडायचे नाही. घराबाहेर न पडता घरातच कामाचे ढीग उपसायचे.

गोदूबाईचे भाऊ नरहरपंत जोशी दिवाळीच्या सुट्टीत देवरूखला घरी येत. त्यावेळी दर दिवाळीला गोदूबाईलाही माहेरी पाठवत. नरहरपंत सुधारक होते. त्यांना वाटे गोदूला मुंबईला न्यावे शिकवावे. त्यांची आई मात्र कामात होणारी मदत जाईल म्हणून गोदूबाईला मुंबईला पाठवायला तयार नसे. पण पुढे दादाची म्हणजेच नरपंतांची बायको वारली म्हणून अडचण काढण्यासाठी गोदूला जावे लागले. दादाच्या बिऱ्हाडी तेरा चौदा माणसे होती. कर्व्यांची बायको राधाबाई हिला एकटीला काम करावे



लागू नाही म्हणून दादांनी गोदूला मुंबईला नेले. त्यांनी तिला घरी थोडे शिकविले. पुढे पंडिता रमाबाईंनी काढलेल्या शारदासदनात सदनाची पहिली विद्यार्थिनी म्हणून गोदूला दाखल केले. काशीबाई कानिटकरांच्या अध्यक्षतेखाली सदनाचे उद्घाटन झाले. प्रथम गोदू घरी राहूनच सदनाच्या शाळेत जात असे. विधवा स्त्री अंगात चोळी घालून, उन्हासाठी हातात छत्री घेऊन आणि पायात जोडे घालून शिकायला शाळेत जाताना पाहण्यासाठी चाळीतील लोक जमत. त्याकाळी हे सर्व विपरीतच होते. पुढे ती सदनात रहायलाच गेली.

गोदूच्या कामासाठी बदली म्हणून घरी गडी ठेवायला गोदूच्या बाबांना पंडिता रमाबाई वर्षाचे ५० रुपये देत. मात्र वडिलांना दिलेल्या पैशाबद्दल गोदू रमाबाईंची सदनातील सर्व कामे करीत असे. सदनात आल्यावर रमाबाईंनी 'केस वाढव' असे गोदूला सुचविले. तिने तसे केले. दादा सदनात तिला भेटायला नेहमी येत असत. त्यांचे मित्र धोंडोपंत कर्वे बुजरे असल्यामुळे प्रथम त्यांच्याबरोबर सदनात जायला तयार होत नसत, पण मग पुढे एखादेवेळी तेही येऊ लागले.

पंडिता रमाबाईंचा गोदूच्या जीवनावर फार प्रभाव पडला. रमाबाई काहीवर्षे अमेरिकेत होत्या. त्या भारतात परत आल्यावर अमेरिकन लोकांच्या मदतीने विधवांना शिक्षण देण्याचे काम करावयाचे त्यांनी ठरविले. मुंबईत शारदासदनाची सुरूवात केली. मुंबईपेक्षा पुण्यात त्याचे काम जास्त फोफावेल असे वाटले म्हणून दीड पावणेदोन वर्षांनी शारदासदन पुण्यास हलविण्यात आले. पुण्यात सदनातील विद्यार्थिनींची संख्या ६४ झाली. दुर्गाबाई किर्लोस्कर, काशीबाई देवधर, वेणूबाई नामजोशी ह्याही त्यांत होत्या. पुढे ह्या तिघीही हिंगणे अनाथ बालिकाश्रमात काम करायला आल्या.

शारदासदनात गोदूबाईला खूप काम करावे लागे. कधी कधी हरी नारायण आपटे, काशीबाई कानिटकर अशी मंडळी सदनात आली तर त्यांच्यासाठी स्वयंपाकही करावा लागे. पण एकीकडे सहा इयत्ता मराठी व तीन इयत्ता इंग्रजी त्यांनी पुऱ्या केल्या. रमाबाई म्हणत, 'फुलांच्या गादीवर बसून विद्या येत नाही. पण, विधवांचे आयुष्य हालाचेच असले पाहिजे अशी जी सर्वत्र समजूत आहे तसे ते असता कामा नये. मी त्यांना सुखात ठेवणार आहे. इतर व्यक्तींना मिळतात ती सर्व सुखं त्यांनाही मिळायला हवीत.'

एकदा गोदूने थंड पाण्याने अंग धुतलेले कळले तेव्हा रमाबाई खूप रागावल्या. त्यांनी गोदूला ५०० ओळी शुद्धलेखन लिहायची शिक्षा केली. बाई सदनातील विद्यार्थिनींवर जसे रागावत तसे मनापासून प्रेमही करीत असत. बाईंच्यामुळे तर त्या विधवा स्त्रियांना लोकांपासून होणारा त्रास वाचत असे.

रमाबाई म्हणत, 'स्त्री हाच स्त्रीचा शत्रू आहे. स्त्रियांचा उद्धार करायला स्त्रियांनीच पुढे झाले पाहिजे. इथे शिकणाऱ्या प्रत्येक विधवा विद्यार्थिनीने पुढे जर स्वतःप्रमाणे

एखाद्या विधवेला शिकवले तर माझ्या शिकवण्याचे सार्थक झाले असे मी समजेन.' त्यांचे हे शब्द गोदूबाईच्या हृदयपटलावर कायमचे कोरले गेले.

(एकदा गोदूबाईंचे बाबा पुण्यास कर्व्यांकडे उतरले होते. जेवण झाल्यावर इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. बाबा कर्व्यांना म्हणाले, 'का हो, तुम्ही पुन्हा लग्न करणार नाही का?' त्यावर कर्वे उत्तरले, 'तसेच काही नाही, पण केलेच पुन्हा लग्न तर विधवेशीच करायचे हा माझा निश्चय आहे. त्याबाबतचा विचार पक्का आहे.'

बाबा कर्व्यांना म्हणाले, 'असे असेल तर, धोंडोपंत, मुलीचा शोध करायला दूर कशाला जायला हवे? आपली गोदूबाई आहे ना!'

कर्वे बाबांकडे पाहून म्हणाले, 'पण बाबा, ह्या गोष्टीला तुमची संमती आहे? आणि गोदूबाईच्या मनाची तयारी आहे का ते प्रथम विचारात घ्यायला हवे.'

बाबांना कर्व्यांचे उत्तर ऐकून मनोमन आनंद झाला. कारण त्यांना पहिल्यापासून वाटायचे गोदूबाईचे लग्न झाले पाहिजे. त्यासाठी तिला दूर कुठे नेऊन ती कुमारिका आहे असे सांगावे लागले तरी चालेल. आपल्या पहिल्या मुलीच्या आयुष्याचे वैधव्यामुळे मातेरे झालेले त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते, त्यामुळे त्यांच्या मनाने फार धसका घेतला होता.

गोदूबाई मात्र म्हणायची, 'नको बाबा, तोही मेला तर? त्यापेक्षा मी आपले जन्मभर कष्ट करीन.' पण बाबांनी कर्व्यांच्या स्थळाबद्दलची गोष्ट काढताच गोदूबाईचाही रुकार मिळाला.

दरम्यान नरहरपंतांचा पुनर्विवाह पुण्यास एका प्रौढ कुमारिकेशी झाला. त्या लग्नाच्यावेळी कर्व्यांनी गोदूबाईला विचारले, 'मी गरीब आहे. पंडिता रमाबाईंच्या सदनात जे सुख आहे ते माझ्याकडे मिळणार नाही. तुला जर माझी गरिबी पसंत असेल तर तुझ्या वडिलांच्या म्हणण्याप्रमाणे तुझ्याशी लग्न करण्याची माझी तयारी आहे.' गोदूबाईने कर्व्यांशी लग्न करण्याची तयारी दर्शविली.

अशारितीने कर्व्यांनी गोदूबाईशी पुनर्विवाह करायचे ठरविले खरे पण त्यासाठी त्यांना आपल्या मातोश्री व वडिलबंधूंची अनुमती घ्यायला हवी होती. ते काम खूपच कठीण होते.) विधवा विवाहाचा प्रश्न हल्लीच्याइतका सोपा नव्हता. कर्व्यांच्या मातोश्री व वडीलबंधू प्रेमळ होते, त्यांचे कर्व्यांवर अकृत्रिम प्रेम होते, तरी विधवेशी लग्न करण्याचा विचार त्यांना सांगणे म्हणजे त्या उभयतांच्या धर्मबुद्धीला जबरदस्त धक्का देऊन त्यांना दु:खसागरात लोटून देण्यासारखे होते. पण 'माझ्याएवढ्या वयाच्या मनुष्याने वडील मंडळींच्या इच्छेप्रमाणे कुमारिकेशी लग्न करणे म्हणजे केवळ पशूच्याही खालच्या पायरीवर जाणे होय.' असे कर्व्यांना मनापासून वाटत होते. राधाबाईंच्या मृत्यूनंतर ज्या ज्यावेळी पुनर्लग्नाविषयी त्यांच्या मनात विचार येत त्या त्यावेळी त्यांची विवेकबुद्धी त्यांना विचारी, 'तू सामान्य माणसाप्रमाणे भ्याड मनाने जनरूढीला बळी



पडणार, की मनाला पवित्र वाटणाऱ्या व थोर विभूतींनी घालून दिलेल्या नवीन मार्गाचे धैर्याने अवलंबन करणार?'

(त्यांची मन:स्थिती द्विधा येवढ्यासाठी झाली की मातोश्री, बंधूंना दुखवून विधवेशी पुनर्विवाह करावा की लग्नाचा विचार मनातून अजिबात काढून टाकावा. अखेरीला सद्विचारांचा जन्म झाला. आपल्या मनाने विधवेशी पुनर्विवाह करण्याचा केलेला निश्चय त्यांनी अत्यंत सौम्यपद्धतीने त्या दोघांना कळविला.

ती दोघे अत्यंत थोर मनाची व समंजस होती. त्यांनी अण्णांची मन:स्थिती ओळखली व 'आम्हाला आमच्या परिस्थितीला सोडून देऊन तुझ्या मनाला योग्य वाटेल ते तू कर.' अशी मोकळीक त्यांनी दिली.) पडत्याफळाची आज्ञा घेऊन कर्वे लग्नाला तयार झाले खरे, पण आणखीही काही अडचणी या विवाहात आल्या.

गोदूबाईच्या लग्नाबद्दलची गोष्ट त्यांच्या बाबांनी पंडिता रमाबाईंच्या कानावर जेव्हा घातली तेव्हा ह्या लग्नापासून गोदूबाईला परावृत्त करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्या म्हणाल्या, 'कर्वे यांची प्रकृती किरकोळ आहे. शिवाय त्यांना बारा वर्षांचा पहिला मुलगा आहे. त्यांचा पगार थोडा आहे. तेव्हा विचार कर. निदान एक वर्ष तरी थांब. मग लग्न कर.'

त्यांच्या सांगण्याचा हेतू हा की, कर्वे एक वर्षभर तरी जगतात की नाही, अथवा आहे इतपत तरी त्यांची प्रकृती टिकते की नाही. धोंडो केशव कर्वे शतायुषी झाले. त्यांची अंगकाठी बारीक खरी, पण कमावलेली होती हे वरवर पाहणाऱ्याला कळत नसे.

गोदूबाईला सर्वांत तिच्या बाबांच्या विचारसरणीचे नवल वाटे. त्याकाळातही माणुसकी हाच त्यांना श्रेष्ठ धर्म वाटे. ते गोदूबाईला म्हणत. 'अग, ज्या देवाने तुला विधवा केली त्याच देवाला तुझ्या हातचा नैवेद्य का चालू नये?' आपल्या घरच्या उपाध्यायांनाही त्यांनी सांगीतले, 'माझ्या देवाला गोदूबाईच्या हातचे चालते. तुम्हाला चालत नसेल तर तुम्ही इकडे येऊ नका.'

गोदूबाई एकप्रकारे भाग्यवान होती असेच म्हटले पाहिजे. आणि म्हणूनच आपल्या विधवा मुलीला इतक्या सन्मानाने वागविणारा पिता तिच्या वाट्याला आला. शिवाय ज्याच्याबरोबर पुनर्विवाह व्हायचा होता ते धोंडोपंत कर्वेही आपल्या विचाराशी पक्के होते.

(आत्मचरित्रात याबद्दल कर्व्यांनी) खूप सविस्तर (मजकूर लिहिला आहे) सारांश असा, 'मी मुरूडला असताना वयाच्या अकराव्या वर्षीच मुरूड येथील श्री. पां.दा. बाळ या हुशार, बहुश्रुत आणि वर्तमानपत्रे नित्य वाचणाऱ्या सद्गृहस्थांचा सहवास मला लाभला. माझे गुरूजी श्री. वि. ल. सोमण हे माझे मार्गदर्शक होते, त्यांचा व श्री. बाळ यांचा परिचय असल्यामुळे त्या दोघांत होणाऱ्या चर्चा मला लहानपणीच

ऐकायला मिळत असत. 'इंदुप्रकाश' पण मुरूडला येत होते. त्यावरच्या दोघांच्या चर्चा विशेष रंगत असत. तेव्हापासूनच पुनर्विवाहचे कार्य हे एक सत्कार्य आहे असे माझ्या मनाने घेतले.

'मी कॉलेजात असताना ता. १२ जून १८८३च्या केसरीच्या अंकात माझे मित्र श्री. सीतारामपंत देवधर यांनी रचलेले, विधवांच्या स्थितीबद्दलचे हृदय हलवून सोडणारे एक पद प्रसिद्ध झाले. ते पद मला फारच आवडले. मी ते पाठ केले व कारणपरत्वे म्हणत असे. माझे मित्र नरहरपंत मजकडून ते अनेक वेळा म्हणवून घेत. न्यायमूर्ती रानडयांनी ह्या पदाच्या प्रती छापवून घेऊन फुकट वाटल्या होत्या.

'आणखी एक कारण म्हणजे माझे बालमित्र श्री. रामभाऊ जोशी यांनी विशेष प्रकारचे धैर्य दाखवून आपल्या गतभर्तृका भगिनीचा विवाह तिला पुण्यास नेऊन स्वत:च्या जबाबदारीवर मोठ्या धारिष्टयाने करुन दिला होता. रामभाऊंच्या उदाहरणाने माझ्या मनावर बराच परिणाम घडला.

'विधवांविषयीची विशेष प्रकारची सहानुभूती उत्पन्न होण्याला नरहरपंतांच्या वडील बहिणीचे अत्यंत हृदयद्रावक असे प्रत्यक्ष उदाहरण माझ्या डोळ्यासमोर होतेच.

'मी पुनर्विवाहकडे वळलो याला सामान्यत: स्त्रीजातीविषयी सहानुभूती हेही एक कारण होते. स्त्रीजातीकडे निसर्गप्राप्त जे एक कर्तव्य आले आहे, त्यामुळे ती जात अगदी पंगू झाली आहे. ज्या अपराधाचे मुख्य कर्तृत्व पुरुषाकडे असते व ज्याचा उगम शेकडा नव्वद उदाहरणांमध्ये पुरुषाकडूनच होतो, त्याबद्दल निसर्ग आणि समाज या उभयतांनीही स्त्रीलाच कडक शासन करावे व पुरुषाला दोघांच्याही तावडीतून निसटून जाता यावे या प्रकाराला काय म्हणावे ते कळत नाही. निसर्गावर मनुष्य केव्हा मात करू शकेल हे सांगता येत नाही, पण समाजकृती मनुष्यकृत आहे आणि ती मनुष्याला सावकाश खरी, पण बदलता येणारी आहे. स्त्रियांच्या ह्या शोचनीय स्थितीशी सामना त्यांच्या त्याच करू जाणे!

'स्त्री जातीच्या दु:खाने माझे मन कळवळण्याला वरील अनेक प्रसंग कारणीभूत आहेत.'

वडिलांची पुरोगामी विचारसरणी आणि भावी पती धोंडोपंत कर्वे यांना वाटणारा स्त्रीविषयक कळवळा या दोन्हींमुळे विधवेच्या दुर्दैवी जीवनक्रमातून गोदूबाईची सुटका होऊ शकली. एकट्या गोदूबाइलाच नव्हे तर भारतभरच्या असंख्य स्त्रियांना वैधव्याच्या दाट अंधाराच्या जीवनक्रमातून आस्मितेचा प्रकाशकिरण अण्णांमुळे दिसू शकला. अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या स्त्रीजातीला ज्ञानरूपी प्रकाश त्यांच्यामुळे दिसू शकला. त्यांच्या जीवनपथाचा मार्ग उजळून निघाला. त्याग, कार्य आणि निष्ठा या मौलिक मूल्यांचे अधिष्ठान त्यांच्या जीवनाला लाभले. प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयाच्या शिक्षणापर्यंतचे शिक्षण स्त्रियांना प्राप्त होऊ शकले. आपल्या



बुद्धिसामर्थ्याने प्रत्येक क्षेत्रात तळपणाऱ्या स्त्रीजातीच्या यशाचे श्रेय महर्षी कर्व्यांनी त्यासाठी जीवनभर केलेल्या अखंड परिश्रमाकडे जाते. कर्व्यांनी त्याकाळी गोदूबाईशी पुनर्विवाह करून स्वत:पासूनच या जीवितकार्याला सुरूवात करण्याचे ठरविले.

११ मार्च १८९३ला शारदासदनाचा वाढदिवस होता. त्याच दिवशी गोदूबाई - धोंडोपंतांच्या पुनर्विवाहाचा मुहूर्त ठरला. कर्व्यांचे मित्र श्री. रामभाऊ जोशी आणि प्रि. गोपाळ गणेश आगरकर यांनी लग्नपत्रिकेवर सह्या केल्या होत्या. पुनर्विवाहाचे कट्टर पुरस्कर्ते भांडारकर यांच्या घरात लग्न लागले. लग्न विधिवत् झाले. मालवणच्या वेदमूर्ती भिकंभटजी वझे यांनी लग्नाचे पौरोहित्य केले. त्यांना विधवांच्यासंबंधी फार सहानुभूती होती. त्यांना पुनर्विवाहाच्या प्रसंगी पौरोहित्य करणे म्हणजे पुण्यकृत्य वाटे. एक पुनर्विवाह चालविला तर एका काशीयात्रेचे पुण्य लागते, अशी त्यांची श्रद्धा होती.

विवाह विधीतील कन्यादान करण्याची पद्धत अण्णांच्या विवेकबुद्धीला पटली नाही. त्यात प्रौढ वधूचे दान फारच चमत्कारिक दिसते असे त्यांचे मत होते. प्रौढ वधुवरांचे विवाह स्वयंवराच्या स्वरूपाचे होत असत. स्वयंवर या नावाला शोभेल असा काहीतरी विधी या संबंधाने असावा असे अण्णांना वाटले. आणि वाटले की गप्प बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. त्यांनी व गोदूबाईने ठरविले की आपल्या पुनर्विवाहात वधूचे कन्यादान न करता तिने आत्मदान करण्याचा विधी करावा आणि त्याप्रमाणे त्यांनी केलेही. भिकंभटजींनीही तसे करण्यास काही हरकत घेतली नाही. अण्णांनी ह्या गोष्टीची फारशी वाच्यता केली नव्हती, तरी या गोष्टीची चर्चा लोकांमध्ये झाली. वर्तमानपत्रांनीही 'आत्मदान' या शब्दांचा उपयोग लग्नाची माहिती देताना केला.

संध्याकाळी पुनर्विवाहित दांपत्य शारदा सदनात गेले. त्या आधी गोदूबाईने वेणीफणी केली. तोंड पुसले. कुंकू लावण्यासाठी कपाळावर बोट टेकताना तिच्या मनात असंख्य भाव दाटून आले. वीस वर्षांनंतर आज प्रथम ती कुंकू लावीत होती. तिला एकीकडे खूप आनंद झाला होता आणि त्याचवेळी ती मनातून घाबरूनही गेली हाती. शारदासदनातील पहिली विद्यार्थिनी म्हणून गोदूबाई, रमाबाईंची फार लाडकी होती. त्यांनी मोठा समारंभ केला. लग्नानिमित्ताने मोतीचुराचे लाडू केले. शिवाय चहाच्यावेळी वेडिंग केकही होता. बरीच मंडळी जमली होती. मात्र कर्व्यांच्या घरची अगर गोदूबाईच्या घरची एकही व्यक्ती समारंभाला हजर नव्हती.

रमाबाईंना आपली लाडकी विद्यार्थिनी स्वत:च्या नव्या घरी जाणार म्हणून फार आनंद झाला होता. खडतर वैधव्यकाळ जाऊन तिच्या वाटचाला पुन्हा सौभाग्यवतीचे आनंदमय जीवन आले होते. रमाबाईंनी गोदूबाईला घसघशीत आहेर केला.

सदनातील इतर मुलींनी मैत्रिणीच्या लग्नानिमित्त एक कविता करुन आपला

आनंद व्यक्त केला. ते गाणे असे,

*आनंद झाला फार। आम्हाला। आनंद झाला फार।*
*प्रिय भगिनी गे गोदूबाई। सुखे करी संसार।*
*जन अपवादा न गणुनि सखये। केला योग्य विचार।*
*वाहवा करतिल सुजन तुझी गे। करतिल साह्य अपार।*
*तुम्हा उभयता प्रभु सुख देवो। करा तुम्ही उपकार।*

त्यांनी रचलेली मंगलाष्टकेपण फार अर्थपूर्ण होती. त्यांचा आशय असा होता, 'सौभाग्यानुभवास विन्मुख झालेल्या, हीन स्थितीत असलेल्या एका बालविधवेने धैर्य करून पुन्हा लग्न लावले आहे. अशा आपल्या भगिनीला आपण यश चिंतूया. दीनांचा उद्धार करणाऱ्या प्रभूने ह्या जोडप्याचे रक्षण करावे.'

कर्व्यांच्या शेजारी बसलेले डॉ. भांडारकर कर्व्यांना म्हणाले, 'कर्वे, तुम्ही बायकोचे नाव काय ठेवणार ते उखाणा घेऊन सांगा.' कर्व्यांनी उखाणा घेतला,

'सदनाचे उपकार, मजवर झाले फार।
'आनंदीने' फेडायला असावे तयार।'

नाव घेण्यासंबंधी गोदूबाईंनी आत्मचरित्रात लिहिले आहे, 'मी मात्र कर्व्यांचे नाव कधीच घेतले नाही. कारण 'धोंडू' हे नावच मला आवडत नव्हते. नवऱ्याचे नाव घेतले तर त्याचे आयुष्य कमी होईल ही जुनी कल्पनाही मला मान्य नव्हती. लग्नापूर्वी मी कर्व्यांना 'अण्णा' म्हणत असे, आता मला वाटले लग्नानंतर काय म्हणावे? तेव्हा रमाबाईंनी सुचविले 'कर्वे' म्हणा.' लग्नानंतर अनेकांनी अभिनंदनाची भाषणे केली. रमाबाईंनी 'चेतक' घोड्याच्या गाडीतून त्या दोघांना घरी पोहोचविले. दोघांनी नवा संसार सुरू केला.

दोनतीन वेळा शारदासदनात गोदूबाईला माहेरपणासाठीही बोलविले होते. समाजाकडून प्रा. कर्व्यांच्या पुनर्विवाहाचे मिश्र स्वागत झाले. धार्मिक व सामजिकदृष्ट्या ज्यांनी या विवाहाचा निषेध केला त्यांचा आवाज विवाहाचे स्वागत करणाऱ्यांपेक्षा मोठा होता. सुदैवाने कर्व्यांचे घरमालक गंगाधरपंत मेहेंदळे यांना त्यांच्याविषयी सहानुभूती वाटत होती, म्हणून पुनर्विवाहित जोडप्याला त्यांनी आपल्या घरात राहण्यास हरकत घेतली नाही. कर्व्यांपूर्वी याच जागेत प्रि. गोपाळ गणेश आगरकर राहत होते.

विशेष म्हणजे मुंबईच्या 'इन्दुप्रकाश' व 'सुबोध पत्रिका' पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' 'सुधारक' व 'केसरी', अकोल्याच्या 'वैदर्भ' आणि वेंगुर्ल्याच्या 'वेंगुर्ला वृत्त' या नियतकालिकांनी प्रा. कर्व्यांनी पुनर्विवाह करून धाडसी पाऊल टाकल्याबद्दल त्यांचे कौतुक व अभिनंदन केले. इतरांनी मात्र या विवाहाचा समाजावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होईल अशी चिंता व्यक्त केली.

■ ■ ■



# ५ / कसोटीचे दिवस

कर्व्यांच्या पुनर्विवाहानंतर सनातनी वृत्तपत्रांनी त्यांच्यावर जो हल्ला चढविला त्याचे कर्व्यांना काही वाटले नाही. किंबहुना त्या विवेकी माणसाला ते अपेक्षितच होते. परंतु आपल्याच मित्रमंडळींकडून आणि जवळच्या नातेवाईकांकडून होणारी टीका सोसणे उभयतांना फार कठीण गेले. लग्नामुळे त्यांच्याशी दुरावा निर्माण होणे अपरिहार्य होते, पण ज्या मुरूडवर कर्व्यांनी अखेरपर्यंत प्रेम केले होते ती मुरूडकर मंडळी ज्या पद्धतीने त्यांच्याशी वागली, ती रीत असह्य होती.

विवाहानंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत पुनर्विवाहित कर्वे दांपत्य जेव्हा मुरूडला गेले तेव्हा मुरुडकरांच्या रागाची त्यांना प्रचीती आली. हर्णैच्या बंदरावरून मुरुडास जायचे तर कुणी त्यांना आपल्या बैलगाडीत बसवून घ्यायला तयार होईना. त्यांना उतरायला म्हशीचा गोठा दिला. पाणी द्यायलाही कोणी नव्हते. बोटीच्या विटाळाचे कपडे धुण्याकरिता रघुपतीने अंगावर पाणी ओतले. तो कर्व्यांकडे राहणारा, तेव्हा त्याला कानपिचक्या म्हणून मुद्दाम तेथे बोलावून घेतलेले असावे. कर्व्यांच्या घरची मंडळी मात्र सज्जन होती. लोकांना वाटावे कर्वे दांपत्य आपला स्वयंपाक करून खातात म्हणून आनंदीबाई म्हणजे गोदूबाई उगीचच चूल पेटवी. कर्व्यांची आई शिजलेले अन्न त्यांना गुपचूप पोहोचवीत असे. आनंदीबाई आपल्या आत्मचरित्रात लिहितात, 'शेजारपाजरच्या बायका लांबून टेहळणी करीत, दुरून बोटे दाखवून कुजबूज करीत पण आमच्याजवळ फारसे कुणी येत नसे. आणि चुकूनमाकून कोणी आलेच तर खवचटपणाने बोले. ते ऐकून वाटे चांगली खेटरपूजा करावी.'

कर्वे आपल्या आत्मचरित्रात लिहितात, 'मानापमानाचा विचार न करता लोक जसे वागवतील तसे वागवून घेण्यास मी तयार होतो. शूद्र लोकांत पुनर्विवाहाची चाल आहे, तेव्हा मला तुम्ही शूद्राप्रमाणे वागवा, असे मी ग्रामस्थांना स्पष्टपणे सांगितले, पण मला खड्यासारखे उचलून टाकण्याचाच त्यांनी बेत केला. मी सायंकाळी मुरुडास जाऊन दाखल झालो - ही बातमी गावभर पसरली. मला कसे वागवायचे

याबद्दल टोळक्या टोळक्यांत खलबतं झाली. दुसऱ्या दिवशी गावकी जमली. अठरा वर्षांवरील प्रत्येक ब्राह्मण त्या दिवशी गावकीला हजर होता. गावाबद्दलच्या एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत निदान दोन पक्ष असायचे. पण इथे सर्वांचे एकमतच होते. नव्या सुशिक्षित मंडळींपैकी एकालाही, 'पुनर्विवाहित मनुष्याला अशारीतीने वागविणे योग्य नव्हे' असे म्हणण्याचे धैर्य झाले नाही. गावकुटाळांची निर्णायक सभा भरली आहे, असे वाटले.'

कर्व्यांच्या दादांची मात्र यावेळी अतिशय कठीण स्थिती झाली. गावकीत एकमताने ठराव झाले ते असे,

(१) धोंडोपंतांना एका बैठकीवर घेऊन बसू नये.

(२) ते ज्या सभेत असतील, त्या सभेला कोणी जाऊ नये.

(३) कर्वे मे महिन्यानंतर पुन: येऊन कवाडीत पाऊल टाकतील तर त्यांचे बंधू भिकाजीपंत यांच्यावर बहिष्कार घालावा.

पहिल्या दोन बंधनांचे कर्व्यांना फारसे वाईट वाटले नाही. इतपत विरोध होईल असे त्यांना अंदाज होताच. पण तिसरे बंधन मात्र त्यांच्या काळजाला झोंवले. ते लिहीतात, 'माझा शारीरिक छळ झाला असता तर तो मी मोठ्या आनंदाने सोसला असता. पण प्रियजनांतील प्रेमपाश छेदणारा हा नियम मला असह्य झाला. आम्ही कुटुंबातील सर्व मंडळी अतिशय एकोप्याने व प्रेमळपणाने वागणारी होती. ग्रामस्थांनी अशाप्रकारे शस्त्र उगारलेले पाहून आई व अंबाताई यांची मन:स्थिती अत्यंत शोचनीय झाली. शेजारपाजारच्या स्त्रिया आपखुशीने डिटेक्टीव्ह झाल्या. दादांनाही लोकापवाद दु:सह झाला. त्यांची मन:स्थिती फार बिघडली. त्यानंतर काही वर्षे मी मुरूडगावची वास्तपुस्त सोडून दिली. आठ-दहा वर्षे मी माझ्या घराच्या आवारात पाऊल टाकले नाही. मुरूडफंड हा ब्राह्मण ग्रामस्थांचा आहे आणि पुनर्विवाहितेशी लग्न केल्यामुळे कर्वे ब्राह्मण राहिले नाहीत, तेव्हा त्यातून त्यांना काढून टाकावे असा सूर निघाला होता पण त्याला फारसा दुजोरा मिळाला नाही.

'मी तरी मुरुडात मुरलेलो होतो, पण आनंदीबाईची स्थिती फारच चमत्कारिक झाली. तिला घरातून बाहेरही जाता येत नसे. आणि घरबसल्या कुचकी नासकी बोलणी सहन करावी लागत. नाहीतर काहीतरी खमंग बोलून त्यांना गप्प करावे लागे पण काही झाले तरी मनाला त्रासच.'

या पुनर्विवाहाचे प्रायश्चित कर्व्यांच्या सासऱ्यांना म्हणजे गोदूबाईच्या बाबांनाही ग्रामस्थांनी घ्यायला लावले. मुलीच्या पुनर्विवाहाबद्दल ग्रामस्थांच्या उपस्थितीत त्यांना रामाच्या देवळात बारा नमस्कार घालायला लावले आणि तीन देवळांच्या जीर्णोद्धारासाठी १००/- रुपये दंड त्यांच्याकडून वसूल केला गेला. या सर्व प्रकाराबद्दल चीड येणारी व्यक्ती अपवाद म्हणून एक होती, ती म्हणजे कर्व्यांचे दापोलीचे मित्र मोडक. त्यांनी



कर्वे दांपत्याचे आदरातिथ्य छान केले. त्यांच्या वृद्ध आईने मोठ्या कौतुकाने आनंदीबाईची वेणीफेणी केली.

आनंदीबाई, कर्वे, रघुनाथ आणि शिक्षणासाठी त्यांनी बाळीलाही बरोबर घेतले होते, असे चौघेजण परतीच्या प्रवासासाठी बोटीवर चढले. तिथेसुद्धा आनंदीबाईंकडे बोट दाखवून लोक हळूहळू कुजबुजत होते, 'ही दोन्ही मुले बाईच्या पहिल्या नवऱ्याची असतील.'

असे अनेक प्रकारचे सुखदु:खाचे अनुभव घेऊन व तालुक्यातील लोकांना महिना दोन - महिने चर्चेला पुरतील असे विषय उत्पन्न होण्याला कारणीभूत होऊन कर्वे कुटुंबीय पुण्याला आले.

पुण्याला परत आल्यावर एकंदर सात मंडळींचा स्वयंपाक वगैरे करून आनंदीबाई शिकण्यासाठी हुजुरपागेत जाऊ लागल्या. त्यांना पाहण्यासाठी लोक स्वत:चा वेळ खर्च करून उभे रहात, त्यांना ऐकू येईल असे बोलत, 'बायकांनी पायात जोडे घातले, आता पुरुषांनी काय घालावं?' त्यावेळी बायका नेहमी अनवाणीच असत. आनंदीबाईंच्या वर्गातल्या मुलींपाशी त्यांच्या घरची व शेजारची माणसे, आप्त बरेच दिवसपर्यंत कर्वे कुटुंबाची चौकशी करीत असत.

शारदासदनात आनंदीबाई तिसरी नापास झालेल्या होत्या, पण हुजुरपागेत त्यांना दुसरीत बसविले. त्यामुळे वार्षिक परीक्षेत पुढे नेहमी त्यांचा पहिला नंबर येई. आनंदीबाई म्हणायच्या, 'कर्वे माझे नाव घालायला शाळेत बरोबर येत अगर पत्र देत तर माझे वर्ष वाचले असते. पण कर्वे आले नाहीत.'

कर्वे पतिपत्नींचे पूर्वायुष्य कष्टमय, खडतर होतेच, पण त्यात सौख्यकारक गोष्ट अशी की सतत होणाऱ्या मानहानीमुळे ती दोघे एकमेकांच्या अगदी निकट आली. परस्परांच्या आधारावर आनंदाने राहू लागली. उचापती करणारे लोक कंड्या पिकवत, पण कर्वे नेहमी शांत राहात. आगरकरांच्या पत्नीने कर्वे दांपत्याला भोजनाला बोलावून खणानारळाने आनंदीबाईंची ओटीही भरली. फर्ग्युसनच्या प्राध्यापकांच्या वर्तुळातही कर्व्यांबद्दल सहानुभूती होती, आगरकरांच्या पत्नी आनंदीबाईंना हळदीकुंकवाला बोलवीत, पण त्यांना स्वत:च्या हाताने कुंकू मात्र लावीत नसत. ते काम पोरीबाळींना सांगत. रँग्लर परांजप्यांच्या आई तर कर्व्यांची मामीच, पण तिने सुद्धा आपल्या सुनेस वेगळा फणीकरंडा दिला व आनंदीच्या करंड्यातले कुंकू लावू नकोस - असे सांगितले होते. पुढे चार-पाच वर्षांनंतर जेव्हा आनंदीबाई सुईणीचे काम शिकून आल्या व या बायकांच्या उपयोगी पडू लागल्या, तेव्हा त्यांची ओटी भरणे, त्यांना कुंकू लावणे, पंक्तीला जेवायला बसवणे, त्यांचे उष्टे काढणे वगैरे महाकर्मठ लोकांच्या घरातूनही होऊ लागले. पण सुरूवातीला निराश करणारे प्रसंग बरेच घडत, तेव्हा आगरकरांच्या घरी मिळालेला पाठिंबा व धीर देणारा एखादा प्रसंग - निराशेतही

आनंदाने क्षणभर आयुष्य उजळून टाकीत असे.

लग्नानंतर तेरा महिन्यांनी आनंदीबाईंना पहिला मुलगा झाला. त्यावेळी रमाबाईंनी त्यांना खूप मदत केली. बाळाला बाळलेणी, कपडे, चांदीची वाटी असा बाळंतविडा केला. मुलाचे नाव शंकर ठेवले. त्यानंतर दीड वर्षांनी दुसरे मूल झाले पण ते दगावले. या सर्व काळात आनंदीबाईंनी शिक्षण सोडले नाही. त्या हुजुरपागेत शिकत. पण कर्व्यांना वाटे प्रत्येक स्त्री-पुरुषाने अशी एखादी कला शिकून घ्यावी की त्याला स्वतःचे पायावर उभे राहता यावे. यासाठी संधी मिळताच त्यांनी आनंदीबाईंना परिचारिकेचे व सुईणीचे काम शिकून घेण्यासाठी नागपूरच्या डफरीन इस्पितळात एक वर्ष पाठविले.

शंकर थोडा मोठा झाल्यावर आनंदीबाई हुजुरपागेत बोर्डिंगात राहू लागल्या. शंकरसुद्धा आईबरोबर तिथेच राहात होता. हुजुरपागेत लेडी सुपरिंटेंडेंट मिस् हर्फर्ड शंकरचे फार लाड करीत. तो त्यांना मदर म्हणे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुण्यास येत तेव्हा ते शंकरला विनोदाने ग्लॅडस्टोन (Glad-Stone) म्हणत. आनंदी म्हणजे Glad आणि धोंडू म्हणजे Stone. आनंदी-धोंडो कर्व्यांचा मुलगा म्हणून 'ग्लॅडस्टोन कर्वे.'

विधवेशी पुनर्विवाह करून कर्व्यांनी समाजसुधारणेचे पहिले पाऊल टाकले. आता त्यांना वाटू लागले की अशा पुनर्विवाहांना लोकमताचा पाठिंबा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. विधवा पुनर्विवाहाचा कायदा पास होऊन चाळीस वर्षे उलटली पण पुनर्विवाहांची संख्या मात्र फारच थोडी होती. म्हणून कर्व्यांना वाटले आपण त्यासाठी संस्था स्थापन करायला हवी. अशाच तऱ्हेची संस्था, विधवा विवाहोत्तेजक मंडळ या नावाने विष्णुशास्त्री पंडितांनी स्थापन केली होती. पण त्यांच्या मृत्यूनंतर १८७५ मध्ये या मंडळाचे कार्य थांबले होते.

पुढे १८९३ साली विदर्भातील एक समाजसेवक वामनराव कोल्हटकर यांच्या मदतीने कर्व्यांनी वर्धा येथे विधवा विवाहाविषयी सहानुभूती असलेल्यांची एक बैठक आयोजित केली. आंतरजातीय विवाहांसारखे वादग्रस्त प्रश्न त्यांनी त्यातून वगळले. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांना संस्थेचे अध्यक्ष व प्रा. कर्व्यांना चिटणीस नेमण्यात येऊन संस्थेची मुख्य कचेरी पुण्यात ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्यांनी विधवेशी विवाह केला आहे, अथवा असा विवाह केलेल्या माणसाच्या पंक्तीस बसून भोजन करण्यास जे कचरणार नाहीत अशानाच संस्थेचे सभासद होता येत असे. पुनर्विवाह केलेल्या सभासदाने आपले एक दिवसाचे उत्पन्न वर्गणी म्हणून द्यावे, विधवांच्या मुलांसाठी वस्तिगृह उभारावे वगैरे गोष्टी ठरल्या. संस्थेच्या कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रा. कर्वे सुट्टीच्या काळात ठिकठिकाणी दौरे करीत. या कार्याकडे लोकांचे लक्ष वेधावे म्हणून विधवा विवाहाच्या पुरस्कर्त्यांच्या कुटुंबियांचे पुण्यात संमेलन भरविले जाई.



पहिल्या संमेलनास २२ सदस्य उपस्थित होते. प्रा. आगरकर, प्रा. भानू आणि रावबहादूर भट संमेलनाला हजर होते. कर्व्यांच्या मनात रात्रंदिवस आपल्या कार्याचे विचार घोळत असत. १८९५ मध्ये संस्थेचे नाव बदलून, 'विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळी' असे ठेवण्यात आले. नावावरून संस्थेचे कार्य सूचित व्हावे हा कर्व्यांचा हेतू होता. काही वर्षे सतत काम केल्यानंतर कर्व्यांना आढळून आले की, विधवा विवाहाचा विचार लोकांना पटतो, पण तो धार्मिक परंपरेविरुद्ध आहे म्हणून लोक विरोध करतात. विधवांचा पुनर्विवाह लावून देण्यात पुढाकार घेतला तरी त्यात फारसे यश येत नाही. अपत्य असलेल्या विधवा पुनर्विवाहाला तयारच होत नाहीत. अशा विधवांच्या साऱ्या आशा, आकांक्षा आपल्या मुलात केंद्रीभूत झालेल्या असतात. मुलासाठी आयुष्यभर विधवेचे त्यागमय जीवन जगण्याची त्यांची तयारी असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रा. कर्व्यांची मेहुणी पार्वतीबाई आठवले होय. विधवांच्या भावभावना लक्षात आल्यानंतर विधवांना शिक्षण मिळवून देणे व स्वतंत्र व्यक्ती म्हणून समाजात स्थान मिळवून देणे यासाठी कर्व्यांच्या मनात योजना सुरू झाल्या.

'विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळीच्या' चिटणीसपदी असतानाच प्रा. कर्व्यांना मुंबईतील हेमंत व्याख्यानमालेत 'विधवा पुनर्विवाह चळवळीची २५ वर्षे' या विषयावर व्याख्यान देण्याचे आमंत्रण मिळाले. न्यायमूर्ती रानडे अध्यक्षपदी होते. आर्यसभा मंदिरात भरलेल्या सभेला श्रोत्यांची खूप गर्दी लोटली होती. एक तासाच्या आपल्या भाषणात प्रा. कर्व्यांनी गृहस्थाश्रमाची महती वर्णन केली. ते म्हणाले, 'गृहस्थाश्रमी जीवन स्त्रीसाठी तसेच पुरुषांसाठी सर्वोत्तम व अत्यंत इष्ट असते. ब्रह्मचर्याचे पालन फारच थोडे- लोक म्हणजे हजारात एखादीच व्यक्ती करू शकते. एकनिष्ठ राहून मानवतेची सेवा करण्याचे व्रत जे स्वीकारतात असे फारच थोडे लोक त्या मार्गाने जात. म्हणून दुर्दैवाने विधवा झालेल्या व गृहिणीचे जीवन पुन्हा लाभावे अशी स्वाभाविक इच्छा बाळगणाऱ्या कोणत्याही मुलीवर व स्त्रीवर कायमचे वैधव्य लादले जाऊ नये.'

कर्व्यांच्या व्याख्यानात वक्तृत्व नव्हते, परंतु ते इतके तळमळीने भरलेले आणि भावनोत्कट होते की, श्रोत्यांनी त्यांच्या भाषणातील शब्दन्‌शब्द एकाग्रचित्ताने ऐकला.

त्यांच्या भाषणानंतर लगेच एक गृहस्थ बोलायला उठले. त्यांनी विधवा विवाह चळवळीवर कडाडून हल्ला केला. ह्या चळवळीची प्रगती अत्यंत असमाधानकारक आहे असे सांगून त्यासाठी न्यायमूर्ती रानडे कसे जबाबदार आहेत हे अध्यक्षस्थानी असलेल्या रानड्यांकडे हातवारे करून ठामपणे सांगितले. स्वतः रानड्यांनी पहिल्या पत्नीच्या निधनानंतर अत्यंत कोवळ्या वयाच्या कुमारिकेशी लग्न केले, वगैरे हकीगत सांगून त्यांच्या वैयक्तिक जीवनावर ठपका आणला. त्या व्यक्तीचे मर्यादा सोडून बोलणे श्रोत्यांना आवडले नाही, पण विशेष म्हणजे स्वतःवर केलेले सर्व आरोप न्यायमूर्ती

रानडयांनी मान्य केले व धीरगंभीरपणे आपले भाषण केले. त्यांच्या अर्ध्यातासाच्या भाषणाने श्रोते मंत्रमुग्ध झाले आणि न्यायमूर्तींबद्दल आधी असलेली आदराची भावनाच श्रोत्यांच्या मनात द्विगुणीत झाली. कर्वे स्वत: फार हेलावून गेले. कर्व्यांनीही समाजपुरुषाचा राग शांतपणे सोसला होता. आई, भाऊ, बहीण अशा अत्यंत जवळच्या नातेवाईकांचा दुरावा सहन केला होता. लोकांच्या तीव्र विरोधामुळे कर्व्यांच्या आईलाही फार दु:ख झाले होते, कारण तिची आपल्या प्रिय मुलाशी ताटातूट समाजाच्या असह्य बंधनांमुळेच झाली होती. धोंडू वरून धीरगंभीर वाटला तरी मनाने किती हळवा आहे हे त्या माऊलीला पूर्णपणे माहीत होते, म्हणूनच आपल्या शेवटच्या आजारात कर्व्यांच्या आईने सर्वांना बजावून ठेवले होते, 'मी दु:खी आहे हे वर्तमान धोंडूला अजिबात कळू देऊ नका.' नाहीतर वडिलधाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध जाऊन स्वत: विधवेशी पुनर्विवाह केला आणि आईच्या मनाला अनंत यातना दिल्या याबद्दल त्यांच्या मनाला कायमची रुखरुख लागून राहिली असती. 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।' असे धोंडोपंत कर्वे कर्तव्याला कठोर पण आप्त स्वकीयांच्या कोमलशा प्रेमपाशात गुंतून राहणारे कुसुम कोमल मनाचे, संपन्न व्यक्तिमत्त्व होते.

■ ■ ■



# ६ / अनाथ बालिकाश्रमाची स्थापना

'केवळ काही विधवांचे पुनर्विवाह करून देण्यापेक्षा सर्वच विधवांना शिक्षण मिळवून देण्याची सोय करणे अत्यंत आवश्यक आहे,' असे प्रा. कर्व्यांचे अनुभवांती ठाम मत झाले. सर्वच विधवा पुनर्विवाहाला तयार होत नाहीत. विशेषत: ज्यांना मुलबाळं आहेत अशा विधवा तर नाहीच नाही. पण त्यांना अनाथाचे, आश्रिताचे जिणेही नको असते. म्हणून त्या शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहण्याची इच्छा मात्र बाळगतात.

एव्हाना पंडिता रमाबाईंच्या शारदाश्रमात साठ विधवा शिकू लागल्या होत्या. समाजातही सुशिक्षित लोक विधवा पुनर्विवाह धर्माविरुद्ध आहे असे मानीत पण विधवांची कुटुंबातील दयनीय अवस्था त्यांनाही मान्य नसे. या सगळ्या पार्श्वभूमीवर एक छोटीशी योजना कर्व्यांनी आखली. त्यांनी पाच-सहा विधवांसाठी एक छोटासा आश्रम सुरू करण्याचे ठरविले. विधवा विद्यार्थिनींची भोजनाची, राहण्याची व शिक्षणाची सोय करण्यासाठी त्यांनी स्वत:चे एक हजार रुपये गुंतविले आणि १८९६ मध्ये 'अनाथ बालिकाश्रम' स्थापन केला. 'Charity begins at home.' ह्या नियमास अनुसरून रोख एक हजार रुपयांव्यतिरिक्त स्वत:ची पाच हजार रुपयांची विम्याची पॉलिसीही आश्रमास अर्पण केली.

ध्यानी-मनी, जागृती-चिंतनी अण्णांचे मन ह्या एकाच ध्येयाने व्यापून गेले. 'विधवांची हीन-दीन स्थिती सुधारायची असेल तर त्यांना सुशिक्षित करून समर्थ करणे हाच मार्ग श्रेयस्कर आहे.' या विचाराने अण्णांच्या मनात ठाम मूळ धरल्यामुळे अण्णा या कार्याकडे नेटाने वळले. प्रथम त्यांना वाटले, विधवांचे शिक्षणकार्य व विधवांचे विवाहकार्य दोन्ही एकमेकांच्या साथीने होत राहतील, पण मग विचारांती त्यांना जाणवले की ही दोन्ही कार्ये अलिप्तच ठेवणे शहाणपणाचे होईल. त्यामुळे लोकांच्या गैरसमजुतीला उगाच वाव मिळणार नाही व पालकही आपल्या विधवा मुलींना शिक्षणासाठी पाठविण्यास कचरणार नाहीत. त्यामुळे पुनर्विवाह संस्थेच्या

आश्रयाखाली असताना, विधवाशिक्षणासाठी त्यांनी जमविलेला निधी त्या संस्थेचा ठराव करून त्यांनी विधवा शिक्षणासाठी स्वतंत्र करून घेतला. स्वतःची विमा पॉलिसी व बचत त्यांनी या कार्यासाठी दिल्याचे आधी म्हटलेच आहे. लोकांकडून सढळ हातांनी मदत मिळून कार्य नीट चालावे यासाठी आगरकरांच्या 'सुधारक' पत्रात एक पत्रपण दिले. आणि १४ जून १८९६ रोजी राव बहादूर भिडे यांच्या घरी त्यांच्याच अध्यक्षतेखाली विधवांच्या शिक्षण कार्याला अनुकूल होतील अशा सद्गृहस्थांची सभा घेण्यात येऊन काही ठोकळ नियम करून 'अनाथबालिकाश्रमाची मंडळी' या नावाची अपूर्व संस्था स्थापन करण्यात आली. त्याच सभेत संस्थेच्या अध्यक्षस्थानी डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर आणि संस्थेचे चिटणीस म्हणून कर्व्यांची नियुक्ती झाली. (दूर दृष्टी असलेल्या अण्णांच्या मनाला एखादी समाजसेवेची नवी कल्पना सुचली की पैशाची कितीही चणचण भासली तरी त्यांनी प्रयत्न कधी सोडले नाहीत की कधी निराशही झाले नाहीत.)

लोकांना नुसते आवाहन करून प्रश्न थोडेच सुटणार आहेत? पण लोकांना काहीतरी कार्य दिसल्याशिवाय लोक एकदम मदत तरी कशी करणार? असे समजून कार्याला जोमाने सुरूवात केली, त्याप्रमाणे 'अनाथबालिकाश्रमाची मंडळी' ह्या संस्थेच्या स्थापनेने कल्पनेला मूर्त स्वरूप आले.

संस्थेच्या संस्थापकाला आपल्याला कार्याला अनुकूल असणाऱ्या सद्गृहस्थांची सहानुभूती व द्रव्यसहाय्य मिळविणे अत्यंत जरूरीचे असते. त्याचप्रमाणे केवळ शब्दांची का असेना बहुजनसमाजाची सहानुभूती मिळणेही आवश्यक असते. या सर्व योजना राबविताना अण्णांच्या ठिकाणी अशा कार्याला लागणारा मोठा गुण म्हणजे आपल्या कार्याचा पद्धतशीर प्रचार करून, वेळप्रसंगी लोकांचे अपशब्द सहन करून, स्वतःच्या मनाची शांती तिळभरही ढळू न देता चिकाटीने, प्रामाणिकपणे व दृढविश्वासाने कार्य करीत रहाणे व हळू हळू जनतेच्या सहानुभूतीचा ओघ आपल्या कार्याकडे वळविणे. आपल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील काम संभाळून राहिलेला सर्व वेळ अण्णा या विधवाशिक्षणाच्या कार्यासच देत.

आश्रमासाठी शहराबाहेर कोठेतरी शांत व सुरक्षित अशी जागा मिळावी असे अण्णांना वाटत असे. संस्थेच्या इतर सभासदांना मात्र अण्णांइतकी तळमळ वाटत नव्हती. म्हणून प्रथम १ जानेवारी १८९९ रोजी पेरुगेटाजवळील गोरे यांच्या वाड्यात आश्रमास सुरूवात करण्यात आली. या आश्रमात आरंभी एकच विधवा होती. ही विधवा म्हणजे कै. वा. गं. गरूड यांची पत्नी श्रीमती कमलाबाई या होत. पुढे पुण्यात प्लेगची लागण झाल्यामुळे आश्रम गावाबाहेर हिंगण्याच्या माळावर हलवावा लागला. आश्रमाबद्दल ज्यांना मनापासून आपलेपणा वाटत होता अशा रा. ब. गणेश गोविंद गोखले यांच्या बंगल्यात तो हलविण्यात आला व पुढे त्याला लागूनच असलेली



सहा एकर जमीन गोखल्यांनी आश्रमासाठी दिली. ही जागा पुण्याच्या नैऋत्येस सुमारे साडेतीन मैलांवर मुठा नदीच्या कालव्याकाठी असून तेथून भोवतालचे दृश्य हृदयंगम दिसे.

मुठा नदी खडकवासल्याकडून वहात येऊन हिंगणे गावाच्या टोकाला उत्तरेकडे वळते. नदीच्या पश्चिम काठावर हिंगणे वसले आहे. नदीकाठी थेट कोंढव्यापर्यंत शेती आहे. वनदेवीचे देऊळ असलेला आडवा पश्चिमपूर्व डोंगर म्हणजे, हिंगणे व कोथरूड या दोन गावांतील विभाजक खूण आहे. एका बाजूला कोथरूड व दुसऱ्या बाजूला वारजे आणि मध्ये हिंगणे आहे. सधन शेतकरी पुण्यात रहात आणि हिंगण्याच्या शेतांत तांदूळ, गहू, बाजरी, ज्वारी इत्यादि धान्ये पिकवीत. हिंगण्यात पेरूच्या बागा व उसाचे मळे पिकवीत.

अशा या परिसरात (हिंगण्याच्या उजाड-ओसाड माळरानावर ५०० रुपये खर्चून अण्णांनी दगड-विटांचे एक झोपडे बांधले. हीच आश्रमाची मूळ झोपडी. संस्थेने ही पवित्र झोपडी अजूनही जतन करून ठेवली आहे.)

फड्या निवडुंगानी वेढलेल्या त्या झोपडीत राहिलेल्या मुली सांगत, 'रात्री मिणमिण कंदील, भणभण वारे आणि अंधाराचे साम्राज्य असे. कोल्हेकुई ऐकू येई. आमची घाबरगुंडी उडे. रात्रीअपरात्री झोपडीबाहेर पडायचे म्हणजे धडकी भरे. साप, नाग यांच्या सान्निध्यातच आम्ही रहात होतो. संस्थेच्या दक्षिणेला चारदोन झोपड्या होत्या तेवढीच काय ती सोबत.'

'पुण्याहून हिंगण्याकडे येऊ लागले की वाटेत कोथरूड हद्दीत कितीतरी पेरूच्या बागा होत्या. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या ह्या बागांमुळे थंडावा होता. उन्हे जाणवत नसत. संध्याकाळी झाडांच्या दाट सावल्या पसरत. रस्त्यात भीती वाटे. कालव्याच्या काठावरून येणाऱ्या रस्त्यावर जांभळीची व आंब्याची झाडे होती. खायला फळे, कालव्याचा थंड वारा ह्यामुळे श्रम निघून जात. रहदारी फारशी नसे. कालव्याखालून वाहणाऱ्या तीन ओढ्यांवर अगदी अरुंद असे पूल होते. त्यांच्या दीडदोन फुटी भिंतीवरून चालत जायचे म्हणजे कठीण काम. पावसाळ्यात तर चिखल आणि निसरडे यामुळे पुलाशी आले की धडकी भरे. एकमेकींचा हात धरून, जीव मुठीत घेऊन, तोल सांभाळून चालावे लागे. एकदा ते ओढे ओलांडले की जीव भांड्यात पडे. खालून खळाळत वाहणाऱ्या गढूळ पाण्यातल्या झाडांच्या बारक्या फांद्या, काटेरी झुडुपे, गदळ पाहून जिवाचा थरकाप होई. तरीपण सभोवती डोंगरांचे संरक्षण, मुठा नदीचा जिव्हाळा लाभलेला, लहानमोठ्या झाडांनी वेढलेला, जवळून वाहणाऱ्या कालव्याकाठच्या गवती फुलांनी सुशोभित आलेला परिसर पाहून येथेच संस्था कायमची ठेवावी असे अण्णांनी ठरविले.'

पहिली दोनतीन वर्षे विद्यार्थिनींना व अण्णांना अतिशय कष्टाने काढावी लागली.

विद्यार्थिनींना लागणारे सर्व सामान चार मैल चालत येताना अण्णा स्वत: पाठीवर वाहून आणीत. कॉलेजातील काम आटोपल्यावर अण्णा रोज आश्रमात जात. रात्री आश्रमातील विद्यार्थिनींना शिकवीत. सकाळी पुण्यात परतत. पण त्याआधी भल्या पहाटे उठून पुन्हा विद्यार्थिनींना शिकवीत.

आश्रमाभोवती जमीन फक्त मुबलक होती, बाकी सोई काहीच नव्हत्या. कालव्याचेच पाणी पिण्यासाठी वापरावे लागे. पावसाळ्यात ते एक दिवस निवळायला ठेवावे लागे. पावसामुळे झोपडीचे छप्पर इतके गळे की पांघरुणावरून पुन्हा हातरी पांघरावी लागे. झोपडीत तीन खोल्या होत्या. एक स्वयंपाकाकरिता, एक शिकण्याकरिता व एक निजण्याकरिता.

अण्णांच्या प्रचारकार्यामुळे भारतातील दूरदूरच्या भागांतून आश्रमात विधवा विद्यार्थिनी येत. आश्रमाच्या नावाचा उल्लेख भारतात सर्वत्र गौरवपूर्ण होऊ लागला. सोवळ्या झालेल्या विधवांचीही सोय आश्रमात जुन्या पद्धतीला धरून होई. त्यांचे सोवळे - ओवळे सांभाळणे, उपास - तापासाची सोय करणे सर्व सांभाळले जाई. यामुळे त्या अभागी विधवांना बरे वाटे.

हिंगण्याच्या आसपासचे खेडूत हिंगण्याच्या शाळेला ' बोडक्यांची शाळा ' म्हणूनच ओळखीत. हिंगणे गावातील माणसे मात्र सज्जन होती. संस्थेस त्यांचा त्रास कधीच झाला नाही. उलट त्यांच्याकडून संरक्षण मिळे. संस्थेत थोड्या मुली होत्या तेव्हाची गोष्ट. हिंगण्याचे शेतकरी मुलींना ऊस, हरभरा, पेरू आणून देत. गुऱ्हाळ लागले की मुलींना रस प्यायला, गरम गूळ खायला बोलावीत. त्यावेळी झाडावरचे पेरू हाताने तोडून हवे तेवढे खा म्हणत. शिवाय पैसे कशाचेच घेत नसत. दयाळू अंत:करणाच्या अशिक्षित अडाणी माणसांनी आपल्यापरीने केलेले आदरातिथ्य पाहून अण्णांना फार संतोष वाटे.

१९०६-१९०७ सालच्या जुन्या विद्यार्थिनी सीताबाई आण्णेगिरी, इंदिराबाई निमोगी इत्यादी जेव्हा मोठेपणी पुन्हा आश्रमात येत तेव्हा त्यांना आश्रमातले स्वत:चे जीवन हमखास आठवत असे. त्या दिवसांविषयी बोलल्याशिवाय त्यांना राहवत नसे. त्या सांगत असत, 'आम्ही सुरूवातीला आश्रमात अतिशय कष्टात दिवस काढले. पण शिकायला मिळतंय मग असंही चालेल असे वाटे. आमचे आश्रमातले राहणे रानात, लोकांपासून दूर, करमणुकीची कोणतीच साधने नव्हती आणि करमणूक करून घेण्यासाठी वेळही नसे. कामाच्या पाळ्या असत. त्या दर महिन्याला बदलत. कोणी स्वत:चे काम कधी चुकवत नसे. फरशा नव्हत्या. मातीची जमीन शेणाने सारवावी लागे. चरात लाकडे पेटवून स्वयंपाक करावा लागे. लाकडांचा धूर डोळ्यांना झोंबे. जेवणसुद्धा अगदी साधे. आमटी, भाकरी हे मुख्य अन्न - जोडीला कधी भाजी तर कधी चटणी असे. मोठ्या मुलींना फक्त दोन वेळा जेवण मिळे. लहान मुलींना



मधल्यावेळी भाकरी आमटीच खायला मिळे. दोन्ही वेळेला ताक मात्र असे. पण चहाची अजिबात भानगड नसे.

'जेवायला बसायला पाट नव्हते, जमिनीवरच बसावे लागे. पाळीपाळीने वाढावे लागे. जेवण झाल्यावर शेण लावावे लागे. त्याकाळी मुली जातवारीने अंतर राखून जेवायला बसत. प्रथम ब्राह्मणांच्या मुली सोवळ्याने बसत. नंतर मराठा मुली व नंतर बरेच अंतर सोडून विकेशा मुली बसत.

'मुलींना भाजी निवडणे, ताक करणे, पीठ मळणे, चटणी वाटणे, कंदील तेलवात करून पुसून ठेवणे ही कामे करावी लागत. शिवाय दळण - कांडण, पाखडणे - निवडणे करावे लागे. हळद, तिखट कुटणे, भांडी घासणे, स्व:च्या खोल्यांची झाड - सारव करणे, पाणी तापविणे, कपडे धुणे सर्व कामे करावी लागत.

'इतके करूनही आम्ही अभ्यास केला. कोणतीही गोष्ट सहज मिळाली की त्याची किंमत कळत नाही. कामे करावी लागतात म्हणून शिस्तीने वागवणाऱ्या आश्रम चालकांबद्दल मनात कधी रागही नसे. उलट आदरयुक्त भीती आणि मनापासून आपलेपणा वाटत असे.'

आश्रमात हुशार चुणचुणीत मुलींची पारख करून त्यांना घडविले जाई. त्यांच्या मनात ध्येय व सेवेची भावना प्रयत्नपूर्वक निर्माण केली जात असे. काशीबाई देवधरांनी आपल्याला निवडले याबद्दल मुलींना अभिमान वाटे. मुलींची मने आनंदाने भरून जात. पुढील आयुष्यात काहीतरी कार्य करून दाखवले पाहिजे, असे त्यांना वाटू लागे. ध्येयापोटी आश्रमातले कष्टाचे जीवन त्या सहजपणे निभावून नेत.

सौ. बाया म्हणजेच आनंदीबाई कर्वे आश्रमात काही दिवस रहात होत्या. पण त्यांच्यावरही कडक निर्बंध असत. पुनर्विवाहित म्हणून तिने मुलींच्या पाण्याला सुद्धा शिवायचे नाही. पुढे तर मुलींच्या मनावर परिणाम होईल म्हणून अण्णांनी बायाला आश्रमात रहायची सुद्धा बंदी केली. तिच्यावर म्हणजे स्वत:च्या पत्नीवर अण्णांनी हा अन्यायच केला होता असे आजच्या काळात आपल्याला वाटले तरी पण संस्थेच्या दृष्टीने विचार केला तर त्यावेळेचा अण्णाचा निर्णय योग्यच होता. नाहीतर संस्था बंद पडली असती. अण्णा म्हणत, 'समाजाला पचेल अशा बेतानेच हळूहळू पाऊल पुढे टाकले पाहिजे.'

आरंभी पालकांच्या इच्छेप्रमाणे विद्यार्थिनींना मराठी, संस्कृत, इंग्रजी या तीन भाषा शिकवीत. थोडे गणित आणि इतिहास, भूगोलाची थोडी माहिती आणि बाकी गृहकृत्ये शिकविली जात. धर्म व नीतिशास्त्राची ओळख होण्याकरिता अर्थासहित गीतेचे श्लोक शिकवीत. तुकाराम, एकनाथ, रामदासांच्या अभंग - ओव्या वाचून त्यावर प्रवचने होत असत.

हळूहळू विद्यार्थिनींची संख्या वाढू लागली. १९०३ साली ती २१ झाली.

१९०४ साली ४० झाली तर १९०५ साली ६० पर्यंत वाढली.)विधवेचे पालक एकटीला न पाठवता कुमारिका बहिणींनाही तिच्या बरोबर पाठवत. त्यामुळे एका घरच्या दोघी, तिघीजणी आश्रमात शिकायला येत. सहा वर्षांची एक मुलगी, तिची वीस वर्षांची आई आणि पस्तीस वर्षांची विधवा आजी एकाचवेळी आश्रमात दाखल झाल्याचे उदाहरण आहे. यांपैकी आजी आश्रमात लिहावाचायला शिकली व पुढे सुईणीचे काम शिकली, आई ट्रेनिंग कॉलेजात गेली.

आणखी एक मायलेकींची जोडी आली. आई इंग्रजी चौथीपर्यंत शिकून नर्स झाली. मुलगी संस्थेतून मॅट्रीक झाली.

एकदम घर सोडून, विधवा स्वत:च्या हिमतीवर विधवा आश्रमात येत तेव्हा त्यांना ठेवून घेताना फार पंचाईत पडे. पण त्यांचीही सोय आश्रमात होई.

मथूबाई उचगावकर, रुक्मिणी अम्मा, सीताबाई अण्णेगिरी या परप्रांतीय महिलांनी भाषेची अडचण सोसूनही मराठी भाषेचा अभ्यास केला.

(आता आपणाला काय करावयाचे आहे शिकून? असले निराशजनक विचार घालवून, विधवांच्या मनात आशेचे अंकूर रूजविण्याचे फार मोठे काम आश्रमाने केले.)

(१९१० साली आश्रमात ऐंशी विधवा व वीस कुमारिका विद्यार्थिनी होत्या. मुलींना गायन, शिवणकाम, विणकाम व चित्रकला हेही विषय शिकविण्याची सोय केली.)आश्रमाचा हिशोब स्वत: अण्णा अतिशय काळजीने ठेवीत. स्वत:च्या पैशापेक्षा सार्वजनिक पैशाची काळजी अधिक घेतली पाहिजे, यासंबंधी अण्णांचा अतिशय कटाक्ष असे.

(विधवागृहात कुमारिकांना प्रवेश देण्यास जी सुरूवात झाली, त्यातूनचच नकळत महिला शिक्षणाचे बीज रुजले गेले. अण्णांच्या मनात केवळ विधवांनाच शिक्षण देण्याचा विचार नव्हता तर त्यांना सर्व स्त्री समजालाच शिक्षण द्यावयाचे होते. समाजातील विधवांच्या दुर्दशेमुळे प्रथम त्यांचे मन विधवाशिक्षणाकडे वळले एवढेच. तथापि स्त्री रूपात असलेला समाजाचा अर्धा भाग गाढ अज्ञानात खितपत राहणे ही गोष्ट त्यांच्या मनाला सारखी टोचणी लावीत होती. विधवा स्वावलंबी बनाव्यात आणि सर्वच स्त्रिया शिकून सुकन्या, सुगृहिणी व सुमाता व्हाव्यात असे त्यांना वाटे.)

आश्रमातील राहणी व अभ्यासक्रम लोकांना आवडू लागला होता, त्यामुळे कुमारिकांची संख्या दिवसानुदिवस वाढू लागली होती. पण त्यांच्या संख्येवर व्यस्थापक मंडळाने मर्यादा घातली असल्यामुळे बऱ्याच कुमारिकांना प्रवेश नाकारावा लागत असे. अण्णांना या गोष्टीचे वाईट वाटे. राष्ट्रहिताच्या दृष्टीने सर्वच स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक होते. ही गोष्ट अण्णांनी आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळीतील बऱ्याच लोकांच्या पुन:पुन्हा लक्षात आणून दिली होती. पण त्यांची सूचना मान्य करण्यात



आली नाही. काशीबाई देवधर स्वभावाने फार कडक व तत्त्वाला चिकटून राहणाऱ्या होत्या. आश्रम हा विधवांसाठी आहे. त्यात कुमारिकांची संख्या फार नको त्या मुद्यावर त्यांचा अण्णांशी मतभेद होता. व्यवस्थापक मंडळींना पण अण्णांचा विचार मान्य नव्हता.

वरील कारणामुळे अण्णांना स्वतंत्र महिला विद्यालय काढावे लागले. यामुळे आश्रम व विद्यालय यांत एकप्रकारचे वितुष्ट आले व पुढे ते बरेच विकोपासही गेले. त्यामुळे अण्णांना बराच मन:स्तापही झाला. पण ते स्वस्थ तर बसले नाहीतच अथवा विद्यालय काढण्याचा विचारही त्यांनी सोडून दिला नाही. उलट त्यांच्या मनाने त्या कार्याची जोमाने सुरूवात करायची उचल खाल्ली.

(कुमारिकांना शक्य तितके शिक्षण देण्याने सहाजिकच त्यांच्या लग्नाची वयोमर्यादा वाढत जाऊन समाजातील तितक्या बालविधवांची संख्या आपोआपच कमी होत जाईल, या गाष्टीचेही अण्णांना विशेष महत्त्व वाटू लागले होते. कुमारिकांची लग्नांची वयोमर्यादा वाढावी म्हणून त्यांनी गरीब व होतकरू कुमारिकांना मदत करण्यासाठी ब्रह्मचर्य फंडाची कल्पना काढली.)

('वीस वर्षांचे वय होईपर्यंत मुलीचे लग्न करणार नाही व मुलीचे शिक्षण संस्थेच्या देखरेखी खाली चालू ठेवीन असे, मुलीच्या गरीब पालकाने कबूल करावयाचे सोळा सतरा वर्षांचे वय होईपर्यंत मुलीचे शिक्षण चालवून पुढे ती होतकरू दिसली व तिने आणखी शिकण्याची इच्छा बाळगली तर तिला अधिक शिकू द्यावयाचे, नाहीतर तिला लग्नाची परवानगी द्यावयाची.')

या अटी मान्य करणाऱ्या गरीब पालकांच्या अविवाहित मुलींना ब्रह्मचर्य फंडातून मदत करण्याचे अण्णांनी ठरविले. एका थोर मनाच्या परप्रांतीय हिंदू सद्गृहस्थांना अण्णांनी सांगितलेली फंडाची कल्पना फार आवडल्यामुळे ते जवळजवळ सात-आठ वर्षे दरमहा २५ रु. या निधीसाठी देत होते.

(मुळात आश्रमाचेच बस्तान अजून नीट बसायचे होते, त्याच्या आतच महिला विद्यालयाची जबाबदारी अण्णांनी एकट्याच्या शिरावर घेतली.)(डेक्कन एज्युकेशन सोसायटीला दान म्हणून मिळालेला लकडी पुळाजवळील गोडबोलेवाडा सोसायटीच्या दृष्टीने निरुपयोगी होता. तो अण्णांनी नाममात्र भाडे देऊन मिळविला. त्या वाड्यात महिला विद्यालय सुरू केले त्यादिवशी सहा विद्यार्थिनी शाळेत दाखल झाल्या होत्या.) महिला विद्यालयाची माहिती लाकांना व्हावी म्हणून अण्णांनी ज्ञानप्रकाशात एक लेख प्रसिद्ध केला. त्यातील काही महत्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे होते.

'मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविण्यासाठी गरीब होतकरू मुलींचे शिक्षण विद्यालयाचे खर्चाने केले जाईल. मध्यमवर्गीय व गरीब स्थितीतील लोकांना या विद्यालयाचा उपयोग व्हावा म्हणून दरमहा पाच रुपयांत प्रत्येक मुलीचे जेवणे, खाणे

व रहाणे याबद्दलचा खर्च भागवावा अशी तजवीज केली आहे. ज्या विद्यार्थिनी जास्त काळ शिक्षण करू शकतील त्यांना मॅट्रीकपर्यंत शिक्षण द्यावयाचे आणि गृहिणीपदाची कर्तव्ये व सामाजिक कर्तव्ये यांचीही ओळख करून द्यावयाची. साध्या वृत्तीने राहणे, श्रेष्ठ विचारांचे पोषण, सर्व धर्मांबद्दल सहिष्णुता बाळगणे, गांजलेल्या व गरीब लोकांबद्दल कर्तव्यजागृती ठेवणे या सद्गुणांच्या वाढीसाठी विशेष लक्ष पुरविले जाईल.'

वर उल्लेखिलेल्या सर्व जबाबदाऱ्या अण्णांनी स्वत:कडे घेतल्या होत्या. या प्रमाणे एकट्याच्या जबाबदारीवर त्यांनी कार्याची सुरूवात धीमेपणाने केली. सुदैव असे की, अण्णांचे मुरूडचे सोमण गुरूजी सेवानिवृत्त होऊन त्यांचेबरोबर कामाला आले. वसतिगृहाची सर्व अवस्था अण्णांच्या पहिल्या बायकोची म्हणजे राधाबाईंची कर्तबगार बहीण बघू लागली. (अण्णांचा उत्साह, चिकाटी दांडगी. प्रारंभीच्या काळात संस्थेतील विद्यार्थीनींना पुढच्या आठवड्यात कसे जेवायला घालायचे अशी भ्रांत पडायची. तेव्हा मूठ मूठ धान्याची भिक्षा मागण्याची कल्पना निघाली. घरोघरी जाऊन हा 'मुष्टिफंड' जमवून धान्य आणले जाई. व त्यावर गुजारा होई. मुष्टिफंड जमा करण्यात बाया कर्वेंची खूप मदत होत असे. मुंबईहून मुष्टिफंड जमवून पुण्याला पाठविल्याची काही उदाहरणे आहेत. पुण्यात महिला विद्यालयाची वाढ हळूहळू होत होती. पैशाची नेहमी तूट पडे. पण पुढे अण्णांनी विद्यालय हिंगण्याला हलविल्यानंतर जागा आणि पैसा यांची टंचाई खूप प्रमाणांत कमी झाली. आश्रमापेक्षाही विद्यालयाला जास्त प्रमाणात लोकांचे सहाय्य मिळाले. कारण विधवाशिक्षणाला लोकमताचा विरोध होता, तसा स्त्रीशिक्षणाला नव्हता.)

१९०७ साली अचानक बुडालेल्या एका बँकेतले, महिला विद्यालयाचे साडेचार हजार रुपये बुडाले. पण सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीमधून नामदार गोखले यांनी ५०००/- रु. कर्जाऊ दिले आणि संस्थेची नड भागविली.

■ ■ ■



# ७ / 'निष्कामकर्ममठा' चे मिशनकार्य

अनाथ बालिकाश्रम आणि महिला विद्यालय सुरू करण्याचे अण्णांचे स्वप्न आता पूर्ण झाले होते. त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्याही बऱ्यापैकी झाली होती. (आश्रमाचे आणि महिला विद्यालयाचे महत्त्व लोकांना पटू लागले. जनतेकडून लहानमोठ्या देणग्या व वार्षिक वर्गण्या मिळू लागल्या. संस्थेचा खर्च भागू लागला. स्थायिक फंडात ही भर पडत होती. ह्या सगळ्या गोष्टी संतोष वाटाव्या अशा होत्या. पण संस्था सुरळीत चालण्यासाठी आणखीही एका गोष्टीची नितांत गरज असते आणि ती म्हणजे नि:स्वार्थी कार्यकर्त्यांची. असे स्वार्थत्यागी स्त्री, पुरूष कार्यकर्ते आपल्या संस्थेला सतत कसे मिळतील ह्या विचाराने अण्णा अस्वस्थ होते.)

यापूर्वी ज्या स्त्रियांनी आपले सर्व आयुष्य संस्था कार्यासाठी अल्प वेतनावर वाहून घेण्याची तयारी केली होती त्यांपैकी एकदोघींचे मतभेद व्हायला सुरूवात झाली होती. वेळ पडल्यास त्या स्त्रिया संस्था सोडूनही जातील अशी भीती अण्णांना वाटत होती.

आश्रमातील विद्यार्थीनींनी विद्या संपादन करून नीतीने आपला चरितार्थ चालवावा फक्त एवढीच अपेक्षा आश्रम चालकांची नव्हती, तर त्यांनी आपल्या देशभगिनींच्या उपयोगी पडावे व त्यांच्या उन्नतीला सहाय्य करावे असे ही त्यांना प्रकर्षाने वाटे. शिवाय आश्रमात शिक्षण घेतल्यावर आजन्म सेवाव्रत घेतलेल्या स्त्रिया आश्रमातून तयार व्हाव्यात अशी उमेद आश्रमाला होती. अशा व्यक्तींची परंपरा निर्माण झाली पाहिजे असे अण्णांना वाटे.

केवळ सेवा करणे हाच ज्यांचा उद्देश आहे अशांनी चालविलेले कॅथेड्रल गर्लस् हायस्कूल आणि गोखल्यांनी स्थापन केलेल्या सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे कार्य, त्याग व निष्ठा या गुणांवर निरलसपणे कसे चालू आहे हे अण्णांनी फार वळून पाहिले होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीत स्वत: अण्णा आणि त्यांच्यासारखे नेक लोक नि:स्वार्थबुद्धीने काम करीत होते. तेव्हा राष्ट्र उभारणीच्या कार्यात शिक्षण

ही अत्यंत महत्त्वाची बाब असते, त्यासाठी शेकडो कार्यकर्त्यांची गरज असते. अशा कार्यकर्त्यांनी आपल्या देशबांधवांची सेवा ही ईश्वराची सेवा मानून कार्य केले पाहिजे असे अण्णांना वाटे. आपल्या देशबांधवांची सेवाच ईश्वराला अधिक आवडते ही कल्पना अण्णांच्या काळच्या भारतीय लोकांना नवीन असली तरी अण्णांना मात्र हे विचार नवे नव्हते.

अण्णांच्या मनात विचार येत, 'मिशनरी लोक परदेशांतून इतक्या दूर हिंदुस्थानात येऊन त्यागमय जीवन जगतात. धर्मप्रसारासाठी परदेशातल्या प्रतिकूल वातावरणाशी जमवून घेऊन त्या कार्याला आजन्म वाहून घेतात. तसे आपल्या भारतीय लोकांना का जमू नये? आपणही एखादे 'इंडियन लेडिज मिशन' काढले तर!'

ही कल्पना मनात आली आणि अण्णा योग्य माणसे मिळविण्याच्या शोधाला लागले. या प्रयत्नातूनच 'निष्कामकर्ममठाची' कल्पना निघाली. या संघाचे सभासद होण्याची तीव्र इच्छा असेल त्यांनी केवळ योगक्षेमापुरते वेतन घेऊन स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर मनापासून काम करावे, संस्थेसाठी आपला देह झिजविणे हेच आपले अंतिम साध्य मानावे, हे विचार ज्यांना मान्य होते त्यांचा एक संघ अण्णांनी निर्माण केला. संस्थाकार्यासाठी देह झिजविता आला तर जन्माचे सार्थक झाले या कळकळीने प्रेरित झालेल्या स्त्री-पुरुषांना या संघाचे सभासद करून घेण्यात येई. आश्रमात शिकत असलेल्या काही प्रौढ विद्यार्थिनींपैकी पाच-सात विद्यार्थिनींना ही मठाची कल्पना पसंत पडून त्यांनी मठाची प्रतिज्ञा घेतली. ह्या स्त्रिया प्रौढ असल्या तरी त्यांचे शिक्षण पूर्ण होऊन त्या प्रत्यक्ष कामाला लागायला वेळ होता. याच सुमारास श्री. बाळाजी विनायक कौलगेकर व श्री. महादेव केशव गाडगीळ हे दोघे स्वतःच्या नोकऱ्या सोडून आश्रमात किंवा महाविद्यालयात काम करण्यासाठी आपल्या पत्नींसह आले.

३ डिसेंबर १९१० या दिवशी मठाच्या सर्व सेवक-सेविकांची सभा महिला विद्यालयात होऊन मठाचे नियम व इतर गोष्टी ठरविण्यात आले. कौलगेकर, गाडगीळ, स्वतः अण्णा व पार्वतीबाई आठवल्यांचा मुलगा नारायण महादेव आठवले असे चार पुरूष मठाचे मुळचे सभासद बनले. मठाच्या सभासदत्वाचे नियम थोडक्यात असे.

१) आरंभीची प्रतिज्ञा - 'आश्रम, विद्यालय अशांसारख्या लोकोपयोगी संस्थांचे काम करण्यासाठी जे 'इंडियन लेडीज मिशन' (मठ) स्थापले आहे त्या कामी मी आपले जीवित - या विश्वाचा चालक जो परमात्मा त्याला स्मरून अर्पण करीत आहे. माझ्या जीवितावर आता माझा हक्क नाही. त्याचा उपयोग संस्थेने योग्य वाटेल तसा करून घ्यावा. माझ्या व माझ्या स्वतःच्या कुटुंबाच्या खर्चासंबंधाने संस्था जे ठरवील ते मला मान्य आहे.'

२) निष्काम कर्म म्हणजे मी, माझी बायको, मुले ह्या कल्पना ज्यात विसरून



जातील अशाप्रकारची समाजोन्नतीची कर्मे.

३) या मठाच्या निःस्वार्थी कार्यामुळेच मनुष्य जीवनमुक्त होईल असा दृढविश्वास सभासदाने बाळगायचा.

४) या कामी तपश्चर्या व स्वार्थत्याग ह्यामुळे सभासदाचे जीवन तावून-सुलाखून निघणार होते. त्यासाठी कडकडीत वैराग्य व मनोजय प्राप्त करून घेणे हे काम अत्यंत कठीण होते.

५) इतकी ज्यांची मनाची तयारी नसेल, त्यांनी दुसऱ्या पायरीवर काम करावे. अर्थात ह्या माणसांनासुद्धा बराच स्वार्थत्याग करावा लागणार होता.

अण्णांचे ध्येय किती मोठे होते आणि योजना आखताना किती विशाल तत्त्वावर ते आखीत याची कल्पना यावरून येते.

निष्कामकर्ममठाची प्रतिज्ञा म्हणजे सही करून दिलेला कोरा चेक होता. त्या मठाच्या सभासदांनी आपले जीवन अण्णांच्या अमूर्त ध्येयाला वाहिले. 'जीवन वाहणे' या शब्दांत फार मोठा अर्थ भरला आहे. आपण देवावर फुले वाहतो ती ताजी, टवटवीत, सुगंधी असतात, संध्याकाळी ती कोमेजतात पण देवाजवळून हालत नाहीत. देवावरच त्यांचे निर्माल्य होते. त्याचप्रमाणे आपले धडपडणे, आपले सर्वस्व पणाला लावणे आणि त्यांतच देहाचा अंत होणे, अशी ही नितांत एकनिष्ठतेची कल्पना 'जीवन वाहणे' ह्या शब्दात आहे.

एका शुभ मुहूर्तावर कौलगेकर, गाडगीळ, ना. म. आठवले व स्वतः अण्णा हे चार मूळचे पुरूष सभासद आणि सीताबाई आण्णेगिरी, वारूबाई शेवडे, गंगूबाई तांबोळे वगैरे स्त्रिया सर्वजण वनदेवीच्या डोंगरावर गेले. तिथे खडकावर बसून सूर्यनारायणाच्या साक्षीने त्यांनी - आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर, निष्कामवृत्तीने संस्थेची आजन्म सेवा करण्याची शपथ घेतली. हा निर्णय कदाचित त्यांच्या मनावर कृतज्ञतेचे दडपण आल्यामुळे घेतला असेल का असा विचार क्षणभर मनात येतो, पण विधवेने शिक्षण घेतल्यावर समाजासाठी काहीतरी कार्य करून प्रकाशझोतात आले तरच त्यांना समाज विचारील असाही विचार त्या स्त्रियांच्या मनात आला असेल. कदाचित उपकारकर्त्या, उद्धारक, अण्णांसारख्या थोर गुरूचा शब्द मोडणे त्यांना शक्य झाले नसेल. काहीही असले तरी त्यांनी 'व्रत' घेतले हे खरे!

पण निष्कामकर्ममठ या नावातच पावित्र्य, चारित्र्य व त्याग यांचा समावेश होतो. शिवाय मठातील सभासदांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार अण्णांनी त्यावेळी केला नाही. त्यांना अभिप्रेत होती ती सेवकांच्या अंगची कार्याबद्दलची निष्ठा, कळकळ नि उत्साह, अतीव निष्ठा, पराकाष्ठेचा स्वार्थत्याग हे गुण मठ या शब्दाने सूचित होतात. या मठाचा सेवक स्वत्व विसरून कार्यात विलीन व्हावा ही कल्पना होती.

१९०८ साली नोंदविलेल्या हिंदू विधवाश्रम संघाच्या जाहीरनाम्यात आयुष्यभर



138284

नि:स्वार्थपणे सेवाकार्य करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांची एक संघटना उभी करावी असे कर्व्यांनी प्रसृत केलेल्या एका निवेदनात म्हटले होते. भगवत्‌गीतेचे सार 'निष्काम कर्म' या शब्दांत सामावलेले आहे. म्हणूनच कर्व्यांनी स्थापन केलेल्या ह्या मठास त्यांनी 'निष्कामकर्ममठ' हे नाव दिले. कर्व्यांच्या मनात असलेल्या उदात्त विचारांचे दृश्य स्वरूप म्हणजे निष्कामकर्ममठ या नावाची एक आदर्श संस्था होय. पण कर्व्यांच्या टीकाकारांना ती अव्यवहार्य वाटली. मठाने प्रत्यक्ष काही ठोस कार्य करून दाखविण्याआधीच मठाच्या कार्यकर्त्यांना टीकेच्या वावटळीला तोंड द्यावे लागले. 'इंदुप्रकाशा'त २१ ऑगस्ट १९१३ रोजी एक खोडसाळ लेख प्रसिद्ध करण्यात आला.

'आश्रमाशी केवळ स्पर्धा करण्याकरिताच महिला विद्यालय व निष्काम कर्म मठ या सहसंस्था प्रो. कर्व्यांनी स्थापल्या.' असे कुत्सितपणे ह्या लेखात म्हटले होते. 'अठरा वर्षे वयाच्या अननुभवी व कोवळ्या मुला-मुलींना मठासाठी जन्मभर दारिद्र्यात राहण्याची आणि परित्यागाची दीक्षा देणे नैतिकदृष्ट्या योग्य आहे काय? अत्युच्च ध्येयवादी विचार या जगासाठी योग्य नाहीत आणि त्यांच्यामुळे कधी कधी निर्माण होणाऱ्या लोकपवादाचे दुष्परिणाम फार भयानक असतात.' या लेखात पुढे म्हटले होते की, 'कर्व्यांसारख्या व्यक्तीच्या बारीक देखरेखीखाली व नियंत्रणाखाली जोपर्यंत अशा संस्था आहेत तोपर्यंत त्या चांगल्या रीतीने चालू शकतील पण पुढे धोका उद्‌भवणारच नाही असे म्हणता येणार नाही.'

लेखात पुढे असे सुचविले होते की, 'फक्त ३०, वर्षे वयावरील स्त्री पुरुषांनाच सेवक व सेविका म्हणून घेतले जावे. मठाच्या सेवकाने विधवाश्रम व महिला विद्यालयाशी संबंध ठेवू नये.'

स्त्रियांचा उद्धार करण्यासाठी वेगवेगळ्या योजना आखून कसे काम करता येईल या प्रबळ विचारातून निरनिराळ्या योजना अण्णांच्या मनात रात्रंदिवस घोळत होत्या. आपल्या नव्या प्रयोगासंबंधी (निष्कामकर्ममठाच्या) जे लिहिले अथवा सुचविले जात होते, त्यामुळे कर्व्यांचे अंत:करण शतश: विदीर्ण होत होते. त्यांचे ध्येय इतके उदात्त व उत्तुंग होते की लाखातील एखाद्यानेच त्याची कल्पना करावी. आपल्या एकाकी कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचा कर्वे आटोकाट प्रयत्न करीत होते. त्यांच्या कट्टर शत्रूलाही त्यांच्यावर स्वार्थीपणाचा आरोप करता आला नसता इतके कर्व्यांचे कार्य स्वच्छ होते. पण कर्व्यांच्या बरोबरीने काम करणाऱ्यांना कर्व्यांच्या विशाल ध्येयाची झेप उमजू शकली नाही.

विनम्रता हा कर्व्यांचा स्थायीभाव होता. आपल्याला प्रिय असलेले कार्य टीका आणि गैरसमजूत यांच्या कचाट्यातून वाचविण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत. स्वत:च्या असलेल्या वा नसलेल्या चुकाही सुधारायला ते तयार असत. आपल्या मठ स्थापनेमागच्या



मूळ उद्दिष्टांचे टीकाकारांना आकलन होत नाही हे त्यांच्या लक्षात आले. कदाचित नाना आठवले, वारूबाई शेवडे, सीताबाई अण्णेगिरी, सीताबाई जोशी, गंगूबाई तांबोळे इत्यादी अण्णांच्या विद्यार्थिनींना व आप्तांनाही ते समजले होते की नव्हते हे सांगता येत नाही पण केवळ अण्णांनी मठ सुरू केला आहे म्हणून ते कार्यासाठी पुढे आले असतील का? पण तसेही वाटत नाही, कारण अण्णांच्या कार्याला वाहून घेतलेल्या ह्या सर्वांनी भावी आयुष्यात त्याबद्दल कधी पश्चाताप केल्याबद्दलचे उल्लेख आढळत नाहीत.

विचारांती अण्णांनी रचानात्मक दृष्टिकोन पुढे ठेवून आश्रम, विद्यालय आणि मठ यांचे एकीकरण करण्याचा विचार स्वीकारला. त्यासाठी संस्थांच्या घटनांतून आवश्यक ते फेरबदल केले. आणि या घटनेचे वर्णन अण्णांनी 'त्रिवेणी संगम' या शब्दांत केले. अण्णा खऱ्या अर्थाने 'महर्षी' होते व त्याच नावाने ते पुढे ओळखले जाऊ लागले.

अण्णा कराचीला संस्थेसाठी वर्गणी जमविणे व प्रचारकार्य करणे यासाठी गेले होते. तिथून त्यांनी निष्कामकर्ममठाच्या सेविकांना इतके सुंदर पत्र लिहिले आहे की ते पाहिल्यावर आपल्या संस्थांच्या कामाशिवाय अण्णांनी जीवनात दुसऱ्या कशालाच अग्रस्थान दिले नसेल असे वाटते. त्यांनी लिहिले होते, 'मुलींनो, तुम्हास भेटून बरेच दिवस झाले आहेत. तुमच्याशी संस्थेच्या हिताच्या गोष्टी कधी बौलेन असे मला झाले आहे. तुम्ही कमी अधिक प्रमाणात कामाला लागला असाल. व्यक्तींची व संस्थांची परीक्षा पाहण्यासाठी केव्हाना केव्हा संकटे येतातच हे लक्षात असू द्या. पण संकटांच्या आचेत आपली संस्था भस्मसात होऊ नये यासाठी आपण सर्वांनी शिकस्त केली पाहिजे. प्रत्येकाच्या शरीरात जसे सर्व ठिकाणी रक्ताचे अभिसरण चालले आहे, त्याप्रमाणे संस्थेच्या सर्व अवयवांतून संस्थेच्या जीवनाचा प्रवाह अबाधित चालला पाहिजे. हा प्रवाह सर्वांच्या विचारांचा एकजीव होऊन निर्माण झाला तरच तो निर्मल व आरोग्यकारी राहील. नाहीतर रक्त गोठून शरीराप्रमाणे संस्थेचेही भाग झडू लागतील. संस्थेच्या हातून काहीतरी कार्यभाग घडवावा अशी ईश्वरी इच्छा दिसते.'

अण्णांची इच्छा आजन्म सेवकांनी फलद्रुप केली. प्रत्येकवेळी नवनवीन कल्पना अण्णांनी सेवकांपुढे मांडल्या आणि सेवकांनी त्या मोठ्या जिद्दीने साकार केल्या. पुढे संस्थेच्या संकटकाळी या आजन्म सेवकांनी ४० टक्के एवढी भरघोस पगार कपात स्वत: मान्य करून महिला विद्यापीठास वाचविले.

विधवांना समाजात रूढ असलेल्या दृष्ट आचारपद्धतींपासून मुक्त करण्याचा कसोशीने प्रयत्न करायचा, त्यांना शिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे रहायला मदत करायची हे ध्येय अण्णांनी आयुष्याच्या सुरूवातीला एकदा ठरविले आणि

अखेरपर्यंत ह्या कल्याणकारी ध्येयाचा पाठपुरावा केला.

नुसत्या विधवांनीच नव्हे तर समाजातील सर्वच स्त्रियांनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांनी महिला विद्यालय स्थापन केले. स्त्री कल्याणाच्या नवनव्या योजना आखल्या आणि त्या राबविण्यासाठी आपले तन मन धन वेचले. पण हे काम सोपे नव्हते. ह्या कार्यासाठी पैसा उभारणे आवश्यक होते. आपल्या संस्थांसाठी पैसा उभारण्यासाठी अण्णा देशभर वणवण हिंडत. ह्या कामात मदत करावी असे पार्वतीबाई आठवले म्हणजे बाया कर्व्यांच्या बहीणीला मनापासून वाटू लागले. पार्वतीबाईंचे मन शिक्षणाकडे वळविण्याचा कर्वे पतिपत्नींनी फार आग्रह धरला होता. त्याचे असे झाले, पार्वतीबाईंना त्यांचे आईवडील बाया व कर्व्यांच्या बिऱ्हाडी रहायला परवानगी देत नव्हते. जुन्या रीतिरिवाजाला मानणारी बायाची आई म्हणे, 'बायाने - माझ्या एका मुलीने पुनर्विवाह केला. तिचे उदाहरण कृष्णी म्हणजे पार्वतीबाई गिरवील तर आमच्या कुळाला जास्तच बट्टा लागेल. त्यापेक्षा ती यात्रेत कॉलऱ्यानी मेली तरी मला चालेल. पण बायाचे घरी रहायचे नाही.'

पुढे मुलाचे शिक्षण नीट व्हायला पाहिजे म्हणून पार्वतीबाईंनी आपल्या मुलाला कर्व्यांच्या बिऱ्हाडी शिकायला ठेवले. एकदा पार्वतीबाई त्याला भेटायला आल्या होत्या त्यावेळी कर्व्यांच्या डोक्यात विधवाश्रम सुरू करायचे विचार होते. त्यांनी पार्वतीबाईंना विचारले, 'विधवाश्रम निघाला तर तू त्यात काय काम करशील?' 'मी स्वयंपाक करण्याचे काम करीन' त्यांनी लगेच उत्तर दिले. कर्वे म्हणाले, 'आश्रम निघावयास अजून वेळ आहे. तोपर्यंत तू शिक्षकिणीचे सर्टिफिकेट घे. होमक्लासमध्ये जा.' त्यावेळी पार्वतीबाई २६ वर्षे वयाच्या होत्या. होमक्लासमध्ये श्रीमंतांच्या बायका बऱ्याच येत असत. त्यात पार्वतीबाईंसारख्या कोकणातल्या सोवळ्याबाईला जायची लाज वाटे. त्यांच्याकडे कुणी लक्षच देत नसे. या परिस्थितीला कंटाळून त्या बायाला म्हणाल्या, 'मी तुझ्या घरीच स्वयंपाकाचे काम करून मुलाचे शिक्षण करीन.' पण रमाबाईंच्या आवडत्या शिष्या असलेल्या बायाला हे थोडेच पटणार होते? त्यांनी पार्वतीबाईंना कोणतेच काम न करता बसायची शिक्षा दिली. 'एक तर विद्या शीक नाही तर घरात मुकाट्याने बस. आम्ही काही घरकामासाठी तुला आणलेले नाही. आम्हाला स्वयंपाकिणी वाटेल तेवढ्या मिळतील. शिक्षकिणीचे काम करायचे असेल तर तुला शिकलेच पाहिजे.' असे निक्षून सांगितल्यावर मात्र होमक्लासात जाण्याऐवजी त्या आगरकरीणबाईंच्या घरी त्यांच्या बरोबर शिकू लागल्या.

पार्वतीबाईंची ही आठवण विलक्षण बोलकी आहे. 'पुढे पुण्यातील हुजुरपागेत जावे असे त्यांना वाटले. १४ पाढे, १०० अंक, कर, मर, रथ, एवढेच वाचन, मोडीची ओळख नाही. मी २६ वर्षाची सोवळी बाई, मला सात वर्षाचा मुलगा, माझे शिक्षण संपणार कधी मी मास्तरीण होणार कशी? अनेक काळज्या. पण बायाने



मला दुसरीच्या गोगटे मास्तरांपुढे उभे केले व त्यांना वर्गात घेण्याची विनंती केली. दुसरीत ८/१० वर्षांच्या एकंदर ६० कुमारिका. मी सोवळी बाई त्यांच्यापुढे उभी. मास्तर वर्गात बसवून घ्यायला तयार नाहीत. बायाची विनवणी चालूच होती. काय देखावा होता. सध्याच्या सरळपणे शिकणाऱ्या मुलींना त्याची कल्पनाही करता येणार नाही. पण शेवटी प्रवेश मिळाला आणि पुढे शिक्षण चालू राहून अखेरीस ट्रेनिंगची स्कॉलरशिप मिळवून सर्टिफिकेट मिळाले. शिक्षणावर नितांत प्रेम करणाऱ्या अण्णांना व बायाला कोण आनंद झाला आणि किती धन्यता वाटली त्याचे वर्णन शब्दांत होणे शक्य नाही.'

पुढे पार्वतीबाई संस्थांच्या मदतीसाठी निधी गोळा करण्यासाठी वर्षातून एकदोनदा दौऱ्यावर जात होत्या. इंग्रजीच्या अज्ञानामुळे दौऱ्यात त्यांना फार त्रास होई. इंग्रजी येत नसल्यामुळे त्यांना स्टेशनच्या नावाच्या पाट्या वाचता येत नसत व अनेकदा त्या चुकीच्या स्टेशनवर उतरून जात. अनेक वेळा मराठी न जाणणाऱ्या लोकांना भेटायची वेळ येई व काम समजावून सांगता येत नसे. अण्णांनी पार्वतीबाईंना इंग्रजी शिकविण्याचे काम स्वतःवर घेतले त्यावेळी पार्वतीबाई ४२ वर्षांच्या होत्या.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य असूनही आपण न्यू इंग्लिश स्कूल अथवा फर्ग्युसन कॉलेज यासाठी काही करू शकलो नाही याची अण्णांना खंत वाटे. खरे तर ते अनाथ बालिकाश्रमाचे कामात सतत गुंतलेले होते. आपण डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सदस्य असल्यामुळे आपल्याला खूप प्रतिष्ठा मिळाली आणि तिचा पर्यायाने बालिकाश्रमाच्या कामासाठी आपल्याला उपयोग झाला पण आपण मात्र त्या संस्थेसाठी फक्त अध्यापनाचेच कार्य केले म्हणून त्यांना अपराध्यासारखे वाटे. या विचारातूनच त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांची एक सभा घेतली आणि न्यू इंग्लिश स्कूल असोसिएशन स्थापन केली. जुन्या विद्यार्थ्यांनी असोसिएशनचे सभासद व्हावे आणि आपले एक महिन्याचे उत्पन्न दरवर्षी असोसिएशनला द्यावे अशी सूचना करण्यात आली. कर्व्यांच्या मार्गदर्शनाखाली एक लाख रुपये गोळा करायची योजना आखली होती, पण त्यात फारसे यश आले नाही याची रुखरुख त्यांना लागून राहिली होती, म्हणून त्यांनी दरमहा दहा रुपये निधीत टाकायला सुरूवात केली. त्यांना आश्रमाकडून मिळणारा आठ महिन्यांचा पगारही त्यांनी त्या निधीत जमा केला.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून प्राध्यापक म्हणून निवृत्त झाल्यावर आपल्या कुटुंबियांच्या चरितार्थासाठी अगदी आवश्यक होती त्यापेक्षा त्यांनी एक पैही जास्त त्यांनी मठापासून घेतली नाही. त्या दिवसापासून त्यांच्याकडे शिलकी रक्कम अशी कधी राहिली नाही. त्यामुळे स्वतःसाठी कमावण्याची भावना आधी फारशी नव्हतीच पण आता तर सर्वच भावना संपली व सर्व प्रकारच्या द्रव्यविषयक काळजीतून

त्यांचे मन मुक्त झाले.

कौटुंबिक विवंचनेपासून अण्णा मुक्त झाले होते हे खरे आहे, पण त्या सर्व विवंचना त्यांच्या पत्नीच्या बायाच्या मागे होत्याच. आपल्या तीन मुलांचा व पतीचा चरितार्थ चालविण्याविषयी बायाने खंबीरपणे शरीरकष्ट उपसले. बायाने आपल्या आठवणींत लिहिले आहे, 'कर्व्यांनी कधी भरपूर पैसा कमावला नाही, आणि जो काही कमावला तो कुटुंबावर खर्च करण्याऐवजी त्यांनी स्वतः उभारलेल्या संस्थांच्या मदतीसाठी खर्च करणे पसंत केले. त्यामुळे घरगडी न ठेवता सर्व कामे मीच करीत असे. सुईणीचे काम करून मला थोडे पैसे मिळत. श्रीमंत कुटुंबातील एका अज्ञान मुलीच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून ती सज्ञान होईपर्यंत काम पाहण्यासाठी कर्व्यांची नेमणूक झाली. त्याचे मानधन म्हणून कर्व्यांना सालीना ४०० रुपये मिळत. अर्थात त्या मुलीचा आईसारखा सांभाळ मीच केला. ती मुलगी अशक्त व तुनुमुनु होती. त्यामुळे जास्तच काळजी घ्यावी लागे.'

कर्वे चरित्र्याने फार शुद्ध होते. आपली चूक कुणी दाखवून दिली, अगर स्वतःची चूक स्वतःलाच समजून आली तर ज्या व्यक्तीवर आपल्याकडून अन्याय झाला तिची माफी मागितल्याशिवाय कर्व्यांना चैन पडत नसे. एकदा तर फार गंमत झाली. कर्व्यांच्या मनात जुन्या आठवणी येऊ लागल्या. आपण कोणाला उद्धटपणे बोललो होतो का अगर दुखावले होते का हे आठवायचा ते प्रयत्न करू लागले. त्यांना एकदम १९०७ साली घडलेल्या घटनेची आठवण झाली. आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळाची सभा होती. त्यात महिला विद्यालयाच्या योजनेवर चर्चा झाली. मंडळाने कर्व्यांनी मांडलेली योजना फेटाळून लावली. कर्वे निराश झाले. एऱ्हवी अगदी शांत असणाऱ्या कर्व्यांच्या सहनशक्तीची मर्यादा संपली आणि संस्थेचे अध्यक्ष डॉ. रामकृष्ण भांडारकर यांच्याशी बोलताना काही अपमानास्पद शब्द कर्व्यांच्या तोंडून निघून गेले. आपण डॉ. भांडारकरांशी असे बोलावयास नको होते असे कर्व्यांना आता वाटू लागले. घडलेल्या घटने नंतर दिलगीरी व्यक्त करणारे पत्र अण्णांनी भांडारकरांना पाठविले. त्यात त्यांनी असे लिहिले होते, 'आपले चुकले आहे असे बराच काळ मला वाटले नाही, आणि नंतर जेव्हा तसे वाटले तेव्हा आपली क्षमा मागण्याचे धैर्य मला झाले नाही. आता त्याबद्दल मी प्रांजळपणे माफी मागत आहे. आपण उदार मनाने मला क्षमा करावी अशी मी विनंती करतो. समितीच्या बैठकीला पाच वर्षांपूर्वी जे सभासद हजर होते त्यांना मी या पत्राची एक प्रत देईन.'

डॉ. भांडारकरही गुणी माणसांचे तितकेच चाहते होते. त्यांनी कर्व्यांना छोटेसे उत्तर पाठविले त्यात लिहिले होते की, 'आपल्या बोलण्यामुळे माझा काही अपमान झाला असे मला वाटलेच नाही, उलट तुम्ही स्वीकारलेल्या कार्यात आमची मदत कोणत्याही प्रकारे नको आहे एवढाच अर्थ मी त्यातून काढला.'



कर्व्यांचा दृष्टिकोन असा हा नेहमीच रचनात्मक असायचा. कर्व्यांना वयाच्या ५७ व्या वर्षी राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या आखिल भारतीय संमेलनाचे अध्यक्षपद भूषवायचा सन्मान मिळाला. अध्यक्षपदावरून त्यांनी 'भारतीय महिलांच्या सेवेत वीस वर्षे' या विषयावर भाषण दिले. त्याच्या छापील प्रती वाटण्यात आल्या. भारतीय स्त्रियांच्या उन्नतीसाठी आणि समाजात त्यांना अधिक चांगले स्थान मिळण्यासाठी कर्व्यांनी कोणते कार्य केले, किती कष्ट उपसले, किती प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत मार्ग काढला याची त्यांच्या मित्रांना व टीकाकारांना कल्पना आली.

मासिक मनोरंजनाचे संपादक श्री. का. र. मित्र यांना त्यांचे जीवनकार्य फार स्फूर्तिप्रद वाटले. त्यांनी कर्व्यांना आत्मचरित्र लिहिण्याची विनंती केली. अति विनयशील स्वभावामुळे कर्व्यांनी प्रथम साफ नकार कळविला. पण काही दिवस विचार केल्यावर त्यांना वाटले - आश्रम, मठ, विद्यालय या आपल्या संस्थांच्या कार्याचे महत्त्व त्यामुळे लोकांना चांगले पटेल, म्हणून त्यांनी आत्मचरित्र लिहिण्याची तयारी दर्शविली. अनेकवेळा यश, अपयश पचविल्यानंतर साठीकडे झुकत असताना कर्वे आयुष्याकडे कृतार्थतेने बघत होते. पण अहंकार किंवा वृथाभिमानाची भावना त्यांच्या मनाला शिवली नाही. या वयातही नवनवीन कार्य हाती घ्यायचा त्यांचा उत्साह मात्र तिळमात्र कमी झाला नाही.

■ ■ ■

# ८ / महिला विद्यापीठ

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात - त्याचप्रमाणे भावी घटनांची बीजेसुद्धा द्रष्टया माणसाच्या मनोबुद्धीत आधीच कुठेतरी रुजलेली दिसतात. तसे नसते तर, ‘हिंगण्याच्या संस्थांतून जर महाराष्ट्रासाठी स्त्रियांची युनिव्हर्सिटी उत्क्रांत होईल तर काय बहार उडेल !’ असा विचार अण्णांनी आपल्या आत्मवृत्तात बारा वर्षांपूर्वीच अगदी सहजपणे प्रगट केला नसता. असा एखादा विचार माणसाच्या मनात खोल कुठेतरी दडून बसतो आणि मग अगदी विस्मरणात गेल्यासारखा वाटतो. पुढे केव्हातरी त्या विचाराला अनुसरून घटना घडतात तेव्हा त्या घटना त्या व्यक्तीला स्वत:लाच अकल्पित वाटतात. अण्णा म्हणतात, ‘माझ्या आयुष्यात काही अकल्पित योग आलेले आहेत व त्यामुळे माझ्या कार्याला एकदम निराळी दिशा लागलेली आहे. महिला विद्यापीठ स्थापन करण्याबद्दलची घटना यांपैकीच म्हणावी लागेल.’

१९१५ सालचा ऑगस्ट महिना होता. प्रा. कर्वे फर्ग्युसन कॉलेजातून प्राध्यापक पदावरून निवृत्त झाल्यावर आता स्वत: स्थापन केलेल्या आपल्या संस्थांच्या कामात पूर्णवेळ लक्ष घालत असत. आश्रमाच्या कचेरीत ते टेबलपाशी काम करीत बसले होते. एवढ्यात त्यांच्या टेबलावर टपाल येऊन पडले. हातातील काम दूर सारून त्यांनी टपाल चाळले. एका लिफाफ्यातून जपानमधील एका महिला विद्यापीठाच्या कार्याची माहिती देणारी एक पुस्तिका त्यांच्या हाती पडली. त्यांनी ती जराशी चाळली, उलट सुलट करून पाहिली पण ती कुणी पाठविली त्याचा पत्ता लागला नाही. पाठवणाऱ्याचे चार ओळीचे पत्रही सोबत नव्हते. त्यामुळे त्याकडे फारसे लक्ष न देता त्यांनी ती पुस्तिका टेबलाच्या खणात ठेवली व आपले काम पुढे चालू केले. अनेक पुस्तके, पत्रके येतात त्यांतलेच हे एक असे त्यांना त्यावेळी वाटले.

१९१५ सालच्या अखेरीस राष्ट्रीय सभा मुंबईस भरावयाची होती. त्याचवेळी न्यायमूर्ती रानडयांनी तीस वर्षांपूर्वी सुरू केलेल्या प्रथेनुसार राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अधिवेशनही कॉंग्रेसच्या अधिवेशनाला जोडून त्याच शहरात, त्याच जागी भरविले



जाणार होते. ह्या सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान प्रा. कर्व्यांनी स्वीकारावे असे पत्र संस्थेचे चिटणीस न्यायमूर्ती चंदावरकर यांनी कर्व्यांना पाठविले.

आपण कोणी सामान्य व्यक्ती आहोत आणि हिंगण्यासारख्या एका आड बाजूच्या गावात आपण चालविलेले कार्य फार मोठे आहे असे कर्व्यांना कधी वाटले नाही. वृथाभिमान त्यांच्या मनाला कधी शिवलाही नाही. त्यामुळे सामाजिक परिषदेसारख्या आखिल भारतीय कीर्तीच्या संस्थेकडून आपणास अध्यक्षपदाचा मान कधी मिळेल अशी कल्पनाही त्यांच्या मनाला शिवलेली नाही. उलट नेहमीप्रमाणे अतिसंकोचाने हे काम आपल्या आटोक्याबाहेरचे आहे असे वाटून कर्व्यांनी ताबडतोब आपला नकार चंदावरकरांना कळविला, पण चंदावरकरांनी कर्व्यांच्या मित्रांमार्फत कर्व्यांवर दडपण आणले. शेवटी कर्वे तयार झाले.

अध्यक्षीय भाषणाचा विषय अर्थातच त्यांनी ‘स्त्रियांचे शिक्षण’ हाच निवडला. मनातल्या मनात भाषणाची जुळवाजुळव चालू असताना त्यांना एकदम जपानमधील महिला विद्यापीठासंबंधीच्या ‘त्या’ पुस्तिकेची आठवण झाली. त्यांनी टेबलाच्या खणातून ती पुस्तिका काढून अथपासून इतिपर्यंत वाचली, आणि काय आश्चर्य कर्व्यांच्या मनात अवर्णनीय उत्साहाचे वारे खेळू लागले. जपानी बांधवांच्या मार्गाचा स्वीकार आपण केला तर भारतीय स्त्रियांना उच्च शिक्षणाची संधी आपण निश्चित उपलब्ध करून देऊ शकू असे त्यांना वाटले. पत्रकाचा अर्थ नीट समजावून घेऊन वाचताना अण्णांना आढळून आले की, चाणाक्ष, दूरदर्शी जपानी लोकांच्या लक्षात एक गोष्ट चटकन आली की जपानला अमेरिका व इतर युरोपीय देश यांसारखी प्रगती करून घ्यायची असेल तर राष्ट्रपुनर्रचनेच्या कार्यात विद्याविभूषित पुरुषांइतक्याच स्त्रियाही पदवीधर व्हायला हव्यात. शिक्षणाच्या क्षेत्रात स्त्रिया मागे पडल्या तर पुरुषांचे विचार व स्त्रियांचे विचार यांत महदंतर पडेल व राष्ट्राच्या दृष्टीने ते अपायकारक ठरेल. जपानी युनिव्हर्सिटीचे भावी चॅन्सेलर मिस्टर नरूसे यांना या कामाचा अक्षरश: ध्यास लागला होता. पाच वर्षे या संबंधाने खटपट करून १९०० साली त्यांनी युनिव्हर्सिटीची स्थपना केली. जपानी लोकांच्या विचारांची दिशा या पुस्तिकेवरून स्पष्ट होत होती.

जपानमधील पुरुषांच्या विद्यापीठाशी स्पर्धा करणे हा या महिला विद्यापीठाचा हेतू नव्हता. महिलांच्या मानसिक आणि शारिरीक परिस्थितीला अनुरूप ठरेल असा अभ्यासक्रम आखून त्यांना उच्च शिक्षण मिळवून देणे आणि त्यांची प्रगती होताच शिक्षणाचा दर्जा हळूहळू उंचावणे हा या विद्यापीठाच्या संस्थापकांचा उद्देश होता. स्त्रीचे मुख्य कार्यक्षेत्र तिच्या घरात, गृहिणीजीवनात सामावलेले आहे. यावर जपानमधील महिला विद्यापीठाच्या चालकांनी भर दिला होता. आणि कर्व्यांना पण हा मुद्दा विशेष आवडला होता. या गृहक्षेत्राच्या केंद्रस्थानी राहून संसारातील आणि कुटुंब जीवनातील साऱ्या कार्याचे सूत्रचालन करणे हेच स्त्रीचे मुख्य कर्तव्य व स्थान होते.

समाजाच्या व राष्ट्राच्या कल्याणाचा पाया येथेच घातला जातो. त्यावेळी जपानमध्ये गेली ५० ते ६० वर्षे राष्ट्राच्या पुनर्रचनेचे जे प्रयत्न चालले होते त्यांत स्त्रियांना बरोबरीने वाटा उचलता आला पाहिजे अशी विद्यापीठाच्या चालकांची धारणा होती. याबाबतीत पोषक ठरतील अशी काही मार्गदर्शक तत्त्वे त्यांनी समोर ठेवली होती. त्यांपैकी महत्त्वाची काही अशी - १) स्त्रिया म्हणजे मानवजातीचे घटक व स्वत्त्व-विशिष्ट व्यक्ती आहेत हे ओळखून त्यांना शिक्षण देणे. २) सुपत्नी व सुमाता होण्याची पात्रता अंगी येईल असे शिक्षण त्यांना देणे. ३) आपल्या प्रापंचिक जीवनाचा राष्ट्राच्या उन्नती, अवनतीशी अप्रत्यक्ष पण निकटचा संबंध आहे, असे स्त्रियांच्या सतत ध्यानात राहील अशा प्रकारे त्यांस शिक्षण देणे.

जपानमधील स्त्रीशिक्षणासंबंधी चाललेल्या या प्रयोगाची प्रा. कर्व्यांनी माहिती करून घेतली आणि त्याचा विस्तृत परिचय आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भारतीय समाजाला करून दिला. (जपानमधील महिला विद्यापीठाचे एक फार मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्या विद्यापीठावर सरकारचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नव्हते अथवा सरकारकडून आर्थिक मदतही घेतली जात नव्हती. त्यामुळे विद्यापीठातील अभ्यासक्रम अमुक एका पद्धतीने ठरवावा असा सरकारचा काही आग्रहही नव्हता.) अण्णांना स्वत:लाही हे सर्व फार अनुकूल वाटले. महिला विद्यापीठ स्थापन करण्याची आपली ही नवी योजना त्यांनी अध्यक्षीय भाषणात जाहीरही करून टाकली. अर्थात या कामात अनेक अडचणी येतील याची त्यांना पूर्ण कल्पना होती.

सामाजिक परिषदेच्या अध्यक्ष पदावरून दिलेल्या भाषणात अण्णांनी ही घोषणा केली खरी पण त्यानंतर या विषयावर वर्तमानपत्रांत बरीच उलट सुलट चर्चा झाली. डॉ. भांडारकर, फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. कानिटकर, प्रो. गुणे, गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर, शेफील्ड युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरू डॉ. फिशर, मिस्टर सी. एफ. ॲण्ड्र्यूज, नामदार श्रीनिवास शास्त्री, महात्मा गांधी, ॲनी वेझंट अशा अनेक नामवंत व्यक्तींची महिला विद्यापीठाच्या स्थापनेस पूर्ण सहानुभूती होती. मात्र लोकमान्य टिळकांना स्त्रियांना उच्च शिक्षण देण्याची कल्पना पसंत पडली नाही. इतकेच नव्हे तर प्रो. कर्व्यांना विविध योजनांत अनेक तऱ्हेनी सहकार्य करणारे त्यांचे शिष्योत्तम व मामेभाऊ रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांचाही सुरूवातीस या कार्यास खरोखर विरोधच होता.

याविषयी एक मजेशीर हकीगत कर्व्यांनी आत्मचरित्रात लिहिली आहे. 'इकडे सामाजिक परिषदेत स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीबद्दल माझी तरफदारी चालली होती. व त्याचवेळी परिषदेच्या मंडपात व मंडपाबाहेर परांजपे यांनी लिहिलेले माझे एक लहानसे इंग्रजी चरित्र विकले जात होते. त्या पुस्तकात 'Festana lente' असे लॅटीन वचन असून त्याचे इंग्रजीत भाषांतर 'Hasten slowly' म्हणजे 'इतकी घाई करू नका' असे दिले होते. त्यांच्या सल्ल्याचा हेतू हा होता की अजून महिला आश्रमाला



चांगले स्थैर्य यावयास पाहिजे, ते येऊ द्या व मग महिला विद्यापीठाचा दुसरा उद्योग हाती घेण्यास आपणास ठीक पडेल.'

प्रो. कर्वे आपल्या 'Looking back' ह्या इंग्रजी आत्मचरित्रात लिहितात, 'विद्यापीठाबाबतचा हा सबुरीचा सल्ला योग्यच होता. परंतु एकदा कामाला लागायचे म्हटले की ताबडतोब काम हाती घ्यायचे हे माझे स्वभाव वैशिष्ट्य झाले होते. शिवाय मी आता ५७ वर्षांचा झालो होतो, तेव्हा एखादी धाडसी कल्पना मूर्त स्वरूपात उतरविण्यासाठी प्रयत्न करायचा म्हटला तर आता मला आणखी उशिर करून चालण्यासारखे नव्हते. या योजनेत कोणत्या अडचणी येतील आणि यशापेक्षा अपयशाचीच शक्यता केवढी मोठी होती याचीही मला कल्पना होती. परंतु धोका पत्करूनही या कल्पनेला चालना देण्याची गरज होती. 'काया - वाचा - मनसा' थोडीशीही उसंत न घेता या बाबतीत प्रामाणिक प्रयत्न केले तर अपयश येऊनही माझी मानहानी झाली असे मला वाटणार नव्हते.''

(प्रो. कर्वे वेगाने कामास लागले. महिलांसाठी वेगळ्या विद्यापीठाची त्यांची योजना आणि त्याबाबतच्या त्यांच्या सूचना यामुळे अधिवेशनात कुतूहल निर्माण झाले. या नव्या योजनेवर जितकी टीका झाली तितकेच तिचे स्वागतही झाले होते. स्त्री शिक्षणाविषयी आस्था असणाऱ्यांना या योजनेने चांगले खाद्य पुरविले होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाच्या प्रती छापण्यात येऊन त्या सर्व वाटण्यात आल्या.) दोन महिन्यांनंतर कर्व्यांना ब्रॅडफर्ड येथून एक पत्र आले. तेथील मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका कु. मार्गारेट ई. रॉबर्टस् यांनी आपल्या देशातील शिक्षण संघटनेच्या सदस्यांत वाटण्यासाठी प्रा. कर्व्यांच्या भाषणाच्या १५० प्रतींची मागणी केली होती. पुनर्मुद्रनासाठी येणारा खर्चही द्यायची त्यांनी तयारी दर्शविली होती.

(अण्णांचे राष्ट्रीय सामाजिक परिषदेतले अध्यक्षीय भाषण ३० डिसेंबर १९१५ साली झाले. त्यात त्यांनी स्वतंत्र महिला विद्यापीठाची योजना मांडली आणि भगीरथ प्रयत्न करून ३ जून १९१६ या दिवशी सर्व पूर्वतयारी पूर्ण करून, सेनेटच्या सभेत विद्यापीठाच्या स्थापनेस मंजुरी घेऊन घटना ही मंजूर करून घेतली. म्हणजे महिला विद्यापीठाची गर्भावस्था फक्त ५ महिने ४ दिवसांची होती. इतक्या थोडक्या दिवसांत सरकारी मदत न घेता, खाजगी, वैयक्तिक प्रयत्नांनी युनिव्हर्सिटी स्थापन झाल्याचे उदाहरण हिंदुस्थानातच काय पण जगाच्या पाठीवर कुठे घडले असेल असे वाटत नाही.)

अण्णांच्या डोक्यात महिला विद्यापीठाच्या योजनेने आकार घेतला व ते अहोरात्र त्यासाठी काम करू लागले. सामाजिक परिषदेतील अध्यक्षीय भाषणानंतर सर्वप्रथम अण्णांनी स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीची घटना करण्याची खटपट सुरू केली. सुमारे चौदा-पंधरा मंडळींची सभा फर्ग्युसन कॉलेजात भरविली. त्या सभेला विद्यापीठ स्थपनेला अनुकूल

तसेच प्रतिकूल मते असलेली मंडळीही हजर होती. ह्या सभेत युनिव्हर्सिटी महाराष्ट्रासाठी असावी आणि दरसाल दहा रुपये वर्गणी देणाऱ्या अगर तीनशे रुपये देणगी देणाऱ्या पदवीधरांचा एक मतदारसंघ करावा व पाच रुपये वार्षिक वर्गणी अगर दीडशे रुपये देणगी देणारांचा दुसरा मतदारसंघ करावा ह्या गोष्टी ठरल्या.

त्यानंतर आश्रमातल्या व्यवस्थापक मंडळींची एक सभा अण्णांनी घेतली. त्यात 'महाराष्ट्र शारदापीठ' हे नाव सुचविण्यात आले. संस्थेची उद्दिष्टे व सिनेटचे सभासद निवडण्यासंबंधीचे काही नियम ठरविण्यात आले. आणखीही काही अनुकूल गोष्टी मध्यंतरी घडल्या. हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलातील विद्याखात्याचे प्रमुख - सर शंकरन् नायर हे होते. त्यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त करणारे पत्र अण्णांनी त्यांना पाठविले. पण 'कलकत्त्याऐवजी बनारसला भेटायला यावे कारण बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या पायाचा दगड बसवायला आम्ही तिकडे जात आहोत.' असे त्यांचे उत्तर आले. अण्णांनाही ते सोईचे वाटले. शिवाय बनारस हिंदू विद्यापीठाचा समारंभही पाहता आला. सर शंकरन् नायरना महिला विद्यापीठाची कल्पना बरी वाटली पण कामाला काही स्वरूप आल्यावर सरकारकडून मदतीसंबंधी नंतर बघू असे त्यांनी सांगितले. त्या भेटीच्या वेळीच डॉ. ॲनी बेझंट यांचीही अण्णांनी भेट घेतली. बेझंटबाईंना ही योजना फार आवडली. पण विद्यापीठ केवळ महाराष्ट्रासाठी न काढता त्याला व्यापक स्वरूप द्या - असा सल्ला त्यांनी दिला. सल्ल्याबरोबर दीडशे रुपयांचा चेकही बाईंनी दिला.

पुण्यात आल्यावर १३ फेब्रुवारी १९१६ रोजी पुन्हा आश्रमाच्या मंडळींची सभा अण्णांनी घेतली. त्यात 'भारतवर्षीय महिला - विद्यापीठ' अथवा 'इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटी' हे नाव सुचविण्यात आले, व प्रोव्हिजनल कमिटी निवडून सेनेट व सिंडीकेट नेमले जाईपर्यंत ह्या कमिटीने काम पहाण्याचे ठरविण्यात आले.

गुरुवर्य रविंद्रनाथ टागोरांना कर्व्यांनी नियोजित केलेल्या महिला विद्यापीठात विद्यार्थीनींना मातृभाषेतून उच्च शिक्षण दिले जाणार आहे, हे कळल्यावर विशेष आनंद झाला. 'अशा प्रकारच्या संस्थेची फार आवश्यकता आहे. आपण त्यासंबंधी काढलेल्या छापील पत्रकातील सर्व युक्तिवाद मला पसंत आहे. नवी संस्था जरूर स्थापन करावी. महिला विद्यापीठाला सरकारची मान्यता मिळविण्याच्या कामात गुंतून न राहता प्रत्यक्ष कामाला लागून प्रगती साधावी आणि मग मान्यता मिळवावी हे अधिक चांगले. विद्यापीठाच्या कामी पैशाची मदत मात्र मला कोणत्याच प्रकारे करता येणार नाही, कारण माझ्याजवळची सर्व पुंजी मला माझ्या स्वतःच्या शाळेसाठी, शांतीनिकेतनसाठी खर्च करावी लागते.' असे त्यांनी कर्व्यांना कळविले.

शेफिल्ड विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एच. ए. एल. फिशर यांनी कर्व्यांच्या कार्याला आपण मनापासून यश चिंतितो असे सांगून महिला विद्यापीठ स्थापन झाल्यास



स्त्री शिक्षणाच्या आघाडीवर तुम्ही जे उदात्त कार्य करीत आहात त्यावर शिरपेच चढविला जाईल असे म्हटले.'

प्रो. कर्व्यांचे परदेशातील एक मित्र सर विल्यम वेडरबर्न हे भारत देशाबद्दल अत्यंत प्रेम वाटणारे गृहस्थ होते. प्रो. कर्व्यांनी त्यांच्यावर ज्या कामाबद्दल चौकशी करण्याचे काम सोपविले होते ते काम असे की, 'हिमालय पर्वतातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट सर करणारे मिस्टर एव्हरेस्ट यांची कन्या कुमारी एव्हरेस्ट हिच्या मृत्युपत्रात तिने असे लिहून ठेवले होते की, 'आपल्या संपत्तीपैकी देणग्या म्हणून काही रक्कम दिल्यानंतर जी मालमत्ता उरेल ती सरकारी नियंत्रणाखाली नसलेल्या एखाद्या भारतीय शिक्षणसंस्थेला देण्यात यावी. अशी एकही लायक संस्था अस्तित्वात नाही असे विश्वस्तांना वाटले तर त्यांनी नवी संस्था स्थापन करावी.' वरील मृत्युपत्रासंबंधीचा मजकूर एका वृत्तपत्रात छापून आला होता. त्याबद्दल चौकशी करून कळवावे.' प्रो. कर्व्यांनी वेडरबर्न यांना अनाथ बालिकाश्रम व महिला विद्यापीठ यांची माहिती देणारी पत्रके पाठवून दिली. महिला विद्यापीठाच्यावतीने रीतसर अर्ज करावा का असा सल्लाही त्यांना विचारला.

वेडरबर्न यांनी कर्व्यांना पाठविलेल्या उत्तरात म्हटले आहे की, 'आपण पाठविलेले साहित्य मी लक्षपूर्वक वाचले असून तुमच्या कार्यात सर्वतोपरी मदत करण्याचा मी प्रयत्न करीन.' महिला विद्यापीठ स्थापन करण्याच्या कर्व्यांच्या योजनेच्या विरोधात उभ्या राहिलेल्या एका सद्गृहस्थांनी आपला निषेध सर वेडरबर्न यांच्याकडेही पोहोचवला होता. तो निषेध कळल्यावरही सर वेडरबर्न यांनी कर्व्यांना कळविले की महिला विद्यापीठाची कल्पना मूळ धरून राहण्यासाठी कर्व्यांनी जोरदार प्रयत्न करावेत. त्यांनी पत्रात पुढे लिहिले होते, 'त्यासाठी शिक्षणावर प्रेम करणाऱ्यांनी या विद्यापीठाला जोरदार पाठिंबा द्यायला हवा. असे झाले तर मला आनंदच होईल.'

सर वेडरबर्न यांचा मृत्यू झाल्यावर, भारतासाठी आयुष्यभर केलेल्या त्यांच्या कार्यामुळे, 'इंडिया बेनिफिट फंडातून' अनाथ बालिका श्रमासाठी १५० पौंड व भारतीय महिला विद्यापीठासाठी १०० पौंड रक्कम प्रो. कर्व्यांकडे सुपूर्द करण्यात आली.

प्रो. कर्व्यांनी महात्मा गांधीची भेट घेऊन त्यांनाही आपल्या महिला विद्यापीठाच्या नव्या योजनेची माहिती दिली. गांधीजींना योजना पसंत पडली. विशेषत: विद्यापीठातील शिक्षणाचे माध्यम मातृभाषा आहे हे ऐकून त्यांना विशेष आनंद झाला. मात्र या शिक्षणक्रमात इंग्रजी विषय सक्तीचा असणे त्यांना आवडले नाही. इंग्रजी विषय ऐच्छिक ठेवावा याबद्दल गांधीजींनी आग्रही मत मांडले. पण त्यांना त्याबाबत नम्रपणे नकार देताना कर्वे म्हणाले, 'इंग्रजी हा विषय ऐच्छिक असावा असा आपला आग्रह असेल तर आपल्या सहानुभूतीशिवाय हा प्रकल्प सुरू करावा लागणे हे आम्ही

आमचे दुर्दैव समजू.'

थोड्या वेळाने महात्मा गांधी शांतपणे कर्व्यांना म्हणाले, 'कर्वे, तुम्ही आहात म्हणून मी माघार घेतो. मात्र माझे मत अद्यापी तेच आहे.' म. गांधींनी आग्रह सोडल्यामुळे कर्व्यांचे समाधान झाले. गांधीजींनी महिला विद्यापीठासाठी दरसाल दहा रुपये वर्गणी देण्याची तयारी दर्शविली, आणि दरसाल वार्षिक अहवालाची प्रत पाठविण्यास सांगितले. गांधीजींनी कर्व्यांना अहमदाबादेस नेले आणि स्वतःच्या अध्यक्षतेखाली कर्व्यांचे भाषण ठेवून नियोजित महिला विद्यापीठाची, त्याबद्दलच्या ध्येयधोरणांची, उद्दिष्टांची माहिती जाहीर सभेत श्रोत्यांना द्यायला सांगितले. महात्माजींच्या पाठिंब्यामुळे अहमदाबादेत विद्यापीठासाठी बरीच वर्गणीही मिळाली. इंग्रजी भाषा ही अर्ध्या जगाची ज्ञानभाषा असल्यामुळे ती सक्तीची ठेवण्याबद्दल कर्व्यांनी आपला आग्रह कायम ठेवला होता.

अहमदाबादेनंतर विद्यापीठाच्या प्रचारार्थ कर्वे मद्रास, कर्नाटक, बेळगाव, धारवाड, हुबळी, गदग, विजापूर इत्यादी भागांतून दौऱ्यासाठी गेले. या दौऱ्याचे उद्दिष्ट अर्थात महिला विद्यापीठासाठी निधी जमा करणे, पदवीधर मतदारसंघासाठी सभासद नोंदणी करणे आणि महिला शिक्षणाचा प्रचार करणे हे होते. या दौऱ्यात कृष्णाबाई ठाकूर, वेणूबाई नामजोशी, पार्वतीबाई आठवले अशा कर्व्यांच्या निष्ठावान स्त्री सहकाऱ्यांनी बरीच मदत केली.

मात्र अनेक महान व्यक्तींनी कर्व्यांच्या योजनेला पाठिंबा दिला तरी इंडियन सोशल रिफॉर्मरचे संपादक श्री. नटराजन् यांनी आपला प्रखर विरोधही नोंदविला होता. ते लिहितात, 'प्रा. कर्व्यांच्या महिला शिक्षणाच्या कार्याबद्दल मला सहानुभूती वा कौतुक वाटत असले तरी महिला विद्यापीठाच्या या नव्या योजनेवर माझा विश्वास नाही हे मी स्पष्टपणे सांगतो. कारण कर्व्यांचा हेतू चांगला असला तरी या योजनेमुळे स्त्रीशिक्षणाच्या मार्गात अडथळा येईल अशी मला खात्री वाटते. यश मिळविण्यात ही योजना यशस्वी होणार नाही. नव्हे यश मिळविण्यास ती लायकही नाही.' श्री. नटराजन यांच्या टीकाप्रवाहाने कर्वे दुःखी झाले. तरीसुद्धा कठोर टीकाकारांबद्दलही कर्वे कधीच द्वेषबुद्धी बाळगीत नसत. टीका ही सद्हेतूनेच केली जाते अशी त्यांची धारणा होती. टीकाकारांच्या प्रत्येक शब्दाचा ते काळजीपूर्वक विचार करीत. त्यामुळे आपण काही नवीन शिकलो असे ते म्हणत. प्रखर टीकेने ते नाउमेद होत नसत, अथवा सहानुभूतीमुळे त्यांना फाजील समाधान किंवा अभिमानही वाटत नसे. आपले मन व विचारशक्ती सदैव समतोल ठेवण्याचा ते प्रयत्न करीत.

मद्रासच्या दौऱ्याच्यावेळी अण्णा श्रीनिवास शास्त्री यांच्याकडे उतरले होते. व्यक्तिशः शास्त्रींना महिला विद्यापीठाची कल्पना आणि त्यासाठीचा अण्णांचा दौरा अगदी हास्यास्पद वाटला होता. परंतु पदवीधर संघात ज्यांनी आपली नावे नोंदविली



होती अशा मान्यवर मंडळींनी कर्व्यांच्या योजनेबद्दल दाखविलेली आस्था पाहून शास्त्रींनीही आपले नाव वहीत नोंदविले. मान्यवरांत 'हिंदू' पत्राचे संपादक श्रीयुत कस्तुरीरंगा अय्यंगारही होते.

कलकत्त्याचा अनुभव तर याहूनही वेगळा आला. तेथील एक व्यापारी माडगावकर यांच्याकडे कर्वे उतरणार होते. पण डॉ. नीलरत्न सरकार यांनी आग्रह केला म्हणून त्यांच्याकडे ते गेले. तेथील सभेत अण्णांची फार फजिती झाली. सभेत अण्णांचे महिला विद्यापीठासंबंधीचे व्याख्यान संपल्यावर अध्यक्षांनी (आत्मवृत्तात अण्णांनी त्यांचे नाव काळजीपूर्वक टाळले आहे.) अण्णांनी मांडलेल्या विषयावर डिबेट (चर्चा) सुरू करण्यासाठी श्रोत्यांतील वक्त्यांना आव्हान केले. एकामागून एक वक्ता स्त्रियांची युनिव्हर्सिटी होणे किती अशक्य आहे हे अण्णांसमोर सिद्ध करू लागला. एका वजनदार सुशिक्षित गृहस्थाने उद्गार काढले, 'स्त्रियांना उच्च शिक्षण देणे म्हणजे त्यांना उंच टाचांचे बूट घालावयास लावून, लोकांचे लक्ष वेधणारा पोषाख करायला शिकवून आपला दिमाख दाखवीत नाचरेपणा करण्यास उत्तेजन देणे होय.' 'Flirting' ह्या शब्दाचा उपयोग त्यांनी केला होता.

अशा प्रकारच्या उद्गारांना अण्णा काय उत्तरे देणार? अभ्यासक्रमाची रूपरेषा अजून काही तयार नव्हती. स्वतःचे मुद्दे त्यांनी आधीच मांडलेले होते. त्यामुळे अण्णांनी शांत बसून टीका ऐकली. अध्यक्षांनीही अण्णांच्या महिला विद्यापीठ स्थापनेचा विचार वेडेपणाचा आहे अशाच अर्थाचे भाषण करून सभा बरखास्त केली. मात्र आशेचा किरण एका कोपऱ्यातून आला. सेंटपॉल मिशन कॉलेजातील प्रोफेसर एस्. पी. वासवानी हे गृहस्थ अण्णांच्या टेबलपाशी आले व ही योजना आपल्याला पसंत असल्याचे सांगून त्यांनी आपले नाव पदवीधरांचे संघात दाखल केले. अण्णांसारख्या भारताच्या सुपुत्राला आलेला हा विचित्र अनुभव भारतीय समाजामध्ये शिक्षणाबद्दल किती आस्था आहे हे दर्शविणाराच होता.

मतदारनोंदणीचा आढावा दौरा संपल्यानंतर घेतला गेला. सुमारे १२०० मतदार मिळाले. ग्रॅज्युएट होऊन ज्यांना दहा वर्षे झाली असतील, अगर एम्. ए., पी.एच्.डी. वगैरे उच्च पदव्या मिळविल्या असतील अशाच स्त्रीपुरुषांना सेनेटचे सभासद होता येईल अशी अट होती. अशा प्रकारच्या २६४ स्त्रीपुरुषांनी सेनेटसाठी उमेदवार होण्याचे कबुल केले. त्यांची यादी मतदारांकडे पाठविण्यात आली. पद्धतशीर मतदान झाले. सेनेटच्या ६० सभासदांची निवड मे महिन्याच्या आरंभी झाली. त्यांत पाच स्त्रिया होत्या. त्यांच्यातूनच सिंडिकेटचीही निवड झाली. सेनेटची पहिली सभा दि. ३ व ४ जून १९१६ या दिवशी फर्ग्युसन कॉलेजात भरली होती. त्या सभेत डॉ. भांडारकरांची चॅन्सेलर म्हणून निवड झाली. रँग्लर र. पु. परांजपे यांना व्हाइस चॅन्सेलर पद स्वीकारण्यासाठी गळ घालण्यात आली. ते काम नामदार श्रीनिवास शास्त्री यांनी

केले. महिला विद्यापीठ स्थापन करण्याच्या योजनेस परांजपे अनुकूल नव्हते, तरीही शेवटी अण्णांबद्दल वाटणाऱ्या अत्यादरामुळे त्यांनी ती गोष्ट कबूल केली. रजिस्ट्रारचे काम मात्र अण्णांनाच पत्करावे लागले.

सेनेटच्या एकंदर तीन बैठका झाल्या. विद्यापीठाची नियमावली वगैरे गोष्टी ठरविण्यात आल्या. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा व पदवीचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करण्यात आला. फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. हरीभाऊ लिमये आणि प्रो. केशवराव कानिटकर यांची या कामात फारच मदत झाली. विद्यापीठाच्या सेनेटने प्रा. कर्व्यांनाच या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म्हणून नियुक्त केले.

६ जुलै १९१६ रोजी नवे महाविद्यालय रीतसर सुरू झाले.

प्राचार्यपदाची धुरा कायम सांभाळायची म्हटले असते तर प्रा. कर्व्यांना महाविद्यालयाच्या कामासाठी कायम हिंगणे येथे राहावे लागले असते. परंतु विद्यापीठ व महाविद्यालय यासाठी निधी गोळा करण्याकरिता आणि स्त्रीशिक्षणाच्या कार्याचा प्रसार करण्याकरता बरीच खटपट करणे आवश्यक होते, म्हणून त्यांनी प्राचार्यपदी श्री. नारायण महादेव आठवले यांची आणि रजिस्टार म्हणून श्री. हरी रामचंद्र दिवेकर यांची नेमणूक करण्याची व्यवस्था केली, आणि स्वतः निधी गोळा करण्यासाठी पुन्हा बाहेर पडले. देशाच्या कानाकोपऱ्यात त्यांनी लोकांना विद्यापीठाची माहिती दिली, त्यांची मानसिक व आर्थिक सहानुभूती मिळवली. त्यांत काही श्रीमंत लोक असले तरी बहुतेक मध्यमवर्गीयच जास्त होते. अण्णांनी कधी एखाद्या गरिबाने दिलेल्या चार आठ आण्याच्या देणगीचाही अव्हेर केला नाही. स्थापना झाल्यापासून चार वर्षांनी महिला विद्यापीठाजवळ खर्च वजा जाता सुमारे २,१६,०४१ रुपायांची रक्कम शिल्लक होती. अण्णांच्या अविश्रांत श्रमाचेच हे फळ होते.

विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याची प्रगती पहिल्या चार वर्षांत फार मंद होती. महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग हुषार व आपल्या विषयात पारंगत होता. परंतु विद्यार्थिनींची संख्या मात्र कमी होती. त्याला कारणेही होती. सरकारकडून विद्यापीठाला अजून मान्यता मिळाली नव्हती, विद्यापीठाच्या सर्टिफिकेट व पदवी अभ्यासक्रमाला बाजारात किंमत नव्हती. मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रियांना महाविद्यालयीन शिक्षण देण्याची सर्रास प्रथा नव्हती. धनवान लोकांच्या कन्यका प्रस्थापित विद्यापीठातून पदवी मिळवावी अशी महत्त्वाकांक्षा बाळगीत असत.

परंतु प्रो. कर्वे नाउमेद झाले नाहीत. कार्याची सुरूवात थोडी निराशाजनक वाटली तरी अंती भरघोस यश मिळेल अशी त्यांची श्रद्धा होती.

■ ■ ■



# ९ / वय वर्षे ६१ ते ७१

व्यक्तीच्या जीवनात वयाला ६० वर्षे पुरी होणे या गोष्टीला अतिशय महत्त्व देण्यात येत असे आणि तेही योग्यच म्हणावे लागेल. कारण अण्णांच्याकाळी भारतीय माणसाची सरासरी वयोमर्यादा २५ ते ३० च्या दरम्यान होती. असे असताना ६० वर्षे जगण्यालाही बरीच पुण्याई लागते, अशी श्रद्धा होती व त्याप्रसंगी धार्मिक विधीही करण्याचा रिवाज असे, अजूनही आहे.

कुटुंबियांना व आप्तेष्टांना सुख देत, स्वतःलाही सुख लावून घेत 'विना दैन्येन जीवित' जगणे याबद्दल व्यक्ती अभिनंदनीय ठरत होती. अण्णांचे कुटुंब तर विश्वात्मक होते. निराश्रित स्त्रियांचे, विशेषतः अनाथ विधवांचे अपत्यवत पालनपोषण करून, त्यांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यास समर्थ बनविण्याची बहुमोल कामगिरी आश्रम स्थापनेपासून १९१८ पर्यंत म्हणजे सुमारे दोन तपे अण्णांनी केली होती. विधवा विवाह मंडळ, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महिला विद्यापीठ वगैरे संस्थातील आण्णांचे कार्य लोकांच्या पुढे होते. त्यांची सत्कार्यावरील निष्ठा, निर्लोभता, त्याग, धैर्य, चिकाटी, व्यावहारिक चोखपणा वगैरे वैयक्तिक गुणांचाही लोकांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला होता.

१८ एप्रिल १९१८ या दिवशी अण्णांचा ६१ वा वाढदिवस हिंगण्याच्या आश्रमात मोठ्या थाटाने साजरा झाला. आश्रमात सगळीकडे उत्साह, उल्हास व आनंद दिसत होता. सेवक - सेविका, शिक्षक - शिक्षिका, विद्यार्थिनी, नोकर, चाकर, सर्वजण लगबगीने इकडे तिकडे वावरत होते. सकाळच्या पुण्यप्रहरात मंगल सुरावर सामुदायिक प्रार्थना झाल्यावर विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी उच्च स्वराने अण्णांच्या नावाचा जयजयकार करीत एक प्रभातफेरी काढली. मूळ झोपडीपासून सुरूवात करून त्यावेळेपर्यंत माळावर ज्या इमारती बांधल्या गेल्या होत्या - त्या सर्व इमारतींपुढे क्रमाक्रमाने थांबून त्या त्या इमारतीबद्दल माहिती सांगण्यात आली. अशा पद्धतीने संस्थेच्या इतिहासाची मागील वीस वर्षांतील घटनांची उजळणी करण्यात आली. ही प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर

आठच्या सुमारास आश्रमातील विद्यार्थिनींनी अण्णांना मानपत्र अर्पण केले. विद्यार्थिनींची संख्या फारशी मोठी नसली तरी त्यांच्या मनातील संस्थेवरील प्रेम व आपलेपणा विशेष उत्कटपणे व्यक्त होत होता. महिलांच्या उन्नतीसाठी प्रा. धोंडो केशव ऊर्फ अण्णा कर्व्यांनी जे प्रयत्न केले त्याचा मानपत्रात गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला होता. प्रा. कर्वे फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकवीत असताना आश्रम स्थापन करण्याची पूर्वतयारी करीत होते. त्यावेळी ते जे खडतर कष्टमय जीवन जगले आणि गेल्या २५ वर्षांच्या काळात त्यांनी जे प्रचंड कार्य केले त्यांचाही मानपत्रात उल्लेख होता.

या प्रसंगी जुनागडचे प्रसिद्ध प्राध्यापक व रसिक विद्वान महादेव मल्हार जोशी (प्रा. वामन मल्हारांचे ज्येष्ठ बंधू) यांचे स्फूर्तिदायक भाषण झाले. भोजन आटोपल्यावर दुपारी २॥ वाजता पुणे व मुंबई शहरातील सर्व स्त्री नागरिकांतर्फे अण्णांना मानपत्र देण्याचा समारंभ झाला. मुंबईच्या सुप्रसिद्ध लेडी डॉक्टर काशीबाई नवरंगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेली स्त्रियांची साधीसुधी पण प्रेमादराने ओथंबलेली भाषणे ऐकून अण्णांना गहिवरून आले. त्यांनी उत्तरादाखल आभाराचे छोटे भाषण केले.

लगेच ४-३० वाजता त्या दिवसाच्या मुख्य कार्यक्रमाला डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरूवात झाली. मुरूडचे व्याकरणकार श्री रा. भी. जोशी, प्रो. राजवाडे, प्रो. भाटे वगैरे मान्यवरांची अण्णांचे गुणवर्णन करणारी भाषणे झाली. सर्व भाषणांतून व्यक्त झालेल्या प्रेम, आदर, कृतज्ञता वगैरे सात्त्विक भावनांनी वातावरण भारून गेले होते. मानपत्र व २३६९ रु. ४ आणे रकमेची थैली अण्णांना अर्पण केली. डॉ. भांडारकरांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यांनी वैदिक मंत्रांनी अण्णांना अभिष्ट चिंतिले. शेवटी अण्णांनी सर्वांचे आभार मानले आणि 'व्यक्तीवरच्या लोभाबरोबरच संस्थेवरील लोभही वाढवून संस्थेच्या कार्याला जास्त मदत करा' असे मोठ्या कळवळ्याने सांगितले. ह्याच प्रसंगी संस्थेतील चित्रकला शिक्षक श्री. बचुभाई मुलाणी यांनी काढलेल्या अण्णांच्या तैलचित्राचे अध्यक्षांचे हस्ते अनावरण करण्यात आले. ह्या समारंभाला ५०० च्यावर मंडळी पुण्यातून हिंगण्याला आली होती. विशेष म्हणजे अण्णांचे सख्खे वडील बंधू भिकाजीपंत व चुलतबंधू श्री. गंगुनाना मुरुडाहून आले होते, याचा अण्णांना फार आनंद झाला. रात्री विद्यार्थिनींनी मनोरंजनाचे कार्यक्रम केले. समारंभाच्या निमित्ताने अण्णांच्या कार्याची उपयुक्तता व लोकप्रियता सर्वांना पटून त्यांच्या सहकाऱ्यांना अधिकच उमेद आली असावी. अनेकांकडून देणग्या आल्या. मासिक मनोरंजनचे संपादक श्री. का. र. मित्र यांनी अण्णांच्या वाढदिवसानिमित्त खास अंक काढला.

या विशेषांकात अण्णासाहेब कर्व्यांचे जीवन चरित्र व कार्य, त्यांच्या संस्था, महिला शिक्षणविषयक समस्या, स्त्रियांचा सामाजिक दर्जा व जागृती यांवर अनेक लेख होते. बंगलोरच्या समाज कार्यकर्त्या श्रीमती श्रीरंगम्मल यांनी आपल्या लेखात



अण्णासाहेबांची तुलना राजा राममोहन रॉय, रानडे, विवेकानंद आणि ईश्वरचंद्र विद्यासागर आदि थोर पुरुषांशी केली होती.

महिला विद्यापीठ स्थापन करण्याच्या योजनेचे कट्टे विरोधक, इंडियन सोशल रिफॉर्मरचे संपादक नटराजन् यांनी आपल्या लेखात थोडक्यात पण भावपूर्ण शब्दात अण्णासाहेबांच्या कार्याचा गौरव केला होता.

प्रो. अण्णासाहेब कर्व्यांचे मामेभाऊ रँग्लर र. पु. परांजपे यांनी म्हटले होते, 'प्रा. कर्वे संपूर्ण देशाला एखाद्या आधारस्तंभासारखे वाटत असले तरी आपल्या नातेवाईकांत 'प्रेमळ अण्णा' म्हणूनच ते ओळखले जातात. एक थोर पुरूष म्हणून त्यांच्याकडे पाहणे त्यांच्या नातेवाईकांना अशक्य होते. कारण ४० वर्षांपूर्वी वयाच्या एकविसाव्या वर्षी इंग्रजी शिक्षणासाठी मुंबईला जाणाऱ्या 'धोंडू' मध्ये जो साधेपणा होता, तोच साधेपणा आजही असल्यामुळे त्यांच्याविषयी सर्वांना तेच प्रेम व तीच आपुलकी अजूनही वाटत आहे.'

अण्णांचा वाढदिवस असा आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा झाला.

१९१८ हे वर्ष अण्णांच्या एकसष्ठीच्या निमित्ताने फार उत्साहाचे गेले हे खरे पण १९१९ हे वर्ष मात्र आश्रमाच्या इतिहासात एक अत्यंत अभागी वर्ष म्हणावे लागेल. कारण या वर्षी संस्थेचे काही जुने आजन्मसेवक व नवे आजन्मसेवक यांच्यामध्ये, संस्थेचे काम करावयाच्या दृष्टिकोनात व पद्धतीत संघर्ष उत्पन्न होऊन, संस्थेच्या हिताच्या दृष्टीने व्यवस्थापक मंडळींच्या सांगण्यावरून श्री. कौलगेकर व श्री. गाडगीळ यांनी आपले राजीनामे सादर केले. महिलाश्रम व निष्कामकर्ममठ यांच्या वाढीसाठी या दोघांनी अविश्रांत श्रम घेतले होते. विद्यापीठाच्या स्थापनेसाठी गाडगीळ कुटुंबाने आर्थिक मदत केली होती, ही गोष्ट केव्हाच विसरता येणार नव्हती. ह्या दोघांनी संस्थेसाठी केलेले सेवाकार्य लक्षात घेऊन त्यांना प्रत्येकी द. म. २५ रु. निवृत्तिवेतन देण्याचे संस्थेने ठरविले आणि त्यांच्या मृत्यूपर्यंत ते त्यांना मिळाले.

ह्याच वर्षी श्रीमती वेणुताई नामजोशी यांचा पुनर्विवाह झाला म्हणून संस्थेतील चिटणीस पदाचा त्याग करून त्यांना नाशिकला आपल्या बिऱ्हाडी जावे लागले. श्री. गरूड चिटणीसपद सांभाळत होते पण त्यांच्या पत्नीला हिंगण्याची हवा सोसेना म्हणून त्यांना आश्रमाचे काम सोडावे लागले.

अशा रीतीने आश्रम बऱ्याच जुन्या व अनुभवी आजन्म सेवकांना मुकला. मात्र त्याच वर्षी महिला विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधर श्रीमती वारूबाई शेवडे, श्रीमती गंगूबाई तांबोळे आणि श्रीमती यमूबाई टेंबे या निष्कामकर्ममठाच्या सेविका संस्थेच्या आजन्म सेविका झाल्या.

ह्याच वर्षी संस्थेतील श्री. गो. म. चिपळूणकर यांनी आपल्या विलक्षण कल्पकतेने आश्रमाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याकरिता एक अभिनव व अपूर्व प्रयोग सुरू केला.

दिवाळीत भाऊबीजेच्या दिवशी आश्रमातील विद्यार्थिनींनी जनतेतील बंधूंकडून ओवाळणी मिळवायची व ती त्यांनी समारंभपूर्वक संस्थेच्या स्वाधीन करावयाची. श्री. चिपळूणकरांच्या ह्या अतिशय सुंदर व भावनाप्रधान योजनेचे जनतेकडून मन:पूर्वक स्वागत झाले आणि अभिमानाने सांगायची गोष्ट म्हणजे त्यावेळी सुरू झालेली भाऊबीज फंडाची योजना आजही सुरू आहे. ह्या योजनेमुळे संस्थेस हजारो रुपयांचा द्रव्यलाभ होत आहे.

१९२० साली अपूर्व योग आला. आतापर्यंत कधीही न मिळालेली अशी बरीच मोठी देणगी अनपेक्षितपणे विद्यापीठासाठी चालून आली. 'महाराष्ट्र सारस्वत' चे लेखक - ठाण्याचे श्री. वि. ल. भावे यांनी महिला पाठशाळेस आपल्या मातोश्रींचे 'सरस्वती भावे' हे नाव देण्यात यावे, या अटीवर पन्नास हजार रुपयांचे रोखे संस्थेच्या नावाने करून दिले. मात्र एवढी मोठी अनपेक्षित आलेली देणगी परत करण्याचा प्रसंग संस्थेवर आला. कारण त्याच वर्षी त्याहून कितीतरी पटीने मोठी देणगी महिला विद्यापीठास देणारा दाता अशाच अनपेक्षितपणे पुढे आला व त्यांच्या मातोश्रींचे नाव विद्यापीठास व विद्यापीठाने चालविलेल्या पाठशाळेस द्यावे अशी त्यांचीही इच्छा होती. ह्या मोठ्या देणगीचा योग फार मजेशीरपणे आला.

मुंबईचे एक सुप्रसिद्ध व्यापारी, गरिबांचे कनवाळू व विद्येचे चाहते सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी आपले काही स्नेही व पत्नी लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी यांच्यासह पृथ्विप्रदक्षिणा केली. प्रेमलीलाबाईंच्याबरोबर सहचरी म्हणून महिला पाठशाळेत शिकत असलेल्या निष्कामकर्ममठाच्या सेविका श्रीमती सीताबाई अण्णेगिरी यांना संस्थेने पाठविले होते. ही मंडळी जपानमध्ये गेली असता त्यांनी टोकियो येथील स्त्रियांच्या विद्यापीठास भेट दिली. तेथील सर्व शिक्षण व व्यवस्था पाहून ठाकरसींच्या मनावर त्याचा ठसा उमटला. आपल्या भारतात अशा प्रकारचे विद्यापीठ असावे असे त्यांच्या मनाने घेतले. पुढील प्रवासात अशा प्रकारचेच भारतवर्षीय महिला विद्यापीठ अण्णासाहेब कर्व्यांनी सुरू केले आहे आणि महिलाश्रमाचा त्यास संपूर्ण पाठिंबा आहे वगैरे बरीच माहिती श्रीमती सीताबाई अण्णेगिरींनी त्यांना सांगीतली. सीताबाईंचे विनयशील वर्तन, प्रवासात वेळप्रसंगी स्वयंपाकापासून जी जी कामे त्यांना करावी लागली, ती ती न कुरकुरता व्यवस्थितपणे करणे इत्यादि त्यांच्या सुशील वागणुकीचा सर विठ्ठलदास यांच्या मनावर अत्यंत अनुकूल परिणाम झाला आणि अण्णासाहेब कर्व्यांच्या महिला विद्यापीठास भरपूर आर्थिक मदत करावी असे त्यांच्या मनाने घेतले. १९२० साली पृथ्विपर्यटन करून ते जेव्हा परत आले, तेव्हा आगबोटीतून उतरतांनाच त्यांनी अण्णांना आपली भेट घेण्यास सांगीतले.

पहिल्या भेटीत अण्णांना ते एवढेच म्हणाले, 'तुमच्या विद्यापीठासंबंधी मला पुष्कळ बोलायचे आहे. मला वेळ झाला म्हणजे मी तुम्हाला कळवीन.' त्यानंतर अण्णा, प्रि. केशवराव कानिटकर व रँग्लर र. पु. परांजपे यांच्यासह दोनतीन वेळा



महाबळेश्वरला सर विठ्ठलदास ठाकरसी यांना भेटले. तेथे विद्यापीठासंबंधी बरीच चर्चा होऊन काही अटींवर पंधरा लाखांची देणगी देण्याचे ठरले. त्यांतील मुख्य अटी पुढीलप्रमाणे होत्या.

(१) सर विठ्ठलदास ठाकरसी व त्यांचे वारस आणि मृत्युपत्राचे व्यवस्थापक यांनी विद्यापीठाला दरसाल साडेबावन हजार रुपये (१५ लाखांचे व्याज म्हणून) निरंतर देत रहावे.

(२) विद्यापीठाने आपले नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय महिला विद्यापीठ' असे ठेवावे.

(३) विद्यापीठाने ताबडतोब पुण्यात हायस्कुल काढावे.

(४) हिंगण्याचे कॉलेज आपल्या ताब्यात घेऊन ते शक्य तितके शहराजवळ न्यावे. तेथे वसतिगृहाची सोय करावी.

(५) पुण्यातील हायस्कुल व कॉलेज यांना आणि विद्यापीठाकडून स्वत:च्या खर्चाने जेथे जेथे हायस्कुल किंवा कॉलेजस् चालविण्यात येतील त्या सर्वांना श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी यांचेच नाव देण्यात यावे.

(६) विद्यापीठास सरकारी मान्यता तरी मिळवावी किंवा विद्यापीठाने आणखी १५ लाखांच्या देणग्या मिळवाव्यात. हे झाल्यावर विद्यापीठाच्या स्वाधीन दरसाल रु. ५२,५०० व्याज येईल.

१९२० च्या सेनेटच्या सभेत या व इतर काही अटी मान्य करण्यात आल्या. वरील अटींत एक अट अशी होती की त्यामुळे मातृस्थानी असलेल्या आश्रमाचा संबंध विद्यापीठ, महिला पाठशाळा व पुण्याची कन्याशाळा यांच्याशी दुरावला गेला. पण एखाद्या आईप्रमाणे मोठे मन करून आश्रमाने, ज्या ज्या गोष्टींत विद्यापीठाचे भले होणार होते, त्या त्या गोष्टी विशाल दृष्टिकोन ठेवून आनंदाने स्वीकारल्या.

युगांडा येथे असलेल्या अण्णासाहेबांच्या एका मित्राकडून आणखी एक मोठी देणगी संस्थेकडे आली. अण्णांचे मित्र डॉ. विठ्ठल राघोबा लांडे यांनी आफ्रिकेला जाण्यापूर्वी एकदा कर्व्यांच्या महिलाश्रमाला भेट दिली होती. आफ्रिकेत त्यांचा मृत्यू झाला. मृत्युपत्रात त्यांनी लिहिल्याप्रमाणे त्यांच्या मृत्यूनंतर प्रा. कर्वे यांच्याकडे ४०,००० रुपयांची देणगी पाठवून दिली. या रकमेतून पुण्यात कन्याशाळेसाठी एक इमारत बांधण्यात आली. एवढ्या भरघोस देणगीमुळे डॉ. लांडे यांचेच नाव त्या शाळेला देण्यात आले.

३ जून १९१६ रोजी भारतातील पहिले महिला विद्यापीठ स्थापन झाले. विद्यापीठाचा वार्षिक अहवाल पुढील प्रत्येक वर्षी प्रसिद्ध होऊ लागला. भारतात महिला विद्यापीठ स्थापन करावे ही प्रेरणा कर्व्यांना जपानमधील महिला विद्यापीठाची माहिती देणाऱ्या एका पत्रकाच्या अनपेक्षित आगमनाने मिळाली - याबद्दलची कृतज्ञता

प्रा. कर्वे प्रत्येक वर्षीच्या अहवालात व्यक्त करीत असत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे पत्रक आपणास कुणाकडून आले याबद्दल प्रा. कर्वे अजूनही अंधारात होते.

प्रा. कर्व्यांनी लिहिलेल्या एखाद्या अहवालाची प्रत बनारसच्या बाबू शिवप्रसाद गुप्ता यांच्या हाती एक दिवस पडली असावी. कारण १९१९ मध्ये गुप्तांनी कर्व्यांना पत्र लिहून कळविले की जपानचे ते माहितीपत्रक त्यांनीच स्वत: कर्व्यांना पाठविले होते. १९१५ साली गुप्ता आणि कलकत्त्याचे प्रा. विनयकुमार सरकार हे जपानला गेले असता त्या देशातील महिला विद्यापीठाचे कार्य पाहून ते फार प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनी त्या विद्यापीठाची माहिती देणाऱ्या काही पुस्तिका विकत घेतल्या आणि भारतात आल्यावर, विशेषत: महिलांच्या शिक्षणविषयक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना पाठवून दिल्या होत्या. प्रा. कर्व्यांच्या हिंगणे येथील संस्थेबद्दल त्यांना माहिती असल्यामुळे कर्व्यांकडेही त्यांनी एक प्रत पाठविली.

कर्व्यांच्या महिला विद्यापीठ स्थापनेच्या प्रयोगाविषयी भारतीय शिक्षित नागरिकांच्या मनात फार आदरभाव होता. १९२७ मध्ये पुणे येथे प्रथमच भरलेल्या आखिल भारतीय महिला शिक्षणविषयक परिषदेने या कार्यास आपला मन:पूर्वक पाठिंबा असल्याचे जाहीर केले आणि महिला विद्यापीठास सरकारने मान्यता द्यावी अशी शिफारसही या परिषदेने केली.

महिला विद्यापीठाचे कार्य उत्तम आहे, हे मुंबई प्रांताच्या शिक्षण खात्यानेही मान्य केले आणि १९२५-२६ च्या वार्षिक अहवालात या खात्याने म्हटले होते, 'प्रा. धोंडो केशव कर्वे यांनी महिला शिक्षणासाठी - विशेषत: प्रौढ महिला शिक्षणासाठी केलेले कार्य प्रशंसनीय आहे. प्रा. कर्व्यांनी ३० वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या एका छोट्याशा वसाहतीचे आता एका भव्य विद्यापीठात रूपांतर झाले आहे. या विद्यापीठाचे वैशिष्ट्य म्हणजे तेथील शिक्षणाचे माध्यम मातृभाषा आहे, मुलींच्या गरजा व परिस्थिती लक्षात घेऊन तेथील अभ्यासक्रम आखण्यात आला असून - तो आखताना भारतीय जीवनातील साधेपणा कायम राखला आहे.'

विद्यापीठाबद्दल जी जी मते प्रसिद्ध केली जात त्याची दखल प्रा. कर्वे घेत असत व शक्य होईल तितक्या सूचना स्वीकारत असत. आता कर्वे ७० वर्षांचे झाले होते. त्यांच्या ७१ व्या वाढदिवशी संस्थेच्या आजीव कार्यकर्त्यांनी प्रा. कर्व्यांच्या आत्मचरित्राची दुसरी आवृत्ती छापून प्रसिद्ध केली. कर्व्यांनी मूळ आवृत्तीला आणखी प्रकरणे जोडून त्यांत विद्यापीठाच्या स्थापनेचा व प्रगतीचा इतिहास दिला. अखेरच्या प्रकरणातील शेवटच्या परिच्छेदात त्यांनी लिहिले आहे, 'पुनर्जन्माच्या कल्पनेत जर सत्य असेल तर जगपालकाने माझे या कार्यावरील प्रेम अधिकाधिक वाढवावे व जन्मोजन्मी मला या कार्यासाठी तन मन धन अर्पण करण्याची बुद्धी द्यावी अशी मी त्याचेजवळ याचना करतो.'



(१८ एप्रिल १९२८ रोजी कर्व्यांच्या सत्तराव्या वाढदिवशी पुणे नगरपालिकेने लकडीपुलाकडून एरंडवण्याला जाणाऱ्या रस्त्यास 'कर्वे पथ' असे नाव दिले.) ६१ ते ७१ या दोन वाढदिवसांतील दहा वर्षांत अण्णांनी स्वकर्तृत्वाने संस्थेच्या व्यापात व लौकिकात फार मोठी मोलाची भर घातली होती. (संस्थेवर व अण्णांवर लोभ करणाऱ्या अनेक स्त्रिया व माजी विद्यार्थिनी हिंगण्यास आदल्या दिवसापासून दाखल झाल्या) सूर्योदयाबरोबर आश्रम गीतानंतर सर्वांनी अण्णांना अभिवादन करून आभिष्ट चिंतन केले. या अतिशय हृद्य सोहळ्यात अण्णांच्या हस्ते संस्थेत काम करणाऱ्या सर्व गडी माणसांना फेटे अगर टोप्या आणि मोलकरणींना खण देण्यात आले.(सर्वांचे चेहरे कृतज्ञतेने व आनंदाने उजळून गेले होते. या सर्वांसमवेत अण्णांनी अल्पोपहार केला. त्याच दिवशी पुणे नगरपालिकेने अण्णांना मानपत्र बहाल केले.

'अण्णासाहेब, स्त्री शिक्षणाविषयीच्या या आपल्या अतुल कामगिरीबद्दल हे पुणे शहर आपले ऋणी आहे. आपली रहाणी साधी आहे. आपल्यासारखा नागरिक पुणे शहराला लाभला म्हणून आम्ही स्वत:ला भाग्यवान समजतो आणि म्हणूनच परमेश्वराने आपल्याला उदंड आयुष्य द्यावे. वर्षांनुवर्ष आपला अधिक उत्कर्ष व्हावा व आपण सुरू केलेल्या संस्थांची दिवसेंदिवस जास्त भरभराट व्हावी.')

मानपत्राला उत्तर देताना अण्णा म्हणाले, 'आजच्या आनंददायक प्रसंगी मला माझ्या आयुष्यातील एका संस्मरणीय प्रसंगाची आठवण होत आहे. माझ्या मातोश्री हिंगण्याचा आश्रम पहाण्यासाठी आल्या होत्या. आश्रम पाहून माझ्या मातेचे अंत:करण भरून आले व तिने मला शुभाशीर्वाद देऊन यश चिंतिले. त्यावेळी मला आनंदाचे भरते आले होते. अगदी तसाच आनंद मला आजच्या प्रसंगी वाटत आहे. पुण्यनगरी ही अनेक उपयुक्त संस्थांची जननी आहे. माझ्या आईप्रमाणे पुण्यनगरीने माझा गौरव केला, त्याहून आणखी प्रिय गोष्ट कोणती असणार? आपण सर्वजण स्त्रीशिक्षणप्रेमी आहात हे जाणून आपणांपैकी प्रत्येकाने स्त्री शिक्षणाकरिता शक्य ती मदत करावी अशी मी आपणास विनंती करतो.'

(नगरपालिकेच्या समारंभानंतर हिंगण्याला खास समारंभ झाला. मुंबई इलाख्याचे त्यावेळचे दिवाण सर गोविंदराव प्रधान, लेडी रमाबाई, साहित्यसम्राट न. चिं. केळकर इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते. साहित्यसम्राट म्हणाले, 'स्त्री शिक्षणासंबंधीचा पुण्याचा पूर्वीचा ग्रह पार बदलून टाकण्यास प्रो. कर्वे यांची कामगिरीच कारणीभूत झाली. सुरूवातीला अप्रिय वाटणाऱ्या स्त्री शिक्षणासारख्या कार्यास मदत मिळाली याचे श्रेय प्रो. कर्वे यांच्या व्यक्तिगुणांकडेच आहे.')

(नामदार प्रधान म्हणाले, 'स्त्रियांची सर्वांगिण उन्नती करण्याकरिता हिंदुस्थानात भरीव कामगिरी करणारी व्यक्ती कोण असे विचारले तर मी गुरुवर्य अण्णांकडे बोट दाखविन. रंजल्या-गांजल्या स्त्रियांना योग्य मार्ग ज्यांनी आपुलकीने दाखविला तोच

खरा साधु असे मला वाटते. कोणत्याही प्रकारच्या हाल-अपेष्टांची पर्वा न करता चिकटीने, उच्च ध्येयावर दृष्टी ठेवून कार्य करणाऱ्या गुरुवर्यांना ईश्वर दीर्घायुषी करो.')

(सत्काराला उत्तर देताना प्रा. अण्णासाहेब कर्वे म्हणाले, 'सध्या स्त्रीशिक्षणाचे पाऊल पुढे पडत असले तरी ह्या प्रगतीने माझे समाधान होत नाही. जपानकडे पाहिले असता असे दिसून येते की, तेथे शेकडा ९९ मुले शिकत असली तरी शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्याही शेकडा ९९ इतकीच आहे. पण आपल्याकडे मात्र शिक्षण घेणाऱ्या मुलांमुलींचे प्रमाण ८३:१ असे आहे. इतर राष्ट्रांच्या बरोबरीने हिंदुस्थानास दर्जा प्राप्त व्हावा अशी जर आपली इच्छा असेल तर स्त्रियांच्या शिक्षणासाठी अविश्रांत श्रम घ्यायला हवेत.')

(या ७१ व्या वाढदिवसाचे चिरस्थायी स्मारक म्हणून 'कर्वे ज्युबिली फंड' नावाचा एक फंड उभारण्यात आला. या कामी त्यावेळचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांनी पुढाकार घेतल्यामुळे फंडाची रक्कम रु. १६००० पर्यंत गेली. या फंडाच्या व्याजातून पाच कायम शिष्यवृत्त्या ठेवण्यात आल्या. स्थानिक व महाराष्ट्रातील वृत्तपत्रांत अहवाल, संपादकीय, अग्रलेख वगैरे प्रसिद्ध झालेच - पण बनारसचे प्रो. न. ना. गोडबले यांनी आपल्या लेखात लिहिले, 'ॲरिस्टॉटलने एके ठिकाणी म्हटले आहे की, शाब्दिक विवाद किंवा बौद्धिक उत्पत्ती यांच्या आधारावर समाजघटना होत नाही समाज चालण्यास संस्थाच उत्पन्न केल्या पाहिजेत. नवीन संस्था उत्पन्न करणे, यशस्वी रीतीने चालवून दाखविणे हे काम अतिशय बिकट आहे, व ते साध्य होण्यास मनुष्याचे अंगी अनेक नैतिक गुणांचा समुच्चय असावा लागतो. दीर्घोद्योग, स्वतःच्या कल्पनांवर पूर्ण विश्वास, रचना कौशल्य व जनतेशी प्रेमाने वागण्याची कसोटी संस्था चालकांत असावी लागते. प्रो. कर्व्यांची गणना त्यांत होते.')

■ ■ ■



# १० / सातासमुद्रा पलीकडे

(महिला विद्यापीठाची स्थापना केल्यानंतर पुढील १२ वर्षांपर्यंत म्हणजे १९२८ पर्यंत अण्णांनी भारतातील बहुतेक सर्व प्रांतांत दौरे काढून महिला विद्यापीठासंबंधी लोकमत जागृत केले आणि हजारो रुपये संस्थेसाठी जमविले.)

(आता अण्णांच्या मनात फार दिवस घोळत असलेली एक कल्पना पुढे आली, भारताबाहेरच्या इतर खंडांतील मोठमोठ्या देशांत जाऊन विद्यापीठासंबंधीचे प्रचारकार्य व अर्थप्राप्ती यांबाबत तेथे काही जमते का ते पहावे.) वयाला ६० वर्षे पूर्ण झाली की पेन्शन घेऊन 'हरि हरि' करीत घरी स्वस्थ बसणे ही सर्वसामान्यांची वहिवाट. पण (अण्णा वयाच्या ७१ व्या वर्षी जगप्रवासाला निघाले ते एखाद्या तरुणाला लाजवेल अशा उत्साहाने.) त्यांच्या प्रवासाचे उद्दिष्ट अर्थातच इतर प्रवाशांप्रमाणे निसर्गरम्य स्थळे पाहणे, ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे, खेळांचे सामने, प्रदर्शने, संग्रहालये अथवा वाचनालये पहाणे, सामाजिक चालीरीतींचा अभ्यास अथवा संशोधन करणे हेही नव्हते.

(अण्णांनी या प्रवासात स्त्रियांच्या व मुलींच्या संस्था पाहिल्या. महिला विद्यापीठाच्या कार्याचा प्रचार करणे हेच एक कार्य अण्णांना साधावयाचे होते. शिवाय त्याबरोबरच जिनिव्हा व एल्सिनोर येथे भरणारे जागतिक पातळीवरचे शैक्षणिक मेळावे पहाणे हाही उद्देश त्यांच्यापुढे होता.)

(परदेश प्रवासाची व्यवस्था म्हणजे प्रथम पैशांची व्यवस्था करणे आवश्यक होते. पण श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाने प्रा. कर्व्यांच्या प्रवास योजनेला संमती दिली आणि प्रवासखर्चासाठी रु. ५००० मंजूर केले. ह्या निर्णयामुळे अण्णांना फार आनंद झाला. ७१ व्या वर्षी परदेशच्या प्रवासाचा धोका अण्णांनी पत्करू नये असे काहींचे म्हणणे होते, पण अण्णांचा निर्धार कायम होता.)

भारतभरातील आतापर्यंतचे प्रवास अण्णांनी एकट्यानेच केले होते. पण परदेशचा प्रवास आता एकट्याने करणे इष्ट नव्हते, शक्यही नव्हते. अण्णांचे सर्वांत धाकटे चिरंजीव भास्करराव इंग्लंडमधील लीडस् विश्वविद्यालयात एम्. एड्. चा अभ्यास

करीत होते. त्यांचा अभ्यास थोडयाच दिवसांत पूर्ण होणार होता व ते परदेश प्रवासात अण्णांना सोबत करणार होते.

पॅरिसला अण्णांचे एक निष्ठावंत अनुयायी आणि अनाथ बालिकाश्रम संस्थेचे एक आजन्म सेवक प्रा. हरीभाऊ दिवेकर डॉक्टरेटच्या पदवीकरता संशोधन कार्य करीत होते. अण्णांच्या सूनबाई, दिनकररावांच्या पत्नी इरावतीबाई या जर्मनीत बर्लिनमध्ये डॉक्टरेटकरिता प्रबंध लिहीत होत्या. शिवाय लंडनमध्ये अण्णांचे मामेभाऊ रँग्लर र. पु. परांजपे इंडिया कौन्सिलचे सभासद म्हणून तेथेच वास्तव्यात होते.

इतके सगळे असूनसुद्धा इंग्लडला पोहोचेपर्यंतचा पंधरा दिवसांचा समुद्रप्रवास त्यांना एकट्यालाच करावा लागणार होता. पण तीही अडचण अनायसे दूर झाली. अनाथ बालिकाश्रमाच्या आजन्मसेविका श्रीमती कमलाबाई देशपांडे ह्यांना प्रकृती स्वास्थ्यासाठी त्यांच्या वडिलांनी म्हणजे साहित्यसम्राट केळकर यांनी अण्णांच्या सोबतीने परदेशी पाठविण्याचे ठरविले. पॅरिस, लंडन इत्यादी ठिकाणी राहून हवाफेर झाल्यावर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली व नंतर त्या झेकोस्लोव्हाकियातील प्राग युनिव्हर्सिटीत प्रा. बिटर्नित्स या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गुरूंच्या हाताखाली पी. एच्. डी. चा अभ्यास करण्याकरिता गेल्या.

१६ मार्च १९२९ ला अण्णा रावळपिंडी बोटीने श्रीमती कमलाबाई देशपांडयांसह इंग्लंडला रवाना झाले. हैद्राबादचे न्यायमूर्ती केशवराव नाईक त्यांच्याबरोबर सहप्रवासी म्हणून होते. धारवाडचे कुलकर्णी वकील हेही बोटीवर भेटले. चौघे मिळून एका टेबलाची भरती झाली. मंडळी हसत खेळत, गप्पागोष्टी करीत जेवत असत. अण्णांना बोट मुळीच लागत नसे. त्यामुळे बोटीच्या प्रवासाचा अगर खाण्यापिण्याचा त्रास त्यांना अजिबात झाला नाही. ते डेकवर पुष्कळ फिरत. (प्रवासातसुद्धा अण्णांच्या डोक्यात संस्थेसाठी वर्गणी जमविण्याचाच विचार असे. विद्यापीठाच्या आर्थिक मदतीने आपण प्रवास करीत आहोत तेव्हा तो कमीत कमी खर्चात व्हावा म्हणून वाटेत एडन व पोर्टसेड ही बंदरे लागली असता बाकीची सर्व मंडळी ती पहायला किनाऱ्यावर उतरली पण अण्णांनी डेकवरूनच दिसतील तेवढ्या मोठमोठ्या इमारती, रस्ते पाहिले व समाधान मानले.) आण्णा मार्सेलिसमार्गे दिवेकरांच्या मदतीने कमलाबाईंसह लंडनला पोहोचले.

पहिले साडेतीन महिने अण्णांचे मुख्य ठिकाण लंडन होते. अशा रीतीने दोनतीन आठवडे बाहेर गावी फिरून यावे व ८-१० दिवस लंडनमध्ये रहावे असा कार्यक्रम चालू होता. (सौंदर्यस्थळे जाता जाता दिसतील तेवढी पहायची. एरव्ही निरनिराळ्या संस्थांत जायचे, तिथे सभा भरवून जमतील तेवढ्या मंडळींसमोर इंग्रजीतून व्याख्यान द्यायचे. मॅजिक लँटर्नवर स्लाईडस् दाखवायच्या, प्रश्नोत्तरे-चर्चा करावयाची, व शेवटी झोळी फिरवून मदत गोळा करायची. इंग्लडमध्ये, अमेरिकेत बड्या लोकांचे कार्यक्रम



ठरविणारे एजंट त्यावेळीही होते पण त्यांना वर्ष-सहा महिने आगाऊ सांगावे लागते. त्याकरिता पैसाही खर्च करावा लागे.)

इंग्लंडमधील मालव्हर्न या हवेशीर ठिकाणी प्राथमिक शिक्षकांची एक परिषद होती. तिथे अण्णा गेले. सर्व ठिकाणी बरोबर भास्करराव होतेच. सुमारे सव्वाशे स्त्रिया व पाचसहा पुरूष शिक्षक होते. 'शिक्षणाची नवी उद्दिष्टे' हा चर्चेचा मुख्य विषय होता. अण्णांनी विद्यापीठाची माहिती तेथे दिली. सँडौन येथे भारतीयांची परिषद होती. तेथेही लहानमोठी सव्वाशे माणसे होती. अण्णांचे भाषण झाले व निधी जमा झाला. इंग्लंडमध्ये अण्णांनी २५ शैक्षणिक संस्था पाहिल्या. ३० व्याख्याने दिली. श्रोत्यांची संख्या १५-२० पासून २००-३०० पर्यंत होती. अण्णांच्या जुन्या ओळखीची मंडळी भेटली. लॉर्ड फिशर, लॉर्ड सँडलर, डॉ. मॅन इत्यादी. लिव्हरपूलच्या पश्चिमेस आगबोटीने ४ तास प्रवास केला की 'आइल ऑफ मॅन' म्हणून बेट आहे. हे बेट स्वतंत्र असून अप्रतीम सृष्टिसौंदर्याने नटलेले आहे. तेथील त्यावेळचे गव्हर्नर सर क्लॉड हिल हे पुण्यात आले होते तेव्हा अण्णांची ओळख झाली होती, त्यांनी कळविले तेव्हा बेटाच्या मुख्य ठिकाणी डग्लस येथे त्यांनी अण्णांना बोलावून घेतले व गव्हर्नमेंट हाऊसमध्ये पाहुणे म्हणून त्यांची सोय केली. तेथील पार्लमेंट सर्वांत जुने म्हणजे सुमारे १००० वर्षांचे होते. तेथे लोकतंत्री राज्यकारभार चालत असे.

आयर्लंडमधील डब्लीन येथे आयरिश भाषेच्या पुनरुज्जीवनाचे काम सुरू होते. आयर्लंडला स्वातंत्र्य मिळाल्यावर मातृभाषा ही राजभाषा व ज्ञानभाषा असावी हा त्यांचा उद्देश पाहून अण्णांना फार आनंद वाटला.

एडिंबरोला २१ जूनला एका बाजूने संध्याकाळचा संधिप्रकाश व दुसऱ्या बाजूने पहाटेचा संधिप्रकाश आकाशात दिसतो. म्हणजे दिवसरात्र उजेडच. मग लोकांना झोपे करता पडदे लावून अंधार करावा लागतो.

लीडस्‌जवळच बोनीव्हिल येथे कॅडबरी, कोको व चॉकलेटचा प्रचंड मोठा कारखाना आहे. तो पहायला दररोज हजारपंधराशे लोक यायचे. त्यांना कारखाना दाखवायला ८० वाटाडे नेमलेले होते. ९४०० कामगार व इतर कारकून वगैरे सर्वांची घरे मिळून एक गावच वसलेले आहे. हिंडून झाल्यावर पाहुण्यांना चहा, फराळ व चॉकलेट दिले जाई. कारखान्याच्या मालकांनी अण्णांना पाच पौंडांची देणगी पाठविली.

(लंडनमध्ये ईस्ट इंडियन असोशिएशनने कॅक्स्टन हॉलमध्ये भरविलेली सभा महत्वाची होती. महिला विद्यापीठाला भेट दिलेल्या लेडी सायमन अध्यक्ष होत्या. अण्णांनी 'हिंदुस्थानातील स्त्रीशिक्षण' या विषयावर व्याख्यान दिले. त्यांत महिला विद्यापीठाची मूलतत्त्वे व कार्य यावर विवेचन केले. उलट सुलट चर्चा झाल्या. या सभेचा वृत्तांत स्थानिक व भारतीय वर्तमानपत्रांत आला होता.)

लंडनमधल्या मुक्कामात गार्डन सिटीलेचवर्क व हाय वायकोंब येथील गार्डन स्कूल अण्णांनी पाहिले. हे शहर बागेभोवती मुद्दाम वसविले असून शाळा आधुनिक तत्त्वांवर चालविलेली होती.

विद्यापीठाचे अहवाल, प्रचारसाहित्य बाळगणे, अण्णांचे सामान बांधणे, सोडणे, पुढच्या कार्यक्रमांसंबंधी पत्रव्यवहार करणे यांसर्व गोष्टी भास्करराव करीत. लंडनमधून युरोपला जाताना वाटेत बेल्डाम व हॉलंडमधील पाच-सहा गावी थोडा मुक्काम केला पण सुट्टीचे दिवस असल्याने संस्था बंद होत्या.

२५ जुलै ते ४ ऑगस्ट १९२९ मध्ये जिनेव्हा येथे वर्ल्ड फेडरेशन ऑफ एज्युकेशनल असोशिएशन्स ही परिषद व दुसरी एल्सिनोर (डेन्मार्क) येथे ८-२१ ऑगस्ट न्यू एज्युकेशन फेलोशिप परिषद होती. जिनेव्हा परिषदेने जगातील अनेक देशांतून १५०० प्रतिनिधी आले होते. त्यांत भारतातून श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय व औंधचे श्री. पंढरीनाथ इनामदार यांच्यासहं पंधरा प्रतिनिधी होते. आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सहकार्य हा परिषदेचा मुख्य विषय होता. अनेक व्याख्याने व १८ विभागांत वेगवेगळ्या चर्चा असा अकरा दिवसांचा भरगच्च कार्यक्रम होता. प्रतिनिधींनी अण्णांना आपला प्रमुख नेमले. आशियातील देशांकरिता बनारस प्रतिनिधींतर्फे अण्णांनी एक परिषद बोलविली. एका विभागात ५०-६० श्रोत्यांसमोर अण्णांचे भाषण झाले. त्यात त्यांनी भारताच्यावतीने एक संदेश दिला. परिषदेच्या प्रतिनिधींकरिता आल्प्स पर्वताची एक सफर आयोजित केली होती. माँ ब्लॅं (माउंट ब्लँक) या शिखराखेरीज एक ग्लेशिअर पाहण्यासाठी मंडळी तेथे गेली. तेथील देखावा सूर्यप्रकाशात अप्रतिम दिसत होता. हिमनदीवर वाळूचे थर बसल्यामुळे ती खडकाच्या रंगाची दिसत होती. अंगात गरम कपडे, वरून उन्हासाठी छत्री, समोर बर्फाच्छादित शिखर, पायाखाली हिमनदी अशी सफर ७० वर्षांच्या अण्णांनी मजेने केली.

(स्वित्स्झर्लंडमध्ये १२-१३ दिवस राहून पुढे डेन्मार्कमध्ये एल्सिनरेच्या परिषदेसाठी अण्णा गेले.) जर्मनीतून डेन्मार्कला जाताना बाल्टिक समुद्रातून जावे लागते. पण तेव्हा आगगाडीचा डबाच एका आगबोटीवर चढवून नदीच्या पलीकडच्या तीरावर नेतात. आगबोटीवरचे रूळ जमिनीवरच्या रुळांना जोडून डबा बोटीवर चढवितात. गाडी बोटीवर चढली की प्रवासी बोटीवर उतरून समुद्राची शोभा पाहू शकतात.

(एल्सिनोरच्या परिषदेला निरनिराळ्या देशांतून २००० प्रतिनिधी संमेलनासाठी आले होते.) इतका मोठा जमाव असून कार्यक्रम काटेकोरपणे पार पडत होते. (डाल्टन प्लॅनच्या संयोजिका हेलेन पार्क हर्स्टबाई, शिशुशिक्षणाच्या प्रणेत्या मॉंटेसरीबाई अशा अनेक जगन्मान्य शिक्षणतज्ज्ञांशी अण्णांचा परिचय झाला.) एका मोठ्या सभेत अनेक देशांतील शिक्षणपद्धतींची ओळख करून देण्यात आली. (त्यावेळी सात भारतीयांना प्रत्येकी १० मिनिटे बोलायची संधी मिळाली. अण्णांना ही संधी मिळाली. अण्णांचे



महिला विद्यापीठावर स्वतंत्र भाषणही झाले. या परिषदेचे कामकाज बव्हंशी स्त्रियांनीच चालविल्याचे पाहून अण्णांना आश्चर्य वाटले व आनंदही झाला.)

तिथून जाताना कोपेनहेगनला एक प्रचंड डेअरी पाहिली. डेन्मार्क नॉर्वे-स्वीडन करून ते जर्मनीत आले. तेथे (बर्लिनला सुप्रसिद्ध वैज्ञानिक आइन्स्टाइन यांची भेट झाली. आइन्स्टाइनबरोबर अण्णांचा फोटो घेतला गेला तो अमेरिकेतील न्यूयॉर्क टाइम्समध्ये छापला गेला. फोटोखाली 'पाश्चात्य देशांतील जगद्विख्यात शास्त्रज्ञ व पौर्वात्य देशांतील जगद्विख्यात शिक्षणतज्ज्ञ' असे छापले होते.) अण्णांचा परिचय तिकडील वर्तमानपत्रांत येऊ लागला. जर्मनीत इरावतीबाईंची भेट झाली. हांबुर्ग ते न्यूयॉर्क हा बोटीचा १० दिवसांचा प्रवास होता. जर्मनीत अण्णांना मिळालेल्या प्रसिद्धीमुळे बोटीच्या कप्तानाने अण्णांची खास बडदास्त ठेवली होती. अण्णांना दोन्ही वेळा दहीभात व भरपूर फळे मिळत होती. न्यूयॉर्क बंदरात बोट शिरल्याबरोबर वर्तमानपत्रांचे वार्ताहर व फोटोग्राफर बोटीवर आले. उतरता उतरताच प्रसिद्धी मिळायला सुरूवात झाली.

अमेरिकेत स्थायिक झालेले डॉ. आर. व्ही. गोगटे जिनेव्हा परिषदेत अण्णांच्या परिचयाचे झाले होते. ते न्यूयॉर्क जवळच्या ब्रुकलिन येथील मुलांच्या हायस्कूलचे मुख्याध्यक होते. त्यांनी न्यूयॉर्कमध्ये इंटरनॅशनल हाऊसमध्ये पितापुत्रांची रहायची सोय केली होती. त्यामुळे खर्च खूपच कमी आला. या संस्थेत अनेक राष्ट्रांतून आलेल्या पाचसहाशे विद्यार्थ्यांची सोय होती. ५७ देशांना विद्यार्थ्यांची संख्या ठरवून दिलेली होती. जॉन डी रॉकफेलर यांनी ही संस्था आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण व्हावे व दीर्घकाळ टिकावे म्हणून स्थापन केली होती.

(न्यूयॉर्कमधील भारतीयांनी अण्णासाहेबांचे हार्दिक स्वागत केले व त्यांना ४०० डॉलर्सची थैली दिली. न्यूयॉर्ककडून दक्षिणेकडे कर्वे सरकू लागले तसतसा वर्णविद्वेष वाढत्या प्रमाणात दिसू लागला. निग्रोंची बोर्डिंग वेगळी, त्यांची देवळेही वेगळी आहेत. स्टेशनवर कलर्ड लोकांचे प्रवेशद्वार व गोऱ्या लोकांचे प्रवेशद्वार, अशा पाट्या होत्या. वेटिंगरूम्सही वेगवेगळ्या होत्या. अर्थात ही १९२९ सालची - अण्णांच्या भेटीच्या वेळची परिस्थिती होती.)

'कॅलिफोर्निया ज्युनिअर रिपब्लिक' नावाची उनाड मुलांची संस्था आहे. ही संस्था मिसेस फौलर या बाईंनी चालविली होती. वसतिगृहाच्या शाळेत बारा ते आठरा वर्षे वयाचे सव्वाशे मुलगे होते. लोकशाही पद्धतीने ती मुले सर्व व्यवस्था स्वतःच पहात. काही पालक पैसे देऊन मुलांना सुधारण्यासाठी तेथे पाठवत तर काही कोर्टामार्फत तेथे येत.

युरोप, अमेरिकेत सार्वजनिक कामात स्त्रिया मोठ्या प्रमाणात भाग घेत असत. ओकलंड येथे मिल्स कॉलेज नावाचे मुलींचे कॉलेज आहे, अण्णांना महिला विद्यापीठातील एका विद्यार्थिनीला मोफत शिक्षण देण्याचे आश्वासन मिळाले. त्यामुळे पुढील वर्षी

सीताबाई अण्णिगिरी त्या कॉलेजात जाऊन, दोन वर्षे राहून बी. ए. ची पदवी घेऊन आल्या. गृहशास्त्र विषयाचा तिथे त्यांनी अभ्यास केला.

अमेरिकेनंतर अण्णा जपानला गेले. या प्रवासात १ जानेवारी १९३० ह्या नव्या वर्षाच्या दिवशी त्यांनी बोटीवरचा उत्सव अनुभवला. टोकियोला पाऊल ठेवले आणि अण्णांना फार आनंद झाला, कारण महिला विद्यापीठ स्थापन करण्याची स्फूर्ती ज्या पत्रकाने मिळाली त्या पत्रकातील टोकियो येथील स्त्रियांचे विद्यापीठ हे अण्णांचे स्फूर्तिस्थान ठरले होते. १९०० साली हे विद्यापीठ स्थापन झाले होते. ३० वर्षांत ४२०० विद्यार्थिनी पदवीधर होऊन तेथून बाहेर पडल्या होत्या. अण्णांच्या भेटीच्यावेळी तिथे एकूण १६०० मुली शिकत होत्या. केवळ खाजगी प्रयत्नांनी विद्यापीठ चालले असून शासकीय अनुदान नसले तरी विद्यापीठाच्या पदव्यांना शासकीय मान्यता होती. या विद्यापीठाचे डॉ. असो यांनी अण्णांचे स्वागत केले. या भेटीमुळे जगप्रवासाचे सर्व श्रेय मिळाले इतका आनंद अण्णांना झाला. पूर्व आशियातील शांघाय, हाँगकाँग, मॅनिला, जावा, सिंगापूर मार्गे अण्णा १४ एप्रिलला पुण्याला येऊन पोहोचले.

१८ एप्रिलला अण्णांचा वाढदिवस मोठ्या थाटाने साजरा झाला. परदेशांत अण्णा तेरा महिने राहिले. अण्णांची प्रकृती उत्तम राहिली होती. कुठल्याही कार्यक्रमात अगर प्रवासात व्यत्यय आला नाही. खर्च जाता महिला विद्यापीठासाठी अण्णांनी १४,३०० रु. निधी गोळा केला.

अण्णांना ह्या प्रवासात लक्षात रहाव्यात अशा काही गोष्टी आढळून आल्या. इंग्लंडात बऱ्याच लोकांना काहीतरी नाद किंवा छंद असतो. रिकामपणाचा वेळ उत्तम तऱ्हेने कसा घालवावा याचे मार्गदर्शन शाळांमधूनच मुलांना मिळते. कुणाच्या घरी बसायला जाणे किंवा गप्पा मारण्यात वेळ घालविण्याची पद्धत तिकडे नाही. तरुणांप्रमाणेच वयस्कर मंडळीही वेळ मजेत घालवतात. यथास्थित आयुष्य उपभोगायची या लोकांची हातोटी असते. पैसे साठवून ऐपतीप्रमाणे प्रवास करतात. जिवंतपणे जगण्याची कला त्या देशातील लोकांना अवगत आहे. पाश्चात्यांची राहणी व विचारसरणी पाहून एक प्रकारचा नवा हुरूप घेऊन अण्णा दौऱ्यावरून परतले.

१३ महिने परदेश दौरा करून १९३० मध्ये एप्रिल महिन्यात परत आल्यावर प्रवासाचा शीण जरा कमी होतो न होतो तोच अण्णांनी वर्गणी गोळा करण्यासाठी आफ्रिकेतल्या आपल्या मुलाकडे जायचे ठरविले.

भारतात दौरे करून पुन्हा त्याच त्याच ठिकाणाहून त्याच त्याच कारणासाठी पैसा जमविणे योग्य नव्हे व तो तसा मिळणे सोपेही नाही, हे अण्णांनी ताडले. अण्णांनी पैसा जमविताना कोणालाही गळ घातली नाही. संकटात पाडले नाही. कोणालाही भरीस घातले नाही. लोकांना त्यांच्या कार्याचे महत्त्व पटून त्यांनी स्वेच्छेने, हसतमुखाने जी फूल ना फुलाची पाकळी दिली ती अण्णांनी स्वीकारली. मिळालेली



सर्व रक्कम संस्थांच्या स्वाधीन केली. अण्णांच्या मागण्यातही एक प्रकाराचा गोडवा व सौजन्ययुक्त सौंदर्य (ग्रेस) असे. दुसऱ्याला आपल्यामुळे किंचितही त्रास होऊ नये अशी स्वभावतली एक नाजुक छटा अण्णांजवळ होती. अण्णांनी आपल्या चिरंजीवांना, डॉ. शंकर कर्वे यांना आफ्रिकेत संस्थेसाठी निधी गोळा करण्यासाठी येण्याचा विचार असल्याचे कळविले. मोंबासा इथे त्यांचे स्वतःचे एक छोटेसे हॉस्पिटल होते. डॉ. शंकरने अण्णांना उत्तर पाठविले, 'आपण जरूर यावे. खेप अगदीच फुकट जाणार नाही. पण पैशाची फार मोठी अपेक्षा करू नये.' असे सरळ स्पष्ट विचाराचे हे पत्र होते. यावेळीही महिला विद्यापीठाने मागीलप्रमाणेच होईल तो खर्च मंजूर करण्याचे ठरविले.

मागच्या प्रवासात अण्णांची देखभाल करायला भास्करराव होते. आता अण्णा एकटेच जाणार होते. कोणीतरी बरोबर असायला हवे होते, हा अंतर्यामीचा विचार बायाने केला पण भासवले मात्र असे की, 'शंकरला भेटून बरेच दिवस झाले आहेत आणि एकदा त्याचा आफ्रिकेतला संसारही पहायला जायची माझी फार इच्छा आहे.' अर्थात बायाने स्वतःचा खर्च स्वतःच केला. विद्यापीठावर त्याचा कोणताही भार पडू दिला नाही. आफ्रिकेच्या प्रवासाविषयी बायाने आपल्या आत्मचरित्रात उल्लेख केलेल्या गोष्टींचा सारांश असा,

'कोकणपट्टीवरल्या बोटींच्या मानाने परदेशाची बोट खूपच अलिशान आहे. बोटीवरची स्वच्छता छान आहे आणि बोटीवर प्रवाशांची बडदास्तही छान ठेवतात. ही आगबोट म्हणजे समुद्रावरचे एक मोठे घरच आणि प्रवासी म्हणजे एक मोठे कुटुंबच वाटते. सर्वजण एकमेकांच्या सोयी बघत एकमेकांना मदत करीत.

'शंकरच्या घरी माझा फारच थाट होता. स्वतंत्र खोली, सेवेला गडी माणसे, पण माझी प्रकृती तिकडे काही चांगली राहिली नाही, कारण माझ्या कामाच्या शरीराला काम मिळत नव्हते.'

डॉ. शंकरकडे काम करणारे व पेशंट लोक बरेच गुजराती बोलणारे होते. बायला गुजराती येत नव्हते. तरी त्यांनी थोडे थोडे शिकून घेतले आणि कर्व्यांना विचारून हिंगण्याकडून भाऊबीजफंडाची गुजराती भाषेत लिहिलेली विनंतीपत्रके मागवून घेऊन आश्रमासाठी दोन हजार रुपये जमविले. 'मुलाला व सुनेला माझे पैसे गोळा करणे आवडले नाही. शंकरचा व त्याची पत्नी रेवती यांचा रहाणीचा सरदारी थाट पाहून मला वाटले ही उधळपट्टी आहे. पण मनोमन त्यांचे वैभव पाहून बरेही वाटले, कारण लहानपणी मुलांच्या कोणत्याच हौशी आम्हाला पुरवता आल्या नव्हत्या.'

या साडेचौदा महिन्यांच्या प्रवासात अण्णांनी दोन हजार लोकांच्या भेटी घेतल्या. त्या लोकांकडून त्यांना ३४०००/- रुपयांचा निधी मिळवता आला. त्यांच्या प्रवासखर्च वजा जाता विद्यापीठाला ३१८००/- रुपयांची प्राप्ती झाली. या प्रवासात अण्णांनी

आमदार श्रीनिवास शास्त्री व श्रीमती सरोजिनी नायडू यांची भेट केपटाऊनला जाऊन घेतली.)

अण्णांनी आपल्या निरीक्षणातून आफ्रिकेतील जीवनाविषयी सविस्तर माहिती लिहून काढली आहे. अण्णा लिहितात, 'आफ्रिकेत गुजराथी, मुसलमान वगैरे हिंदी लोकांचा भरणा विशेष असल्याने त्यांच्यात विद्यापीठाचा प्रचार करण्याची एक निराळीच युक्ती मी योजिली होती.' ते हिंदी अगर गुजराती स्वत: लिहू व बोलू शकत नव्हते म्हणून मूळ इंग्रजी पत्रकांची गुजरातीत व हिंदीत भाषांतरे करवून व ती देवनागरीत छापून घेऊन त्या त्या लोकांच्या सभेत ते ती वाचून दाखवीत. इंग्रजी जाणणारांना इंग्रजीतून पटवून देऊ शकत होते. व्यापाऱ्यांकडून देणग्या जमवितांना, 'आफ्रिकेतील ज्या विद्यार्थिनी महिला विद्यापीठाच्या परीक्षांना बसतील त्यांना आफ्रिकेत संस्थेसाठी जमा झालेल्या पैशातून शिष्यवृत्त्या दिल्या जातील.' असे त्यांनी जाहीर केले. त्या घोषणेचाही निधीची रक्कम वाढण्यासाठी फायदा झाला होता.

(आफ्रिकेहून अण्णा १२ मार्च १९३२ रोजी स्वदेशास परतले. परंतु अण्णा तिकडे असताना फेब्रुवारी १९३२ मध्येच ठाकरसी विश्वस्त मंडळ व विद्यापीठाचा अधिकारी वर्ग यांच्यांत काही मतभेद निर्माण झाले. आणि सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या मृत्यूनंतर वार्षिक अनुदान म्हणून ज्या अटींवर ५२५००/- रु. न चुकता विद्यापीठास मिळत होते, त्या अटी विद्यापीठाने पूर्ण केल्या नाहीत म्हणून हे अनुदान बंद करण्याचे ठरविले असल्याचे विश्वस्तांनी विद्यापीठाला पत्र लिहून कळविले.) त्यामुळे संस्थेवर नवाच संकटमेघ तरळू लागला होता.

(ठाकरसींच्या देणगीच्या अटींप्रमाणे विद्यापीठाने मुंबईला महिला महाविद्यालय काढावे व विद्यापीठाची कचेरी मुंबईला न्यावी. शिवाय विद्यापीठास सरकारी मान्यता तरी मिळवावी किंवा विद्यापीठाने आणखी १५ लाखांच्या देणग्या मिळवाव्यात. पण यांतली कुठलीच अट पूर्ण करणे विद्यापीठाला जमले नव्हते. विद्यापीठाकडून जिथे जिथे हायस्कूल किंवा कॉलेज काढले जाईल त्या सर्वांना नाथीबाई दामोदर ठाकरसी यांचेच नाव देण्यात यावे या दुसऱ्या एका अटीमुळे इतर मोठ्या देणग्या मिळू शकत नव्हत्या. प्रवासातून परतल्यावर ही बातमी कानी पडणे म्हणजे अण्णांवर वज्राघातच होता. पण त्याने खचून न जाता त्यांनी जास्त जोमाने निधी जमविण्याचा निश्चय केला.)

अण्णांचे वय आता ७४ वर्षांचे झाले होते. ऑर्गनायझरचे काम एकट्या त्यांच्याच्याने होण्यासारखे नव्हते, म्हणून प्रो. वा. गो. मायदेवांना त्यांच्या मदतीला असिस्टंट ऑर्गनायझर म्हणून नेमले. विद्यापीठाचे प्रकरण हायकोर्टापर्यंत गेलेले होते. तडजोड करण्याचा विचार येत असला तरी त्याबाबतच्या निकालासाठी दोन वर्षे लागतील असे वाटत होते. अशा कठीण प्रसंगी हिंदु विधवाश्रम संघातील आपल्या



विश्वासू सहकाऱ्यांचा आणि आजीव सेवकांचा सल्ला घेतला पाहिजे, हा विचार प्रा. कर्व्यांच्या मनात सर्वप्रथम आला. या प्रसंगी अण्णांचे सहकारी त्यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी आपल्या वेतनात कपात करायला संमती दिली. इतकेच नव्हे तर पगार हाती येताच सर्वच्या सर्व रक्कम प्रा. कर्व्यांना हाती देऊन त्यातून विद्यापीठाला हवी असेल तितकी रक्कम अण्णांनी काढून घ्यावी व उरलेला पगार आम्हाला द्यावा असे त्यांनी अण्णांना सांगितले. आजन्म सेवकांनी व प्राध्यापकांनीही कमी वेतनावर काम करण्याची तयारी दर्शविली.

या कठीण परिस्थितीचे वर्णन कर्व्यांनी आपल्या इंग्रजी आत्मचरित्रात पुढीलप्रमाणे केलेले आहे. 'निर्भेळ आनंद व निर्भेळ दु:ख या गोष्टी जगात कठीणच आहेत. संकटेसुद्धा उपयुक्त ठरतात. अशावेळी कार्यकर्त्यांची व त्यांनी हाती घेतलेल्या चळवळीची कसोटी लागते.' या संकटाचे वर्णन ते 'Bolt from Blue' म्हणजे अशनिपात किंवा वज्राघात असे करतात.

(संकटे कधी एकटी येत नाहीत. ती समुहाने येतात व माणसाभोवती फेर धरून नाचू लागतात. ठाकरसी विश्वस्त मंडळाच्या एक्झिक्यूटर्सचे वर उल्लेखिलेले पत्र येताच विद्यापीठाचे सहा वर्षे कुलगुरू असलेले सर चुन्नीलाल मेहता यांनी आपल्या पदाचे त्यागपत्र दिले. पण ही अडचण विद्यापीठाचे त्यावेळी उपकुलगुरू असलेल्या न्यायमूर्ती पाटकर यांनी कुलगुरूपद स्वीकारून दूर केली. पाटकर हे नामवंत वकील होते. त्यांनी न्यायप्रविष्ट कोर्टकेसमध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणण्याला मदत केली. त्यानुसार रू. ५२,५०० चे वार्षिक अनुदान तिमाही हप्त्यात देण्याची हमी देण्यात आली.)

('विद्यापीठाने आपली कार्यालये मुंबईस हलविण्याचे मान्य केले. मात्र त्यामुळे महिला विद्यापीठ आणि हिंगण्याच्या संस्था यांचे संबंध खूपच दुरावले.) त्याच सुमारास फ्रान्समध्ये पॅरीसला आश्रमाचे आजीव सेवक प्रो. हरीभाऊ दिवेकर पुढील शिक्षण घेत होते. पण फ्रान्सला जाण्यापूर्वी ते अनाथ बालिकाश्रमाचे चिटणीस व महिला विद्यापीठाचे रजिस्टार म्हणून काम पहात होते. शिवाय एरंडवण्याच्या हद्दीतील श्रीमती ना. दा. ठा. कॉलेजची जागा ज्यांच्याकडून घेण्यात आली त्या खिलारे पाटलांच्या विधवा पत्नी व त्यांची दोन्ही अज्ञान मुले यांच्याकरिता विद्यापीठ विश्वस्त राहिले होते. पाटलांच्या कुटुंबावरील गहाणाचा बोजा वगैरे संबंधीचे हिशेब ठेवण्याचे कामही दिवेकरांकडेच आले होते. त्यांच्याकडून हिशेब चोख ठेवले गेले नाहीत. त्यामुळे स्वत: अण्णांचा आणि इतर अनेकांचा दिवेकरांवर लोभ असूनही मन घट्ट करून सर्वांना कठोर बनावे लागले. आणि दिवेकरांना राजिनामा द्यावा लागला. व तो संस्थेला स्वीकारावा लागला. फार मोठ्या कार्यकर्त्याला संस्था मुकली. पण अण्णांनी आपल्या आत्मवृत्तात लिहिले आहे, 'आपल्या लोकांच्या अनेक संस्था अल्पायुषी

होण्याला जी कारणे आहेत त्यांपैकी जमाखर्चाची अव्यवस्था व पैशाची अफरातफर हे एक आहे. आमच्या संस्थेचा अंत झाल्यास तो या कारणास्तव होऊ द्यावयाचा नाही असा तिच्या चालकांचा बेत आहे.'

लेडी प्रेमलीला ठाकरसी या विद्यापीठाच्या सिंडीकेटवर तहहयात सभासद झाल्या. श्री. ना. म. आठवले यांच्या जागी डॉ. इरावतीबाई कर्वे विद्यापीठाच्या रजिस्ट्रार झाल्या. अनेक गोष्टींत जमवून घ्यावे लागले. आश्रम व विद्यापीठाची स्वायत्तता पूर्वीच्या मंडळींच्या हाती राहिली नाही. न्यायमूर्ती पाटकर ह्या अत्यंत शांत व विचारी न्यायाधीशाने गुरुवर्य अण्णांबद्दल स्त्री मासिकाच्या 'कर्वे' विशेषांकात लिहिलेल्या ओळी फार मोलाच्या आहेत, 'प्रो. कर्वे यांचा आशावाद, तडजोडीच्या धोरणाची वृत्ती आणि निधी जमविण्याच्या बाबतीतील त्यांचे दीर्घ परिश्रम यावेळी फार उपयोगी पडले. कर्व्यांचा एक अतिशय महत्त्वाचा गुण म्हणजे मूलभूत तत्त्वाव्यतिरिक्त इतर गोष्टींत तडजोड करण्यास ते सदैव तयार असत. उपहास, अपमान व प्रतिकार यांकडे लक्ष न देता ध्येयासाठी सारखी धडपड करण्याचा स्वभाव, दीर्घ चिकाटी, शत्रू व मित्र या दोघांबरोबरही सरळ वागणूक आणि जबरदस्त आशावाद बाळगून स्फूर्तिदायक उद्योगिता अंगी बाणवणे ही अण्णांची वैशिष्टे होत.'

तडजोड झाल्यावर अण्णांनीसुद्धा ती घडवून आणणाऱ्या सर्व व्यक्तींबद्दल व विशेषत: न्यायमूर्ती पाटकरांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

'की तोडिला तरु फुटे आणखी भराने' असा एका सुभाषितवजा श्लोक आहे. अण्णांचा तो अत्यंत आवडता श्लोक पण अण्णांच्या बाबतीत सुभाषिते, श्लोक नुसते म्हणण्यासाठी, पाठांतरासाठी अथवा त्यांतील काव्यात्म आनंद उपभोगण्यासाठी नव्हते. त्यांतील सुंदर विचार मनात कायमचे कोरून, योग्य प्रसंगी ते अण्णांच्या कृतिद्वारे प्रकट होत असत. श्रीकृष्णाने उपदेशिलेल्या कर्मयोगाचे आचरण सामाजिक भावनेला मान देताना प्रसंगी वैयक्तिक भावना बाजूला सारून प्रा. कर्वे करीत.

■ ■ ■



# ११ / नवीन संकल्प

विद्यापीठावर आलेले संकट दूर झाल्यावर अण्णांच्या मनावरचे बरेच ओझे हलके झाले. काही दिवसांनी विद्यापीठाचा कारभारही सुरळीत सुरू झाला. महिलांच्या विद्यापीठाची उपयुक्तता आता सर्वांना पटली होती. लेडी प्रेमलीला ठाकरसी जातीने विद्यापीठाच्या कारभारात लक्ष घालीत असल्याचे पाहून अण्णांना फार समाधान वाटले. आयुष्यात इतक्या वर्षांनंतर आता स्वत:च्या संसाराची दखल घेतायेण्याजोगी सवड अण्णांना मिळत होती. पण आतापर्यंत मुलांच्या शारीरिक, मानसिक गरजांकडे अण्णांपेक्षा बायानेच लक्ष जास्त पुरविले होते. अनेकवेळा त्यांच्या बालहट्टांना मुरड घालण्यासाठी तिला त्यांची समजूत काढावी लागली होती. अण्णांची कर्तव्यतत्परता, कार्यकुशलता मुलांच्या नजरेसमोर होतीच. आपापल्या हुशारीवर मुले कर्तबगार निघाली. सर्व मुले आपापल्या क्षेत्रात सुस्थिर झाली. सर्वांत थोरले श्री. रघुनाथराव ह्यांनी एल्फिस्टनमधील गणिताच्या अध्यापकाची नोकरी बदलून विल्सन कॉलेजात नोकरी धरली होती. त्याकाळातही संततिनियमनाचे कार्य त्यांनी हिरिरीने लोकांना पटवून देण्याचा मनापासून प्रयत्न केला. अण्णांना तत्वत: त्यांचे विचार पटत नसले तरी आपल्या मुलाची स्वार्थत्यागी वृत्तीने कार्य करण्याची पद्धत ते दुरून कौतुकाने पहात होते.

अण्णांचे दुसरे पुत्र शंकरराव आफ्रिकेत डॉक्टरी व्यवसायात सुस्थिर झाले होते. अण्णा बायासह त्यांच्याकडे राहून आले होते. त्यांचे त्यांच्या व्यवसायातील यश आणि तेथील राजकीय, सामाजिक क्षेत्रांतला सहभाग पाहून त्यांना विशेष आनंद झाला होता.

अण्णांचे तृतीय चिरंजीव दिनकरराव फर्ग्युसन कॉलेजात अध्यापनाचे काम करीत होते. ते लिपझिग् विद्यापीठाचे पी. एच्. डी. होते. नंतर त्यांना त्या कॉलेजचे प्राचार्यपद मिळाले. त्यांच्या पत्नी इरावतीबाई फर्ग्युसन कॉलेजमधून एम्. ए. होऊन जर्मन विद्यापीठाच्या पी. एच्. डी. होत्या. समाजशास्त्र व मानववंशशास्त्र या विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. महिला विद्यापीठाच्या रजिस्टार म्हणून त्या काम करीत

होत्या. अण्णांचे कनिष्ट चिरंजीव भास्करराव व त्यांच्या पत्नी कावेरीबाई अण्णांच्या हिंगणे येथील संस्थेत अध्यापनाचे काम करीत होत्या.

अण्णांच्या पत्नी बाया कर्वे आपल्यापरीने समाजसेवा करीत होत्या. त्यांनी आपल्या घरात अनेक अनाथ व परक्या मुलांना आश्रय दिला होता. अण्णांच्या आत्मवृत्ताच्या प्रकाशनासाठी आश्रमाने पैसा खर्च केला होता, तो भरून काढण्यासाठी प्रा. कर्वे युरोप-अमेरिकेच्या दौऱ्यावर असतानाच उत्तर भारतातील अनेक शहरी एकटीने प्रवास करून बायांनी पुस्तकाच्या अनेक प्रती विकल्या होत्या. या विक्रीतून संस्थेला मदत केली होती.

आता अशाप्रकारे सर्व बाजूंनी निवांतपणा लाभलेल्या अण्णांना थोडा वेळ असे वाटले की आता उर्वरीत आयुष्य आपण मुलानातवंडांत घालवावे. परंतु असे जेमतेम एखादे वर्ष पुरे होते न होते तोच एखादे नवे काम हाती घ्यायचे विचार त्यांच्या मनात प्रकर्षाने घोळू लागले. आतापर्यंत प्रत्येक १० वर्षांनी त्यांना एखादी नवी कल्पना सुचत गेली आणि तसतशी सुचलेली नवी कल्पना ते वास्तवात आणू शकले. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी इंग्रजी मुळाक्षरे शिकायला प्रारंभ केला. २८ व्या वर्षी मुरूडनिधी जमा करू लागले. यानंतर १० वर्षांनी हिंदु विधवाश्रम संघ स्थापन केला. ४८ व्या वर्षी महिला विद्यालय व निष्कामकर्ममठाची स्थापना झाली. वयाच्या ५८ व्या वर्षी महिला विद्यापीठाच्या कामाला अहोरात्र वाहून घेतले, आणि आता ७८ व्या वर्षी एका नव्या कल्पनेचा उदय त्यांच्या मनात झाला. खेडुतात शिक्षणप्रसार करण्याची एक योजना त्यांनी नजरेसमोर ठेवली.

आपल्या पेन्शनच्या ७० रुपयाच्या रकमेतून दरमहा १५ रुपये ते बाजूला काढू लागले. अत्यंत निष्ठापूर्वक त्यांनी कार्यास सुरुवात केली. त्यांनी कधीही दैनंदिनी लिहिली नाही. फक्त परदेश दौऱ्यात ते टिपणे ठेवीत असत. खरे तर त्यांना ठराविक काम संपविण्यासाठी दैनंदिन नोंद करण्याची अजिबात गरज नव्हती. आयुष्यभर त्यांनी मन:पूर्वक कशाची काळजी वाहिली असेल तर ती कामाची व कष्टाची! अत्यंत कष्टप्रद जीवनाची त्यांनी निवड केली व ते तसे जीवन उत्कटपणे जगले. असे असूनही ते कधी कोणाशी निष्ठुरतेने वागले नाहीत. ते निष्ठुर होते ते फक्त स्वत:शीच.

हळूहळू त्यांची कल्पना साकार होऊ लागली. इंजिनियर बापट व मुख्याध्यापक श्री. रा. भा. भागवत सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या कार्यास येऊन मिळाले. ग्रामीणभागात शिक्षणाचा प्रसार हे कार्य खाजगीरीत्या हाती घेणे अवघड व अपुरेच होते. ही जाणीव असूनही अण्णांनी या कामासाठी दोन वर्षांत २७०० रु. गोळा केले.

अण्णांनी 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिकशिक्षण मंडळा'चे कार्य १९३५ पासून १९४७ पर्यंत एक तप चालविले. हे काम फक्त पुण्यातच दररोज दोनतीन तास करावयाचे असे ठरवून पुण्यात असलेल्या २०-२५ पेठांत त्यांनी आपला दौरा काढला. पूर्वीच्या



स्त्रिया चातुर्मासात लाखोली वाहण्याचे व्रत घेत असत, तसे अण्णांनीही लाख घरी भिक्षा मागण्याचे - म्हणजे संस्थांसाठी पैसे मागण्याचे ठरविले असल्याचा उल्लेख अण्णांच्या आत्मवृत्तात आहे. 'ज्यावेळी जे कार्य हाती असेल त्यावेळी सर्व लक्ष त्या कार्याकडे लावून ते चिकाटीने करीत रहावे हे माझ्या जीवनाचे तात्त्विक अधिष्ठान आहे.' असे एका लेखात अण्णांनी म्हटले आहे. आतापर्यंत अनेक महापुरुषांच्या कार्याला सुरूवात होताना त्यांची ध्येयधोरणे मर्यादित स्वरूपात असून एक एक करून ती पूर्ण करण्याकडे त्यांचे अहर्निश लक्ष असते. मग त्यांची दृष्टी विशाल होत होत शेवटी वैश्विक शांतीची ओढ त्यांना लागलेली दिसते. महर्षी कर्वेही याला अपवाद नव्हते!

ग्राम शिक्षणाचे कार्य चालू असतानाच अण्णांच्या मनात दुसऱ्या एका कल्पनेचे बीज रुजू लागलेले होते. 'चिंता करितो विश्वाची' या वचनाप्रमाणे त्यांना असे वाटले की समाजात समता तत्त्वाचा प्रसार झाल्याखेरीज राष्ट्रोन्नती होणे शक्य नाही. त्यांची चिंता अशी की मानवा-मानवांमध्ये कृत्रिम रीतीने निर्माण झालेले भेदभाव नाहीसे करून त्यांच्यात समता प्रस्थापित करण्याच्या हेतूने त्यांनी 'समतासंघ' नावाचा संघ प्रस्थापित करण्याचे ठरविले. संघाच्या उद्देशपत्रिकेत ते म्हणतात, 'पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत मनुष्यामनुष्यांमध्ये असलेले आर्थिक, सामाजिक वगैरे बाबतीतले भेद शक्य तितके कमी करून सर्वांमध्ये समतेची भावना अत्पन्न व्हावी हे संघाचे ध्येय आहे....'

समतेचा प्रचार करण्याकरिता समतासंघ स्थापन करण्याची कल्पना अण्णांना सुचली ती फ्रेड्रिक जेम्स गूल्ड या इंग्लंडमधील गृहस्थांच्या परिचयामुळे. इंग्लंडमध्ये, 'Society to promote Human Equality' ( मानवी-समता पुरस्कार मंडळ ) ह्या संस्थेच्या संस्थापक सभासदांपैकी ते एक होते. त्यांनी अण्णांकडे सदर संस्थेचे त्रैमासिक व इतर पत्रके पाठविली. ती वाचून आपल्याकडे अशी संस्था असावी अशी स्फूर्ती अण्णांना आली.

अमेरिकेतील एक गृहस्थ चार्लस् फ्रेडरिक वेलर यांनी १९१८ साली वर्ल्ड फेलोशिप ही संस्था जगातील मानव जातीचे कल्याण करण्यासाठी जागतिक सरकार स्थापन करणे ह्या उद्देशाने स्थापिली होती. अण्णांना ही कल्पना फार आवडली. त्यांनी संस्थेच्या संस्थापकांना पत्रे पाठविली आणि त्यांचे वेळोवेळी प्रसिद्ध होणारे अहवालही मागवून घेतले.

अण्णांना एखादी कल्पना सुचली की ते सारखा तिचा विचार करीत. तिच्यासंबंधी विचारी व्यक्तींशी चर्चा करीत. त्यावर स्वत: लेख लिहून लोकांची मते अजमावित. समता संघाबद्दल ते रँ. परांजपे, श्री. तात्यासाहेब केळकर, फलटणचे राजे नाईक निंबाळकर वगैरे थोरामोठ्यांबरोबर बोलले, बदलापूरला श्री. ना. गो. तथा नानासाहेब

चापेकर या थोर साहित्यिकाच्या घरी मातृदिनानिमित्ताने जमलेल्या सर्व विद्वानांपुढे अण्णांनी आपली ही नवी कल्पना मांडली होती. इंडियन रिव्हयू मध्ये, 'Human Equality' या विषयावर लेख लिहिला होता. अण्णांच्या पद्धतशीर प्रचारामुळे समता संघाला पहिल्या वर्षी, १९४४ साली ३०० सभासद मिळाले, दुसऱ्या वर्षी ६०० झाले, संघाच्या तिसऱ्या वर्षी सभासद संख्या ९०० झाली.

या संघाच्या तत्त्वप्रणालींचाच प्रचार करण्यासाठी अण्णांनी 'मानवीसमता' या नावाचे आठ पानांचे एक मुखपत्र सुरू केले. १९३८ साली स्त्री मासिकाने काढलेल्या खास 'कर्वे' अंकात साहित्यसम्राट केळकर अण्णांबद्दल मोठे मार्मिक विधान करतात, 'हाती घेतलेले कार्य अण्णा बिनबोभाटपणे करीत. प्रतिपक्षाशीवाद घालावयाचा नाही, हुज्जत घालावयाची नाही - या धोरणाने त्यांचा मार्ग बरचसा निष्कंटक होत असे. उतारवयातील त्यांची ही उद्योगशीलता व काम करण्याची हौस पाहून तरुणांनीही लाजेने मान खाली घातली पाहिजे.'

हे सर्व उद्योग ते पायी हिंडून करीत. मोटार किंवा टांगा घेऊन कधी ते कामाला गेले नाहीत. समता संघाचे आपले कार्य त्यांनी सुमारे १० वर्षे स्वतंत्रपणे चालविले व नंतर 'जातीनिर्मूलन' या संस्थेत समता संघ समाविष्ट होऊन गेला.

■ ■ ■



# ११ / लाखमोलाचे वाढदिवस

दर दहा वर्षांनी अण्णांचा वाढदिवस मोठ्या प्रमाणात संस्थेने आणि त्यांच्या विद्यार्थिनींनी साजरा केला. त्यावेळी त्यांना अण्णांबद्दल ऋणनिर्देश करायची संधी प्राप्त होत असे, शिवाय अण्णांनी ज्या कार्यासाठी स्वत:ला सर्व आयुष्यभर वाहून घेतले त्या निधी जमविण्याच्या कामाला कार्यकर्तेपण वाढदिवसाच्या निमित्ताने हातभार लावत, आणि निधी गोळा करून अण्णांना थैली अर्पण करीत. अण्णा सर्व निधी संस्थेकडे देत असत.

१८ एप्रिल १९३८ रोजी अण्णांचा ८० वा वाढदिवस सर्व देशभर साजरा झाला. त्यानिमित्ताने आश्रमाच्या आजीव सदस्यांनी आपल्या पगाराच्या निम्मी रक्कम देऊन माध्यमिक शाळांसाठी आंतरशालेय क्रीडास्पर्धा दरवर्षी भरविण्याचा नवीन उपक्रम सुरू केला. हे सामने घडवून आणण्यासाठी राज्य शिक्षणखात्याचे संचालक श्री. ग्रिव्ह यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या निमित्ताने हिंगणे येथे एक पोहण्याचा तलाव बांधण्यात आला. त्यासाठी संस्थेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. सौ. सरलाबाई खोत व त्यांचे पती डॉ. खोत यांनी देणगी दिली.

वाढदिवसाला श्री. दादासाहेब मावळंकर अध्यक्ष होते. 'अण्णांनी हाती घेतलेले शिक्षणाचे कार्य - राजकीय गुलामगिरी घालविण्यासाठी जरुरीचे आहे.' असे ते आपल्या भाषणात म्हणाले. गेल्या दहा वर्षात अण्णांचे कर्तृत्व अगदी शिगेला पोहोचले होते. युरोप, अमेरिका, आशिया आणि आफ्रिका खंडांत प्रवास करून त्यांनी संस्थेसाठी ५०,०००/- रुपये इतकी आर्थिक मदत मिळविली होती. ह्या वाढदिवसाचा मुंबईतला समारंभ त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. फलटणचे राजेसाहेब श्री. नाईक निंबाळकर यांनी अण्णांचा वाढदिवस फलटण येथे आपल्या संस्थानच्या प्रजाजनांसाठी साजरा केला. त्यानिमित्त त्यांनी अण्णांना ६००/- रुपयांचे वर्षासन देण्याचे ठरविले.

अण्णांचा ९१ वा वाढदिवस १८ एप्रिल १९४८ रोजी मोठ्या थाटाने साजरा

झाला. या वयात अण्णा भरपूर उत्साहाने कार्य करू शकतात याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला. मुंबईत साजरा झालेल्या त्यांच्या वाढदिवसाला डॉ. राजेंद्रप्रसाद अध्यक्ष म्हणून लाभले होते. अण्णांना त्यानिमित्त एक लाखाची थैली अर्पण करण्यात आली.

मुंबई येथे होणाऱ्या महिला विद्यापीठाच्या इमारतीसाठी भारताचे मध्यवर्ती सरकार आणि मुंबई सरकार यांनी प्रत्येकी सहा लाख रुपये देण्याचे जाहीर केले. 'अनाथ बालिकाश्रमाची मंडळी' हे हिंगणे येथील संस्थेचे मूळचे नाव बदलून 'हिंगणे स्त्री शिक्षण संस्था' असे ठेवण्यात आले. 'वृक्षराजास' हे संस्थेचे वर्णन करणारे सुंदर गीत प्रो. मायदेवांनी रचले.

पुण्यात साजऱ्या झालेल्या वाढदिवसाला डॉ. बाबासाहेब जयकर अध्यक्ष होते. पुण्यातील सुमारे १०० संस्थांनी एकत्र येऊन मानपत्र व ७,५००/- रुपयांची थैली अण्णांना अर्पण केली. ना.दा.ठा. पुणे, कन्याशाळेत विद्यार्थिनींची व पालकांची खास सभा रँग्लर र.पु. परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. अण्णांना दीर्घायुष्य व आरोग्य चिंतण्यात आले. रँ. परांजपे म्हणाले, 'मला जे थोडेफार महत्त्व प्राप्त झाले आहे ते सर्वस्वी अण्णांमुळेच. आई-वडिलांनी मला जन्म दिला असला तरी पहिली मुळाक्षरे शिकवून माझा बौध्दिक जन्म अण्णांमुळेच झाला.'

सई परांजपे यांनी 'कर्वे-परांजपे' नावाचा लेख एप्रिल ९५ मध्ये महाराष्ट्र टाईम्स मध्ये लिहिला होता. त्यात त्यांनी लिहिलेय, 'अण्णा म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे आणि अप्पा म्हणजे रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे दोघे सख्खे आते-मामे भाऊ. अण्णांची आई ही अप्पांची आत्याबाई किंवा अस्सल कोकणी वळणाने बोलायचे तर 'आते'. पण अप्पा-अण्णांच्या मधली जवळीक नात्यापलीकडची होती. बंधू, सोबती, गुरुशिष्य आणि सामाजिक - विशेषत: शैक्षणिक क्षेत्रात तळमळीने काम करणारे सहप्रवर्तक-अशी अनेक पदरी होती. अण्णांनी जर अल्पवयीन रघूच्या तल्लख बुद्धिमत्तेची पारख करून त्याला शिक्षणासाठी हाताशी धरले नसते तर रघुनाथ आपल्या वडिलांप्रमाणे कोकणात भिक्षुकी करीत राहिला असता. अशीच एक सुट्टी कोकणात घालवून अण्णा मुंबईला जायला निघाले ते रघुनाथाला घेऊनच. त्या दिवसापासून ते मुंबई व पुणे येथे रघुनाथाचे डिग्री पर्यंतचे शिक्षण पूर्ण होई पर्यंत त्याच्या शिक्षणाचा सर्व खर्च अण्णांनीच केला. अण्णांच्या सक्रीय गुणग्राहकतेमुळे कोकणातल्या बागेत खेळणारा रघुनाथ, पुढे केंब्रिजला गणिताच्या सर्वोच्च परीक्षेत पहिल्या क्रमांकावर उत्तीर्ण होऊन हिंदुस्थानचा पहिला 'सिनियर रँग्लर' झाला.' ही झाली अगदी अलीकडच्या माणसाने सांगितलेली आठवण.

त्यावेळी -१९४८ साली 'ज्ञानप्रकाश' ने लिहिलेल्या अण्णांसंबंधीच्या अग्रलेखात डॉ. गूल्ड यांनी अण्णांसंबंधी लिहिलेली दोन तीन वाक्ये उद्धृत केली होती, 'He saw his goal, he walked, he persisted, he achieved.... in doing so



he has served Poona, he has served India, he has served Asia, he has served Humanity.'

माणसाला आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य लाभणे अत्यंत सुखावह असले तरी या दीर्घ काळात त्याच्या वाटचाला येणारी दु:खेही विविध प्रकारची असतात. २९ नोव्हेंबर १९५० रोजी स्वत:च्या वयाच्या ८६ व्या वर्षी अण्णांच्या पत्नी सौ. आनंदीबाई ऊर्फ बाया यांचे देहावसान झाले.

बाया एरंडवण्याच्या दोन खोल्यांच्या एका झोपडीत एकटीच रहात असे. वृद्ध बायाला सर्वजण म्हणत, 'बाया, आता तू काहीतरी देणग्या वगैरे जमवायला गावभर कशाला भटकतेस? चांगली मुलं सुना नातवंड आहेत, त्यांच्या घरी त्यांचे कौतुक पहात का रहात नाहीस?'

यावर बाया म्हणे, 'मला वाटते माझ्या घरी मी स्वतंत्र आहे. राणी आहे. हातपाय थकले की जायचेच आहे मुलांकडे.'

अण्णा रोज बायाकडे जात. तासभर बसून गप्पागोष्टी करीत. वर्तमानपत्रे, पुस्तके बायाला वाचून दाखवीत. 'माझ्या घरातील घड्याळाला किल्ली देण्याचे काम मी त्यांच्याकडे दिले आहे. त्यामुळे त्यांना रोज यावेच लागे.' बाया मिष्किलपणे सांगत. तेजस्वी गोरा रंग, वयामुळे कमरेत वाकलेल्या, चेहऱ्यावर सुरकुत्या, छोटासा बुचडा, तीक्ष्ण निळेशार डोळे अशा बायाला सई प्रमाणे मीपण पाहिले होते. सईंनी लिहिले आहे, 'विधवा केलीन्, पण गोरी पाहून केलीन् हो.' असे बाया अण्णांबद्दल चेष्टा मस्करीत म्हणे.

त्यांच्या विनोदी, मिष्किल स्वभावामुळेच त्यांनी संसारातील कितीतरी संकटांवर मात केली. उदंड कीर्ती लाभलेल्या एखाद्या थोर समाजकार्य करणाऱ्या माणसाच्या पत्नीच्या वाटचाला - ज्या समस्या, हालअपेष्टा येतात त्या सर्व बायाच्या वाटचाला आल्या होत्या. कर्व्यांच्या अतिचांगुलपणाची झळ बायाच्या संसाराला खूप पोहोचली. कर्व्यांच्या स्वभावातील गुणदोषांचे अत्यंत मार्मिक चित्रण बायाने आपल्या 'माझे पुराण' ह्या आत्मचरित्रात फार मार्मिकपणे केले आहे. अण्णांच्या पैशाच्या बाबतीतल्या चोखपणाबद्दल त्या सांगतात, 'मुलाच्या घरी जेवले तरी अण्णा हिशेबाने त्याला पैसे देतील. त्याच्या घरी केस कापून घेतले तरी न्हाव्याला स्वत: पैसे देतील.' त्या म्हणतात, 'हा गुण आमच्या मुलांच्याही अंगात तंतोतंत उतरला आहे. आमच्या ओळखीची मंडळी गमतीने म्हणतात 'दोन कर्वे एकत्र आले की काहीतरी पैशाचा हिशोब असायचाच.'

अण्णा अतिशय अबोल होते. जेव्हा बोलत तेव्हा मात्र खणखणीत आवाजात. बाया फटकळ पण विनोदी स्वभावाच्या. तरी त्यांचे सहजीवन फार कौतुकास्पद होते. एकमेकांच्या ध्येया आड ते आले नाहीत. एकमेकांना शक्य तितके पूरक

व्हायचे असे दोघांचेही धोरण असे. बायाने सर्व संसार पेलला. आधी बालविधवेचे करुणामय जीवन आणि अण्णांशी पुर्नविवाह झाल्यावर लोकांच्या चर्चेचा विषय असलेले जीवन त्यांच्या वाटचाला आले. तरीपण त्या अतिशय संसारदक्ष होत्या. केव्हातरी गमतीने बोलणे निघे तेव्हा बाया म्हणे, 'लोक तुम्हाला 'महर्षी' म्हणतात, अन् तुम्ही म्हणवून घेता. नुसते म्हणवून घ्यायला काय लागते? मी घरात सर्व पहायला आहे म्हणून तुम्ही एवढे मोठे झालात.' ह्या म्हणण्यात थोडा विनोदाचा भाग असला तरी सत्याचा भाग पुष्कळच आहे. अण्णांनीही बायाला अनेक बाबतीत संभाळून घेतले होते. म्हणूनच आपल्या सहचरीचा वियोग अण्णांना एकाकी करून गेला.

बायाचे हिंडणे फिरणे थांबल्यावर त्यांना हिंगण्याच्या झोपडीत आणले होते. तिथे त्यांची देखभाल नीट व्हायची. अण्णा रोज बायाला भेटायला येत. तिच्या बिछान्याजवळ बसून रहात. उभयतात फारसे बोलणे होत नसे. पण ५७ वर्षांच्या प्रदीर्घ सहजीवनात दोघांची ध्येये इतकी एकरूप झाली होती की शब्दांचीही अडचण व्हावी. शेवटच्या दिवशी अण्णा दिवसभर बायाजवळ बसून होते. खूप उशिराने ते झोपायला गेले. रात्रीच्या नीरव शांततेत बायाला कायमची शांत झोप लागली.

बायाच्या देहाला अग्नी देण्यात आला, चितेजवळ अण्णा उभे होते. अण्णांच्या गंभीर चेहऱ्यावर दुःखाची, खिन्नतेची छाया पसरली. क्षणभर अण्णा उन्मळून पडल्यासारखे वाटले, पण विचारी व संयमी वृत्तीने ते सावरले. बायासारख्या एका बालविधवेला पुन्हा सौभाग्य मिळणे व अहेवपणी भाग्याचे मरण येणे हे केवळ अण्णांमुळे शक्य झाले होते. बायाच्या दहनभूमीवर तुळशीवृंदावन बांधले आहे. ते स्थान सर्वांना मातृस्मारकासारखे पवित्र वाटते. उर्वरित आयुष्यात अण्णा जेव्हा जेव्हा हिंगण्याला जात तेव्हा तेव्हा प्रथम बायाच्या वृंदावनाशी जात. त्यांचे थरथरते हात नकळत जुळत. मनात भावना दाटून येत. मग ते स्वतःला सावरत व नित्यकर्माला लागत.

उतारवयात अण्णांवर दुसरे संकट कोसळले ते आपल्या ७२ वर्षांच्या थोरल्या मुलाच्या - रघुनाथाच्या मृत्यूचे. १४ ऑक्टोबर १९५३ रोजी ही दुःखद वार्ता मुंबईहून हिंगण्याला कळली. भास्कररावांनी धीर करून ती बातमी अण्णांना सांगितली. अण्णांनी शांतपणे सर्व ऐकून घेतले. थोडावेळ सर्वत्र स्तब्धता पसरली. तिचा भंग अण्णांच्या उद्गारांनी झाला, 'मी ९५ वर्षांचा म्हातारा झालोय. आता निरोप घेण्याची माझी पाळी होती. परंतु ईश्वराने माझ्या मुलाला नेले. तोही वृद्धच होता.'

रघुनाथाच्या बुद्धिमत्तेचा व त्याच्या पुरोगामी विचारसरणीचा अण्णांना मोठा अभिमान वाटे. पतीच्या आधीच स्वर्गवासी झालेल्या रघुनाथाच्या पत्नीच्या सोशिक वृत्तीचा अण्णा नेहमी गौरवाने उल्लेख करीत.

बायाच्या मृत्यूनंतर (१९५१ साली अण्णांना पुणे विद्यापीठाने डी.लिट्. पदवी देऊन सन्मानित केले. १९५४ साली श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने



डी.लिट्. देऊन अण्णांच्या कार्याचा गौरव केला. १९५५ साली भारत सरकारने पद्मविभूषण किताब दिला, तर १९५७ साली मुंबई विद्यापीठाने L.L.D. पदवी दिली.) अण्णांच्या मनात त्यावेळी विचार आले. '१८८४ साली मी याच विद्यापीठातून पदवीधर झालो. तेव्हा मला केवळ आनंद व अभिमान वाटला होता.' आता वयाच्या शंभराव्या वर्षी विद्यापीठाकडून दुसऱ्यांदा सन्माननीय पदवी मिळत आहे.'

(दीक्षान्त समारंभाच्या भाषणात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू श्री. श्रीप्रकाश म्हणाले, 'महर्षी अण्णासाहेब कर्व्यांनी L.L.D. पदवीचा स्वीकार केल्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. अण्णासाहेब हे आमच्या विद्यापीठाचे एक अत्यंत सन्माननीय माजी विद्यार्थी, स्वार्थत्यागी, देशभक्त, दीन-दुःखितांचे कैवारी आणि ज्या तत्त्वांचा त्यांनी प्रचार केला ती प्रत्यक्ष आचरणात आणणारे एक आदर्श पुरूष असून प्राचीन जीवनाचा व विचारसरणीचा खराखुरा प्रतिनिधी कसा असतो हे त्यांनी आपल्या स्वतःच्या साध्या, विशुद्ध व्यक्तिगत जीवनाने दाखवून दिले आहे.')

दीक्षान्त समारंभाला अण्णासाहेब उपस्थित राहिले. पदवी स्वीकाताना त्यांनी आपली प्रथा मोडून एक छोटेसे भाषण केले, आपल्या जुन्या विद्यापीठाने आपला सन्मान केल्याबद्दल आपल्याला किती अभिमान वाटतो ते त्यांनी सांगितले. 'ईश्वरकृपेने मला दीर्घायुष्य लाभले. भारतीय महिलांसाठी मी जे अल्पस्वल्प कार्य केले त्याबद्दल घवघवीत बक्षीसही माझ्या पदरात पडले आहे. समाजाने माझ्यावर जे अलोट प्रेम केले त्याचा पुरावा आजचा जो सन्मान होत आहे तो आहे. उर्वरित आयुष्यात विद्यापीठाचा मी सदैव कृतज्ञ राहीन.'

अण्णासाहेबांनी वयाची शंभरी ओलांडताच, मुंबईत त्यांनी ज्या संस्थांत शिक्षण घेतले त्या तीन संस्था, रॉबर्ट मनी हायस्कूल, विल्सन कॉलेज व एल्फिस्टन कॉलेज यांनी एकत्र येऊन त्यांना चांदीचे सुंदर तबक आणि मानपत्र दिले. उत्तरादाखल अण्णा म्हणाले, 'कोकणासारख्या अत्यंत मागासलेल्या भागातून मुंबईस आलेल्या माझ्यासारख्या तरुणाच्या मनाला व बुद्धीला या तीन संस्थांनी घडविले. त्यावेळचे माझे शिक्षक आता कुणी हयात नाहीत. त्यांची मला सारखी आठवण येते आहे. त्या शिक्षकांचे वारसदार असलेले आजचे तुम्ही शिक्षक व विद्यार्थी या सर्वांना मी शुभेच्छा चिंतितो. माझ्यासारखे दीर्घायुष्य व निरोगी जीवन क्वचितच कोणाच्या वाट्यास येते. आज मला दिलेल्या शुभेच्छांबद्दल व अभिष्टचिंतनाबद्दल मी आभारी आहे. परकीयांना देशाबाहेर घालवून देण्याच्या पहिल्या प्रयत्नापासून स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या पहिल्या दशकापर्यंतचा इतिहास प्रत्यक्ष घडताना मी पाहिला आहे. देशाचे भवितव्य आमच्या शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे यांतून शिकून बाहेर पडणाऱ्या तरुणांच्या हाती आहे. आपला योग्य तो वाटा या शिक्षणसंस्था उचलतील अशी मला आशा आहे.'

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राष्ट्रपतींच्या हातून समाजसेवकांचा व अन्य थोर व्यक्तींचा सन्मान होत असतो, अशांच्या १९५८ च्या प्रजासत्ताकाच्या यादीत अग्रस्थानी महर्षी डॉ. धोंडो केशव कर्वे यांचे नाव झळकत होते. राष्ट्रपतींनी देशाच्या या लाडक्या सुपुत्राला 'भारतरत्न' हा सर्वोच्च बहुमान प्रदान केला. मुंबई ते दिल्ली जाता येता विमान प्रवास झाला. दोन दिवस सन्माननीय पाहुणे म्हणून अण्णा राष्ट्रपतीभवनात मुक्कामाला होते. अण्णांच्या थोर कार्याचा तर बहुमान होताच - पण महाराष्ट्राचाही होता!

■ ■ ■



# १३ / जन्मशताब्दि महोत्सव

१९०० सालच्या जून महिन्यात अनाथबालिकाश्रमाचे स्थलांतर हिंगण्यास झाले. तेव्हापासून कलेकलेने संस्था वाढीस लागली. १८९६ साली महर्षी कर्व्यांनी लावलेल्या इवल्याशा शैक्षणिक रोपट्याचा वेलू आता गगनावरी पोहोचला होता. पुणे शहर, सातारा, वाई, मुंबई, बेळगांव, सोलापूर, धुळे इत्यादी ठिकाणी संस्थेचा विस्तार सर्वदूर झाला होता. श्रीमती पार्वतीबाई आठवले, श्री. ह. रा. दिवेकर, श्री. ना. म. आठवले, श्री. गो. म. चिपळूणकर, कविवर्य वा. गो. मायदेव, श्री. विश्वनाथ मोडक, श्रीमती पारुबाई शेवडे, श्रीमती गंगूबाई तांबोळे, प्रो. वामन मल्हार जोशी, प्रो. रामचंद्र हरी केळकर, डॉ. कमलाबाई देशपांडे, श्रीमती सीताबाई अण्णेगिरी, श्री. ना. म. पटवर्धन, श्रीमती बनुबाई अत्रे, श्री. भास्कर धोंडो कर्वे, सौ. मालतीबाई बेडेकर, सौ. इरावती कर्वे, श्रीमती शारदाबाई साठे, श्री. शी. शं. पतके, सौ. कावेरीबाई कर्वे, श्रीमती काशीबाई नातू अशा असंख्य निष्ठावान शिक्षणप्रेमी मंडळींनी अण्णांचे कार्य खूप पुढे नेले. सर्वांचीच नावे देणेही अशक्य आहे, इतके सहकारी अण्णांना लाभले. अण्णांना शेवटपर्यंत आपल्या कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता वाटत होती.

अनेक ठिकाणी संस्थेच्या कन्याशाळांच्या डौलदार इमारती उभ्या आहेत. हिंगणे येथे तर सुमारे २२ एकर जमिनीवर पार्वतीबाई अध्यापिका विद्यालय, आनंदीबाई कर्वे प्रा. शाळा, महिलाश्रम हायस्कूल, वसतिगृह, अशा अनेक इमारतींनी सारा परिसर गजबजून गेला आहे. विद्यादानाचे पवित्र कार्य अखंड चालू आहे. ज्या झोपडीत अण्णांनी आश्रम सुरू केला ती मूळ झोपडी स्मारक म्हणून अद्याप उभी आहे. श्री. भास्करराव कर्व्यांनी झोपडीचा जीर्णोद्धार केला, तरी झोपडीचे दर्शनी स्वरूप जसेच्या तसे ठेवले आहे. दारे पूर्वीचीच ठेवली आहेत. फक्त पूर्वीचे लहान झरोके काढून खिडक्या बसविल्या आहेत. पाहुण्यांसाठी छानसा स्वागतकक्ष उभा केला आहे. आश्रमाच्या पहिल्या चार विद्यार्थिनींचे, सर्व माजी आजन्मसेवकांचे, जमिनीची मूळ देणगी देणाऱ्या श्री. गणेश गोविंद गोखले यांचा व संस्थेला पाच

लाखांवर भाऊबीज मिळवून देणाऱ्या श्रीमती शांताबाई परांजपे व त्यांच्या भगिनी यांचे फोटो लावलेले आहेत. झोपण्याची खोली, टॉयलेट, लहानसे स्वयंपाकघर अशी व्यवस्था झोपडीत केली असल्यामुळे विशेष पाहुण्यांची चांगली सोय त्यामुळे झाली आहे. स्वागतकक्षात पाहुण्यांच्या चहापाण्याची सोय केली जाते.

या झोपडीत मुख्यमंत्री बा. ग. खेर, राज्यपाल हरे कृष्ण मेहताब, श्री. मोरारजीभाई, श्रीमती इंदिरा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्रप्रसाद, महात्मा गांधी, राज्यपाल श्रीप्रकाश, नामदार श्रीनिवास शास्त्री आणि ज्यांच्या भेटीने फार फार वर्षांपूर्वी अण्णांना अत्यानंद झाला होता ते अण्णाचे ज्येष्ठ बंधू भिकाजीपंत, बहीण अंबाताई आणि मातोश्री लक्ष्मीबाई यांनी भेट दिली होती.

ह्याच झोपडीत सौ. बाया कर्वेंनी आणि स्वत: महर्षी अण्णांनी अखेरचे श्वास घेऊन आपली इहलोकीची यात्रा संपविली.

आता श्री. भास्करराव आणि सौ. कावेरीबाई यांनी संस्थेच्या कामाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली होती. अण्णांच्या मनाला उत्साह वाटे म्हणून ते भास्कररावांबरोबर सभासंमेलनांकरिता आनंदाने प्रवास करीत, पण विचारविनिमयात अगर सभांच्या कामकाजात भाग घेत नसत. त्यांच्या उपस्थितीमुळे सर्वांना आनंद व उत्साह मिळे. अण्णांच्या संस्थेचे सर्व पदाधिकारी फार कुशलतेने काम करीत. निष्ठेने कर्तव्ये पार पाडीत. शताब्दीकडे वाटचाल करणारे अण्णा आता अशाप्रकारे संस्था - कार्यातून मुक्त झाले होते.

१८ एप्रिल १९५८ रोजी अण्णांना शंभर वर्षे पूर्ण झाली. हा दिवस तर संस्थेच्या व अण्णांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा दिवस होता. सौ. कावेरीबाई कर्वे 'हिंगण्याच्या माळावरून' मध्ये लिहितात, 'अतिशय आनंदाचा हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहावा असा आहे. आम्ही सर्वजण हा दिवस फार शुभ व पवित्र मानतो. सर्वजण त्याची अत्यंत आतुरतेने वाट पहात होतो.' अण्णांचा १०१ वा वाढदिवस अभूतपूर्व उत्साहाने, आनंदाने व अभिमानाने साजरा झाला. समारंभाच्या नियोजनासाठी काही महिने आधीच मुंबई, पुणे, मुरूड आणि अन्यत्र गौरव समित्या स्थापन झाल्या होत्या.

हिंगण्याच्या आश्रमातील हजारो माजी विद्यार्थिनींनी १२ एप्रिल १९५८ रोजी शताब्दी सोहळ्याचा शुभारंभ केला. सोहळ्याला सुरूवात महर्षी कर्वे यांच्या हिंग[illegible] या कर्मभूमीत व्हावी हे उचितच होते. ज्येष्ठ माजी विद्यार्थिनी डॉ. इंदिराबाई नियो[illegible] अध्यक्षा होत्या.

रविवार दि. १३ एप्रिल हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या विद्यार्थिनी व कार्यकर्त्यां[illegible] समारंभ केला. अध्यक्षपद भूषविण्यासाठी राज्यपाल श्री. श्रीप्रकाश पुण्याला आ[illegible] होते. समारंभास तीन हजाराच्या वर स्त्री - पुरूष - मुले हजर होती. एवढा मोठा जनसमुदा[illegible]



हिंगण्याच्या माळावर यापूर्वी कधीच जमला नसेल. आदल्याच दिवशी पडून गेलेल्या वळवाच्या पावसामुळे वातावरणात गारवा आला होता. प्रसन्न वाटत होते. भव्य मंच सुशोभित केला होता. ईशस्तवन झाले, निमंत्रितांचे स्वागत झाले. अण्णांच्या गौरवार्थ झालेली भाषणे भावनांनी ओथंबलेली होती. 'धोंडो केशव कर्वे' ह्या अण्णांच्या १९२८ ते १९५८ या तीस वर्षांतील जीवनाचा वृत्तांत चरित्र म्हणून त्यांच्या आत्मचरित्रास पुढे जोडला. त्याचे प्रकाशन झाले. श्री. म. गो. नित्सुरे यांनी लिहिलेल्या 'भाग्यवान शतायुषी' या पुस्तकाचेही प्रकाशन झाले. श्री सहस्त्रबुद्धे व श्री ओगले या दोघांनी मिळून दिलेल्या गुरुवर्यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. शंभराव्या वाढदिवसाची रात्र सौ. हिराबाई बडोदेकरांच्या गायनाने रंगून गेली.

मुंबईत साजऱ्या झालेल्या सोहळ्यासाठी ब्रेबोर्न स्टेडियम सजविण्यात आला होता. शाही इतमामाने हा टोलेजंग समारंभ साजरा झाला. व्यासपीठावर राज्यपाल श्री. श्रीप्रकाश आणि प्रमुख अतिथी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. पंडितजींचे भाषण अत्यंत जिव्हाळ्याचे व हृदयस्पर्शी झाले. पंडित जी म्हणाले, 'इतका संस्मरणीय दिवस यापूर्वी माझ्या पाहण्यात आला नाही. भारताच्या या थोर सुपुत्राचा सन्मान व सत्कार करणारे तुम्ही आम्ही कोण? आपण सारे त्यांच्यापुढे खुजे आहोत. आपण आज इथे जमलो आहोत ते त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी ध्येयावरील अविचल निष्ठा, साधेपणा आणि त्यांना महानता प्राप्त करून देणाऱ्या त्यांच्या इतर गुणांचा निदान अल्पसा अंश तरी आमच्या ठायी निर्माण व्हावा यासाठी त्यांनी आम्हाला स्फूर्ती द्यावी, अशी विनंती करण्यासाठी मी आलो आहे.'

इतर मान्यवरांची भाषणे, मानपत्रे प्रदान करणे, भेटवस्तू अर्पण करणे इत्यादि कार्यक्रम आटोपल्यावर महर्षी कर्वे सत्काराला उत्तर द्यायला उभे राहिले. सर्व श्रोते लक्षपूर्वक ऐकू लागले. हा समारंभ आयोजित केल्याबद्दल त्यांनी संघटकांचे व उपस्थितांचे आभार मानले. आपण ज्या संस्था स्थापन केल्या आणि वाढविल्या त्याचे श्रेय केवळ आपल्या एकट्याचे नसून निष्ठेने साथ देणाऱ्या सर्व सहकाऱ्यांकडे जाते असे महर्षी म्हणाले, यावेळी अण्णासाहेबांना त्यांच्या दिवंगत पत्नी आनंदीबाई ऊर्फ बाया यांची प्रकर्षाने आठवण झाली. त्यांचा गळा दाटून आला. सद्गदित होऊन ते म्हणाले, 'जीवनाच्या वाटचालीत बायाची जेवढी मदत झाली तितकी ती झाली नसती आणि केवळ कौटुंबिकच नव्हे तर माझ्या सार्वजनिक जीवनातील बरीचशी जबाबदारी उचलून तिने माझे ओझे हलके केले नसते तर मला अनेक गोष्टी करता आल्या नसत्या.' शेवटी आपल्याला आपला हा एकशेएकावा वाढदिवस पाहण्याचे भाग्य ज्याच्यामुळे मिळाले त्या परमेश्वराचे त्यांनी कृतज्ञतापूर्वक आभार मानले.

या प्रसंगी आपली शेवटची इच्छा व्यक्त करताना ते खणखणीत आवाजात म्हणाले, 'मला महाराष्ट्र वेगळा झालेला पहायला मिळावा.' अण्णांचे हे वाक्य संपताच

टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. विशेष म्हणजे त्यांच्या हयातीतच गुजरात व महाराष्ट्र ही दोन स्वतंत्र राज्ये त्यांना पहायला मिळाली.

मुंबईत आठवडाभर चाललेल्या या शदाब्दी सभारंभाच्या वेळीच पंडिता रमाबाईंची जन्मशताब्दी सादरी करण्यात आली. महर्षी कव्यपिक्षा केवळ पाच दिवसांनी त्या लहान होत्या. मात्र १९२२ साली ३६ वर्षांपूर्वी त्या स्वर्गवासी झाल्या होत्या. २३ एप्रिल १९५८ च्या त्यांच्या जन्मशताब्दीस सर कावसजी जहांगीर हॉलमध्ये अण्णासाहेब कर्वे उपस्थित होते. त्यावेळच्या केंद्रिय आरोग्यमंत्री राजकुमारी अमृतकौर समारंभाच्या अध्यक्षा होत्या. त्या प्रसंगी केलेल्या छोटयाशा भाषणात अण्णांनी हृदयस्पर्शी शब्दांत पंडिता रमाबाईंना आदरांजली वाहिली. ते म्हणाले, 'माझ्या प्रारंभीच्या कार्यात मला पंडिता रमाबाईंकडूनच स्फूर्ती मिळाली. त्यांचे ऋण मी विसरू शकणार नाही. माझी दुसरी पत्नी आनंदीबाई ऊर्फ बाया ही रमाबाईंच्या शारदासदनाची पहिली विद्यार्थिनी होती. बायाचा माझ्याशी विवाह लावून देण्यात रमाबाईंनी पुढाकार घेतला आणि लग्नानंतर शारदासदनात आमचा सत्कार केला.'

यानंतर ७ मे रोजी अण्णासाहेब कर्वे जन्मशदाब्दिमहोत्सवाच्या शेवटच्या कार्यक्रमासाठी मुरूड ह्या आपल्या मूळगावी गेले. गुरुवर्य अण्णांनी आपले पूर्वायुष्य ज्या ठिकाणी घालवले त्या मुरूड गावात ७ मे १९५८ ते १० मे १९५८ पर्यंत कर्वे जन्मशताब्दिमहोत्सव साजरा झाला.

अण्णांनी भगीरथ प्रयत्न करून भारतीय नारी जगतासाठी त्यांच्या दारी ज्ञानगंगा आणली. उभ्या भारताचे लक्ष या विश्वमानवाकडे लागले. भारतातले थोर नेते अण्णांकडे आशीर्वाद मागण्यासाठी येऊ लागले. अण्णांच्या जीवनातील हे उत्कर्षबिंदू स्तिमित करणारे होते. अशा या मुरूडच्या सुपुत्राचे मोठेपण, त्याचे दूरदर्शित्व आपण जाणले नाही. एका पुनर्विवाहितेशी अण्णांनी दुसरे लग्न केले यासाठी त्यांना प्रखर विरोध करून त्यांच्या समाजसुधारणेच्या कार्याच्या सुरूवातीलाच त्यांचा अक्षरश: छळ केला, त्यांना वाळीत टाकले. हे त्या काळचे आपले वागणे चुकलेच ह्याची जाणीव मुरूडकरांना आता झाली होती. या प्रमादाची जणू प्रशस्त कबुली देण्याकरिताच की काय, मुरूडकरांनी अण्णांचा शंभरावा वाढदिवस मोठ्या थाटाने साजरा केला. अण्णांच्या अपमानाची भरपाई करण्याचा त्यांचा हा प्रयत्न कौतुकास्पद होता. त्यामुळे महर्षींना वृद्धपणी मानसिक सौख्य लाभले.

अण्णांचा हा मुरुडाचा जन्म शताब्दिमहोत्सव कौटुंबिक जिव्हाळा, भव्यता, मार्मिक योजना, वैशिष्ट्यपूर्ण करमणुकीचे कार्यक्रम यांमुळे अनन्यसाधारण झाला अशी उपस्थितांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. या समारंभाची सुरूवात खरे तर ज्या दिवशी अण्णांनी शंभराव्या वर्षात पदार्पण केले त्या १८ एप्रिल १९५७ रोजी मुरूडग्रामसंस्थातर्फे अण्णांना अभिनंदनपर आणि शुभेच्छादर्शक संदेश पाठवून झाली. त्या दिवशी हिंगण्याला



झालेल्या छोट्या समारंभाच्या वेळी मुरूड ग्रामस्थांचे प्रतिनिधी म्हणून पुण्यात स्थायिक झालेल्या वयोवृद्ध श्री. के. भि. जोशी यांनी अण्णांना पुष्पहार घातला. सौ. बायाच्या समाधीलाही पुष्पहार घातला. आणि मुरुडाला नियोजित केलेल्या त्यांच्या शताब्दिमहोत्सवाचे रीतसर निमंत्रण त्यांनी अण्णांना दिले. मुरूडहून त्याचवेळी अभिनंदनाची तार हिंगण्यात आली.

मुरूडकरांच्या या सत्काराच्या निमंत्रणाने आणि अभिनंदनाच्या तारेने अण्णा मनोमन सुखावले. आजचा हा दिवस आपल्या जीवनात उगावलेला अपूर्व सुखाचा दिवस आहे असे अण्णांना वाटले. तारेच्या मजकुरावरून अण्णांनी पुन्हा पुन्हा नजर फिरविली. त्यांचा वृद्ध हात तारेच्या कागदासह भावनोत्कटतेने थरथरु लागला. तारेतला मजकूर असा हाता,

'Kindly accept respectful and hearty congratulations on your hundredth birth-day; Your Villagers are proud of your life-long dedicated work for Indian Woman-hood, for whom your secured a place of honour in society. Indian history will look back your life story with pride. May God spare you for several peaceful and glorious years.'

अण्णांनी मुरूड गावच्या छोट्या परिघातून बाहेर पडून एका विशाल, उदात्त जीवनात प्रवेश केला, तेव्हापासून हा कृश, निर्धन माणूस तपस्व्याच्या निष्ठेने कार्य करीत होता. समस्त स्त्रीवर्गाला प्रतिष्ठेचे जीवन लाभावे, ज्ञानसंपन्न होऊन स्त्रिया स्वावलंबी व्हाव्या आणि शतकानुशतके विळखा घालून बसलेल्या दुष्ट रूढींच्या शृंखलातून समाजाची मुक्तता व्हावी याकरिताच अण्णा आतापर्यंत जगले. महात्मा फुले, आगरकर इत्यादी थोर पुरुषांच्या मालिकेतील हा थोर पुरुष होता. त्यांच्याप्रमाणेच अण्णांना समाजाकडून उपेक्षा, उपहास आणि कित्येकवेळा कडवा विरोध हीच बिदागी मिळाली, पण महर्षी कर्वे मेरूपर्वतासारखे अचल, अभेद्य राहिले. त्यांच्या शताब्दिमहोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन होत होते. समाजमनाचे झालेले परिवर्तन, 'याचि देहि याचि डोळा' पाहण्याचे भाग्य अण्णांना मिळत होते.

शतायुषी अण्णांचा मुरूडच्या दिशेने प्रवास सुरू झाला. अण्णांसाठी वेगळी मोटार होती. त्यांचे चिरंजीव भास्करराव आणि सून कावेरीबाई त्यांच्यासमवेत मोटारीत होते. ती दोघे अत्यंत काळजीपूर्वक अण्णांची जपणूक करीत होती. प्रवास खूप लांबचा होता. रँग्लर परांजपे आणि त्यांची कन्या शकुंतलाबाई परांजपे वेगळ्या मोटारीतून त्यांच्याबरोबर प्रवास करीत होते. मुरूडच्या वाटेवर वाई, दापोली, इत्यादि ठिकाणी अण्णांचे सत्कार झाले. दापोलीच्या मुस्लिम शिक्षण संस्थेने ७ मे रोजी अण्णांना अर्पण केलेले मानपत्र उल्लेखनीय आहे. त्यातील काही भाग असा आहे,

'दापोली शिक्षण संस्थाकी ओरसे भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वेजीकी सेवामें मानपत्र।'

भारतरत्न अण्णासाहेब कर्वेजी। आपके जीवनकी शताब्दिपूर्तिके इस मंगल अवसरपर हम आपका सहर्ष अभिनंदन करते है। आप हमारे तालुकेके नामवर पुरुषरत्न तथा भारतके भाग्यवंत सुपुत्र है। अत: हम अपने आंतरिक हृदयसे और आत्मीयताकी भावनाओंसे परिपूर्ण आपका सुस्वागत करते है।

प्रभुकृपासे भारतीय स्त्री जातीको नवजीवन दिलानेके लिये, उसका उद्धार करनेके लिये, उसका मानसिक और बौद्धिक विकास करनेके लिये, उसे समाजमे आदरास्पद स्थान प्रदान करनेके लियेही आप जैसे प्रतापी, त्यागशील और महान व्यक्तीका भारतमे अवतार हुआ, ऐसी हमारी श्रद्धा है। आपने भारतकी अनाथ, असहाय्य, असीम दु:खी और पतित स्त्री जाती के जीवनमे अपने महान और पुण्य आंदोलनद्वारा ज्यो क्रांती निर्माण की है और इस सत्कार्यके लिये आपने ज्यो प्रदीर्घ और अथक परिश्रमसे घोर कठिनाइयाँ और क्लेश सहे है। ज्यो निरंतर तपस्या की है, ज्यो महायज्ञ प्रारंभ किया और जिसके लिये आपने अपने प्राण, अपना सारा जीवन, और अपने आत्मा को भी सहर्ष अर्पित किया है, स्तुत्य है, वंदनीय है। अत: आदर्श है, और इसके भारतीय स्त्री जातीही नही परंतु समस्त भारत आपका शतवार कृतज्ञ है।

७/५/१९५८

प्रेसिडेंट, मुस्लिम शिक्षण संस्था,
दापोली.)

महर्षी अण्णांसारख्या थोर व्यक्तीच्या सन्मानाचे वेळी सारा समाज स्वत:ची जात, पात, देश, धर्म विसरून एकदिलाने संघटित झाला होता तो असा.)

महर्षी अण्णा कर्वे आणि रँग्लर परांजपे या दोघांच्या मोटारी दापोलीपासून गुलाल अंगावर घेत घेत ७ मे ला संध्याकाळ व्हायच्या आत आसूदच्या पुलापर्यंत येऊन पोहोचल्या. त्यावेळी आसूदच्या पुलावरचे दृश्य कोणालाही भारावून टाकणारे होते. त्या चिमुकल्या जागेत उत्तमोत्तम पोशाख करून पाच हजार स्त्रीपुरुषांचा जमाव उत्स्फूर्तपणे जमला होता. आसूद पुलावर जेथे - मुरूडला जाणारा रस्ता सुरू होतो त्या ठिकाणी आसूदकरांनी सुरूच्या झाडांची खास कोकणी कमान उभारली होती. 'महर्षींच्या शंभराव्या वाढदिवसाचा महोत्सव' हा २५ फूट लांबीचा फलक झळकत होता. मात्र मुरूडकरांना वाटत होते, हा समारंभ महर्षींकरिता नाही, भारतरत्नांकरिता नाही तर हा मुरूडच्या सुपुत्राकरिता, आमच्या थोरल्या भावाकरिता आहे. म्हणून



मुरूडच्या सीमेवर फलक होता, 'तीर्थस्वरूप अण्णांच्या शंभराव्या वाढदिवसाचा महोत्सव.' आरंभापासून अखेरपर्यंत अपूर्व कौटुंबिक जिव्हाळा या गौरव समारंभात जाणवत होता. आपटबारांचा आवाज, गगनभेदी आवाजात होणाऱ्या तुतारीच्या ललकाऱ्या, अण्णांच्या नावाचा जयजयकार यांनी आसमंत दुमदुमून गेला होता. माणसांची रेटारेटी सुरू होती. दापोली, आसूद, कोळथरे, दाभोळ, करंदे, लांडघर, खेड व चिपळूण इत्यादी ठिकाणांहून खास प्रतिनिधी आले होते.

शतायुषी अण्णांचा मुरूडचे वयोवृद्ध ९५ वर्षीय कुणबी ग्रामस्थ, श्री भिकोबा गोळे यांनी स्वागताचा पहिला हार अर्पण करून सत्कार केला. नंतर इतर गावांतर्फे हार घातले गेले. ताशे, वाजंत्री, चौघडा, सनई, ढोल, लेझिम, शिंग यांचा ताफा अग्रभागी होता. त्यांच्यामागे दोन हजार स्त्रिया शिस्तीने चालत होत्या. त्यांच्या पाठोपाठ महर्षींची शृंगारलेली बैलगाडी हळूहळू पुढे सरकत होती. त्यामागे पुरुषांच्या रांगा होत्या. 'आमचे अण्णा चिरायु होवोत' 'मरूडच्या पुत्राचा विजय असो' अशा या घोषणा दिल्या जात होत्या. पुलापासून मुरूडपर्यंत अर्धा मैल अंतर तेव्हा महर्षींना त्रास तर होणार नाहीना असे सर्वांना वाटत होते, पण दादुमियांच्या घरापाशी मुसलमान आयाबहिणींनी अण्णांना अभिवादन केले तेव्हाही अण्णा उत्साहातच होते.

नव्या नगराशी मिरवणूक आली तेव्हा तेथील कमान विशेषच शोभिवंत दिसली. कमानीजवळ पुरूषभर उंचीच्या समया तेवत होत्या. ज्यांना पुलावरून मिरवणुकीत सामील होणे शक्य नव्हते असे अनेक वृद्ध ग्रामस्थ, कमानीपाशी जमले होते. सर्वांनी अण्णांना लवून नमस्कार केले. त्यावेळची अण्णांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता पाहून लोक गहिवरून गेले. या तीन दिवसांच्या समारंभातील सर्वांत संस्मरणीय गोष्ट म्हणजे महर्षींचा उत्साह. गावकऱ्यांची प्रत्येक हौस त्यांनी पुरविली. कशालाही नकार दिला नाही. वस्तुत: बैलगाडीतील धसके, वाद्यांचा कल्लोळ, घोषणांचा जल्लोष हे सारे वयाची १०० वर्षे पूर्ण केलेल्या अण्णांना कसे सहन होईल असे सगळ्या निकटवर्तीयांना वाटत होते. 'अण्णांचा हा उत्साह आम्हाला चकित करतो आहे' अशी कबुलीही त्यांनी दिली.

कर्वे तलावाला वळसा घालून मिरवणूक पुढे सरकत होती. घोषणांचा स्वर उंचावला. प्रवेशद्वार हाकेच्या अंतरावर आले. दूर आपटबारांचे आवाज येत होते. सुरनळे, भुईनळे, अग्निबाण यांची आतषबाजी होत होती. अण्णांच्या भोवती ग्रामस्थांची गर्दी वाढत होती. भाविकतेने सारेजण महर्षींना प्रणाम करीत होते. प्रसन्न मुद्रेने अण्णा त्यांचा स्वीकार करीत होते.

मिरवणूक सभामंडपाशी आली. पाच हजार लोक मावतील एवढा भव्य मंडप लतापल्लवांनी आणि विद्युत्दीपांनी सुशोभित केला होता. एकशे एक सुवासिनी पंचारती घेऊन महर्षींचे स्वागत करायला उभ्या होत्या. दुतर्फा उभ्या असलेल्या सुवासिनींच्या



138284

रांगामधून महर्षींची बैलगाडी निवासस्थानी पोहोचली. अनेक गावकऱ्यांनी अण्णांना चहाला बोलावले. अण्णांनी कोणालाही नाराज केले नाही. थालीपीठ, पन्हे, कोकंब सरबत, कोळाचे पोहे, शहाळ्याचे पाणी, गरे, चहा सर्व काही नैवेद्यासारखे ग्रहण करीत अण्णा घरोघरी गेले. मुरूड गाव पुन्हा एकदा डोळे भरून पहावा असे त्यांना वाटले. उघड्या बैलगाडीतून ते खाडीपासून दुऱ्यापर्यंत फिरून आले. त्यांना फार समाधान वाटले. गावावर प्रेम करावे तर कोकण्यानेच. त्यातही अण्णांचे गावावरचे प्रेम अद्वितीय होते. डोळस होते. मुरूडच्या समारंभावर अण्णा मनापासून संतुष्ट झाले होते. प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा त्यांनी अट्टाहास केला. रात्री एक-दीड पर्यंत जागरण झाले त्याची फिकीर त्यांनी केली नाही.

८ मेला गावोगावचे विद्वान ब्राह्मण मृत्युंजय शांतीसाठी आले होते. तीन तास विधी चालला होता. त्याचवेळी मुरूड गावातील प्रत्येक घरी मुंबईच्या स्वादिष्ट मिठाईचा पुडा वाटला जात होता. प्रत्येकाचे तोंड गोड झाले होते. मुरूडच्या इतिहासात घडले नव्हते असे शुभकार्य गावात सुरू झाले होते. त्याच दिवशी दुपारी महर्षींच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ, उपस्थितांच्या कायम स्मरणात राहील असा झाला.

दुपारचे चार वाजले होते. मंडप अक्षरश: दुथडी भरून गेला होता. त्या दिवशी अवघ्या महाराष्ट्राची संपदा व्यासपीठावर एकत्रित झाली होती. नागपूरचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती नियोगी, भारतातील पहिले रँग्लर र. पु. परांजपे, महामहोपाध्याय अण्णासाहेब काणे, सत्कारमूर्ती भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे, भारतीय स्वातंत्र्य युद्धातील एक झुंजार तपोवृद्ध सैनिक पूज्य सेनापती बापट, ध्येयनिष्ठ समाजवादी नेते एस्. एम्. जोशी, पंडित महादेवशास्त्री जोशी, कविवर्य विं. दा. करंदीकर साहित्यिक गो. नी. दांडेकर, नाट्य समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी इत्यादी विविध क्षेत्रांतील अधिकारी व्यक्तिमत्वे व्यासपीठावर विराजमान झाली होती.

वैदिक प्रार्थनेने कार्यक्रमास सुरुवात झाली. साहित्य वाचस्पती गो. नी. दांडेकर यांनी सत्कार समारंभासाठी रचलेल्या खास स्वागतगीताला श्री. द. अ. गोडबोले यांनी स्वरबद्ध केले होते. त्या गीतातील काही ओळी –

*व्हा पुढे महर्षी, दिव्य कीर्तिमंदिराकडे ॥ धृ ॥*
*जीवन ज्या होय शाप*
*नुरला कुणी मायबाप*
*अबलांच्या मार्गावर घातिले तुम्ही सडे ।१।*
*जननिंदा साहिलीत*
*शिरि विपदा वाहिलीत*
*विष पिऊनी अमृतघट ठेविला अम्हांपुढे ।२।*



*हे तुमचे भव्य दान*
*जणु वैदिक सामगान*
*झडती हे स्मरुनि आज अंबरात चौघडे ।३।*

भारताच्या कानाकोपऱ्यातून शुभसंदेश आले होते. सर्वोदयनेते आचार्य विनोबा भावे, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, अर्थतज्ज्ञ डॉ. सी. डी. देशमुख, श्री. यशवंतरावजी चव्हाण, डॉ. बाळकृष्ण केसकर, न्यायमूर्ती छगला, श्री. हितेंद्र देसाई, श्री. कन्नमवार, डॉ. झाकीर हुसेन, राज्यपाल हरिभाऊ पाटसकर, पंडित सातवळेकर, उद्योगपती शं. वा. किर्लोस्कर आणि समारंभाला येऊ न शकलेले मुरूडकर इत्यादींच्या संदेशाचा समावेश होता. त्यांपैकी काही उल्लेखनीय संदेश असे.

आचार्य विनोबा भावे - मुरूडला पूज्य अण्णासाहेब कर्वे यांचा अर्धपुतळा आदरणीय सेनापती बापट यांच्या हस्ते उघडला जाणार फार सुंदर योग. ग्रामदानाचा विचार जर मुरूडकरांनी तालुकाभर पसरविला तर पूज्य अण्णांचे किती रमणीय स्मारक होईल!

यशवंतरावजी चव्हाण - महर्षी कर्व्यांचा शताब्दिमहोत्सव ही मुरूड गावच्या जीवनातील स्फूर्तिदायक, हृदयस्पर्शी अशी घटना आहे. महर्षींच्या थोर कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या महोत्सवासाठी माझ्या शुभेच्छा.

श्री. शं. वा. किर्लोस्कर - महर्षी कर्व्यांसारख्या व्यक्ती स्वत:बरोबर आपल्या संस्थेचे, आपल्या सहकाऱ्यांचे व आपल्या गावाचे नावही इतिहासात चिरंतन करून ठेवतात.

Dr. C. D. Deshmukh - Maharshi Karve's life will always remain as a classic example of unerring choice of a good and unwavering persuit of it with a devotion and grace almost unknown in these days. It is our great good fortune that he is with us to guide and inspire like sages of old.

अशा अनेक महत्त्वाच्या संदेशांच्या वाचनानंतर, 'शतायुषी अण्णासाहेब कर्वे गौरव-समिती, मुरूड'चे अध्यक्ष श्री. शं. दा. मोरे यांनी आपल्या स्वागतपर भाषणात म्हटले, 'पूज्य सेनापती बापट आणि तीर्थस्वरूप अण्णा यांच्या रूपाने महाराष्ट्राची सत्त्वशीलता, सेवाधर्म आणि सद्भाव यांचे या ठिकाणी आपल्याला दर्शन घडत आहे. उभ्या महाराष्ट्राकरिता अविश्रांत श्रम घेत असलेले आपले एस्. एम्. येथे उपस्थित आहेत. महाराष्ट्राची बुद्धिमत्ता व बुद्धिवाद डॉ. अप्पासाहेब परांजपे यांच्यारूपाने या ठिकाणी आला आहे. आजचे मराठी साहित्य ज्यांच्या समर्थ खांद्यावर उभे

आहे असे काही थोर साहित्यिक आपल्याला येथे दिसतील, रोहिणीबाई भाटे आणि योगिनीबाई जोगळेकर यांच्यासारख्या गुणवती कलोपासक येथे उपस्थित आहेत. दूरवरचे मुरूडकर मोठ्या आस्थेने जमले आहेत. अशा या संमेलनाला अपूर्व म्हणावे लागेल.

'आजच्या या समारंभाची आणखी एक अपूर्वाई म्हणजे रूढीभंजनामुळे ती स्व. अण्णांना सर्वांत प्रखर लोकक्षोभाला तोंड द्यावे लागले ते मुरुडलाच आणि मुरुडात कालपासून ती. स्व. अण्णांचे स्वागत अत्यंत प्रेमभराने होत आहे. एक अपूर्वाई म्हणजे थोरांचे, गुणीजनांचे, त्यांच्या मूळगावी क्वचितच कौतुक होतांना पहायला मिळते ते आज मुरुडात होत आहे. थोर पुरुषांना जन्म देण्यात रत्नागिरी जिल्हा प्रसिद्ध आहे. आमच्या दापोली तालुक्याचा वाटा यात फार मोठा आहे. लो. टिळक, गोखले, साने गुरूजी, दीक्षित, रँ. परांजपे, ती. स्व. अण्णासाहेब कर्वे ही अगदी सहज समोर येणारी नावे आहेत. कोकणाला निसर्गाने भरभरून सृष्टिसौंदर्य दिले असले तरी इथले जग जगण्याच्या फिकीरीत असते. त्याला आर्थिक बळ नसते. अशा या पार्श्वभूमीवर आजचा समारंभ होत आहे तेव्हा ती. स्व. अण्णांविषयी आमच्या जिव्हाळ्याच्या, कृतज्ञेच्या भावना किती खोल आहेत याची तुम्हाला कल्पना येईल.'

त्यानंतर समारंभाचे अध्यक्ष सेनापती बापट यांच्या शुभहस्ते हार घातलेल्या महर्षींच्या अर्धपुतळ्याचे सनईच्या मंगलसुरात, टाळ्यांच्या गजरात अनावरण करण्यात आले. यानंतर मोजकी भाषणे झाली. रँग्लर परांजप्यांना अण्णांनी पूर्वायुष्यात मुरुडात जे लोकक्षोभाचे चटके सोसले त्याची आठवण येऊन गहिवरून आले. 'आपण आज जे काही आहोत त्याचे सर्व श्रेय ती. स्व. अण्णांना आहे. सामाजिक जीवनाचा श्रीगणेशाही आपण अण्णांकडूनच शिकलो.' असे ते म्हणाले. 'या समारंभाच्या निमित्ताने अण्णांसारखी आणखी माणसे निर्माण करण्याची जबाबदारी मुरूडकरांवर येऊन पडली आहे.' असे न्यायमूर्ती नियोगी म्हणाले.

सेनापती बापट आणि महर्षी कर्वे यांच्या संदर्भात महामहोपाध्याय अण्णासाहेब काणे म्हणाले, 'रत्नागिरी जिल्ह्याने हे दोन प्रचंड पुरूष निर्माण केले. एकाने राजकीय क्रांतीची पेटती मशाल धगधगत ठेवली. दुसऱ्याने विरोधकांच्या वादळातही सामाजिक क्रांतीची ज्योत तेवत ठेवली.'

पंडित महादेवशास्त्री जोशी म्हणाले, 'महर्षी कर्वे हे महाराष्ट्राच्या चारित्र्याचे प्रतिक आहे.'

या समारंभात पुण्याहून आलेल्या सौ. सुधाबाई सांगवीकर आपल्या छोट्याशा भाषणात म्हणाल्या, 'मी स्वत: पुनर्विवाहित महिला आहे. अशा स्त्रियांची दु:खे काय असतात आणि ती. स्व. अण्णांबद्दल अशा स्त्रियांच्या भावना किती आदराच्या असतात हे शब्दात सांगणे कठीण आहे.' त्यांचे भाषण इतके हृदयस्पर्शी झाले की, सर्व लोक हेलावून गेले.



मुरूडकरांनी थाटामाटात साजऱ्या केलेल्या जन्मशताब्दिमहोत्सवाचे वेळी उत्तरादाखल केलेल्या छोट्याशा भाषणात अण्णा म्हणाले, 'मुरूड हा माझा गाव. त्या गावाविषयी मला नेहमीच अतिशय प्रेम वाटत आले आहे. मुरूडमध्ये सध्या निर्माण झालेली संघटना व चैतन्य असेच वाढत जावो हीच माझी इच्छा व हाच माझा आशीर्वाद.' थोर मनाच्या अण्णांनी मुरूडमध्ये एकेकाळी अनुभवलेल्या कटु अनुभवांचा उच्चार करणे मात्र टाळले होते.

याच वेळी आसूद पूल ते मुरूड या रस्त्याचे 'महर्षी अण्णासाहेब कर्वे रस्ता' असे नामकरण झाल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले. अध्यक्षांनी, श्री. वा. रा. गानू लिखित, 'मुरूड, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक' या ग्रंथाचे प्रकाशन केले. श्री. ना. गो. चापेकर, श्री. न. र. फाटक, श्रीमती दुर्गाबाई भागवत, श्री. य. न. केळकर इत्यादी मान्यवर साहित्यिकांनी ग्रंथाची प्रशंसा केली. हा ग्रंथ, १०१ रु. आणि मुरूड प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे जमविलेले पैसे असा आहेर ती. स्व. अण्णांना अध्यक्षांच्या हस्ते अर्पण करण्यात आला. त्यानंतर मुरुडातील एका व्यक्तीचा अपूर्व सत्कार झाला तो म्हणजे अण्णांच्या खालोखाल वृद्ध असलेल्या ९५ वर्षे वयाच्या श्री. भिकोबा गोळे यांचा. ध्यानीमनी नसताना गळ्यात हार घालून घेताना भिकोबा गडबडून गेले. त्या निरक्षर पण नेकीच्या ग्रामस्थाला या प्रसंगी कसे वागावे काही कळेना. शेवटी महर्षींच्या पाया पडून ते जागेवर जाऊन बसले. त्यानंतर मुरुडातल्या व आसपासच्या अनेक गावांतील विविध संस्थांतर्फे अण्णांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

रात्री ८ वाजता अण्णांच्या चरित्रदर्शनाने करमणुकीच्या कार्यक्रमांना सुरूवात झाली. या लघुपटाद्वारे अण्णांच्या जीवनातील ६५ वर्षांचा कालखंड प्रेक्षकांपुढून सरकत होता. चित्रपटातील काही भाग खुद्द मुरूडमध्ये चित्रित झाला होता. एकेकाळी मुरूड गावाने अण्णांना केलेला प्रखर विरोध पाहून प्रेक्षकांचे डोळे पाणावले.

खेड, केळशी, आंजर्ले, दाभोळ इतक्या लांबून समारंभाकरिता गर्दी लोटली होती. मुरूड गावाला एखाद्या प्रचंड जत्रेचे स्वरूप आले होते. एस्. टी. बसेस, खाजगी मोटार, बैलगाड्या यांची रीघ लागली होती. तात्पुरत्या उभारलेल्या हॉटेल्समध्ये आणि शहाळी व खेळणी यांच्या दुकानांत त्या छोट्या गावी गर्दी मावत नव्हती. रात्री ९ वाजता मंडप तुडुंब भरला होता. प्रवेश मिळावा म्हणून प्रवेशद्वारापाशी शेकडो लोक ताटकळत उभे होते. स्वयंसेवकांची धावपळ चालली होती. ह.भ.प. कदमबुवा यांचे भजन, मृदंगवादन आणि सौ. मंडलिक आणि आशा गवाणकर यांनी सादर केलेला नृत्याचा कार्यक्रम झाला. यानंतर योगिनीबाई जोगळेकरांचे गाणे झाले. बाईंनी पेश केलेल्या गाण्यांनी श्रोतृवृंद डोलत होता. अफाट गर्दीमुळे अण्णा गाण्याला हजर राहू शकले नाहीत. त्यांनी योगिनीबाईंना निरोप पाठविला. 'गर्दीमुळे काल येता

आले नाही, पण गाणे ऐकण्याची इच्छा आहे.' मग दुसरे दिवशी त्यांच्या निवासस्थानी जाऊन योगिनीबाई अण्णांसाठी तासभर गायल्या.

९ मेला महिला दिन साजरा झाला. एकशे एक पावल्यांची थैली स्थानिक महिलांनी अण्णांना अर्पण केली. अण्णांनी महिलांना उद्देशून खणखणीत आवाजात अर्धातास भाषण केले. हळदीकुंकू आणि करमणुकीचे कार्यक्रम झाले.

त्याच दिवशी तालुक्यातील बागाईतदारांनी फळप्रदर्शन भरविले, त्याला व रांगोळी प्रदर्शनाला खूप गर्दी होती. रात्रीचे रोहिणीबाईंचे नृत्य म्हणजे प्रेक्षकांना अपूर्व दर्शन होते. अण्णा नृत्य पहायला पूर्णवेळ उपस्थित होते. मधून मधून हाताने ताल धरून कार्यक्रमाला ते रसिकतेने दाद देत होते.

१० मेला कोकणचे खास सांस्कृतिक कार्यक्रम झाले. बोणे कोंडातील ग्रामस्थांनी अण्णांच्या जीवनावर रचलेले गाणे सांघिक नृत्यासह सादर केले. रात्री 'लग्नाची बेडी' या नाटकाचा प्रयोग झाला. त्या दिवशी गर्दीने उच्चांक गाठला होता. स्त्रियांच्या भूमिकेत स्त्रियांनी केलेला हा नाट्यप्रयोग मुरूडच्या रंगभूमीवर प्रथमच सादर होत होता. प्रेक्षकांना नाटक फार आवडले.

हा आठवडा मुरूडच्या इतिहासात अपूर्व होता. प्रत्येक घरात सुमारे २५-३० पाहुणे तर होतेच, पण एका घरी तर १०० पाहुणे उतरले होते. शताब्दीच्या वेळीच ६ मे पर्यंत मालवणला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होते. अनेक साहित्यिकांनी मुरूडच्या समारंभाला येण्याची इच्छा प्रदर्शित केली होती, पण एक दिवसात लांबचा पल्ला गाठणे त्यांना अशक्य झाले. तरीही श्री. माधव मनोहर, सौ. मनोहर, प्रा. रा. भि. जोशी, सौ. सुधाताई जोशी इत्यादी साहित्यिक आवर्जून आले होते. पण त्यांना ८ मे ला मुरूडला पोहोचेपर्यंत रात्रीचे १० वाजले होते.

केसरी, लोकसत्ता, तरूणभारत, मराठा, नवशक्ती, नवाकाळ, मौज, साधना, चंद्रोदय, बलवंत इत्यादी महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी समारंभाचे सविस्तर वृत्त दिले होते. केसरीतल्या वृत्तात महादेवशास्त्रींचे उद्‌गार छापले होते, 'इतका मोठा अन् घरगुती जिव्हाळ्याने स्निग्ध झालेला समारंभ माझ्या तरी पाहण्यात नाही.'

भरगच्च कार्यक्रमांनी साजऱ्या झालेल्या शताब्दिमहोत्सवानंतर मुरूड गावाचा निरोप घेताना अण्णांचे अंतःकरण कोमल भावनांनी गलबलून गेले. त्यांची मोटार पुण्याकडे धावत होती. त्यांचे मन मुरूडभोवती रेंगाळत होते. त्यांच्या डोळ्यापुढे एकेक दृश्य उभे राहू लागले. आठवणींना भरती आली.

अण्णांना पुनर्विवाहित जीवनातले पहिले दिवस आठवले. त्यावेळी पत्नीसमवेत ते मुरूडला पहिल्यांदा आले होते त्यावेळी घराच्या आवारातल्या गोठ्यात कंठलेले दिवस, ग्रामस्थांनी दिलेली शूद्रासारखी वागणूक, बहिष्कृत करणारी गावकीची बैठक, आई व अंबाताई यांची त्यावेळची अत्यंत शोचनीय अवस्था, आपल्या बरोबर आपल्या



गावी प्रथमच आलेल्या आपल्या पत्नीची - आनंदीबाईंची घुसमटलेली अवस्था, त्यांच्या प्रिय वडिलबंधूंची झालेली अतिशय दयनीय अवस्था, आपल्या घराचे, प्रियजनांचे प्रेमपाश तोडायला लावणारे सारे कटू प्रसंग त्यांना आठवले. आपल्या शेजारच्याच घरात राहणारी लहानपणीची खेळगडी राधा की जिने अण्णांचे प्रथम पत्निपद भूषविले होते आणि अण्णांचे मुंबईतील कष्टमय जीवन आपला देह झिजवून सुसह्य केले होते, त्या राधाबाईची सर्वप्रथम आठवण झाली. आनंदीबाई ऊर्फ बायाची आठवण तर पदोपदी येत होती.

पण या सर्व आठवणींचा ठेवा आवरून नीट जपून ठेवत, त्या सर्वांची दुःखदायक कड बोथट करून टाकणाऱ्या गेल्या तीन दिवसांतल्या मुरूडातल्या भव्य सत्काराची, फक्त सुखाचा वर्षाव करणारी शेवटची आठवण बरोबर घेऊन जाऊन सदैव ताजी ठेवण्याचा निश्चय अण्णांनी केला.

'Any thing is good that ends good.' असे आपल्या हळुवार झालेल्या अंतःकरणाला अण्णांनी बजावले, आणि रत्नागिरी जिल्ह्याची सरहद्द ओलांडली.

१८ एप्रिल १९५८ ला अण्णांची प्रतिमा असलेले पोस्टाचे तिकीट भारत सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यात आले.

भारत सरकारने ''डॉ. कर्वे यांची कथा' हा त्यांच्या जीवनाचे व कार्याचे दर्शन घडविणारा अतिशय सुंदर माहितीपट काढून तो सर्व भारतभर दाखविण्यात आला.

मुंबई येथील महर्षी कर्वे जन्मशताब्दि समितीने अण्णांचे इंग्रजीतील आत्मचरित्र 'Looking Back' पुनर्मुद्रित केले.

१८९९ साली अण्णासाहेबांनी ५००० रुपयांचा विमा उतरविला होता, व त्यांच्या पश्चात् विम्याची रक्कम हिंगणे येथील अनाथबालिकाश्रमाच्या नावे लिहून दिली होती. एल्.आय.सी. च्या नियमाप्रमाणे रक्कम अण्णांच्या मृत्यूनंतरच आश्रमाला मिळू शकली असती, परंतु आयुर्विमा महामंडळाने एक खास ठराव करून ती रक्कम त्यांच्या शताब्दीच्या सुमारास बालिकाश्रमाच्या स्वाधीन करण्याचा निर्णय घेतला.

महर्षी कर्वे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य होते. या सोसायटीकडेही त्यांची ३००० रुपयांची विमा पॉलिसी होती. तीही रक्कम अण्णांच्या पश्चात् त्यांच्या वारसांना मिळणार होती. सोसायटीने ते विमापत्र जन्मशताब्दिच्या निमित्ताने अण्णासाहेबांच्या स्वाधीन केले. ती रक्कमही अण्णांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला अर्पण केली. सर्व बाजूंनी महर्षींबद्दल आदर व्यक्त होत होता.

■ ■ ■

# १४ / महर्षींचे महाप्रयाण

मुरूडहून परतल्यावर अण्णांच्या दैनंदिन कार्यक्रमात त्यांना काहीही बदल करावा लागला नाही. पहाटे दूर फिरायला जाणे मात्र सोडून द्यावे लागले. घरापुढील बागेतच ते फेऱ्या मारत. थोडा अशक्तपणाही आता जाणवू लागला होता. अण्णा आपले चिरंजीव दिनकरराव यांच्याकडे रहात. स्वत: दिनकरराव आणि त्यांची पत्नी इरावतीबाई अण्णांना फार जपत असत.

जेवणासंबंधी त्यांच्या काही खास आवडी - निवडी नव्हत्या. सर्वांकरिता जे पदार्थ केले असतील ते त्यांना चालत. दोनदा जेवण व दोनदा चहा येवढ्याच त्यांच्या गरजा होत्या. रात्री त्यांना चांगली झोप लागे. रेडियो ऐकणे व वाचन करणे या दोन गोष्टींशिवाय त्यांना चैन पडत नसे. लग्न, मुंजी, बारशी, वास्तुशांत इत्यादी घरगुती समारंभांना जायला त्यांना फार आवडत असे. अशावेळी चार चौघांना अनायसे भेटता येते असे ते म्हणत. मात्र कुटुंबियांना स्वत:चे इतर कार्यक्रम असतील त्यावेळी घरी एकटे रहावे लागले तरी त्यांची तक्रारही नसे.

२९ ऑक्टोबर रोजी 'भारतरत्न' हा भारत सरकारने पूर्वी जाहीर केलेला सर्वोच्च बहुमान स्वीकारण्यासाठी दिल्लीला राष्ट्रपती भवनात अण्णा उपस्थित राहू शकले. पुढे पुढे मात्र त्यांना कमी दिसू लागले, ऐकूही कमी येऊ लागले. मग वाचन बंद झाले आणि रेडिओही फार मोठ्याने लावावा लागे.

१९५९ साली अण्णांना हिंगण्याला रहायला जावे लागले. कारण सौ. इरावतीबाई आणि दिनकरराव या दोघांनाही अमेरिकेत पाहुणे प्राध्यापक म्हणून निमंत्रण आले होते. मूळ झोपडीतल्या खोलीत आता अण्णांची रहायची सोय केली. समोरच भास्कररावांचे निवासस्थान होते. जेवण, खाणे, चहा यांसाठी ते घरी येत. विश्रांतीसाठी झोपडीत जात. संस्थेच्या मैदानावर थोडे फिरायला जात.

एकशे एक वर्षांचे वय झाल्यानंतर अण्णांवर अचानक शस्त्रक्रिया करायची पाळी आली. डॉ. के.सी. घारपुरे यांनी फार कुशलतेने ऑपरेशन केले. तीन महिने



हॉस्पिटलमध्ये राहिल्यावर अण्णांची प्रकृती हळूहळू सुधारली. पाच महिन्यांत ते पूर्ण बरे झाले. कावेरीबाईंनी सासऱ्यांची शुश्रुषा फार आस्थेने केली. अण्णांना बरे वाटल्यावर त्या वर्षीची दिवाळी आनंदाने साजरी झाली.

ऑपरेशननंतर तीन वर्षे अण्णा हिंडते-फिरते होते. त्यांची प्रकृतीही चांगली होती. त्यांचे सकाळ-संध्याकाळचे चालणे मात्र थांबले. तेव्हा त्यांना कंटाळवाणे होऊ नये म्हणून प्रिमिअर ऑटोमोबाइल्सच्या श्री. लालचंद शेटजींकडे फियाट गाडी मिळण्यासाठी बोलणे निघाले असता त्यांनी एक गाडी संस्थेला दिली. फक्त सरकरी कर भरावा लागल्यामुळे गाडी संस्थेला निम्म्या किमतीत मिळाली. उद्यम मंडळाचे सामान आणणे, तयार माल पोहोचविणे अशी कामे असत तेव्हा ती कामे अण्णांना फिरायला न्यायच्यावेळी केली जात. पुष्कळदा स्वत: भास्कररावच गाडी चालवत.

अण्णांना भेटण्यासाठी सतत कोणीतरी येत असे. १९६१ साली राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद पुणे भेटीच्या वेळी अण्णांना भेटण्यासाठी आवर्जून हिंगण्याला आले होते. राज्यपाल श्री. श्रीनिवास १९६२ साली सेवानिवृत्त झाल्यावर पुन्हा अण्णांची भेट घेऊन गेले.

'आलमगीर' साप्ताहिकात सौ. मालतीबाई बेडेकरांनी अण्णांच्या वृद्धत्वाचे चित्रण मोठ्या मार्मिकतेने आणि सहृदयतेने केले होते. त्या लेखाचा थोडक्यात आशय असा,

'..साठी ओलांडली की स्वत:ला म्हातारे समजू लागणाऱ्या लोकांचे म्हातारपण आणि शंभरीच्या पुढे गेलेल्या अण्णांचे म्हातारपण यांत निश्चित फरक होता. एवढ्या वयाला अण्णांची प्रकृती निकोप होती. अण्णांचे म्हातारपणीही सुज्ञ होते. अण्णांनी आपल्या जीभेवर ताबा ठेवला होता. आयुष्यभर सतत काम करूनही 'मी असे केले ....तसे केले' असा आपला भूतकाळ रंगवून सांगत, त्यांनी दुसऱ्याला कधी कंटाळा आणला नाही. अण्णा स्वत: अबोल होते. आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी ज्या व्यक्तीशी काम असेल तिच्याशीच ते त्याच विषयावर बोलत असत. एऱ्हवी राजकारण, साहित्य, समाजकारण यावर लंब्याचवड्या गप्पा त्यांनी कधी कुणाशी केल्या नाहीत. त्यामुळे, 'माझी उपेक्षा होतेय. माझ्याशी कुणी बोलत नाही' अशी त्यांची कधी तक्रार नसायची. एकटेपण त्यांना कधी वाटले नाही. लोक अण्णांना गाडीत घालून आदराने सभांना नेत, अण्णा आनंदाने जात. पण, 'अर्ध्या तासापेक्षा अण्णांना सभेत बसवून घेऊ नका अशी अण्णांच्या सुनामुलांची ताकीद असे.' गंमत अशी की जितका वेळ सभा चालेल तितका वेळ अण्णा स्वत:हून तिथे बसत. समोरचा समाज बघून जुन्या काळातील आपल्या गाजलेल्या सभांच्या आनंदाचा पुन:प्रत्यय त्यांना मिळत असावा. शंभरीतही त्यांची बुद्धी नाठी झाली नाही. 'आता कंटाळा आला आहे' असे म्हणून त्यांनी दुसऱ्याला कधी उदासवाणे केले नाही.'

शेवटच्या सहा महिन्यांत तर अण्णा आपल्या नाती पणतीत वेळ घालवीत. त्या त्यांना बाळमुठीतून आपला खाऊ देत. अण्णा जे बोलत ते त्या ऐकत रहात. कधी दीड दोन वर्षांची पणती त्यांच्या कानात काही गंमत सांगे. पणजोबांना ऐकू येत नाही हे तिला कळत नसे.

(शेवटी शेवटी अण्णा एकटेच विचार करीत बसत. आपल्या प्रदीर्घ आयुष्यातील अनेक घटना व प्रसंग त्यांना आठवत असत. मानवाचा इतिहास, पृथ्वीची उत्क्रांती आणि इतर कैक विषयांबद्दल यापूर्वी जे वाचले होते ते त्यांना आठवायचे. मग ते एकट्याशीच मोठमोठ्याने बोलत. केव्हा केव्हा बऱ्याच वर्षांपूर्वी गणिताच्या वर्गात शिकविलेला पाठ ते म्हणत तर कधीकधी मराठी आणि संस्कृत भाषेतल्या मुखोद्गत केलेल्या कवितेच्या ओळी मोठ्याने म्हणत. रात्रीच्या वेळी त्यांच्या बोलण्याने घरातल्या इतरांची झोपमोड होई आणि त्यांना अण्णांच्या प्रकृतीबद्दल चिंता वाटू लागे.)

(अचानक एक दिवस अण्णांना आजार उद्भवला. हे आजारपण अवघ्या साठ तासांचे ठरले. सात नोव्हेंबरला रात्री अण्णांच्या पोटात दुखू लागले. डॉ. यशवंतराव फाटक यांनी इलाज केल्यावर थोडाफार गुण दिसू लागला. त्या रात्री ते एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर कोणाची मदत न घेता वळू शकल्याचे पाहून सर्वांना धीर आला व सुधारणा होण्याची आशा वाटू लागली. परंतु ती क्षणिक ठरली. वाढत्या रात्रीबरोबर अण्णांच्या जिवाची तगमग वाढली. आश्रमात असलेल्या आप्तस्वकीयांचा, हिंगण्याच्या माळावर उभ्या असलेल्या वास्तूंचा आणि ज्या जगात दीर्घकाळ वास्तव्य घडले त्या जगाचा अण्णा मनोमन निरोप घेऊ लागले.)

('मला दुसऱ्या कुशीवर वळू द्या. मला तेथे जायचे आहे.' असे ते म्हणू लागले. आश्रमातल्या सर्व माणसांची झोपडीच्या दारातून ये-जा सुरू झाली. कुणीतरी अण्णांसाठी चहा आणला. अण्णांनी घोटभर चहा घेतला आणि कारभार आटोपला. ती ९ नोव्हेंबरची सकाळ उजाडलेली होती. हिमालयासारखे उत्तुंग व्यक्तिमत्त्व विलीन झाले होते. अण्णांचा चेहरा शांत होता. त्या कर्मयोग्याच्या चेहऱ्यावर कृतकृत्यतेचे समाधान दिसत होते.)

(अण्णांच्या मृत्यूचा सोहळासुद्धा एखाद्या मोठ्या समारंभाप्रमाणे झाला. हिंगण्याहून अण्णांच्या मृत्यूची वार्ता वाऱ्यासारखी देशभर पसरली. त्या दिवशी दिवसभर हे वृत्त अंतराअंतराने रेडिओवरून प्रसारित करण्यात आले. अण्णांचे चिरंजीव डॉ. शंकर कर्वे हे दूर आफ्रिकेत होते. दिनकरराव व इरावतीबाई महाबळेश्वरला होते. संस्थेचे त्यावेळचे चिटणीस श्री. बापू पालकर अण्णांच्या निधनाचे वृत्त कळविण्यासाठी तीन-चार तास फोनजवळ बसलेले होते. अण्णांची नातेवाईक मंडळी, संस्थेशी संबंधित मंडळी, रेडिओ स्टेशन, वृत्तपत्रे सर्वांशी संपर्क साधला जात होता. दूरच्या लोकांना फोनोग्रॅम्स होत होते.) पालकरांच्या पुढे कामाचे ढीग होते. पहिली गोष्ट म्हणजे अण्णांच्या



दहनाची व्यवस्था करावयाची होती. त्याकरिता पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांची परवानगी काढावी लागली. त्यांना फोन केल्याबरोबर ते स्वत: हिंगण्यास आले. त्यांनी तिथेच लेखी परवानगी दिली. (मोठी अंत्ययात्रा काढून अण्णांचा अंत्यविधी पुण्यात करावा अशी पुण्यातल्या लोकांची फार इच्छा होती. निरनिराळ्या लोकांकडून ती प्रकट होत होती. पण संस्थेतील मंडळींच्या विचाराने अण्णांच्या कर्मभूमीतच अंत्यविधी व्हावा असे ठरले. संस्थेच्या आवारातच ज्या ठिकाणी सौ. आनंदीबाई कर्वे यांचे दहन झाले होते - त्याच्या शेजारीच वटवृक्षाखाली अण्णांना अग्नी देण्याचे निश्चित करण्यात आले. त्याप्रमाणे १० नोव्हेंबरला सकाळी अंत्यविधी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. अण्णांचा पार्थिव देह ९ नोव्हेंबरच्या सकाळपासून १० नोव्हेंबरच्या सकाळी ९ पर्यंत अंत्यदर्शनासाठी इचलकरंजी सभागृहात ठेवण्यात आला होता.)

पुण्यातून अण्णांच्या अंत्यदर्शनासाठी माणसांची रीघ लागली होती. बसेस, मोटारी, सायकली, स्कूटर्स जमेल त्या वाहनांनी माणसे येत होती. जणू काही माणसांचा अखंड प्रवाह चालू होता. प्रत्येकजण महर्षींना वंदन करून डोळे पुसत पुढे सरकत होता. ९ तारखेला दिवसभर हिंगण्याच्या आश्रमाचा परिसर माणसांनी फुलून गेला होता. त्या रात्री हिंगणे गावातील लोकांनी अण्णांच्या पायाशी बसून भजन केले.

दहनाची सर्व व्यवस्था झाली होती. अंत्ययात्रेसाठी आदल्या दिवशी संध्याकाळपासूनच गाडा फुलांनी सजवून तयार ठेवला होता. लोकांनी आपण होऊन गाडा ओढण्याची तयारी दर्शविली. फोटो घेणाऱ्यांनी गर्दी केली होती. (सकाळी ९॥ वाजता अंत्ययात्रेस आरंभ झाला. गाड्याच्या दोराला आपला हात लागावा म्हणून लोकांची धडपड चालू होती. गावकऱ्यांचे भजनीमंडळ अग्रभागी होते. अण्णांचा पार्थिव देह माळरानावरच्या मूळच्या झोपडीसमोर आणण्यात आला. महाराष्ट्र सरकार व इतर अनेकांतर्फे पुष्पचक्र व पुष्पहार घालण्यात आले. नंतर मिरवणूक क्रीडांगणावरील दहनभूमीजवळ आली. खूप माणसे अगदी शांतपणे बसून होती.)

( त्या ठिकाणी शोकसभा घेण्यात आली. रँग्लर परांजपे, लेडी प्रेमलीला ठाकरसी, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, श्री. एस्.एम्. जोशी, ना.म. आठवले, कविवर्य मायदेव, सीताबाई अण्णेगिरी इत्यादी अनेकांनी श्रद्धांजली वाहिली. आचार्य अत्रे मुद्दाम मुंबईहून आले होते. त्यांचे भाषण फार हृदयस्पर्शी झाले. राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे शोकसंदेश वाचून दाखविण्यात आले.)

(पंडित नेहरूंनी दुखवटयाच्या संदेशात म्हटले होते, 'डॉ. कर्वे आज आपल्यात नाहीत, परंतु त्यांचे दीर्घकालीन जीवन म्हणजे प्रचंड अडचणी ओलांडून त्यावर निश्चयपूर्वक केलेली मात आणि त्यामुळे मिळालेली यशसिद्धी यांची गौरवशाली गाथा आहे. ते सर्वार्थाने एक थोर पुरूष होते. भारताला त्यांचा अभिमान असून त्यांची स्मृती चिरंतन राहील.') कोणीतरी म्हटले होते, 'माणसाचे जीवन सर्वप्रकारे संपन्न

**असले तरी त्याच्या मरणावरून** त्याच्या भाग्याचा कस ठरतो.' (कै. अण्णांही नेहमी **म्हणायचे माणसाला**, 'अनायासेन मरणं, विनादैन्येन जीवनम्' मिळावे. अण्णांचे म्हणणे **परमेश्वराने** ऐकले होते.)

डॉ. हरी रामचंद्र दिवेकर यांनी अखेरचे मंत्र म्हटले. यथाविधी अग्निसंस्कार झाला. एवढी गर्दी जमली होती पण त्यात ज्या विद्यार्थिनींवर अण्णांचे अपत्यवत् प्रेम केले त्यांची संख्या शाळेला सुट्टी असल्यामुळे फारच थोडी होती. बाकीची मंडळी हळूहळू आपापल्या घरी परतली. तोवर दुपारचे दोन वाजले होते. आश्रमाच्या परिसरावर शोककळा पसरली होती. आश्रमाच्या सगळ्या वास्तू पोरक्या झाल्याचा भास होत होता.

आयुष्याचे शतक ओलांडून वर आणखी चार पावसाळे पाहिलेल्या माणसाचा मृत्यू अकाली झाला असे म्हणता येणार नाही. परंतु १८ एप्रिल १९६३ला येणारा अण्णांचा १०५ वा वाढदिवस मोठ्या थाटाने साजरा करण्याचा हिंगण्यातील सहकाऱ्यांचा, विद्यार्थिनींचा, अण्णांचे शिष्य आणि मित्र यांचा विचार होता. त्यासाठी तयारी चालू असताना ही निधनाची वार्ता ऐकण्याची कोणाच्याच मनाची तयारी नव्हती.

अण्णांच्या दृष्टीने विचार केला तर त्यांचे मरण अपार भाग्याचे होते. देवदयेने १०५ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले, मरणसमयी त्यांना फारशा यातना वा क्लेश झाले नव्हते, हे पुण्यवंताचेच लक्षण होय. या पुण्यात्म्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी देशभर जागोजागी दुखवट्याच्या सभा झाल्या. वर्तमानपत्रातून अण्णा व त्यांचे अमोल जीवितकार्य यासंबंधी गौरवपूर्ण लेख छापून आले होते.

(भारतरत्न धोंडो केशव कर्वे तथा महर्षी अण्णासाहेब कर्वे या नावाने सर्व भारतभर ओळखले जाणारे गुरुवर्य अण्णा हे १८९१ सालापर्यंत एक अगदी सामान्य गृहस्थ होते. १८९१ मध्ये त्यांच्या पहिल्या पत्नी राधाबाई यांचे निधन झाले. त्यानंतर लोकमान्य टिळकांनी फर्ग्युसन कॉलेजमधल्या प्राध्यापकपदाचा राजिनामा दिला म्हणून रिकाम्या झालेल्या गणिताच्या प्राध्यापकाच्या जागेवर काम करण्याची नामदार गोखल्यांनी अण्णांना विनंती केली. मुंबई सोडून अण्णा पुण्यात दाखल झाले. पुण्यात आल्यावर १८९३ साली त्यांनी आपले परममित्र नरहरपंत जोशी यांच्या बालविधवा बहिणीशी - गोदूबाईशी पुनर्विवाह केला. त्यामुळे ते लोकांसमोर आले. मात्र कोणी एक महान व्यक्ती म्हणून. नव्हे तर एक समाजविघातक कार्य करणारा गृहस्थ म्हणून या विवाहामुळे घरीदारी, समाजातील लोकांकडून सगळीकडून अपमान, तिरस्कार, हेटाळणी व उपेक्षाच त्यांच्या वाट्याला आली होती. तेव्हापासून 'विधवा विवाह व विधवा शिक्षण' ह्या त्यांच्या जीवित कार्याचा प्रारंभ झाला. त्यांच्या दुसऱ्या पत्नी आनंदीबाई यांच्या भक्कम साहचर्यामुळे भारतीय स्त्रियांना विद्यापीठीय शिक्षणाची दारे खुली करून देण्यापर्यंत त्यांचे कार्य कळसाला जाऊन पोहोचले.)



आनंदीबाई ऊर्फ बायाच्या वृंदावनाच्या अष्टकोनी चबुतऱ्याला जोडूनच दुसरा अष्टकोनी चबुतरा बांधून त्यावर अण्णांची पावणेतीन फूट उंचीची पूर्णाकृती मूर्ती बसविण्यात आली आहे. अण्णा काठी घेऊन फिरायला निघाले आहेत-अशी ही मूर्ती फार सुबक आहे. ती शेजारच्या वृंदावनाच्याच उंचीची आहे म्हणून अधिकच आकर्षक दिसते. या जोड चबुतऱ्यांभोवती फुलझाडे लाविली आहेत. अण्णांना बकुळीची फुले फार आवडत असत म्हणून त्यांच्या समाधीस्थानाजवळ बकुळफुलांची नेहमी पखरण असावी यासाठी मुद्दाम बकुळीची झाडे लावली आहेत.

बायाच्या आणि अण्णांच्या पुण्यतिथीच्या दिवशी संस्थेतील विद्यार्थिनी तेथे प्रार्थनेसाठी जमतात. ९ नोव्हेंबर तारीख सुरूवातीला किंवा शेवटी येईल असे पाहून याच महिन्यात महर्षी कर्वे पुण्यस्मरण व्याख्यानमाला तीन दिवस होते. संस्थेला भेट देणारी मंडळी बायाच्या आणि अण्णांच्या स्मारकांचे दर्शन घेतात.

१८ एप्रिल १९६३ ला अण्णांना १०५ वर्षे पुरी व्हावयाची होती. त्याच दिवशी वर उल्लेखिलेल्या अण्णांच्या मूर्तीचे अनावरण महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री कन्नमवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्याच दिवशी अण्णांचे चित्ररूप जीवनदर्शन (फोटो अल्बम्) इंग्रजीत व मराठीत प्रसिद्ध झाले. या पुस्तकाचे संपादन श्री. य. गो. नित्सुरे यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाने त्यासाठी रु. ५०००/- चे अर्थसहाय्य दिले होते.

तसे पाहिले तर अण्णांनी आतापर्यंत स्थापन केलेल्या सर्व संस्था ही अण्णांची स्मारकेच आहेत, पण अण्णांच्या पश्चात हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेने त्यांच्या स्मरणार्थ मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूटच्याधर्तीवर पुणे येथे 'कर्वे समाज सेवा' स्थापन करण्याचे ठरविले. समाजसेवेचे काम शास्त्रशुद्धपद्धतीने तेथे शिकविले जाणार होते. डॉ. काकडे, श्री. हर्षे आणि श्री. शरद्चंद्र गोखले यांनी संस्थेचा आराखडा तयार केला. त्यावेळचे महाराष्ट्र शासनाचे अर्थमंत्री श्री. स. गो. बर्वे यांनी कार्याध्यक्ष होण्याचे मान्य केले. महाराष्ट्राच्या राज्यपाल श्रीमती विजयालक्ष्मी पंडित अध्यक्षा म्हणून लाभल्या.

एस्. एस्. सी. नंतर सर्टिफिकेट कोर्स आणि पदवीधरांकरिता हायर सर्टिफिकेटचा कोर्स असे दोन्ही अभ्यासक्रम सुरू झाले.

हिंगण्याच्या गावकऱ्यांनी अण्णांचे कायमचे स्मरण रहावे म्हणून एक योजना आखली. त्यांनी हिंगणे गावात राहणाऱ्या लोकांच्या सह्यांनिशी पुणे महानगरपालिकेकडे अर्ज करून हिंगण्यासाठी 'कर्वेनगर' हे नाव मागून घेतले, व ते ताबोडतोब मान्यही झाले. या नावाच्या बाबतीतली मजेशीर हकीगत अशी की, अण्णा हयात असताना हेच नाव पानशेतच्या पुरानंतर पुणे महानगरपालिकेने गुलटेकडीकडच्या वसाहतीला द्यावयाचे ठरविले होते. त्यासाठी गृहनिर्माण मंडळाचे तेव्हाचे अध्यक्ष श्री. **नानासाहेब** कुंटे यांनी अण्णांची संमती घेत ते नाव मुक्ररही केले होते. पण आता दोन **'कर्वेनगर'**

कशी होणार हा प्रश्न उद्भवला. अर्थात् ह्या नावावर हिंगण्याच्या लोकांचा हक्क अधिक आहे हे लक्षात घेऊन 'कर्वेनगर' हे नाव हिंगण्याला देण्यात आले, आणि गुलटेकडीच्या वसाहतीला अण्णांच्या स्मरणार्थ 'महर्षीनगर' हे नाव दिले. अशा तऱ्हेने हिंगण्याचे 'कर्वेनगर' झाले.

अण्णांचे जीवितकार्य हिंगण्यातच सफल झाले. हिंगण्याच्या माळावर अण्णा असंख्यवेळा वावरले. माळावरचे शेतकरी अण्णांना भक्तिभावाने वंदन करीत. अण्णांनी आपले उभे आयुष्य हिंगण्याच्या संस्थेसाठी समर्पित केले होते. त्यांच्या वास्तव्याने हिंगण्याची भूमी पवित्र झाली होती. अण्णांनी आपला शेवटचा श्वास हिंगण्याच्या माळावरच्या झोपडीतच घेतला होता. अण्णांच्या कार्याच्या प्रारंभापासून त्यांच्या अंतापर्यंत या झोपडीनेच अण्णांच्या आशा-आकांक्षांना साथ दिली, त्यांना संरक्षण दिले. त्यादृष्टीने पाहिले की झोपडीचे पावित्र्य, मांगल्य आपणांला विशेष जाणवू लागते. या झोपडीने अण्णांच्या कार्याचे अनेक टप्पे पाहिलेले आहेत. या झोपडीमुळे विधवेची विदुषी बनलेली समाजाने पाहिली. गावापासून दूरच्या माळारानावरच्या त्या विद्यादायी झोपडीचे आता कर्वेनगर स्त्री शिक्षण संस्थेच्या रूपाने 'नालंदा' झाले आहे. ही मूळ झोपडी अण्णांचे खरेखुरे स्मारक आहे.

कर्वेनगरला येणाऱ्या प्रत्येक अभ्यासू आणि संस्कारक्षम माणसाला आनंदाचा ठेवा गवसावा म्हणून, त्यांच्या १०५ वर्षांच्या तपस्यामय जीवनाचे दर्शन घडावे म्हणून संस्थेने 'महर्षी-कर्वे-वस्तुसंग्रहालया'त अनेक वस्तूंचे जतन करून त्यांची कलात्मक मांडणी करून ठेवली आहे. ही स्मृतिचिन्हांची जपणूक भावी पिढ्यांसाठी फार मोलाची आहे.

■ ■ ■



परिशिष्ट १.

## कल्पवृक्ष कन्यांसाठी

१४ जून १८९६ या दिवशी डॉ. सर रामकृष्ण भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली. प्रो. धोंडो केशव कर्वे यांनी चिटणीस पद स्वीकारून 'अनाथ बालिकाश्रमाची मंडळी' या संस्थेची स्थापना केली. त्यावेळी आश्रमाच्या हजेरी पटावर फक्त एका विधवा विद्यार्थिनीचे नाव होते - ते म्हणजे श्रीमती कमलाबाई गरूड यांचे.

१९०० साली पुण्यात प्लेगची साथ आली आणि हिंगणे बुद्रुक, (सध्याचे कर्वेनगर) येथे आश्रम स्थलांतरित झाला. हिंगण्याच्या निर्जन, खडकाळ, काटचाकुटचांनी भरलेल्या माळावर आश्रमात दोन विधवा आणि दोन कुमारिका दाखल झाल्या.

*'काशीक्षेत्री स्नान करितो*
*करविर भिक्षेला जातो*
*माहुरी निद्रेला वरितो।'*

असे दत्तात्रयाचे वर्णन करतात, त्याप्रमाणे अण्णांचे बिऱ्हाड पुण्याला, नोकरी फर्ग्युसन कॉलेजात आणि आश्रमाची निगराणी हिंगण्याच्या माळावर, अशा या धोंडो केशवाने काटचाकुटचांनी भरलेल्या मुठाकाठच्या माळरानावर शिक्षणासाठी आणि स्वावलंबी बनण्यासाठी आसुसलेल्या विधवांसाठी आणि निराधार अनाथ स्त्रिया व मुली यांच्यासाठी आश्रमाची प्रतिसृष्टी निर्माण केली.

आश्रमाचा प्रपंच चालविण्यासाठी उन्हातान्हात, थंडीवाऱ्यात, पावसापाण्यात दारोदार 'भिक्षांदेहि' करून पै पैसा जमविला. स्वत:ची सर्व पुंजी आश्रमासाठी दिली. स्वत:च्या वार्धक्याची तरतूद म्हणून उतरविलेली विम्याची पॉलिसी ही संस्थार्पण केली. काया-वाचा-मनाने आणि तन-मन-धनाने अण्णा गुरुकुलाचे अध्वर्यु बनले.

कर्वे पतिपत्नींच्या जोडीला, पार्वतीबाई आठवले, सीताबाई आण्णेगिरी, पारुबाई शेवडे, गो. म. चिपळूणकर, कविवर्य मायदेव, ना. म. पटवर्धन, काशीबाई देवधर, वेणुबाई नामजोशी, डॉ. कमलाबाई देशपांडे, मोडक, गोळे, मालतीबाई बेडेकर, काशीबाई नातू, शारदाबाई साठे, इरावतीबाई कर्वे, भास्करराव कर्वे इत्यादी असंख्य निष्ठावान कार्यकर्त्यांनी तळमळीने कार्य केले.

हिंगण्याच्या माळरानावर आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळा, पार्वतीबाई अध्यापिका विद्यालय, महिलाश्रम हायस्कूल, मूळ झोपडी, प्राथमिक विद्यामंदिर, टाईपरायटिंग इन्स्टिटयूट, संपदा बेकरी, वसतिगृहांच्या तीन मोठ्या इमारती, वृध्दाश्रमांच्या इमारती, इचलकरंजी हॉल, कला आणि वाणिज्य विद्यालय आणि या सर्वांवर कळस म्हणजे कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची भव्य इमारत, कॉलेज विद्यार्थिनींची वसतिगृह

या मोठमोठ्या इमारती डौलाने उभ्या आहेत. पोस्ट ऑफिस, बँक, झेरॉक्सची सुविधा, तरण तलाव, उद्यम मंदिर या सोयीही उपलब्ध आहेत.

(ज्याप्रमाणे ३ जून १९१६ साली भारतातील महिलांसाठी पहिले स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा मान भारतरत्न धोंडो केशव कर्वे ऊर्फ गुरूवर्य अण्णांना मिळाला त्याचप्रमाणे अण्णांच्या पश्चात् अण्णांचा ज्ञानदानाचा वसा पुढे उत्तमरीतीने चालवून 'महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेतील' शिक्षणप्रेमी मंडळींनी भारतातील पहिले मुलींचे अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याचा विक्रम केला. १९९५ - ९६ या संस्थेच्या शताब्दिवर्षात या महाविद्यालयातून पदवी घेऊन विद्यार्थिनींची पहिली बॅच बाहेर पडेल. तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रात संस्थेने ही गरूडझेप घेतलेली आहे. ह्या महाविद्यालयात ८०० विद्यार्थिनी शिक्षण घेत असून सध्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल हे अत्याधुनिक विषयही शिकविले जातात. शासकीय मान्यता प्राप्त विनाअनुदान तत्त्वावर चालणाऱ्या या महाविद्यालयात प्रवेशाच्या वेळी डोनेशन न घेण्याची पध्दत संस्थेचे एक तत्त्व म्हणून स्वीकारण्यात आली आहे, हे शिक्षणसंस्थेला भूषणावह आहे.)

गेल्या वर्षीच संस्थेने स्थापत्य महाविद्यालयाची स्थापना केली असून तेथे चाळीस विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. महर्षींच्या जन्मभूमीत - रत्नागिरी जिल्हयातील शिरगावला औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन केली आहे.

नोकरी करणाऱ्या, शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची निवासाची सोय व्हावी म्हणून पुण्यात दोन महिला वसतिगृह आहेत. कर्वेनगरच्या वसतिगृहात पैसे भरून राहणाऱ्या विद्यार्थिनी, नादार, अर्धनादार, बी.सी., ई.बी.सी. कॅटेगरीतील विद्यार्थीनी जुव्हेनाईल कोर्टामार्फत आलेल्या मुली, माजी सैनिकांच्या कन्या, शिवाय मेसमध्ये व बेकरीमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी स्त्रिया यांच्यासाठी राहणे व भोजन यांची उत्तम व्यवस्था असणारी वसतिगृह आहेत. पुणे, सातारा, वाई, इत्यादी ठिकाणी मिळून संस्थेच्या सुमारे २९ शैक्षणिक शाखांत तेरा हजार विद्यार्थीनी शिकत आहेत.

'महर्षी अण्णांना अभिप्रेत असलेल्या स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचे काम करणारी ही 'कर्वे स्त्री शिक्षण संस्था' म्हणजे सतत बदलत जाणाऱ्या समाजव्यवस्थेत, विद्याविभूषित होऊन स्वत:ला मानाचे स्थान प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या सर्व स्तरांतील स्त्रीवर्गाला एक आधारवड आहे.' असे संस्थेत उच्चपदावर काम करीत असलेल्या कार्यकर्त्या सौ.मालतीबाई देशपांडे यांनी सातारा येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'ऐक्य' मधील आपल्या लेखात म्हटले आहे. पण मी तर म्हणते महर्षींनी अवघ्या स्त्रीजातीसाठी भूतलावर रुजविलेला तो एक कल्पवृक्ष आहे.

■ ■ ■



## परिशिष्ट २.

# मनामनांचा कानोसा

### पितृतुल्य गुरुवर्य

'मातीमोल झालेल्या जन्माचे सोने करणाऱ्या महात्म्याबद्दल कृतज्ञता वाटल्यावाचून कशी राहील ?'

**श्रीमती सीताबाई अण्णेगिरी**

'आम्हा हिंदी विधवांना गुरुवर्य अण्णांनी आशेचा किरण दाखविला. स्वत:च्या पायावर उभे केले. मनात आत्मविश्वास निर्माण केला. अशा थोर व्यक्तीबद्दल किती आदरभाव असतो ते माझ्यासारख्या विधवांनाच कळू शकेल. गुरुवर्यांनी महिला समाजावर इतके उपकार केले आहेत की संपूर्ण स्त्रीजातीने त्यांचे ऋणी रहायला हवे.'

**श्रीमती उमाबाई गद्रे**

'स्वर्गस्थ देवांनी पापी समजल्या जाणाऱ्या त्रिशंकूला मृत्युलोकात ढकलून दिल्यावर त्याच्या विषयी अनुकंपा बाळगणाऱ्या विश्वामित्र ऋषींनी त्याच्यासाठी प्रतिसृष्टी निर्माण केली. तद्वतच महर्षी अण्णांनी आश्रमाची प्रतिष्ठापना करून हीन व पापी मानल्या गेलेल्या विधवांसाठी जणू नवी सृष्टीच निर्माण करून दिली.'

**श्रीमती वारूबाई शेवडे**

'गुरुवर्य अण्णांनी विधवांचा प्रश्न म्हणजे एकप्रकारे दलितांचा प्रश्नच - सोडवून अशुभाला शुभ बनविले. त्यांची ही कामगिरी हिऱ्याच्या अक्षरांनी लिहिली जाईल. सज्जनांबरोबर सात पावले चालले तरी सत्प्रवृत्ती जागृत होतात. माझ्या महद्भाग्याने मला परमपूज्य अण्णांच्या सहवासाने पुनीत झालेल्या संस्थांचा दीड तपाचा सहवास लाभला. समाजसेवेचे उच्च ध्येय हाच अण्णांचा देव आणि त्यासाठी भगीरथ प्रयत्न करणे हीच त्यांची उपासना.'

**श्रीमती दुर्गाबाई जोशी**

'विधवांच्या हातची लाटणी जाऊन त्यांच्या हाती लेखणी आली ह्याचे सारे श्रेय गुरुवर्य अण्णांना दिले पाहिजे.'

**सौ. अचला मंजली**

'लहान वयात वैधव्याची कुऱ्हाड कोसळलेल्या माझ्यासारख्या खेडेगावातील मुलीला तीर्थस्वरूप अण्णांचा आणि सौ.बायाचा सहवास म्हणजे वटवृक्षाची छाया वाटली. अण्णांनी मला शिक्षण घेण्याचा आग्रह केला. बायाने मला प्रेमाने न्हाऊ-माखू घातले. त्या दोघांनी मला माझ्या भल्याबुऱ्याचा विचार करण्याची बुद्धी दिली.'

**श्रीमती सत्यवती चिटणीस (वय वर्ष ९०)**

'पितृतुल्य अण्णा आमचे स्फूर्तिस्थान, त्यांचा आदर्श पुढे असल्यामुळे निराशाग्रस्त जीवनातून स्वत:च्या पायांवर उभे राहण्याचे धैर्य मिळाले. भाऊबिजेची मोठी रक्कम जमविण्याचा केलेला निश्चय, कितीही पायपीट करावी लागली तरी तो पूर्ण करण्याचे श्रेय मिळविता आले. अण्णांनी आमच्यावर केलेल्या अनंत उपकारांची अंशत: तरी फेड करता आली.'

**श्रीमती शांताबाई परांजपे**

'मोठेपणी नावारूपाला आलेली माणसे लहानपणीही खूप समजूतदार, शहाणी, हुशार होती असे म्हणण्याचा एक प्रघात आहे. अण्णांचे या पध्दतीने वर्णन केले तर, खाण खणतानाच अष्टपैलू हिरा सापडला, अगर कपाशीच्या झाडावरच भरजरी वस्त्र तयार झाले असं म्हणण्यासारखे हास्यास्पद ठरेल. अण्णांचा जीवनप्रवास अपूर्णातून पूर्ण होण्याकडे, चुका करीत करीत शिकण्याकडे - असा सुरू होता. संकटे, अडचणी, दु:ख, निराशा यांना तोंड देत देत त्यांच्या मनाची शक्ती वाढत गेली. मित्रांच्या सहवासात त्यांची बुद्धी प्रौढ, विवेचक, चिकित्सक झाली. वृत्तीतील नम्रता व प्रसन्नता, व्यवहारातील चोखपणा, मनाचा निर्मळपणा आणि अखंड कष्ट करण्याची क्षमता या गुणांनी अण्णांना महानपण मिळाले. ते अबोल होते पण त्यांच्या शेजारी न बोलता नुसते बसून राहिले तरी माझ्या अंतरात्म्याला विलक्षण सुख मिळत असे.'

**श्री. य. गो. नित्सुरे**

■ ■ ■



# मान्यवरांच्या चष्म्यातून

## श्रीमती सरोजिनी नायडू

'प्रो.कर्व्यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त सर्व हिंदुस्थानकडून त्यांना जे धन्यवाद देण्यात येत आहेत त्यात भाग घेण्यास मिळाल्याबद्दल मला आनंद वाटतो. सुखसमृध्दीपूर्ण आयुष्य अनुभविण्याच्या स्त्रियांच्या हक्कासाठी निर्भयपणे आणि धैर्याने लढणारे ते खंदे पाठीराखे असून आजच्या काळात त्यांची सर कोणासही येऊ शकणार नाही.'

## प्रो. वामन मल्हार जोशी

'सर्वेषाम् आविरोधेन ब्रह्मकर्म समारभे' हे गीतेतील तत्त्व किंवा 'line of least resistance' म्हणजे कुणालाही कमीत कमी विरोध करणे हे अण्णांच्या अंगी असूनही त्यांनाही विरोधक भेटलेच. पण सुदैवाची गोष्ट अशी की अण्णांचे विरोधक किंवा प्रसंगी शत्रू उत्पन्न झाले तेही आपल्यापरीने विचार करणारे, प्रामाणिक व समंजस होते. अण्णांनी बालविधवेशी पुनर्विवाह केला याला अनेकांचा विरोध होता पण त्यांचे असामान्य धैर्य पाहून त्याबद्दलही काहींना सहानुभूती वाटली. लोकमान्य टिळक हे पुराणमतवादी लोकांचे काही बाबतीत अग्रणी होते पण तेही अण्णांच्या पुनर्विवाहाला उपस्थित होते हे नमूद करण्यासारखे आहे.

'संस्थेचे आजन्मसेवक - सेविका यांमध्ये अण्णांच्या धोरणाला, आवडीनिवडीला खरे सांगायचे तर तीव्र विरोध करणारेही होते. पण एक गोष्ट निश्चित की, अण्णा केव्हाही स्वार्थ पहात नाहीत, संस्थेचे कल्याणच करू पाहतात, त्यांच्याइतकी संस्थेची माहिती दुसऱ्या कोणला नाही, त्यांच्याइतका अनुभव नाही व त्यांच्याइतकी आस्था व कळकळ नाहीच नाही, ही जाणीव सर्वांनाच होती. इंग्रजीत एक सुभाषित आहे की, 'He never made friends who never made enemies' भावार्थ, शत्रू नाहीत त्याला मित्रही नसायचेच.'

## साहित्यसम्राट न.चिं. केळकर

'लोकमान्य टिळकांचे समाजकार्याचे धोरण आणि प्रा.कर्वे यांचे समाजकार्याचे धोरण यात खूप विरोध होता. त्यामुळे 'केसरी' सारख्या पत्राकडून आपल्या कार्याला पाठिंबा मिळणार नाही हे कर्व्यांनी ताडले पण पाठिंबा मिळावा म्हणून त्यांनी कधीही लगट केली नाही की लोचटपणा केला नाही. उलट टिळकांनी आपल्या कार्यावर

लेख लिहून शस्त्र उगारले नाही - हेच त्यांना धन्यतेचे वाटे. अर्थात आपल्या कार्याला प्रसिद्धी नाही म्हणून टिळकांविरुद्ध काहीबाही बालून कर्व्यांनीही कधी अव्यापारेषुव्यापार केला नाही. सनातनवादी प्रतिपक्षाशीही कर्व्यांची वृत्ती बिनभांडखोरपणाची होती. त्यामुळे वाद न घालता कार्य करून दाखविणे हेच त्यांना दिलेले कर्व्यांचे प्रछन्न उत्तर होय.

'अण्णांच्या कार्याची सुरूवात अनाथ स्त्रियांना आश्रय व संरक्षण मिळवून देण्यापासून झाली पण अशा स्त्रियांना जन्मभर आश्रमात पोसत राहणे त्यांना योग्य वाटले नाही. अण्णांनी प्रथम त्यांना सुरक्षित करून नंतर शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याची खटपट केली. त्यामुळे आपोआपच अनाथ बालिकाश्रमाला शिक्षणसंस्थेचे स्वरूप प्राप्त झाले. संस्थेसाठी सतत भीक मागणाऱ्या कर्व्यांनी स्वार्थत्याग करून, निर्धनता पत्करून, अंगीकृत कार्याला स्वत:ही भीक घातली. त्यामुळेच त्यांचे भीक घालणे दिव्यत्वाकडे गेले. कर्व्यांनी याचक वृत्तीला महाराष्ट्रात निरपवादच नव्हे तर बहुमानास्पद बनविले. कर्वे अगणित कन्यांचे धर्मपिता बनले.'

## श्री.लक्ष्मणराव किर्लोस्कर

'आपल्या बुध्दीला सुचेल व आपल्या मनाला रुचेल असे एखादे कार्य हाती घ्यायचे व आपली सर्व शक्ती एकवटून ते करीत रहायचे हा यशाचा मार्ग मला माझ्या हितचिंतकांनी दाखविला व तो अनुभवाने हितकारकही ठरला. मी माझ्या कार्य सिद्धीसाठी प्रयत्न करीत असता जे जे आदर्श माझ्या डोळ्यापुढे ठेवले त्यांपैकी प्रो. कर्वे हे एक होते. त्यांचे व माझे कार्यक्षेत्र भिन्न होते पण कर्व्यांची कार्यनिष्ठा व अविश्रांत श्रम करण्याची चिकाटी मला सतत मार्गदर्शक ठरली मला नेहमी वाटते की आम्हा भारतवासीयांत हाच 'कर्वेपणा' निर्माण झाला तर देशाचा भाग्योदय मुळीच दूर नाही.'

## इचलकरंजी संस्थानाधिपती श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे

'राजकारणात जसे नामदार गोखले व लोकमान्य टिळक त्याप्रमाणे सामाजिक क्षेत्रात, स्त्रीशिक्षणाच्या व स्त्रीयांच्या उन्नतीच्या कार्यात प्रो.कर्वे यांचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. मात्र प्रा. कर्वे यांनी वरील दोघांपेक्षाही आधिकच शारीरिक व मानसिक कष्ट सोसलेले आहेत. या काळात त्यांना सोसावा लागणारा मानसिक ताण व पाणउताऱ्याचे प्रसंग वगैरे हकीगती अतिशयोक्तीच्या वाटण्याचा संभव आहे. निस्वार्थी व कार्याकरिता कार्य करण्याचे उदात्त उदाहरण म्हणजे अण्णा. त्यांची आनंदी वृत्ती, कोणी काहीही



देवो त्यात संतोष मानण्याचा स्वभाव, कष्टाळूपणा, अलोट मानसिक धैर्य, अढळ आशावाद, नियमितपणा, उगीच कोणाला भीड न घालता किंवा भिन्न मतांच्या लोकांची मने न दुखविण्याचा सहिष्णुपणा, सोशिकवृत्ती इत्यादींमुळे ते सध्याच्या काळातील साधुसंत वाटतात.'

## न्यायमूर्ती पाटकर

'प्रो.कर्वे यांचा व माझा परिचय प्रथम गुरुशिष्याच्या नात्याने झाला. मी इंग्रजी ४ थ्या इयत्तेत त्यांच्या वर्गात असताना त्यांच्याबद्दलची आठवण म्हणजे त्यांचा खणखणीत आवाज, आणि तो अजूनही कायम आहे. कर्वे स्त्रीशिक्षणाचे कट्टे कैवारी, आचारविचारांच्या प्रांतात स्त्रीस्वातंत्र्याच्या मर्यादा वाढविण्यास अनुकूल, उत्साही व कृतिशील कार्यकर्ते, विधवाविवाहविषयक चळवळीचे नेते होतील अशी त्यावेळी मला कल्पना नव्हती. उपहास, अपमान व प्रतिकार यांकडे लक्ष न देता ध्येयासाठी सारखी धडपड करण्याचा स्वभाव, दीर्घ चिकाटी, कमी महत्त्वाच्या गोष्टींत तडजोडीची तयारी, शत्रू व मित्र दोघांबरोबर सरळ वागवणूक आणि स्फूर्तिदायक उद्योगिता या गुणसमुच्चयांमुळे भारतभूमीतील असंख्य निराश्रित स्त्रियांच्या पितृस्थानी ते विराजमान झाले.'

## शिवप्रसाद गुप्त, सेवा उपवन काशी

'मुझे यह जानकर बडी प्रसन्नता है की श्रीमान धोंडोपंत केशव केर्वेजी अपनी आयुका ८० वा वर्ष पूरा करके अप्रैल मासमे ८१ वे वर्षमे पदार्पण करेंगे। भगवान आपको स्त्रीजातीके उन्नतीके लिये और बहुत समयतक आयुप्रदान करे। श्रीमान् कर्वे स्वयं एक दैदिप्यमान मणि है। प्रशंसा और कीर्तिगानकी उन्हे आवश्यकता नही है। यह पंक्तियाँ भक्ती और श्रध्दासे परिपूर्ण हृदयके उद्‌गार मात्र है। जिस प्रकार सूर्य की पूजा के समय उनकी आरती की जाती है उसी प्रकार यह लेखन है।'

## सरदार मा.वि.किबे, इंदूर

'प्रो:अण्णा कर्वे यांच्या तोडीची हिंदुस्थानातील दुसरी व्यक्ती म्हटली म्हणजे महामुनी पंडित मदन मोहन मालवीय हीच होय. दोघांचेही कार्यक्षेत्र एकच. दोघेही पराक्रमाने तुल्यबल. भेद इतकाच की अण्णासाहेबांस कष्ट मात्र अधिक पडले तरी त्यांच्या कार्यास आलेले स्वरूप आनंददायक, अभिमानास्पद आणि उपकारी आहे.

म्हणून त्यांना महाराष्ट्राचे मालवीय म्हणावेसे वाटते.'

### न्यायमूर्ती फैज तय्यबजी, मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश

'द्रव्यबळ व मनुष्यबळ यांचा कुठल्याही तऱ्हेने पाठींबा नसताना केवळ उच्च ध्येयाला एकनिष्ठपणे स्वत:ला वाहून घेऊन मनुष्याला केवढे प्रचंड कार्य करून दाखवता येते याचे प्रो.कर्वे व त्यांनी संस्थापिलेले माहिला विद्यापीठ हे मूर्तिमंत उदाहरण होय. दृढनिश्चयाने समाजसेवेचे व्रत अंगिकारून काही ना काही कार्य प्रत्येक व्यक्तीस कसे साध्य करता येते याची साक्ष हे महिलाविद्यापीठाचे काम आपणाला पटवून देते. सकृत्‌दर्शनी अशा प्रकारचे कार्य करून दाखविणे अगदी सोपे वाटले तरी प्रो.कर्व्यांसारख्या स्वार्थनिरपेक्ष समाजसेवा करणाऱ्या व्यक्ती क्वचित् सापडतात.'

### शाहीर अमर शेख

*'कोट्यावधी अबला भगिनींचे,*
*सबल करांनी अश्रु पुसावे।*
*रात्रंदिन मानवता भक्ती,*
*शंभरीतही रसरसलेली।'*

■ ■ ■



## परिशिष्ट ३.

# घरातले पडसाद

### स्वार्थत्यागाची दुसरी बाजू

प्रो. रघुनाथ धोंडो कर्वे एम्.ए.

माझी ओळख करून देताना पुष्कळवर्षे, म्हणजे मला स्वत:ला काही विशिष्ट व्यक्तिमत्त्व प्राप्त होईपर्यंत, 'हे महर्षी कर्व्यांचे चिरंजीव' अशा शब्दांत करून देत असत. अशी ओळख मला फारशी रुचत नसे. प्रत्येक माणसाला अण्णांसारखी प्रसिद्धी मिळणे शक्यही नसते आणि प्रसिद्ध माणसे देखील आपल्याला वाटतात तितकी प्रसिद्ध नसतातच.

स्वार्थत्याग म्हणजे चांगलाच असला पाहिजे असे म्हणण्याची वहिवाट आहे. परंतु मला ठामपणे असे वाटते की, ज्या माणसावर कोणाच्या पोषणाची वा शिक्षणाची जबाबदारी नाही त्याने वाटल्यास खुशाल स्वार्थत्याग करावा, पण अशा प्रकारची जबाबदारी असेल त्याने स्वार्थत्याग केला तर तो स्वार्थत्याग न होता इतरांवर केलेला अन्याय ठरतो. माझ्यावर असा अन्याय झाला आहे आणि म्हणूनच मी अण्णांच्या संस्थांत काम करायला तयार झालो नाही. त्याचे आणखीही एक कारण म्हणजे तिथे खूप कमी पगारावर काम करावे लागे आणि तो माणूस विवाहित असला पाहिजे अशी अट होती. विवाहित माणसाला खूप गरिबीत रहा म्हणणे म्हणजे कात्रीत धरण्यासारखे आहे.

अण्णांच्या कामाचे महत्त्व मला कळले होते पण त्यामुळे माझ्यावर झालेला अन्याय भरून निघत नव्हता. स्वार्थत्यागासाठी अण्णा डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सदस्य झाले आणि मग मी मॅट्रिकच्या परीक्षेत पहिला नंबर मिळवला होता तरी मला अण्णांच्या कॉलेजात शिक्षण घ्यावे लागले. वास्तविक मला चांगली शिष्यवृत्ती कॉलेजात मिळायला हवी होती. पण इतर हुशार विद्यार्थी चांगली शिष्यवृत्ती दिली नाही तर ते कॉलेज सोडून दुसऱ्या कॉलेजात जातील अशी भीती संस्थाचालकांच्या मनात असते. माझ्या बाबातीत अशी भीती नसल्यामुळे संस्था चालकांनी मला अत्यंत अन्यायाने वागवले आहे. बी.ए. झाल्यावर फेलोशिपवर माझा हक्क असताही मला एकच वर्ष फेलोशिप मिळाली. मग मला एम्.ए. अर्धवट टाकावे लागले. नोकरी पहावी लागली. अण्णांकडूनही काही उत्तेजन अथवा मदत मिळाली नाही.

अण्णांजवळ मोकळेपणाने बोलण्याचा मला धीर झाला नव्हता. माझ्या मातोश्री राधाबाई त्यांच्या तरुणपणीच वारल्यामुळे माझी कड घ्यायला कोणीच नव्हते. एम्.ए.

अर्धवटच राहिले. पुढे नोकरीतली गरज म्हणून ते पूर्ण केले. पण निराश मन:स्थितीत माझ्यासारख्या पहिला नंबर मिळवणाऱ्या मुलास साधा पास क्लास मिळाला.

अण्णा तसे माझ्याशी कठोर वागले नाहीत, पण पहिल्या मुलाला वडिलांच्या शिस्तीचा कठोर अनुभव माराच्या रूपाने त्याकाळी मिळत असे तसा मला मिळाला. माझ्या खालील तीनही भावांना त्यांच्या इच्छेप्रमाणे महागडे शिक्षण घेता आले. अर्थात त्यांना त्याबद्दल कर्जही फेडावे लागले, पण नुकसान होण्याच्या संदर्भात विचार केला तर मलाच जास्त झळ लागली. मात्र याबद्दल माझ्या मनात अण्णांबद्दल तेढ राहिली नाही. कारण अण्णांनी ते बुद्धिपुरस्सर केले नव्हते. मात्र अजाणताही एखाद्या मुलावर खूपच अन्याय होत जातो व त्याचे परिणाम त्या मुलालाच भोगावे लागतात. कमालीचा स्वार्थत्याग करून अण्णांसारख्या माणसांना जगात इतका मोठेपणा मिळतो की त्यानंतर त्यांच्यामुळे स्वत:चे नुकसान झाले आहे असे म्हणण्याचा धीर बहुदा कोणास होत नाही व त्यांच्या हातून झालेली चूक जगाला कळतच नाही. ही गोष्ट मला मान्य नाही. पण अण्णांच्या मोठेपणाची दुसरी बाजू दाखविणे येवढाच माझा उद्देश आहे. एरव्ही अण्णांबद्दल माझ्या मनात आदरच आहे. मुलांसाठी ठेवायला त्यांच्याजवळ पुंजीच नव्हती म्हणून अनादराची एक धारदार बाजू आहे. शेवटी मात्र अण्णांचा एक विशेष गुण सांगावासा वाटतो. वयाबरोबर बहुतेक लोकांची मते पक्की व ठाम झालेली असतात. नव्या विचारांना त्यांच्या मनात थारा मिळत नाही. अण्णांचे मन मात्र क्रांतिकारक समजल्या जाणाऱ्या नव्या विचारांचेही स्वागत करणारे असे लवचिक आहे. त्यांच्या मोठेपणामुळे मुलांचे व्यक्तिमत्व थोडे फिकटले तरी अण्णांबद्दल आम्हाला अभिमानही वाटतो यात शंका नाही.

## तत्त्वनिष्ठेतील तारतम्य

डॉ.शंकर धोंडो कर्वे एम्.बी.बी.एस्.

मोठ्या लोकांच्या मुलांची स्थिति जरा नाजुकच असते, कारण वडिलांच्या इतका पराक्रम करणे त्यांना बहुदा शक्य नसते. मोठ्या झाडाच्या छायेत लागलेले छोटे झाड बहुदा खुरटे होते. आम्हा चौघा भावांची स्थिति जरा तशीच झाली. आम्ही एखाद्या सामान्य गृहस्थाची मुले असतो तर कदाचित् आमच्या आयुष्याला निराळेच वळण लागले असते. पण मला एवढे कबूल करावे लागेल की आम्हा सर्व भावांना साधारण समजू लागल्यानंतर पूर्ण आचार व विचार स्वातंत्र्य होते.

'कर्व्यांच्या मुलांनी तरी असं वागता कामा नये' अशी तक्रार कुणी अण्णांकडे घेऊन गेल्यास अण्णा त्याला चोख उत्तर देत असत, 'मुलं आता मोठी झाली. त्यांनी आपला मार्ग आपण काढला पाहिजे व जगाचे रट्टे त्यांनी आपले आपण



सोसावे.' सारांश काय आम्हा पितापुत्रांत कधी मतभेदामुळे भांडण झाल्याचे बिलकुल स्मरत नाही. इतकेच काय अण्णांना न आवडणाऱ्या कितीतरी गोष्टी मी केल्या तरी त्याबाबतीत मला बोलून त्यांनी कधीही दुखवलेलं नाही.

आफ्रिकेत माझ्या घरच्या वास्तव्यातील शेवटच्या रात्री आम्ही बोलत बसलो असताना अण्णा मला म्हणाले, 'तुमचे आचारविचार मला तितके पसंत नाहीत व ते तसं नसणं साहाजिकच आहे. पण मी पूर्व आफ्रिकेत जिथं जिथं गेलो, तिथं तिथं लोक तुला ओळखतात व तू इकडे मानाने राहतोस यातच मला आनंद आहे.'

ज्याप्रमाणे वडील अतिप्रसिद्ध असल्याकारणाने एक प्रकारचे नुकसान होते त्याचप्रमाणे कधी कधी त्याचा फायदापण होतो. मी नैरोबीत जाऊन नुकतीच धंद्याला सुरूवात केली होती. तेव्हा श्रीमती सरोजिनी नायडू पूर्व आफ्रिकेत काँग्रेसच्या अध्यक्ष म्हणून आल्या होत्या. नैरोबीत आल्यानंतर तेथील लोकांच्या भेटीसाठी त्या निघाल्या. तेथील पुढाऱ्यांची त्यांनी यादी केली 'इथं हिंदी डॉक्टर, वकील वगैरे कोणी आहेत का?' असे त्यांनी विचारले. त्यांना डॉ. कर्वे हे माझे नाव कळताच त्या म्हणाल्या, 'ते प्रो. कर्व्यांचे कुणी लागतात काय?' मी अण्णांचा मुलगा असे कळल्याबरोबर सर्वप्रथम त्या माझ्या भेटीसाठी आल्या. नैरोबीच्या काही पुढाऱ्यांना त्याचे जरा वैषम्यच वाटले.

दुसरा असाच एक गमतीदार प्रसंग. पंडित कुंझरु मुंबासा येथे काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून आले, तेव्हा त्यांना उतरवून घ्यायला आम्ही तिघेचौघे बोटीवर गेलो होतो. भारत सेवक समाजाचे कोदंडराव यांनी माझी ओळख 'प्रो.कर्वे यांचे चिरंजीव' अशी करून दिली. बोलताना एकदा ते म्हणाले, 'तुम्ही इकडे आफ्रिकेत का आलात? तुमच्या वडिलांचे तिकडे वजन असल्यामुळे हिंदुस्थानात तुमच्या व्यवसाय चांगला चालला असता.'

मी त्यांना हसतच उत्तर दिले, 'नेहमी प्रो. कर्वे यांचा मुलगाच न राहता माझ्या नावाने मला लोकांनी ओळखावे अशी माझी इच्छा होती, पण ते काही साधले नाही. परवाच पहा, माझी तुमच्याशी ओळख करून देताना इथेही प्रो. कर्वे यांचा मुलगा अशी करून दिली.' अण्णांना ही आठवण सांगितली तेव्हा त्यांना पण बरीच गंमत वाटली.

अण्णांच्या स्वभावातली दुसरी लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे जेथे काही तत्त्वाला विशेष बाधा येण्यासारखे नसेल, तेथे ते पूर्णपणे दुसऱ्या माणसाच्या मनाप्रमाणे वागतात. त्यामुळे जिथे जातील तिथे ते सर्वांना प्रिय होतात. अर्थातच त्यांच्या ह्या स्वभावाचा पुष्कळ लोक गैरवाजवी फायदा घेतात. त्यामुळे हाताखालच्या लोकांना अण्णांबद्दल खूप आदर असला तरी त्यांचा योग्य दरारा बिलकूल वाटत नसे. स्वत:च्या मुख्य तत्त्वाला आजिबात धक्का न लावता दुसऱ्या व्यक्तीला खूष करण्यासाठी अगदी

म्हातारपणापर्यंत अण्णांनी स्वतःच्या बाबतीत हवा तसा बदल केला होता. अगदी मांसाहार अगर मद्यपान सुध्दा परदेशात क्वचित प्रसंगी घेतले.

## स्वभाव तो स्वभाव

**श्री. भास्कर धोंडो कर्वे बी. एस्. सी., बी. टी., एम. ई डी.**

माझ्या लहानपणी मला अण्णांचा सहवास फारच कमी मिळाला, कारण ते संस्थेसाठी निधी जमविण्यासाठी अगर व्याख्याने देण्यासाठी सारखे दौऱ्यावर असत. माझ्या अभ्यासाकडे लक्ष द्यायला त्यांना कधीच सवड झाली नाही. मला त्यांच्या रागीटपणाचा मुळीच त्रास झाला नाही. मला अण्णांची भीती अशी कधीच वाटली नाही. घरातल्या काटकसरीमुळे नाटक, सिनेमा वगैरे करमणुकीच्या गोष्टी अजिबात वर्ज्य होत्या, पण पुढे हे निर्बंध थोडे सैल झाले. आईकडे वशिला न लावता मी सरळ अण्णांनाच परवानगी विचारत असे. त्यांनीही कधी नाही म्हटले.

संस्थांचे हिशेब चोख ठेवल्याबद्दल अण्णांची ख्याती आहेच पण घरगुती हिशेब पण ते चोखच ठेवीत. बायको, मुले, भावंडे यांच्याशीही पै पैशाचा हिशेब ठेवलेला पाहून तिऱ्हाईताला बरे वाटत नसे. पण विचारपूर्वक पाहिले तर त्यांचा हा चोखपणा कौटुंबिक सुखाला पोषक ठरत असे. अण्णा आमच्याकडे, कुणाही मुलाच्या घरी राहिले तरी भोजनखर्चाबद्दल पैसे देत. इतकेच नव्हे तर पोस्टाच्या तिकिटाचे अथवा न्हाव्याचे पैसे सुद्धा स्व तः खर्च करीत. आणा दोन आणे सुद्धा आठवणीने परत देत. पैशाच्या भांडणामुळे आजवर हजारो कुटुंबे धुळीस मिळाली आहेत. भावाभावांत, बापलेकांत कलागती लागल्या आहेत. अण्णांच्यासारखा व्यावहारिक हिशेबीपणाचा समाजात प्रसार झाला तर तो किती तरी सुखावह होईल.

विलायतेच्या दौऱ्यावर मला अण्णांचा भरपूर सहवास मिळाला 'वृद्धपिता' या दृष्टीने अण्णांचे वागणे किती उच्च दर्जाचे आहे, याची जाणीव मला तेव्हा झाली. ते सर्व मुलांशी मित्राप्रमाणे वागतात. मुलांच्या ज्या गोष्टी त्यांना आवडत नाहीत त्याकडे ते पूर्णपणे कानाडोळा करतात. मी शिक्षणाकरिता इंग्लंडला जायला निघालो त्यावेळी 'Keep away from women and wine' असा त्यांनी उपदेश केला. पण मुलांप्रमाणे मी मुलींशीही मैत्री केली. प्रसगी मद्यपान केले. सिगरेट ओढली आणि नृत्यही शिकलो. अण्णा इंग्लंडला आले तेव्हा कोणाकडून तरी त्यांना हे सर्व कळण्यापेक्षा प्रसंगी त्यांच्या देखतच मी ह्यांतील सर्व केले. पण माझ्या वर्तनाबद्दल त्यांना काय वाटले हे मला कधीच समजले नाही. त्यांनी कधीही एका शब्दाने अथवा कृतीने नापसंती दर्शविली नाही.

अण्णांचे मन व शरीर दोन्ही लवचिक होते. विलायतेत गरम कपडे सकाळी उठल्याबरोबर अंगावर चढवायचे ते रात्री अकराबारा वाजता उतरावयाचे. त्यांचे ओझे ७१व्या वर्षी दिवसभर खोगिरासारखे अंगावर बाळगायचे. ह्या वयात हातात प्रथम काटा चमचा धरून जेवायला शिकायचे. बर्फ पडण्याइतकी थंडी असो अगर घामाच्या धारा असोत, प्रकृती उत्तम राखून आखलेल्या कार्यक्रमात काडीइतका खंड पडू द्यायचा नाही. या सर्व गोष्टी लवचिकपणाच्या निदर्शकच आहेत. ते रोज नियमितपणे फिरत असत. पण अमेरिकेत दिवसा चारपाच व्याख्याने, भोजन व चहा यांची निमंत्रणे व रात्रीचा प्रवास असे कितीतरी दिवस चालले होते. तेव्हा फिरणे जमत नसे. तरीपण त्यांची प्रकृती उत्तम राहिली.

मुरूडफंडाच्या कार्यक्रमाला सुवर्णमहोत्सवाच्या शेवटच्या दिवशी रात्रभर कार्यक्रमास बसून ७९व्या वर्षी अण्णा अंथरुणाला पाठही न लावता सकाळी मोटारीत बसले.

राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन क्षेत्रांतले पुरोगामी विचार ते नियमाने वाचीत. अण्णांच्या स्वभावात स्वतःची जाहिरातबाजी करण्याचे बिलकूल नाही. उलट एकप्रकारचा न्यूनगंडच असल्यामुळे ते नेहमी मागे मागे रहात. अण्णांच्या गुणवर्णनात हा त्यांचा स्वभाव विनय म्हणून ओळखला गेला. अण्णा खूप निग्रही होते, पण आग्रही नव्हते. स्वतःच्या मुलाला देखील 'तू अमुक केले पाहिजेस' असे त्यांनी म्हटले नाही. ते दुसऱ्याला काय बोलणार? स्वभाव तो स्वभाव!

## आयुष्याला अण्णांचा आधार!

पार्वतीबाई आठवले (अण्णांची मेहुणी)

माझी बहीण सौ. आनंदीबाई कर्वे ऊर्फ बाया व मेहुणे प्रो. अण्णा कर्वे या उभयतांनी आग्रह धरल्यामुळे, कोकणातल्या देवरूखसारख्या खेडेगावी राहणाऱ्या माझ्या- सारख्या विधवेला शिक्षण घ्यायची संधी मिळाली. माझे ट्रेनिंगपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत अण्णांच्या आश्रमातील मुलींची संख्या १८ झाली होती. अण्णांनी खूप खटपट करून मला ३ वर्षांच्या सरकारी बाँडमधून मुक्त करवून घेतले, आणि हिंगण्याच्या आश्रमशाळेत कामासाठी ठेवून घेतले.

ट्रेनिंगचा अभ्यास करताना सुट्टीत मी अण्णांबरोबर चालत हिंगण्याला जात असे. वाट खूप दूरची होती. वाट चालता चालता अण्णा 'त्यावेळची हिंदुस्थानातील विधवांची स्थिती व ती सुधारण्याकरिता कार्य करणे कसे आवश्यक आहे' या विषयावर बोलत असत. या बाबतीतली त्यांची मते फार प्रभावित करणारी होती. त्यामुळेच पुढे मी आश्रमाची आजन्म सेविका बनले. आमच्याकाळी विधवांचे केशवपन करणे हा एका धार्मिक आचार आहे असे समजले जात असे व त्याचे पालन

सर्वजण करीत. पण शिक्षणाने माझी मते बदलल्यावर केशवपनाची सक्ती करणे अधार्मिक आहे असे मला वाटू लागले. एवढेच नव्हे तर विधवांचे वपन थांबविण्यासाठी मी हजारो प्रयत्न केले. 'वपन करायचे असेल तर ते नापिताकडून करवून न घेता घरच्या घरी विधवेचा वडील भाऊ अगर तिचा मुलगा यांनी करावे, ही धार्मिक बाब करण्याचे त्यांनी अमान्य केल्यास विधवांनी एकमेकींचे वपन करावे अथवा त्यांच्या वहिनीने ते करावे' असे मी सुरूवातीला सांगू लागले. पण विधवांचे केशवपन नापिताने करणेच सशास्त्र आहे असे खुद्द विधवांनाच रूढीच्या पगड्यामुळे वाटत असे. मात्र माझ्याशी खाजगीत बोलताना त्या म्हणत, 'कोणी मेल्याने ही विधवांची केशवपनाची चाल काढली. रामायण-महाभारत काळात ती असल्याची उदाहरणे नाहीत. वेदकाळातही नाहीत, पण मनुस्मृतीत असल्याचे पुरुष माणसे सांगतात. तरूण विधवांचे वपन दहा पंधरा दिवसांनी करावे लागले तरीसुद्धा नापित त्यासाठी आनंदाने तयार असतात. पण वृद्ध विधवांचे वपन करण्याची ते टाळाटाळ करतात.' या सर्वांवरून शेवटी स्वत:च ह्यासंबंधी उदाहरण घालून दिल्याखेरीज ह्या चालीला आळा बसणार नाही असे वाटून, मी लोकनिंदा, कुचेष्टा, तर्कवितर्क यांच्याकडे दुर्लक्ष करून स्वत: केस वाढविण्यास सुरूवात केली. त्यावेळी कित्येक लोक कर्व्यांना भेटून प्रश्न करीत, 'काय हो कर्वे, तुमच्या पार्वतीबाई काही निराळ्या हेतूने केस वाढवितात की काय?' तेव्हा कर्वे म्हणत, 'असे मला वाटत नाही. तसे असल्यास ते समाजास पुढे दिसून येईलच.' माझ्यापुढे अण्णांचा आदर्श असल्याने माझ्या मतांना एक विशिष्ट वळण लागले होते. विधवेने केवळ व्यक्तिस्वातंत्र्य व समता यामागे लागून स्वत:च्या कुटुंबात झगडत राहण्यापेक्षा मातृभूमीतील विधवांची सेवा करण्यात, त्यांची उन्नती करण्यात आयुष्य घालवावे असे मला वाटले.

प्रो. कर्वे यांची बैलगाडी उलटून त्यांना आजारपण आले. त्यांच्या वर्गणी जमविण्याची कामी मी स्वत: जबाबदारी घ्यावी असे मला वाटले. अण्णांनीही संमती दिली. मी देशभर या कार्याकरिता हिंडले. खूप अडचणी आल्या. सभा भरविल्या. व्याख्याने दिली. अपमान सोसले. या सर्व प्रकारात इंग्रजी येत नसल्यामुळे परप्रांतात अधिकच अडचणी आल्या. शेवटी मी इंग्रजी शिकण्याला माझ्या वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी प्रारंभ केला. अण्णांना ते आवडले व त्यांनी स्वत: मला इंग्रजी शिकवण्याची जबाबदारी घेतली. पुढे त्यांनी मला मुंबईला मिशन हायस्कुलात इंग्रजी शिकण्यासाठी पाठविले. पुढे तर अण्णांच्या पाठिंब्यानेच मला अमेरिकेत जाता आले. पुढे सामाजिक परिषदेत स्त्रीशिक्षणाच्या ठरावावर मी भाषण केले. माझ्या स्पष्ट विचारांमुळे पोषाखी सुधारकांच्या तळपायाची आग मस्तकी गेली. 'सुधारणा ही इंग्रजी पेहेरावात नाही, इंग्रजी पद्धतीच्या राहणीच्या थाटात नाही, तर ती कृतीत आहे.' अभागी विधवांनी संन्यस्त वृत्तीने राहून जीविताचे सार्थक करावे असा मी त्यांना उपदेश केला. इतके



स्पष्ट विचारांचे सामर्थ्य व धैर्य मला अण्णांमुळे प्राप्त झाले. पुढे 'माझी कहाणी' हे आत्मचरित्र वजा पुस्तक मी लिहीले. मराठी पुस्तके इंग्रजीत प्रसिद्ध करणाऱ्या ख्रि. रे. ॲबट या मिशनऱ्यांकडे अण्णांनी ते पाठविले. ॲबट साहेबांना ते अतिशय आवडले. त्यांनी त्याचे इंग्रजीत 'My Story' असे भाषांतर करून स्व:खर्चाने अमेरिकेत प्रसिद्ध केले.

## तीर्थरूप अण्णांनी नवजीवन दिले

सौ. मालती रघुनाथ कर्वे

मला आयुष्यात कोणत्याही कलेचे ज्ञान मिळाले नाही. कोणतीही पदवी मिळाली नाही. पण संस्थेच्या आरंभी संस्थेवर जे सुखदु:खाचे प्रसंग आले त्यापासून व तीर्थरुप गुरुवर्य अण्णांच्या सहवासातून मिळालेल्या ज्ञानाची किंमत सर्व पदव्यांपेक्षा मी मोठी समजते. अण्णांनी आम्हाला नवजीवन दिले.

## कर्तबगार सासुसासऱ्यांच्या सावलीत

सौ. कावेरी भास्कर कर्वे

माझ्या कर्तबगार सासुसासऱ्यांच्या - म्हणजे ती. अण्णा आणि सौ. बाया यांच्या सावलीत मी आणि माझ्या कित्येक मित्रमैत्रिणी लहानाच्या मोठ्या झालो. विधवेशी पुनर्विवाह केल्यामुळे निर्माण झालेल्या लोकापवादाने खचून न जात अण्णा त्याविरुद्ध खंबीर मनाने उभे राहिले. पुढील आयुष्यभर त्यांनी विधवाविवाह व विधवांना आणि सर्वच स्त्रीवर्गाला शिक्षण देण्याच्या कामी स्वत:ला वाहून घेतले. हिंगण्याचा रम्य परिसर अनाथबालिकाश्रमासाठी निवडला. तिथे बांधलेल्या एका झोपडीला आश्रम मानून स्त्रीशिक्षणाचे कार्य सुरू केले. आता या आश्रमाचा विस्तार भारताला भूषणभूत ठरेल असा झाला आहे. समाजाच्या रूढ कल्पनांना रुचेल अशा बेताने हळूहळू सुधारणा केल्या. त्यासाठी स्वत:च्या पत्नीवर म्हणजे बायावर सुद्धा आश्रमात न राहण्याचे बंधन घातले. तिने आश्रमातील मुलींच्या पाण्याला सुद्धा शिवायचे नाही अशी ताकीद होती. बाया पुनर्विवाहित होती, तिला पाहून आश्रमातील मुलींच्या मनात पुनर्विवाह करावा असे विचार येऊ नयेत म्हणून त्यांनी सर्व प्रकारची खबरदारी घेतली. तसे पाहिले तर स्वत:च्या पत्नीवर त्यांनी अन्याय केला असे कोणालाही वाटले असते पण अंगीकृत कार्याला आडकाठी येऊ नये यासाठी तो निर्णय योग्यच

होता. अण्णांनी निष्काम-कर्म-मठ स्थापन करून स्वार्थत्यागी कार्यकर्त्यांचा जथाच्या जथा निर्माण केला. अण्णांना आश्रमवासीय देव मानीत.

बायाला मात्र फक्त अण्णांची पत्नी म्हणून ओळखावे अशी तिची कर्तृत्वशक्ती मर्यादित नव्हती. अण्णांना शोभेल असं तिचंही स्वतंत्र व्यक्तिमत्व होतं. एकसारखे काम, कामाबद्दल अखंड तळमळ, तडफड, कोणाही व्यक्तीबद्दल सहानुभूती व प्रेम आणि प्रत्येकाकडे आपलेपणाने पाहण्याची दृष्टी ही तिची मुख्य जीवनसूत्रे होती. ज्यांना कोणीही जवळ करणार नाही अशा असंख्य चुकल्यामाकल्या स्त्रियांना तिने सन्मार्गाला लावले.

बायासारखी कार्यकर्ती पाश्चात्य देशात असती तर तिने 'Boys Town' सारखी आनंदभवने निर्माण केली असती. आणि 'आमची आई' म्हणून तिचे पुतळे उभारले गेले असते.

हिंगणे येथील संस्थेसाठी तिने पैसा गोळा केला. भाऊबीज फंड जमविला, संस्थेच्या आरंभापासून निरपेक्ष सेवा केली. त्यामुळे पतिपत्नींचे वैवाहिक जीवन त्यागमय झाले.

अण्णांना १०० वर्षे पूर्ण झाली तो दिवस आम्हाला फार शुभ व पवित्र वाटला. 'भारतरत्न' किताब मिळाला- त्याबद्दल सासऱ्यांविषयी अभिमान वाटला. त्यांच्या शताब्दिनंतरच्या आयुष्यात त्यांची सेवा करण्याची संधी मिळाली म्हणून मला धन्यता वाटली. मला अण्णा-बाया पितृमातृस्थानी वाटत होते.

## सुगंध मागे ठेवणारा बकुळवृक्ष ।

सौ. कुंदा नेने (अण्णांची नात)

मला वयाच्या २९-३० वर्षांपर्यंत अण्णांचा सहवास लाभला. मुळातच अण्णांचा स्वभाव फार अबोल. आयुष्यभर त्यांनी आणि माझ्या आईवडिलांनी संस्थेचेच काम केले. त्यामुळे आमच्या घरी एकमेकांशी कामाव्यतिरिक्त बोलणं फार कमी होत असे. त्याला कारण असं की, संस्थेविषयीच्या व्यवहारांबद्दल आगाऊ वाच्यता नको, व्यवस्थित गुप्तता राखली जावी. अण्णा संस्थेच्या लोकांच्या भेटीगाठी व मिटिंग यात नेहमी गुंतलेले असत.

गावापासून आम्ही खूप दूर राहिलो, त्यामुळे पाहुणे-रावळे घरी खूप कमी यायचे. आश्रमातच वास्तव्य यामुळे अनाथ, दु:खी स्त्रियांच्या व्यथा, समस्या असे जीवनाची नकारात्मक बाजू सांगणारे उदासवाणे वातावरण सतत भोवती असे. त्यांची दु:ख कमी करण्यासाठी झटणे येवढेच ह्या अलग जगातील ध्येय होते. मात्र वडीलधाऱ्या



माणसांची सेवाभावी वृत्ती नकळत अंगी बाणवली गेली. आमची आजी- बाया आजारी पडली तेव्हा तिची वेणीफणी करणं, तिला खायला देणं ही कामे मी नियमीतपणे करीत असे.

अण्णा संस्थेच्या कामाच्या बाबतीत फार करारी होते. संस्थेचे कुठलेही काम वेळच्यावेळी झाले पाहिजे, पद्धतशीर झाले पाहिजे, निरपेक्षवृत्तीने आणि नि:स्वार्थीपणाने झाले पाहिजे असा अण्णांचा कटाक्ष होता. हिशेबात तर अतिशय चोखपणा होता. याउलट घरगुती जीवनात अण्णांचा कुठलाही हट्ट नसे. मुलांनी सुनांनी असंच केलं पाहिजे असा दुराग्रह नाही. संस्थेच्या हितासंबंधी अण्णांना फार दूरदृष्टी होती. संस्थेजवळ जसजसा पैसा जमला तसतशी संस्थेच्या आसपास नको ती वस्ती होऊ नये, संस्थेतील वातावरण कायम सुरक्षित रहावे याची काळजी त्यांनी घेतली.

महिला विद्यापीठ आणि ठाकरसी यांच्यात व्यवहारासंबंधी वितुष्ट आले आणि विद्यापीठास ठाकरसी यांच्याकडून मिळणारे अर्थसहाय्य बंद केले अगर महिला विद्यापीठाचे मुख्य कार्यालय मुंबईला हलविण्यात आले तेव्हाही अण्णा धीरगंभीर होते. त्यांना झालेले क्लेश त्यांनी आम्हाला सुद्धा दिसू दिले नाहीत. अण्णांचा सोशिकपणा फार होता. हाती घेतलेल्या कामावर त्यांची आत्यंतिक निष्ठा होती आणि ते कार्य खंडित होऊ नये, त्यासंबंधीच्या मूळ तत्वाचा गाभा कायम रहावा यासाठी ते नेहमी तडजोड करीत. स्वत:च्या नावाच्या प्रसिद्धीसाठी ते केव्हाच हपापलेले नव्हते. मुरूडला झालेल्या जन्मशताब्दि सोहळ्याचेवेळी अण्णा खूप आनंदित झालेले दिसले. त्यांनी तो समारंभ मनापासून Enjoy केला.

अण्णांना बकुळीची फुले फार आवडत असत, म्हणून त्यांच्या आणि बायाच्या समाधीस्थानाजवळ बकुळफुलं नेहमी टपटपावी यासाठी बकुळीची झाडे मुद्दाम लावली आहेत. इवली सुंदर फुलं सुकली तरी सुगंध मागे ठेवणारी- अगदी अण्णांच्या जीवनाचं प्रतिक वाटावे अशी!

## वृद्धापकाळातील दिनचर्या

डॉ. आनंद कर्वे

अण्णाआजोबा आमच्या एरंडवण्यातल्या बंगल्यात रहावयास आले तेव्हा मी सुमारे ६-७ वर्षांचा असेन. अण्णा त्यावेळी ८५ वर्षांच्या पुढे होते. आमच्या वयातल्या या प्रचंड फरकामुळे आमचा एकमेकांशी तसा काहीच संबंध नसे. अण्णा सकाळी लवकर उठून फिरावयास जात, त्यामुळे सकाळचा वेळ ते घरीच नसत. मग ९ च्या सुमाराला ते परत आले की आंघोळ करत. आमची शाळा सकाळी ११ ची असल्याने

आम्ही मुले १० ला जेवायला बसत असू. त्यावेळी अण्णाही आमच्या बरोबरच जेवत. त्यांचा आहार अत्यंत मोजका. एखादी चतकोर भाकरी, किंवा अर्धी चपाती, भाजी, आमटी, एक मूद होईल इतपत भात व जेवणाशेवटी ताक. ते वाटीत नेहमी थोडी आमटी ठेवीत व त्यातच ताक घेत व बोटांनी ताक आणि आमटी नीट ढवळून ते पीत. आम्हा मुलांना याची फार गंमत वाटे. परंतु अशा काही आमच्या मते विचित्र गोष्टी सोडल्यास एरवी त्यांच्या खाण्यापिण्याच्या आवडीनिवडी काही नसत. जे काही केलेले असे ते अण्णा खात. त्यांनी पानात काहीही टाकलेले मला कधी आठवत नाही. जेवणानंतर त्यांची घरातल्या घरात शतपावली चाले.

माझ्या आठवणीतल्या अण्णांना कमी ऐकू येई. त्यामुळे त्यांच्याशी संभाषण करणे म्हणजेच अवघडच होते. एरव्ही सुद्धा तसे ते मुलांच्यात मिसळणारे असे आजोबा नव्हतेच. वयाच्या मानाने धडधाकट आणि हिंडतेफिरते असले तरी मुलांशी खेळणे, उचलून घेणे इ. थोडया दंगामस्तीच्या गोष्टी करण्याचे त्यांचे वयच नव्हते. नाही म्हणायला माझी धाकटी बहीण गौरी, हिला मात्र लहानपणी समोर बसवून काही श्लोक वगैरे त्यांनी शिकवल्याचे आठवते.

बैठ्या खेळांमध्ये मात्र ते इतर कुटुंबियांबरोबर भाग घेत. विशेषत: पत्ते खेळण्यात ते तासन् तास रंगत. मात्र हे सर्व बदाम सात, गुलमचोर, रमी असे सोपे खेळ. ब्रिजसारख्या सीरियस खेळाच्या वाटेला ते कधी गेले नाहीत.

दुपारी त्यांचे वाचन चाले. रोज सुमारे तासभर आमच्या समोर राहणाऱ्या गंगूबाई तांबोळी या त्यांना काहीतर वाचून दाखवीत. संध्याकाळी पुन्हा फिरायला जात, ते अंधार पडता पडताच परत येत. मग रात्रीच्या जेवणापर्यंत रेडियो ऐकत. त्याकाळी टी.व्ही. नसायचा.

अण्णांना भेटायला नेहमी विविध लोक येत. त्यांच्या निमित्ताने अनेक प्रसिद्ध लेखक, पुढारी, पत्रकार, समाजधुरीण व इतर प्रसिद्धव्यक्तींना जवळून पहायला मिळाले.

आमच्या घरी राजा नावाचे एक माथेफिरू कुत्रे होते. ते दुपारचे घराच्या पायरीवर झोपायचे आणि कुणीही पायरी ओलांडून जाऊ लागले की त्याला चावायचे. घरच्या लोकांनाही त्याचा प्रसाद मिळाला होता पण अण्णा आले की मात्र ते मुकाटपणे पायरी सोडून बाजूला जाऊन उभे रहावयाचे व अण्णांना जाऊ द्यायचे!

■ ■ ■



## भारतरत्न डॉ. धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनातील प्रमुख घटना

| | |
|---|---|
| १८ एप्रिल १८५८ | जन्म. |
| १८७३ | राधाबाईंशी लग्न. |
| १८८१ | मॅट्रीक्युलेशन परीक्षा पास. |
| १८८३ | प्रथमपुत्र रघुनाथ याचा जन्म. |
| १८८४ | बी. ए. परीक्षा पास. |
| १८८५ | एल्फिस्टन हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी. |
| १८९१ | राधाबाईंचा मृत्यू. |
| १५ नोव्हेंबर १८९१ | फर्ग्यसन कॉलेज, पुणे येथे नोकरी. |
| ११ मार्च १८९३ | आनंदीबाई ( गोदुबाई जोशी ) पुनर्विवाह. |
| ३१ डिसेंबर १८९३ | विधवा विवाहोत्तेजक मंडळीची स्थापना. |
| १४ जून १८९६ | अनाथ बालिकाश्रमाची मंडळी स्थापना. |
| जून १९०० | आश्रमाचे हिंगण्यास स्थलांतर. |
| ४ मार्च १९०७ | महिला विद्यालय स्थापना. |
| ४ नोव्हेंबर १९०८ | निष्काम-कर्म-मठाची स्थापना. |
| ३ जून १९१६ | महिला विद्यापीठाची स्थापना. |
| १८ एप्रिल १९१८ | ६१ वा वाढदिवस. |
| १९२० | सर विठ्ठलदास ठाकरसींची देणगी. |
| १८ एप्रिल १९२८ | ७१ वा वाढदिवस. |
| १९२९ - १९३० | त्रिखंड प्रवास. |
| १९३० - १९३२ | आफ्रिकेचा प्रवास. |
| १९३२ | ठाकरसी ट्रस्टींशी बेबनाव. |
| १९३५ | ठाकरसी ट्रस्टींशी तडजोड. |
| १९३६ | महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक-शिक्षण मंडळाची स्थापना. |
| १८ एप्रिल १९३८ | ८१ वा वाढदिवस. |
| १९४२ | बनारस हिंदु विश्वविद्यालयाकडून डी.लिट्. पदवी. |
| १९४४ | समता संघाची स्थापना. |
| २१ नोव्हेंबर १९५० | आनंदीबाई उर्फ बायाचा मृत्यू. |
| १९५१ | पुणे विद्यापीठाकडून डी.लिट्. पदवी. |
| १९५४ | महिला विद्यापीठाची डी.लिट्. पदवी. |

| | |
|---|---|
| २९ नोव्हेंबर १९५० | आनंदीबाई ऊर्फ बायाचा मृत्यू. |
| १९५१ | पुणे विद्यापीठाकडून डी.लिट्. पदवी. |
| १९५४ | महिला विद्यापीठाची डी.लिट्. पदवी. |
| १९५५ | पद्मविभूषण. |
| १९५७ | मुंबई विद्यापीठाची एल्.एल्.डी. पदवी. |
| १९५८ | भारतरत्न, जन्मशताब्दि वर्ष. |
| ९ नोव्हेंबर १९६२ | निधन. |

■ ■ ■



# संदर्भसूची


| | पुस्तकाचे नाव | लेखक | सन |
|---|---|---|---|
| १) | धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र. | कर्वे धोंडो केशव, पटवर्धन नारायण महादेव. | १९५८ |
| २) | आधुनिक भारताचे शिल्पकार धोंडो केशव कर्वे | चंदावरकर गणेश लक्ष्मण | १९७४ |
| ३) | हिंगण्याच्या संस्थेत मी | कर्वे भास्कर धोंडो | १९८६ |
| ४) | माझे पुराण | कर्वे आनंदीबाई धोंडो | १९५१ |
| ५) | माझी कहाणी | आठवले पार्वतीबाई | १९३६ |
| ६) | तपोमूर्ती कर्वे | शिखरे दामोदर नरहर | १९६३ |
| ७) | हिंगण्याच्या माळावर | कर्वे कावेरी भास्कर | १९७७ |
| ८) | भाग्यवान शतायुषी | नित्सुरे य. गो. | १९५८ |
| ९) | माझी पायपीट | परांजपे शांताबाई | १९९३ |
| १०) | हिमालयाची सावली | कानेटकर वसंत | १९७२ |
| ११) | Looking Back | Karve Dhondo Keshav | १९३६ |
| १२) | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था साठ वर्षे | मोडक विश्वनाथ आबाजी | १९५६ |
| १३) | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था हीरक महोत्सव ते माणिक महोत्सव | पालकर केशव रामचंद्र | १९६७ |
| १४) | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था माणिक महोत्सव ते अशीतिक महोत्सव | पालकर केशव रामचंद्र | १९७६ |
| १५) | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था अशीतिक महोत्सव ते नवती महोत्सव | पालकर केशव रामचंद्र | १९८६ |
| १६) | शतायुषी अण्णासाहेब कर्वे गौरव समिती कार्याचा अहवाल | मोरे शं. दा. | १९६० |
| १७) | कर्वे-परांजपे (लेख) महाराष्ट्र टाइम्स | परांजपे सई | १६/४/९५ |
| १८) | शतायुषी स्त्री शिक्षण संस्था (लेख) महाराष्ट्र टाइम्स | जोशी वा. भा. | १४/६/९५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व (लेख) महाराष्ट्र टाइम्स | कुलकर्णी अंजली | १४/६/९५ |
| १९) | कर्वे स्त्री शिक्षण संस्था-एक आधारवड (लेख) ऐक्य | देशपांडे मालतीबाई | १४/६/९५ |
| २०) | दीपस्तंभाचे स्मरण (लेख) ऐक्य | डॉ. दीक्षित लीला | १४/६/९५ |
| २१) | वटवृक्षाच्या छायेत (लेख) ऐक्य | चिटणीस सत्यवती | १४/६/९५ |
| २२) | शतायुषी शिक्षण संस्थेचे सिंहावलोकन (लेख) लोकसत्ता | परळकर सुवर्णा अरविंद | १३/६/९५ |
| २३) | स्त्री मासिक - कर्वे विशेषांक | विविध लेख | एप्रिल १९३८ |
| २४) | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था नवती महोत्सव स्मरणिका | पालकर केशव रामचंद्र | १९८६ |
| २५) | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था वार्षिक अहवाल | जोशी वा. भा. | १९८९-९० |
| २६) | महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था | जोशी वा. भा. | जून १९९१-९२ |
| २७) | महर्षी कर्वे - १०५ वर्षांचे जीवन दर्शन (अल्बम) | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था | एप्रिल १९६३ |


■ ■ ■